इलासुंदरी.

प्रकरण १ लें.

आरंभ.

संवत् १६१२ त राजपुतान्यांतील चिरविख्यात चितोडशहरीं, ही ऐतिहासिक आख्यायिका घडली. त्याच्यापूर्वी, राजपुतान्यांतील प्रबल पराक्रमसंपन्न राजांनीं *तार्तरी सम्राट सिकंदरशहाची सत्ता एकीकडे गुंडाळून ठेऊन अवघ्या राजपुतान्यांत स्वतंत्रतेची पताका फडकविली होती. तेव्हां सिकंदरशहा आपल्यास जरी भारतवर्षाचा सार्वभौम राजा असें मानी, तरी तें केवळ नाममात्रच होतें. फक्त दिल्ली शहर आणि त्याच्या आसमंतांतील थोडासा प्रदेश त्याच्या स्वाधीनतेंत होता.

सिकंदराच्या मुख्य सेनानायकाचें नांव हेमू ह्याच हेमूनें संवत १६११ त विपुल युद्धसामग्री व सेना घेऊन, मेवाडप्रांतास घेरा घातला. हेमूच्या मनाची बालंबाल खातरजमा होती कीं, आपल्या युद्धकौशल्य विशारद व समरांगण चतुर सैनिक वीरांस पहातांच रजपूत लोक युद्धाचा हिय्याच धरणार नाहींत. ते दांतीं तृण धरून आपल्यास शरण येतील. माझ्या सारखा समरधीर व वीराग्रणी स्वत: सैन्याधिपत्य स्वीकारून युद्धास सिद्ध होऊन आला तर रजपूत लोक कर्तव्यविमूढ झालेच पाहिजेत. आणि आपला पराभव झाला असें समजून त्यांनीं, मी सांगेन त्या अटी मान्य केल्याच पाहिजेत. आपण असंख्य मणिमुक्ता सुवर्णाची लूट मिळवूं. सारांश, दोन्ही कडून आपले इच्छित हेतु सफल होतील;

असा हेमूचा पक्का विश्वास होता. हेमू अशा मनोराज्य तरंगांत गुंग होता परंतु त्याची उमेद सफाई निष्फळ झाली. प्रातःस्मरणीय शूराग्रगण्य, कट्टेस्वाभिमानी, स्वदेश प्रीत्यर्थ प्राणांचीही बेपर्वा करणारे रजपूत लोक, हेमूच्या सेनासागरास बिलकुल भ्याले नाहींत. त्यांनीं, मारूं किंवा मरूं अशा असामान्य दृढनिश्चयानें यवन सेनेवर वारंवार हल्ला केला. आणि यवन सेनेस, हा जीवलोक नकोसें झालें. शेवटीं रजपूतवीरांनीं यवनांचीं शस्त्रास्त्रें काढून घेऊन त्यांस समरभूमिवरून हांकून लाविलें.

रजपूत लोकांनीं हेमूचा सर्वैव पराभव केला. तरी तो निराश झाला नाहीं. तो बंगाल प्रांतांत गेला आणि राजमहालच्या किल्ल्यांत राहिला. तेथें तो, आपल्या पराजयाचा मोबदला कसा मिळवावा ? रजपूतांचा कोणत्या युक्तिप्रयुक्तीनें पराभव करतां येईल ? ते लोक कोणत्या उपायानें झटकन आपल्या कबजांत येतील ? अशा विचारांत अहर्निश निमग्न असे. अनेक प्रकारच्या साधक बाधक गोष्टींचा विचार करून शेवटीं हेमूनें आपल्या मनाचा असा पक्का निश्चय ठरविला कीं, आग्नेयास्त्रांपुढें दैहिकबलाचा बहुधा टिकाव निवणार नाहीं. एतदर्थ आपण त्याचीच यथास्थित सिद्धता करूं म्हणजे आपले सर्व उद्देश हटकून साध्य होतील. त्यानें तेव्हांच चट्टगांवीं आपले कित्येक लोक पाठविले. पोर्टुगीज लोकांस द्रव्यानें संतुष्ट केलें; शेंकडों परदेशीय लोक आणविले आणि दारुगोळ्याची तोफखान्याची व लष्कराची जंगी तयारी केली.

उदयपुराधिपति संगराणा परलोकवासी झाल्यानंतर, विक्रमजित् सिंहासनावर बसला. तो फार निष्ठुर व दुराचारी होता. ह्यामुळें रजपुतांस, तो प्रिय नव्हता फारच थोड्या अवधींत बहुतेक रजपूत. विक्रमाजितावर बिथरले आणि त्यांनी त्याशीं युद्ध आरंभिलें. त्यांत विक्रमाजिताचा पराभव झाला. आणि रजपूतांनीं संगराण्याचा द्वितीयपुत्र उदयसिंह, कमलमीर येथें होता; त्यास तेथून आणून सिंहासनाधिष्ठित केलें. एकदां गृहविवादास आरंभ झाला कीं, बहुतांशीं त्याचा परिणाम फार वाईट होतो. विक्रमाजिताच्या पक्षाचा मोड होतांच, त्याच्या पक्षांतील बहुतेक रजपूत लोक, दाही दिशा भडकले. त्यांपैकीं कित्येक दक्षिणेकडे; कित्येक पूर्वे-

कडे आणि कित्येक रजपूत कुलकंटक हेमूकडे जाऊन त्याच्या चाकरीस राहिले.

आपला अपकीर्ति कलंक, रजपुतांच्या आरक्तरक्तानें धुऊन साफ नाहींसा करण्याविषयीं अतिशय उत्सुक व गतवैभव संपादन लालसेनें उच्छृंखल झालेला हेमू संवत १६१२ त तीस हजार पायदळ, बारा हजार घोडेस्वार, पांच हजार गोलंदाज आणि तीस तोफा बरोबर घेऊन मेवाडा-वर चाल करून आला. तव्हां विक्रमाजिताच्या पक्षातील ५१३ क्षत्रिय कुलकलंक स्वजाति बांधवांच्या रक्तानें आपलीं हत्यारें कलंकित कर-ण्याकरितां हेमूबरोबर आले होते. आणि त उदयसिंहाचा सर्व नाश कसा होईल ? त्याच्च विवेचनेंत गर्क होते ! त्यास आपल्या देशाची धर्माची, जातीची, कीर्तीची किंवा कर्तव्याची कांहीं चाडच नव्हती. आपल्या अशा नीच कृत्यानें केवळ उदयसिंहाचाच पराभव होईल असें नाहीं तर आपणास अक्षय्य कलंक लागेल; आपल्या परमप्रीय देशाची राखरांगोळी होईल; रजपूत जातीचा अलौकिक क्षात्रगौरव निलयास जाईल; असें किंवा अशा सारखेच क्षत्रियोचित सद्विचार त्यांच्या मनांत कसे आले नाहींत जगदीश जाणे आणि तेंही खरेंच. कोणताही मनुष्य कर्तव्या-विषयीं एकदां दृढ प्रतिज्ञ झाला आणि मी मनांत आणीन ते करीन; असा त्याचा कायम संकल्प झाला, ह्मणजे सारासार विचाराचें त्याला भानच नाहींसें होतें. मग तो स्वार्थांध देशाच्या बऱ्या वाईटाकडे, सुख-दुःखाकडे, हितानहिताकडे, कीर्ति अपकीर्तिकडे, किंवा सत्यासत्याकडे पहातच नाहीं.

हेमू फार अभिमानी असे. तो शूर पुरुष होता साहस व दिट्या हे युद्धोपयोगीं गुणही त्याच्या अंगीं चांगले वसत होते एका लढाईत पराजय झाला ह्मणून कराघातानें कपाळ ताडन करीत रडत बसावें; असें त्याला मुळीच वाटत नसे एक प्रयत्न फसला; दुसरा करून पहावा. दुसरा निष्फळ झाला; तिसरा, तिसरा साध्य झाला नाहीं, तर चौथा करावा. असे तो पुष्कळ प्रयत्न करी. मनुष्य मात्राच्या आशेस सीमा नाहीं, हें जरी खरें, तरी हेमू कधीं हताश झाला किंवा प्रयत्न सोडून केवळ दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसला; असें झालेंच नाहीं कारण अया-

पराजय अनिवार्य आहे; हें त्याला चांगले माहीत होतें. आपले लोकांस ईर्षा यावी; त्यांनीं उत्साहानें युद्ध करून आपण विजयी व्हावें; अशा उमेदीनें, साभिमानानें व वीरदर्पानें तो स्वसेनानायकांस व सहायकर्त्या रजपुतास वारंवार सांगे. ' ह्या युद्धांत आपल्या पक्षाचा हटकून जय झालाच पाहिजे. आपण हिंमतीनें लढाई करूं तर जय-जय म्हणजे विशाद काय ? तुम्हीं आपल्या प्राणांची पर्वा करणार नाहीं. माझी आज्ञा शिरसा मान्य करून युद्ध कराल तर पहिल्या मुकाबल्यासच विजय संपादन कराल. काफ-रांचा संहार करणें हेंच तुमचें मुख्य कर्तव्य आहे ! मी तुम्हांला खात्रीनें सांगतों कीं, ह्या सेवेच्या लढाईंत तुम्हां जी लूट मिळवाल ती तुम्हांस बक्षीस आहे. तुम्ही विजयी झाला तर कीर्तीच्या शिखरास पोंचाल आणि धैर्यानें युद्ध करतां करतां समरंगण क्षेत्रांत पडला तर देवलोकच्या सौख्यानंदांत चिरकाल वास कराल. '

केव्हां जाईन आणि चितोडदुर्गाक्रमण करीन ? अशा उमेदीनें हेमू राजमहालाहून निघाला. आणि एकविसावे दिवशीं स्वदलबलासह कमलगडास आला. त्यानें तेथून दोन योजनें दूर-उदयसागराच्या कांठीं आपला तळ ठोकिला. उदयसागरच्या पूर्व पश्चिम दिशांस गगनभेदी अरवली पर्वत आहे. त्या उन्नत गिरिराजाच्या समंतात् भागीं यवन-समुच्या डेरे, तंबु व राहुट्या ह्यांची एकच गर्दी उसळली. उदयसागराच्या उत्तर तटीं हेमूनें आपला लाल तंबु ठोकिला होता. त्याची सुवि-स्तृत शिखरपताका सुगंध शीतल मारुतानें फडकत होती. त्या तंबुच्यापुढें एक भव्य मंडप होता आणि त्याच्या दोन्ही बाजूंस इतर सेनानायकांचे तळ पडले होते. त्यापासून सुमारें हजार बाराशें हातांवर इतर सैनिक-वीरांनीं आपल्या छावण्या दिल्या होत्या

फाल्गुन मास लागला -प्रकृति आपल्या प्रियकरास भेटण्याच्या आतुरतेनें मधुर -मनोहर रूप धारण करूं लागली— ती उल्हा-सानें हसूं लागली—ती मधुमासाची सूचना देते कीं काय ? असा सर्वांस भास होऊं लागला. अरवली पर्वतावरील अनेक जातींच्या व चित्र-विचित्र रंगांच्या वृक्ष श्रेणी, नूतन पल्लवांनीं सुशोभित झाल्या. लतादि-कांस सुगंध सुमन गुच्छांनीं अपूर्व शोभा येऊं लागली. त्या आनंद निके-

सन काननांत बहुविध रंगाचे अनेक पक्षी, मंजूळ व गंभीर किलकिलाट करूं लागले. कित्येक तरुशाखांवरील पुष्पमालेवर मधुलोलुप भ्रमरावली गुंजारव करूं लागली. कोकिला पिऊ पिऊ करून स्वप्राण प्रियास बोलावूं लागल्या. सारांश, प्रकृतिचें सुहास्य मुखारविंद पहातांच, सर्वांस अत्यानंद झाला.

संध्याकाळचा चारघटका दिवस होता. हेमू तंबू बाहेर गेलेला होता. त्याच्या तंबूंत लोकांची जा-ये-क्वचित होती. अगदींच नव्हती असें म्हटलें तरी चालेल. सेनापति हेमूच्या तंबूंत एक जगन्मनोहारिणी रूपवती तरुणी एकटीच बसली होती. त्या सुंदरीचें वय १८—२० वर्षांचें असावें. तिची देहकांती सुवर्णासारखी होती. तिचे गाल गुलाबाच्या फुलासारखे दिसत. हरणीच्या नेत्रास खालीं पहावयास लावतील असे विशाल, चंचल, काळे नेत्र महान विचार सागरांत निमग्न झाले असावेत असें भासें. तिच्या नेत्रकमल चांचल्यांत क्षणोक्षणीं निरनिराळा भास होत असे. कविवर्णित चंपाकळी पेक्षांही तिचें सरळ नाक सुरेख दिसें. विद्रुमोपम ओष्ठ, कुंदकलिका प्रमाणें परम शुभ्र दंतपंक्तीस शोभा देत होते. तिनें आपले लांब व कुरळ केश पृष्ठभागीं मोकळेच सोडिले होते. कानाजवळच्या कुरळ केशपंक्तीकडे पहातांच, गुलाबी गालांवर भ्रमरावली मधुसेवनार्थ गुंजारव करित आहे काय ? असें वाटें. तिच्या मनोहर, कमानदार भृकुटी क्षणोक्षणीं विचार तरंगांनीं तरंगित होत होत्या. आणि विस्तृत कपाल, तिच्या एकंदर गोंडसपणास फारच शोभा देत होतें. तिनें आपले कंठांत कित्येक अमोलिक भूषणें घातलीं होतीं. तिच्या अंगांत शुभ्र रंगाचें पेहरण होतें. त्यावर हिरव्या रंगाचें - ज्याला मोत्यांच्या गुंड्या लाविल्या असून हात नाहींत असें—एक अंगवस्त्र होतें तिच्या हातांत हिरेजडित कंकणें होतीं. पायांत लाल रंगाचा रेशमी पायजमा होता तिच्या हस्तपद कमलांचीं नखें मेंदीच्या रंगानें रंगविलेलीं होतीं. ती नवयौवनसंपन्न सुंदरी खुर्चीवर बसली होती. त्या तरुण रमणीनें आपला डावा पाय खालीं सोडून त्यावर उजवा पाय ठेविला होता आणि विचारांत निमग्न होऊन ती स्वस्थ बसली होती.

प्रकरण २ रें

परिचय.

उदयपुराधिपति संग राण्याचा पेशवा किंवा मुख्य प्रधान माधवराव. माधवरावाचा पराक्रम कीर्ति, लौकिक, मानमरतबा, चातुर्य व धाकदरारा अवघ्या राजपुतान्यांत माहीत नाहीं असा एकही मानव प्राणी नसेल. सर्व लोक त्याची मानमान्यता चांगली ठेवीत. सर्व त्याच्या राजकारणपटुत्वाची तारीफ करीत. संग राण्याचाही त्यावर पूर्ण विश्वास होता तो कोणतीही सल्लामसलत माधवरावाच्या अनुमतावाचून कधींच करीत नसे. महाराण्याची त्यावर कृपा असल्यामुळें सर्व प्रजा त्याच्या धाकांत असे. माधवरावास एकुलतीएक कन्या होती, तिचें नाव इलासुंदरी इलासुंदरी लहान असतांनाच, तिची माता परलोकवासी झाली तरी माधवरावाच्या बहिणीनें तिचा चांगला प्रतिपाल केला. दामिनी नांवाच्या एका दासीस राजपुतान्याचा बराच इतिहास माहित होता. ती इलासुंदरीस दूध पाजीत असे. दामिनीच्याच मांडीवर इलासुंदरी लहानाची थोर झाली. ती लहान होती तेव्हांपासूनच दामिनी तिला राजन्या व वीरांगनांच्या अनेक रसभरित कथा सांगे. केव्हां वीरश्रेष्ठांच्या व सती शिरोमणी साध्वी स्त्रियांचीं गाणीं तिला ऐकवी. इलासुंदरीला चांगलें समजूं लागलें, तेव्हां पराक्रमी पुरुषांच्या मनोवेधक व वीररसप्राधान्य वार्तालापांनीं दामिनी तिचें मन रमवी. रात्रीस तर दामिनीच्या मनोरम गोष्टीशिवाय इलासुंदरीस झोंपच येत नसे. तिची माता लहानपणींच मृत्यु पावल्यामुळें आणि माधवरावाच्या वजनामुळें सर्व लोक इलेस जीव की प्राण करीत. माधवरावाच्या बहिणीचें तर स्वप्राणापेक्षांही इलासुंदरीवर फार प्रेम होतें. माधवरावाचीही तिजवर निःसीम प्रीति असे. बालपणापासूनच इलेचे अतिशय लाड होऊं लागले यामुळें ती फार हट्टी, अभिमानी व हेकट होऊन स्वतंत्रपणानें वागत चालली ती म्हणेल तें सर्वांनीं ऐकावें. तिचे हट्ट सर्वांनी पूर्ण

करावेत आणि तिच्या आज्ञेंत सर्वांनीं वागावें असा तिचा गुरारा असे. राग असे तिच्या मनाविरुद्ध कोणी कांहीं केलें कीं, एकदम आकांत करी. एखादी जिन्नस तिनें मागितली आणि जेव्हांच्या तेव्हांच ती तिला आणून दिली नाहीं म्हणजे रागाच्या झपाट्यानें ती तडक आरडूं लागे. एखादी वस्तु आपल्या दृष्टीपुढें आणूं नका असें तिनें सांगितलें आणि जरी विस्मृतीनें ती वस्तु पुढें आणिली गेली तर त्या आणणाराचीं शंभर वर्षें भरलींच म्हणावयाचीं. ती सर्वांच्याच प्रीतींतील असल्याकारणानें तिला कोणी कांहींच बोलत नसे. तिचें मागणें शिरसा वंद्य करणें सर्वांस भाग पडे. यदाकदाचित माधवरावानें किंवा त्याचे बहिणीनें इलेस रीतीच्या गोष्टीविषयीं कांहीं सांगितलें. अथवा धमकी दिली तर ती क्रोधाच्या फणकाऱ्यानें एखाद्या खोलींत जाऊन एक दोन दिवस निराहार–निरुदक अंथरुणावर पडून राही. खोलींत जाऊन एकदां तिनें दाराची कडी लाविली कीं, कोणी कितीही कपाळकूट करो; इला कडी काढील तर शपथ, जेव्हां तिच्या पोटांत कावळे कोकूं लागावें; आतां आपलें फार आर्जव झालें; पुन्हां आपणास कोणी कांहीं बोलणार नाहीं, अशी तिची खात्री व्हावी, तेव्हां मोठ्या मिनतवारीनें तिनें दार उघडावें. तुम्हीं कितीही आर्जवें करा, नाक घांसा, क्षमा मागा, पण इलेस एकदां राग आला कीं, तो घालविण्यास महत् प्रयास केले, तरी तो जात नसे. आणि गेला असें बाह्यतः जरी दिसलें तरी त्या क्रोधाग्नीच्या ज्वाला, बरेच दिवस शांत होत नसत. इलेच्या रागीट स्वभावापुढें, सर्वांस हात टेंकण्याची पाळी येई. रागाच्या भरांत जें हातीं सांपडेल तें दुसऱ्याच्या कपाळावर हाणण्यास ती मागें पुढें पहात नसे. इलासुंदरी जसजशी मोठी होऊं लागली, तसतसा तिचा क्रोधही वाढतच चालला. तिचा स्वभाव जरी रागीट होता, तरी बुद्धी तीव्र होती. ती, दामिनीच्या तोंडच्या ज्या कथा किंवा गाणीं ऐके त्या सर्व तिला मुखोद्गत होत्या. आणि त्यांचें तत्व ती नेहमीं आपल्या हृदय भांडारांत संचित करी. आपल्या मनास आवडणारा कुलीन, सद्गुणी व धीरोदार पति मिळेल तेव्हांच लग्न करावयाचें, नाहीं तर अविवाहित रहावयाचें, अशा मनोनिग्रहामुळें ती इतकी मोठी झाली तरी कुमारिकावस्थेंतच

होती. तिचें सतीत्व स्तुतिपात्र होतें. तिच्या क्रोधास सीमा नसे हें खरें; परंतु तिच्या अंगीं पुष्कळ सद्गुण वास्तव्य करीत होते. ती चतुर, प्रसंगावर नजर देऊन वागणारी व स्वधर्मप्रिय आणि जात्याभिमानी होती.

दामिनी बोलून चालून दासी. ती हीन कुलांतील असल्यामुळें तिचे विचार बहुधा हीनच असत. तिच्या सारखी धनलुब्ध स्त्री, अवघ्या त्रिभुवनांत सांपडणें कठीण ! तिची वाक्‌शक्ति व बहुश्रुतपणा नावाजण्या सारखा होता. पण तिच्या स्वभावतःच परम लोभी स्वभावापुढें तिचाही नाइलाज होई.

विक्रमाजिताच्या अमानुषिक व्यवहाराचा माधवरावास फारच वीट आला होता. तो नेहमीं रजपूत राजेरजवाड्यांकडे व सामंत मांडलिकांकडे वारंवार जाऊन, विक्रमाजितास युक्तिनें नाहींतर सक्तीनें पदच्युत करून, उदयसिंहास सिंव्हासनावर बसवूं असें सांगे. कोणाच्याही मनांत एखादी लालसा प्रबलतेनें उत्पन्न झाली आणि ती, सिद्धीस न्यावयाची असा त्याचा दृढनिश्चय ठरला; ह्मणजे दुसऱ्या गोष्टींकडे त्याचें बहुतांशीं अलक्ष्य होतें. तीच स्थिती आपल्या माधवरावाची. अन्यायाचरणी विक्रमाजितास राज्यासनावरून काढून उदयसिंहास केव्हां राज्याभिषेक करीन या प्रबलतर इच्छेनें माधवरावाचें खाण्यापिण्याकडे किंवा संसाराच्या इतर भानगडीकडे फारसें लक्ष्यच लागत नसे. ह्याच वेळेस इलेच्या असाधारणरूप लावण्याची जिकडे तिकडे प्रख्याति झालेली होती. कित्येक तरुण, तिच्या पाणिग्रहणाची आकांक्षा धरून होते. त्यांत यवन सेनाधिपति हेमू तर त्या देववांछित परम सुंदरीच्या प्रेमजालांत अगदींच गुरफटून गेला होता. त्याच्या मागें जरी हजारों उपद्व्याप होते, तरी इलासुंदरीची रति पेक्षांही परम रमणीय मूर्ति त्याच्या अंतःकरण मंदिरांत प्रत्येकक्षणीं विराजमान् होत असे. इला आपल्या महालांत असावी, अशा इरायानें हेमूच्या हजार खटपटी आणि लटपटी सुरू असत. ती आज ना उद्यां आपल्या हस्तगत होईल; एतदर्थ त्याचें प्रत्येक क्षणीं निरनिराळ्या तऱ्हेचें छल-बल-कौशल्य सुरू होतें. हेमू केवळ दुराग्रहाचा मूर्तिमंत पुतळा होता. आणि आपण मनांत आणूं तें सिद्धीस नेल्याशिवाय रहाणार नाहीं अशी त्याची धमकही होती. आपली प्रत्येक

वासना पूर्ण करण्याकरितां तो धनाकडे, परिश्रमाकडे फार तर काय? परमप्रीय प्राणाकडेही पहात नसे. माधवराव, उदयसिंहास राज्याभिषिक्त करण्याच्या भानगडींत होता. त्याला स्वगृहस्थितीकडे लक्ष्य धावयास सवडच नव्हती. हीच संधी हेमूस फार फायदेशीर झाली. त्यांतच दामिनी सारखी धनलोभी दासी त्याला अनुकूल झाली. एकदां संध्याकाळच्या वेळीं इलासुंदरी आणि दामिनी, उदयपुरांतील एका परम रमणीय पुष्पोद्यानांत वायु सेवन करीत चालल्या होत्या. दामिनी हेमूच्या यशराशीचें सुरस वर्णन करीत होती. इतक्यांत, वेषांतर केलेले दोन यवन तरुण अकस्मात तेथें आले. त्यांस पहातांच दामिनी तेथून निसटली त्याबरोबर इलासुंदरीच्या तोंडांत बोळा देऊन त्या तरुणांनीं तिला एकदम उचलली आणि सुसाट पळ काढिला.

रात्रीं भोजनाच्या प्रसंगी, इलेच्या आतेनें तिची चौकशी केली. तेव्हां दामिनीनें 'तिची प्रकृति नीट नाही. तिला आज जेवायला नको. ती स्वस्थ झोंपली आहे.' असं खोटेंनाटें सांगून वेळ मारून नेली. तरी दुसरे दिवशी तिचा शोध झालाच. तेव्हांही दामिनीनें 'प्रातःकालींच ती बागेंत गेली होती पण अद्यापि आली नाहीं. असें मलतेंच सांगितलें' तरी इलेच्या आतेनें तिचा कसून तपास केला. सर्व शहरभर तिला शोधण्याकरतां चाकर नोकर व दासदासी पाठविल्या. तरी इलासुंदरीचा पत्ता लागेना. शेवटीं तिनें माधवरावास ते वर्तमान सांगितलें. त्यानेही शोधाची होती नव्हती तितकी शिकस्त केली. तरी तिचा थांग नाही तो नाहींच. माधवरावानें फार पश्चात्ताप केला. क्षणाक्षणीं अनेक सद्सद्विचार त्याच्या मनांत येऊं लागले. त्याचें मन कोठेंच लागेना. प्राणापेक्षांही प्रियकन्या नाहींशी झाली; तिचा इतका शोध केला तरी तपास लागत नाहीं. काय ही आपली शोचनीय स्थिती ? अशा तऱ्हेच्या अनेक प्रकारच्या दुःखकारक विचारामुळें माधवराव फारच खचला. त्याच्या जिवास स्वास्थ्य नाहींसें झालें. त्याला कोठेंच करमेना; पहावें तेव्हां तो विचारसागर लहरींत परिमग्न असे. इलेशिवाय कोणत्याच गोष्टीकडे त्याचें चित्त लागत नव्हतें. त्या बिचाऱ्याला केवळ औदासिन्यानें घेरिलें. दिवसेंदिवस त्याची शक्ति क्षीण होत चालली. इलासुंदरी सांपडत नाहीं

असें त्याच्या मनानें निश्चित ठरल्यापासून अवघ्या पंधरा दिवसांत तो मरणोन्मुखासारखा दिसूं लागला. सोळाव्या दिवशीं एका महात्म्यानें इलासुंदरी हेमूच्या गृहीं सुखरूप आहे असें त्याला सांगितलें. तेव्हां माधवरावास वज्राघातप्राय दुःख झालें. शोकातिशयानें आणि संतापानें तो अगदीं विव्हळ झाला आपली पूर्वस्थिती आठवून आणि उदयसिंहास राज्याभिषेक करण्याच्या भानगडींत पडल्यापासून आपली सर्व प्रकारें फार नुकसानी झाली. आपल्यासारखा अज्ञानी कोणी नाहीं, असें त्याला भासूं लागलें. इला गेल्यापासूनच त्यानें अन्नपाणी वर्ज केलें असें म्हटलें तरी चालेल. आणि तशा स्थितींत तो असतांना जेव्हां त्यानें ऐकिलें कीं, ती हेमूकडे आहे. तेव्हां तर त्याच्या दुःखशोकाचा अतिरेकच झाला ! आपला दुर्लौकिक झाला. असा त्याच्या मनाचा संकल्प होतांच त्यास ' देमाय धरणीठाय ' असें झालें. सारांश; इला नाहींशी झाल्यापासून अवघ्या एक महिन्यांत माधवरावाचा अंत झाला ! त्या सत्पुरुषानें हा अत्याचार पीडित आणि पातक प्रपुरित लोक सोडून शांतिनिकेतन स्वर्गधामांत वास्तव्य केल्यावर थोडक्याच अवधींत त्याच्या भगिनीनेंही त्याच मार्गाचें अवलंबन केलें. ! !

इलासुंदरी हेमूच्या तंबूंत आल्यावर बरेच दिवस निराहार होती. कोणीही अन्न किंवा उदक घेऊन तिजकडे गेलें कीं, ती नागिणी सारखी फणफण त्याच्या अंगावर येई, अद्वातद्वा शिव्या देई आणि हातीं सांपडेल ती वस्तू घेऊन मारूं लागे. शेवटीं दुःख, चिंता-- शोकातिशयानें ती इतकी दुर्बल झाली कीं, शय्येवरून उठण्याचेंही तिला सामर्थ्य राहिलें नाहीं. हेमूनें आपली होती तितकी पराकाष्ठा केली. वैद्य झालें; हकीम झाले. प्रत्येकानें आपआपल्या औषधांचा व चिकीत्सेचा स्तुतिपाठ गाऊन होते तितके परिश्रम करून पाहिले. परंतु कांहींच उपयोग झाला नाहीं. आतां इलासुंदरी खास वांचत नाहीं ती मृत्युशय्येवर अक्षय्य झोंपणार-तिला कोणत्याही औषधानें गुण येण्याची आशा राहिली नाहीं, अशी सर्वांची खात्री झाली. अखेरीस ती अत्यवस्थ आहे हें वर्तमान, हेमूनें रामानुजस्वामीस सांगितलें रामानुजस्वामी हा उदासीपंथांतील एक महान् सत्पुरुष होता. तो, केवळ सत्याचा भुकेला आणि परोपकार-

दक्ष असे. त्यानें उदारबुद्धीनें इलासुंदरीस मणिमंत्रौषधी देऊन निरोगी केलें.

इलासुंदरी रोगदुःखयंत्रणेंतून निर्मुक्त झाल्यावर पूर्व स्थितींत येऊं लागली. हेमूनें आपला सर्व नाश केला अशी तिची खात्री पटली. तेव्हां ती त्यास पहातांच, क्रोधसंतप्त होऊन बेधडक त्याच्या अंगावर धांवे. नानाप्रकारचीं कटु भाषणें बोले. केव्हां केव्हां स्वस्थ राही. केव्हां आपली पूर्वस्थिती स्मरून आक्रोश करी. केव्हां अंतरंगदुःखातिशयानें टपाटप क्रोधाश्रु गाळी. बरेच दिवस अशा शोचनीय स्थितींत गेल्यावर जेव्हां तिच्या मनाची खात्री पटली कीं, आपण कितीही दुःख प्रदर्शित केलें; किंवा आकांत केला तरी आपली येथून सुटका होणार नाहीं. आतां हेमूवर आपली प्रीति आहे, असें बाह्यतः दाखवून हिमतीनेंच स्वकार्यभाग साध्य केला पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं.

हेमूनें इलासुंदरीस आपली धर्मपत्नी करीन अशी जणुं काय प्रतिज्ञाच केली होती—तो लग्नाकरितां तिला नेहमीं निरनिराळ्याप्रकारचीं लालुच दाखवी. तिच्या मर्जीप्रमाणें वागे. गोडगोड बोले. फार तर काय ? इलासुंदरीची प्रत्येक आज्ञा झेलण्यास तो एकापायावर तयार असे. परंतु, ती हें त्याचें प्रत्येक ढोंगी कृत्य ओळखून होती. ती त्याच्या प्रत्येक मधुर भाषणाकडे बिलकुल कानाडोळा करी. एखादेवेळीं हेमूनें फारच लाडिगोडी लावून लघळपणा केला कीं, ती संतापून त्यावर दांतओंठ चावे—बेजबाब बोले—मारूं धांवे आणि मारी देखील. तरी पुन्हां हेमूचा लघळपणा सुरूं असेच. त्याला वाटे, अशाच ढंगांनीं सुंदरी इलाप्रसन्न होऊन आपली अर्धांगी बनेल परंतु तिचा उद्देश अगदींच निराळा होता. ती यवनीवर्गाचा मनापासून धिःकार करी. तरी हेमूस आपला संशय येऊं नये इतक्या करतांच ती केव्हां केव्हां तसा वेष करी. ती यवनांच्या ताब्यांत होती; तरी तिच्या खाण्यापिण्याची अगदीं स्वतंत्र सिद्धता होती. हेमू तिच्या अर्ध्या वचनांत वागे. ह्यामुळें तिला कोणत्याच गोष्टीची न्यून्यता नव्हती. आणि इलासुंदरीनें आपल्याशीं विवाह करावा, इतक्याच उद्देशानें तो तिची बन्दोबस्त चांगली ठेवी. ती पळून जाईल म्हणून हेमूनें तिजवर गुप्त पहारा ठेविला होता पण ' तुमचे सद्गुण पाहीन तेव्हां मी तुम्हांबरोबर

खुषीनें लग्न लावीन. आतां माझें या जगांत तुमच्याशिवाय कोण आहे? तुह्मीं माझ्या सांगण्याप्रमाणें वागतां असें जेव्हां माझे दृष्टोत्पत्तिस येईल, तेव्हां मला तुह्मीं सांगायला नको? मी तुमचीच आहें.' असें तिनें वरवर कां होईना—सांगितल्या दिवसापासून हेमूनें पहारा दूर केला. इलासुंदरी शांत मनानें स्वस्थितीचा विचार करूं लागली ह्मणजे महत् दुःखी होत असे. ती मनांत ह्मण. 'काय मी दुर्दैवी? या दुष्ट हेतूनें विनाकारण मला संकटसागरांत लोटिलें माझा धर्म भंग करावा अशी त्या अधमाची इच्छा! ब्रह्मदेवानें माझ्या कपाळीं काय लिहिलें आहे कोणजाणें! जन्मलें तेव्हांच मी मरतें, तर अशीं दुःखें कां भोगावीं लागतीं? खरोखर मी हतभाग्य! ह्मणून अशा नराधमाच्या हातीं सांपडलें सर्वच दिवस सारखे नसतात मी क्षत्रिय कुळांत जन्म घेतला आहें. आह्मा लोकांच्या स्वाभाविक गुणाप्रमाणें माझ्या अंगीं जर कांहीं क्षात्रतेज वास्तव्य करीत असेल तर मी पाहिजे तेव्हां हेमूच्या दुष्कर्माचा सूड उगवीनच उगवीन. हेमू? तूं मला जातिभ्रष्ट करूं पहात आहेस? पण याद राख तुझ्या निंद्य कृतीचा मोबदला तुला देईन तरच मी नांवाची इलासुंदरी होईन. नीचा तूं मला यःकश्चित जारिणी स्त्रियांच्या पंक्तीत बसवूं पहातोस काय? मी तुझ्याशीं गोड बोलतें; ह्मणून तुला वाटत असेल कीं, मी तुझी स्त्री होऊन राहीन. छीः छीः अरे व्यर्थ रे व्यर्थ ही आशा! माझ्या सारख्या अबलेच्या हातून तूं वीरश्रेष्ठ ह्मणविणारा कसा वांचतोस तें मी पहातें. तूं माझा सर्व नाश केलास? नसाच मीही तुझा करीन. कधीं सोडणार नाहीं. माझ्या क्रोधाग्निकुंडांत तुला दग्ध करीन तर मीच करीन तुला या जगांतून उठवीन तर मीच उठवीन. कपटाला कपट विषाचा प्रतिकार विषानेंच केला पाहिजे. तुला आपल्या पौरुषत्वाची आढ्यता असेल! असो, मीही रजपूत कन्या आहें. तूं माझ्या हातांत आहेस. मला वाटल तेव्हां मी तुझें काय पाहिजे तें करूं शकेन. तुझ्याशीं मी सख्यत्वानें वागतें असें तुला वाटत असेल. परंतु, नाहीं. तूं चुकतोस. साहस आणि कपट कसें करावें? हें आह्मांस कोणी शिकवायला नको. अरे? जे आह्मा रजपुतांच्या विनाशास टपलेले; जे आमचे कट्टे शत्रू; त्या अधमाधमाची मी अर्धांगी होईन? नाहीं; असें कधीं होणार नाहीं.

मीं त्याला ठार मारिलें तर धर्म किंवा नीतिदृष्ट्या अन्यायी किंवा घातकी ठरेन ? नाहीं; माझ्या दृष्टीला तर तसें दिसत नाहीं. जो माझ्या नाशास उद्युक्त झाला त्याला मीं ठार मारिलें तर त्यांत अन्याय कसचा बरें, मी हें कृत्य केवळ माझ्याच हिताकरतां करणार आहे ? नाहीं. याला ठार मारिलें तर माझ्या मागें जी ही दगदग लागली आहे तीही नाहींशी होईल हें काय थोडें झालें ? '

आपला हेतु सिद्धीस जात नाहीं ह्मणून हेम देखील मनांत अतिशय तळमळत असे. परस्परांचे विचार परस्परांशीं भिन्न असल्यामुळें हेम आणि इलासुंदरी अंतरंग झांकून वागत. मनाची अगदीं सखोल जागा—ज्यांतील गोष्टी दुसऱ्यास बिलकुल माहीत नसतात—ती दोघांची ही परिशुद्ध नव्हती. इलासुंदरी जशा आडव्यतेनें वागे; तसाच हेमू आणि हेमूचे जसे विचार; तसेच इलासुंदरीचे -

प्रकरण ३ रें.

गप्पागोष्टी.

एके दिवशीं संध्याकाळीं इलासुंदरी आपल्या तंबूंत एकटीच शांतमनानें आपल्या भावि स्थितीचा विचार करीत बसली होती. तितक्यांत हेमूचा विश्वासू सरदार शेरखां तेथें आला. त्यासरशी तिची चित्तवृत्ति पालटली. एकदम तिच्या दृष्टीचें माधुर्य बदललें ती वक्र दृष्टीनें शेरखांकडे पाहून ह्मणाली. ' खानसाहेब ! मी शिबिरांत एकटी असतांना, आपण इतक्या जरूरीनें कां आलां ? सेनापतीनें तुह्मांला पाठविलें आहे ? त्यांचें कांहीं खासगी जरूरीचें काम आहे काय ?

बराच वेळ शेरखां तटस्थ होता. इलासुंदरीच्या प्रश्नाचें उत्तर काय द्यावें हेंच त्याला समजेना. तरी कांहींवेळ विचार करून तो ह्मणाला. ' बाई साहेब, " क्षमा असावी. सेनापतीच्या कामा करतां मीं आलों असा अर्थ नाहीं. आपल्या सारख्या थोर लोकांचें दर्शन घ्यावें आणि क्षेम समाचार विचारावा; हेंच आह्मांसारख्या नोकरांचें कर्तव्य होय.

इलासुंदरी ह्मणाली " असेल. परंतु आपल्या आकस्मिक आगमनानें मला खरोखरच असंतोष झाला. इतकेंच नव्हे पण मी स्पष्ट सांगतें कीं, फार चमत्कारही भासला! तुह्मीं माझा उपमर्द केला असें मी समजतें. आणि तुमच्या यजमानास ही गोष्ट सांगण्यास मी कधींही कमी करणार नाहीं.

शेरखां इलासुंदरीच्या क्रोधभरित भाषणानें संतप्त किंवा लज्जित न होतां ह्मणाला. ' बेषक, मी आपला ताबेदार आहें. यजमानाचा मजवर पूर्ण विश्वास आहे. आणि ते किती योग्यतेचे गृहस्थ आहेत; हेंही मी चांगलें ओळखतों. मला फक्त आपल्याच भेटीची अवश्यकता होती याकरतांच, तशी संधी पाहून मी मुद्दाम आलों. आपला अपमान केला असें आपणास वाटत असेल तर मी हजार वेळ माफी मागेन. '

इलासुंद्री आश्चर्यतेनें ह्मणाली. ' खानसाहेब ? तुमच्या भाषणाचें मला मोठें नवल वाटतें ! सांगा पाहूं तुमचें मजकडे काय काम आहे तें ? '

शेरखां विनम्रतेनें ह्मणाला ' आपण रागावूं नका. खरा प्रकार काय असेल तो मोकळ्या मनानें सांगा. मेहरबानीनें तुह्मीं मजवर इतके उपकार करा. मी मोकळ्या मनानें येथें आलों आहें. तुमच्याविषयीं कोणत्याही प्रकारची पापवासना माझ्या मनांत नाहीं, हें मी खुदातालाची शपथ वाहून सांगतों. माझ्या विचारण्याचा मतलब इतकाच आहे कीं, तुमच्या सारख्या हिंदुस्त्रीनें— परम सुंद्ररीनें-यवनांच्या छावणींत रहाणें, तुह्माला प्रशस्त वाटतें काय ? सेनापतीनें कशा कावे-बाजपणानें आणि उद्देशानें तुह्मांस येथें आणिलें हें तुह्मांला माहीत आहे ? '

इलासुंदरी आरक्त नेत्र करून कर्कश स्वरानें ह्मणाली. खानसाहेब ' तुह्मीं शुद्धींत आहां ? सेनापति तुमचे मालक आहेत, हें तुमच्या ध्यानांत आहेना ? '

शेरखां बेपर्वाईनें ह्मणाला. ' हो हों-तें सर्व मला माहीत आहे. तुह्मीं सांगायला नको. मी खात्रीनें सांगतों कीं, पुष्कळ गोष्टींत मी सेनापतीपेक्षां थोर आहें. मी चांगल्या मोठ्या खानदानीचा गृहस्थ आहें. हेमू फार नीच

कुलांत जन्मला आहे. त्याचें वर्तन फारच खराब आहे.. नीच किंवा दुष्ट कृत्य कसें करूं ! ही शंका आजपर्यंत त्याच्या मनांत कधींच आली नाहीं आणि पुढें येईल असेंही दिसत नाहीं. मी छाती ठोकून सांगतों कीं, त्याच्या दुष्कर्माचा परिणाम वाईट झाल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं. तारुण्याच्या घमेंडींत तो जीं जीं पापकर्में करीत आहे, त्याचें फळ आज जरी त्याला भोगावें लागत नाहीं असें त्यास दिसत असेल, तरी पुढें त्याचे हाड कुत्रा देखील खाणार नाहीं. बादशाची आपणावर कृपा आहे. आज आपण करूं तें होईल, असें जरी त्याला वाटत असेल; तरी ही त्याची सर्वांशीं चूक आहे. राजाच्या कृपेचा जसा नेम नाहीं; तसेंच मनुष्यमात्राचें केव्हां काय होईल हेंही सांगतां येत नाहीं. बाईसाहेब ? आजपर्यंत कोणाचेच सर्व दिवस सारखे गेले नाहींत. प्रत्यक्ष सूर्यास जर उदय आणि अस्त आहे, तर मग आह्मांसारख्या मनुष्याची पर्वा कसची ? हिंदुराजांचीं राज्यें, केवळ अन्यायानें आपल्या घशांत उतरण्याचा प्रयत्न करणें; त्यांना विनाकारण दिवसा ढवळ्या लुटणें; त्यांच्या लेंकी, सुनांवर व स्त्रियांवर जुलूम करणें; त्यांच्या देवमंदिरांचा विध्वंस करणें ! हाय हाय ! ! काय हीं अधमाधम कृत्यें नव्हत ? हिंदुलोकांनीं आह्मांशीं जर अशीं निंद्यकर्में केलीं, तर आह्मीं स्वस्थ बसूं ? नाहीं. कधीं बसणार नाहीं. मग त्यांनीं तरी कां बसावें ? आह्मीं तेवढे देवलोकचे आणि हिंदु मनुष्य लोकचे; असातर कांहीं प्रकार नाहींना ? कां देवानें आह्मांस चार हात दिले आहेत आणि त्यास दोनच आहेत ? आह्मीं निंद्य कर्में केलीं तर त्यांचा झाडा आह्मांस द्यावा लागणार नाहीं आणि हिंदुलोकांस मात्र द्यावा लागेल; असें कांहीं नाहीं. जसा आमच्या पातकांचा आह्मांस, तसा त्यांच्या दुष्कर्माचा त्यांस झाडा अवश्य द्यावा लागेल. आह्मांस जशीं कुकर्में करण्याची सनद दिलेली नाहीं, तशीच त्यांसही नाहीं. मग आह्मींच इतके शिरजोर कां ? हिंदुलोकांच्या देशांत येऊन आह्मीं परकीय जनांनीं त्यांशीं सलोख्यानें वागावें. पण तें राहिलें एकिकडेच आणि आह्मींच उलट त्यांवर जुलूम करतों ! परमेश्वर अशा जुलमी लोकांचें कसें कल्याण करील ? नाहीं. कधीं करणार नाहीं हेमूला वाटत असेल कीं, आपलें

सदैव असेंच् सुयंत्रित चालेल. परंतु ही त्याची आशा सफाई फुकट आहे. आफसोस ! आफसोस ! ! तुह्मीं अशा नीच मनुष्यास मालक समजतां ? अहो, धन्याचा धनी तो दुसराच आहे. हेमू दरोडेखोरांचा मायबाप. तो चोरांचा सरदार. त्याला कोण मालक ह्मणेल ? तुह्मींच विचार करा. तो मुसलमान, व तुह्मीं हिंदु. त्याचा तुमचा अर्थाअर्थी कांहीं तरी संबंध आहे काय ? नाहीं. मग या घातक्यानें तुमच्या घरावर दरोडा घालून तुह्मांस येथें कां आणावें ? काय तुह्मीं त्याचा अपराध केला होता ? बाई-साहेब ? तुमच्या सद्यस्थितीचा तुह्मांस पश्चाताप होत नसेल – – – '

इलासुंदरी मध्येंच ह्मणाली. ' मेहेरबान तुमच्या ह्या वाक्पांडित्याचा भावार्थ मला मुळींच समजत नाहीं. तुह्मीं माझें मन पहाण्याकरितां तर आलां नाहीं ना ? '

शेरखां म्हणाला. ' छी: छी: ! ती शंकाच नको. मला पुष्कळ सांगावयाचें आहे. परंतु मी स्थलाकडे व कालाकडे नजर देऊन थोडक्यांत आटोपतें घेतों. तुह्मीं आपल्या कुटुंबांतील मनुष्यांतून इकडे आल्यापासून त्यांचा कधीं समाचार तरी घेतला काय ? ज्या मातेनें आणि पित्यानें तुह्मांस जन्म दिलें; तुमचे अनेक लाड पुरवून वाढविलें. ज्यांनीं आपल्या हाडांचीं कांडें व रक्तांचें पाणी करून तुमचा आजपर्यंत सांभाळ केला त्यांची आज काय दशा आहे ? तीं जिवंत आहेत किंवा मेलीं ? हें तुम्हांस ऐकून तरी माहीत आहे ? मातापितरांचें आचरण आपल्या मुलां-लेंकरांशीं निष्कपट असतें. हेमू आज तुह्मीं ह्मणाल तें ऐकत असेल पण त्याचें आचरण सकपट आहे. तुह्मीं आतां लहान नव्हे. तुह्मांला सर्व समजतें. तुमच्या जातींतून आणि धर्मांतून तुह्मांस भ्रष्ट करावें इतकाच त्याचा इरादा आहे. एकदां तो शेवटास गेला कीं, तुमच्याकडे तो ढुंकून देखील पहाणार नाहीं. ज्या जातींत तुह्मीं जन्मास आलां ती जात सोडणें तुह्मांस चांगलें दिसतें कां ? अहो ? ज्या तुमच्या धर्मास तुह्मीं सनातन आर्यधर्म असें ह्मणतां; त्याचा त्याग करणें तुह्मांस कसें आवडेल तें आवडो ! मी मुसलमान आहें. सेनापतीचा नोकर आहें. मला काळवेळ सर्व समजतें. मी शुद्धींत आहें. मी तुमचें मन पहावयासही आलों नाहीं. तुह्मांस हिताहिताच्या चार गोष्टी सांगणारे किंवा तुमच्या

कळवळ्याचें येथें कोणीच नाहीं असें मला दिसलें म्हणूंन माझ्या निस्पृह मनास सत्य स्मरून जे चार सुविचार सुचले ते आपल्या कानावर घालावे इतक्यासाठींच मी मुद्दाम आपल्या भेटीस आलों. निदान माझ्या मतानें तरी तुम्हांस या दुःखद स्थितीचा फारच तिट्कारा आला असेल आणि तो येणेंही रास्तच आहे. '

दीर्घ निःश्वास सोडून इलासुंदरी म्हणाली. " खानसाहेब ! आज आपण मोठेच धर्मोपदेशक बनून आलां आहां. असो, तुमचेंच मताप्रमाणें का होईना ! मी फार पातकी आहे. पण काय हो ? तुम्ही ज्याचें अन्न किंवा निमक खातां; ज्याच्या अन्नानें तुम्ही वाढलां आणि ज्याचे तुम्ही परम विश्वासु सेवक म्हणवितां; त्याचें अपयश माझ्या समक्ष गायला अथवा निमकहरामपणा करायला तुम्हांला कांहींच वाटूं नये ? अहो असें निंद्याचरण करणें तुम्हांसारख्या समंजस गृहस्थास योग्य आहे काय ? तुमच्या अशा विरुद्धाचरणानें तुमच्याविषयीं कोणाच्याही मनांत साहजिक संशय येणार नाहीं ? तुम्हीं कितीही पर्यायानें सांगा; तुम्ही खरोखर सत्यवादी असाल किंवा तसा डौल दाखवूं पहात असाल पण मी खात्रीनें सांगतें कीं, तुम्हीं आपल्या मतानें कितीही लपंडाव किंवा कावेबाजपणा केला, तरी तो मजपुढें क्षणभरही टिकणार नाहीं. मीं तुमचा मानसिक हेतु केव्हांच ओळखला. तुमच्या कपटी वर्तनावरून मजविषयीं तुमचा मानसिक अभिप्राय फार वाईट दिसतो. तुमच्या मनांत मजविषयीं खरोखरच पापवासना आहे. "— •

शेरखां मध्येंच म्हणाला. ' तुम्ही चुकतां. मीं शपथ वाहून सांगतों कीं, मजविषयीं तुम्हीं आपला भलताच समज करून घेऊं नका. '

इलासुंदरी म्हणाली. ' मी निष्कलंक आहें. पण तुम्हीं आपल्या धन्यास जर इतका नीच—अधम व पापमूर्ति समजतां, तर त्याची आज्ञा वंद्य करून त्याच्या आश्रयांत कां राहिलां आहां ? अशा पातक्याच्या आश्रयानें रहाणारे तुम्हींही पातकी ठरत नाहीं ? तुम्ही धनाभिलाषेनें अंध तर झाला नाहीं ? त्यांकडे दगलबाजी करून आपला स्वार्थ साधावा; इतकाच तुमचा मानसिक उद्देश आहे ? आणि त्याच मार्गाचें मीही अवलंबन करावें असें तुम्हांस वाटतें ? फार काय सांगूं ? तुम्हीं फार कावेबाज व

मतलबी आहां हें मला आज चांगलें समजलें खान साहेब !! '

शेरखां पुन्हां आग्रहानें ह्मणूं लागला. ' नाहीं नाहीं. बाईसाहेब ! माझा खरा मतलब आपण बिलकुल समजला नाहीं. तुह्मी मला लागेल तितका दोषी ठरवा; माझा मानसिक हेतु तुमच्या मनांत चांगला ठसेल असा मला सांगतां आला नाहीं; ह्मणून मीं पापी आहें असें आपणास भासलें असावें. पण मीं तुह्माला सावध करण्याकरतां— बाईसाहेब, तुमचें हित व्हावें ह्मणून केवळ तुमच्या कल्याणासाठीं येथें आलों. तुह्मांला त्रास यावा असा माझा अगदीं हेतु नाहीं. भावीकाल परम भयानक स्वरूपानें तुह्मांकडे पहात आहे. तुह्मी आज सावध होणार नाहीं तर पुढें महत् संकटांत पडाल. विचार करा बाईसाहेब, तुह्मीच शुद्धीवर या. '

इलासुंदरी बेपर्वाईनें ह्मणाली. ' शेरखां ? तुह्मी जसे धर्मोपदेशक तसेच भविष्यवादीही आहां ! शाबास. '

शेरखां ह्मणाला. ' या अल्पमतीच्या प्रत्येक भाषणाची तुह्मीं उडवा-उडव करीत आहां, पण आपलें कर्तव्य आपण करावें मग तुह्मांला कांहीं दिसो. गतवर्षी केवळ लूट मिळविण्याच्या इरादानें हेमू मेवाडावर चाल करून आला. रजपुतांपेक्षां आमची फौज पुष्कळ जास्त होती, तरी आमचा सर्वथैव पराजय झाला. चालु लढाईची स्थितीही तशीच दिसते. आमचा फौजफांटा रजपुतां पेक्षां जास्त आहे. तोफा—बंदुकांचीही जंगी तयारी आहे. हें मी कबूल करतों. पण अशा या बिकट पहाडांत आमचा तळ पडल्याकारणानें, रसद जमा करण्याची फार मुष्कील ! दिवसेंदिवस आमच्या फौजेस खुराकी सामानाची टंचाई पडत चालली आहे. " आजचा दिवस मावळला, उद्यांचा कसा उगवतो ? " अशा चिंतेंत आपले सर्व लोक गर्क आहेत. अवघ्या छावणींत केवळ असंतोष फैलावला आहे. जो पहावा त्याचें मन औदासिन्यानें घेरिलें आहे. साम, दाम व भेद यापैकीं एकही उपाय अमलांत येत नाहीं. आतां फक्त दंडाचा मार्ग शिल्लक राहिला आहे. कालच आह्मीं कित्येक सरदारांकडे फितुरी करण्याचा प्रयत्न केला पण तो निष्फळ फसला ! एकंदरींत आह्मांकडून रजपूतसरदारांत जर फाटाफूट होणार नाहीं; तर आह्मीं जयाची आशा सफाई सोडून दिली पाहिजे. "

इलासुंदरी ह्मणाली "तुझांकडे जे कित्येक रजपूत लोक आलेले आहेत, त्याकडून कांहींच कार्यभाग होण्यासारखा नाहीं ? "

शेरखा ह्मणाला 'त्यांचा या लढाईत व्हावा तसा उपयोग होईल असें मला बिलकुल वाटत नाहीं. कारण, कमलमीर व चितोडगडच्या किल्ल्यांत जाण्याच्या ज्या चोरवाटा आहेत; त्यांची त्यांस मुळींच माहिती नाहीं. आमचा चट्सारा विश्वास कायतो तोफखान्यावर. समोरा-समोर चार हात करून जय मिळवूं ही आशा मृगजलानें तहान भाग-विण्यासारखीच. रजपूत लोक पहिल्याच सपाट्यास आमच्या सैन्याचा पाठारा उडवितील. आमच्या फौजेस उपासमारानें मृत्युमुखांत लोटण्या-पेक्षां युद्धभूमीवर काय होईल तें होवो अशा समजानें लौकरच युद्धास प्रारंभ करणें भाग आहे. आतां शुभश्वशीघ्रं या मंत्राचा जप चालला आहे. '

इलासुंदरी ह्मणाली. ' काय होणार तें होवो. सेनापती फार दुराग्रही आहे. तो आपला हेका तडीस नेल्याशिवाय रहाणार नाहीं. माझी स्थिती तुह्मीं पहातच आहा; मीं मरणाला थोडीच भितें आहें ? माझ्या आस्थेचें येथें कोणी नाहीं. हेमू माझें ऐकेल ही आशा व्यर्थच. कोणाशीं मोकळ्या मनानें बोलायचालायला नाहीं. रामानुजस्वामि आहेत, परंतु माझ्या-सारख्या अबलेचे विचार त्यांना रुचणार कसें ?— '

शेरखां मध्येंच ह्मणाला. ' स्वामींचे ते विचारच नव्हत. त्यांनीं चाहेल तितकी धर्मचर्चा करावी ! युद्धाच्या भानगडींत त्या बिचाऱ्यास काय समजणार ? '

इलासुंदरीचा कंठ भरून आला. तिची मुखकांति म्लान दिसूं लागली आणि दुःखाचें भरतें येऊन ती ह्मणाली. ' पित्याच्या घरीं असतांना जर या साधुपुरुषाचें दर्शन होतें; तर माझें नशीब असें कां फुटतें ? '

शेरखां ह्मणाला ' तसें होतें तर हेमूची तुह्मांस कपटानें येथें आण-ण्याची काय मगदूर होती ? कोणत्या बिकट वेळीं तुह्मीं सेनापतीच्या हातीं सांपडला खुदा जाणें ! '

इलासुंदरी भृकुटी वक्र करून आणि मान डोलवून ह्मणाली. ' काय सांगूं खांसाहेब ! जेव्हां माझ्या मनांत नवे नवे अंकुर

परिस्फुट होत होते. तेव्हां सेनापतीच्या शौर्यबलाच्या नव्यानव्या वार्ता नेहमीं माझ्या ऐकिवांत येत. आज त्यांनीं अमुक पराक्रम केले, काल त्याच्या शौर्यप्रभावास पाहून सर्वांनीं तोंडांत बोटेंच घातलीं ! आज हजारो रजपूत सेनेस त्यानें थक्क करून सोडिलें. अशा अनेक शौर्यरस-परिपूरित गोष्टींनीं माझ्या मनांत असें येऊं लागलें कीं, आपणास लग्न करण्याची पाळी आली तर अशाच पुरुषाशीं करावें. फक्त १०० लोक बरोबर घेऊन तो चितोडावर चाल करून आला. आणि त्याकडे फक्त १६ वीर पुरुष राहिले तरी तो अगदीं न भितां चितोड किल्ल्याचा जबरदस्त दरवाजा फोडून आंत शिरला आणि शेंकडों लोकांस ठार मारून तरवार गाजवीत शत्रूचे कचाटींतून सुरक्षित बाहेर आला; तेव्हां तर माझे अप्रबुद्ध मनावर त्याच्या शौर्यगुणाचा अपूर्व ठसा बसला. त्यानें मला दगा दिला हें खरें. परंतु तो जर माझें सांगणें ऐकेल तर मीं त्याशीं आनंदानें विवाह करीन.

शेरखां ह्मणाला. ' तुह्मीं सांगतां या सर्व गोष्टी अगदीं खोट्या आहेत. हेमू शूर आहे हें खरें, पण तुह्मीं सांगतां असा एकहीं पराक्रम त्यानें केला नाहीं. तुह्मीं सांगतां या गोष्टी शुद्ध काल्पनिक आहेत. आणि त्या खरो-खर घडल्या असें धरून चाललें तरी तेव्हां मेवाडची असावी तशी परा-क्रमसंपन्नता नव्हती आणि त्याचें कारण इतकेंच कीं, तेव्हां अनूपसिंह मेवाडच्या आश्रयात नव्हता. तो असता तर हेमु इतकें नांवच जगांत राहिलें असतें. आज अवघ्या हिंदुस्थानांत अनूपसिंहासारखा पराक्रमी सिंह एकही नसेल ! काय त्याची शूरता– काय चपळता-आणि काय अलौकिक शक्ति ! '—

शेरखांचें भाषण समाप्त झालें नव्हतें. इतक्यांत तंबूच्या दारावर तुतारी वाजली. तेव्हां सेनापति येत आहे अशी त्याची समजूत होऊन तो सभयमनानें ह्मणाला. ' आतां त्या गोष्टी नकोत. '

शेरखां अन्य मार्गानें तंबूच्या बाहेर गेला. आणि आपल्या लोकांस सांगूं लागला. ' हुशारीनें पहारा करा. कोणी गाफील राहूं नका. '

पहाऱ्यावरील शिपायांनीं ' जो हुकूम ' ह्मणून शेरखांची आज्ञा बंद केली.

प्रकरण ४ थें.

:o:

मित्र व शत्रु.

हेमू शिबिरांत आल्यावर थोडक्याच वेळानें शेरखांही तेथें आला. इलासुंदरी विचारांतच गर्क होती. तिला हेमूनें विचारिलें. ' सुंदरी ? आज तूं विचारांत फारच गढून गेली आहेस असें दिसतें. सांग, असें कोणतें संकट तुजवर आलें आहे सांग ? '

सुहास्यवदनीं इलासुंदरी ह्मणाली ' हंसावें, रडावें, खावें, प्यावें आणि स्वस्थ असावें; याशिवाय मला दुसरें काय काम आहे ? '

हेमू ह्मणाला. ' असा टाळाटाळींचा जबाब देणें तुझ्यासारख्या संभावित स्त्रियेस योग्य नव्हे. मीं अत्याग्रहानें विचारतों. तूं आज अगदीं उदास कां दिसतेस ? '

इलासुंदरी ह्मणाली. ' माझ्या उदासीनतेचें कारण आपण फारच आस्थेनें विचारीत आहां हें पाहून माझेंही मन सुप्रसन्न झालें. खरेंच आज माझा भाग्योदय झाला असें मला वाटतें ! असा दिवस पुढें येईल कीं नाहीं ? कोणी सांगावें ! '

हेमू ह्मणाला ' मला तें कारण तूं सांगितलेंच पाहिजे. ' सुंदरी ह्मणाली. ' बा: तें कारण मीं सांगितलेंच पाहिजे अशी तुह्मीं प्रतिज्ञाच केली आहे असें दिसतें. '

हेमू ह्मणाला. ' असें तर खरेंच. '

इलासुंदरी विकटहास्य करून ह्मणाली. ' मलाही असाच स्वभाव आवडतो; परंतु तें कारण सांगावयास मलाही फार भीति वाटते ! आणि सांगितलें तर तुह्मीं तें ऐकून त्याप्रमाणें वागाल किंवा नाहीं ? ही शंकाच दिसते ! '

हेमू ह्मणाला ' असें कां बरें ? तुझें कोणतें सांगणें मीं अमान्य केलें ? '

इलासुंदरी थट्टेनें पण खोचून ह्मणाली. ' आणि ऐकलें तरी कोणतें ? '

शेरखां इतकावेळ शांत होता. त्याला वाटत होतें ' कदाचित् इलासुंदरी आपलें भाषण हेमूस सांगणार नाहीं कशावरून ? ' त्यांच्या भाषणाचा ओघ बदलावा इतक्या करतांच तो हात जोडून मध्येंच

ह्मणाला ' बाईसाहेब माझ्या भीतींच्या गोष्टी ऐकून भयभीत झालेल्या असाव्या ! '

हेमू ह्मणाला. ' भीति ? '

शेरखां ह्मणाला. ' तूर्तच्या लढाईचें कारण आणि उभय दलाची स्थिती मीं सांगत होतों त्यांत साहजिक अनूपसिंहाचें नांव निघालें-- '

क्रोधसंतप्त होऊन हेमू मध्येंच ह्मणाला. ' दगलबाज--बेइमान निमक-हराम ! अनूप ! मीं त्या पोराला लहानाचा मोठा केला, त्याचे सर्व लाड पुरविले-- '

शेरखां पुष्टी देत ह्मणाला. ' तेच उपकार तो फेडित आहे. '

हेमू ह्मणाला ' त्याच्या एकंदर लक्षणावरून तो पुढें जगप्रसिद्ध पुरुष होईल अशी माझी पक्की खातरी होती; ह्मणून मीं उदार मनानें त्याला युद्धकलेंतील चांगले मारपेंचाचे डाव शिकविले. शत्रूवर कशी चाल करावी ? त्याला कसें अडवावें ? कशा हुलकावण्या दाखवाव्या ? शस्त्र कसें धरावें ? मारावें कसें ? पळावें कसें ? पाठलाग कसा करावा ? फौजेची शिस्त कशी असावी ? तोफा कशा डागाव्या ? अशा एक का दोन हजारो गोष्टी. प्रत्येक युद्धप्रसंगीं तो मजबरोबर असे. खरोखरच तो मल्लयुद्धांत अप्रतीम योद्धा आहे. तरी आमच्या तोफखान्यापुढें रजपुतांच्या चटसाऱ्या युक्त्या, मारपेंच आणि शौर्य पार लटपटून जाईल. '

शेरखां आग्रहपूर्वक ह्मणाला. ' अनपसिंह पूर्वी आपल्याशीं इतक्या सख्यत्वानें वागे आणि आतां तुह्मांवरच फिरला कसा ? '

हेमू ह्मणाला. ' रामानुज स्वामीनें त्याचें मन वळविलें. व स्वज्ञाति-बांधवांविरुद्ध वागणें अनुचित ! असें त्याच्या मनानें घेतलें. '

शेरखां ह्मणाला. ' तर मग अनूपसिंहानें केवळ विश्वासघात केला असेंच ह्मटलें पाहिजे. '

हेमू ह्मणाला. ' निःसंशय. निमकहरामपणा. पण आम्हीं कोठें त्याची पर्वा करतों आह्मीं ? काफर लोकांचा संहार करावयाचा, त्यांचीं राज्यें बळकावून बसायचें. त्यांच्या देवळांच्या मशिदी बनवावयाच्या, आणि जगांतून हिंदु हें नांव अजीबात नाहींसें करायचें. हा आमचा कायमचा संकल्प आहे. तो आमरण बदलणार नाहीं. '

शेरखां हंसत ह्मणाला. ' अस्तगफरुल्लाह ! काफर लोकांचा सर्व नाश करणें हें आपलें मुख्य कर्तव्यकर्म होय ! '

हेमू म्हणाला. ' हिंदुलोकांशीं लढाई करूं नका अशी अनुपसिंहानें मजकडे पुष्कळ रडकथा गाइली आणि माझें मन दयार्द्र होईल किंवा मी आपला निश्चय बदलीन अशी त्याला पुष्कळ धमक होती. परंतु तो फसला ! आणि माझ्या तैनातींतून उदयपूरच्या राण्याकडे गेला. तो मजकडे जें युद्धकौशल्य शिकला तेंच त्यानें रजपुतांस शिकवून लढाईच्या कामीं तरबेज केलें असेल. '

शेरखां ह्मणाला. ' अनूपसिंहाच्या कृतघ्नपणाचा मोबदला देण्यास हीच संधी चांगली आहे. '

हेमू ह्मणाला. ' बेषक. त्याची खोड जिरविण्याकरतांच मीं मुद्दाम मेवाडादर चाल केली आहे. आमच्या फौजेंत अन्नाची टंचाई आहे त्याकरतां होईल तितक्या त्वरेनें युद्धारंभ करणें भाग आहे. या लढाईत खात्रीनें आपण विजयी होऊं. हिंदुलोक यःकश्चित प्राणी आहेत, असें समजणारे हजारों रणधुरंधर यवनयोद्धे आह्मांकडे आहेत. रजपुतांची फक्त वीस हजार फौज आहे असें लोकवार्ता सांगते. फिकीर नाहीं, पहातां येईल. मीं गेल्या लढाईचें नुकसान या युद्धांत भरून काढल्याशिवाय कधीं सोडणार नाहीं. उद्यां दोनप्रहरीं राणा, आपल्या आप्तइष्ट सैनिकवीरांसह कराला देवीच्या पूजेस जाणार आहे. तेव्हां ते लोक बहुतांशीं निःशस्त्रच जातील आणि तेव्हां त्यांच्या मनांत युद्धकल्पना असणें असंभाव्यच. मला वाटतें, तेव्हांच त्यांवर हल्ला करून सर्वांची कत्तल उडवावी. '

शेरखां मनांत ह्मणाला. ' दगान किस्का सगा ' (उघड) देवीस जसे बळी देतात तसें तेथच्या तेथेंच आपण त्यांस ठार मारूं ! '

इतक्यांत तुतारी वाजली. ती ऐकून हेमू इलासुंदरीस सांगूं लागला. उदयीक केव्हां आणि कसा हल्ला करावा ? ही आज्ञा ऐकण्याकरितां आपलें लष्कर जमा झालें आहे तें पहावें अशी तुझी इच्छा असेल तर चल. परंतु आमच्या सल्ला मसलतींत तूं विनाकारण कांहींच मत देऊं नको. नाहीं तर स्त्रीजातीच्या स्वभावावर जाशील; इतक्याकरतां

मुद्दाम सूचना देतों.'

इलासुंदरी ह्मणाली. 'मीं कांहीं सांगितलें तरीं तुह्मीं थोडेंच ऐकतां ? तशांत जसा वेळ तसा खेळ ! प्रसंगाप्रमाणें सर्व होईल. तुह्मीं नको ह्मटलें तरी मला वाटेल तें मी सांगितल्याशिवाय कधीं रहाणार नाहीं. ऐकणें किंवा न ऐकणें तुमच्या स्वाधीन आहे. मला कितीही बजावून सांगितलें तरी सारखेंच, नाहीं तरी तेंच. ज्या कृतीनें तुमची कि र्ति होईल ती मला प्रिय. माझ्या मनाला जें चांगलें दिसतें तें मीं स्पष्ट सांगतें, मग तें कोणाला चांगलें वाटो वा न वाटो. माझ्या स्वभावाप्रमाणें मीं करीन. त्यांत मला कोणाची भीड नाहीं—मुर्वत नाहीं. हें तुह्मांला माहीत आहेच. मग तुह्मीं उगाच आपल्या जिवाला त्रास कां करून घेतां ? आणि इतकी आगाऊ सूचना तरी पाहिजे कशाला ? '

प्रकरण ५ वें

मसलत.

हेमूचा दरबार सैनिक वीरपुरुषांनीं गजबजून गेला होता. सुंदरि शांतमनानें एका स्वतंत्र आसनावर बसली होती. सर्व मानकरी आपआपल्या दर्जाप्रमाणें बसले होते. इतक्यांत, रामानुज स्वामि तेथें आला. त्यास पहातांच सर्वांनीं उठून त्यांचा सत्कार केला. हेमूनेंही त्यांचें चांगलें स्वागत केलें आणि आपले आसनाजवळच एका स्वतंत्र आसनावर त्यांना नेऊन बसविलें.

रामानुज स्वामी कोण हें एकदां वाचकांस सांगूं आणि त्यांची ओळख करून देऊं. रामानुज स्वामि उच्चकुलांतील ब्राह्मण होता. तो संस्कृतांत महान् पंडित होता. श्रुतिस्मृति, पुराणें, न्याय, वेद, शास्त्रें त्याला हस्तामलकवत् होतीं. तो आर्बी व फार्शी भाषेंतही चांगला निष्णात होता. त्या विद्वान् शिरोमणीस संस्कृत भाषेंत वार्तालाप करण्यास जसें जड जात नसे तसाच तो फार्शी व अरबीही अस्खलित बोले. आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी त्यानें संन्यासाश्रम दीक्षावलंबन

केलें. तत्पूर्वी तो एक श्रीमान् गृहस्थ होता. तो यवनांचा अंतरंग द्वेष करी. परंतु, बाह्यत: त्यांशीं सख्यत्वानें वागे व त्यांच्या हितार्थ आपण फार झटतों असें दाखवी. यवनांचा नि:पात करतांना जरी आपणास मृत्यु आला तरी आपण कृतार्थ झालों, हाच मुख्यत: त्याचा साधनमंत्र होता आणि त्याकरतां व तो यवनांशीं परिचय ठेवी. यवनांत चुरस पडून त्यांचा परस्पर विध्वंस व्हावा, एतदर्थ त्यानें हेमूस चांगली मदत दिली. बंगाल प्रांतांतून हुमायुनास हांकून लावण्याच्या अनेक युक्ति-प्रयुक्ति त्यानें हेमूस सांगितल्या. आणि केवळ स्वामीच्याच सहाय्यानें किंवा उपायकौशल्यानें हेमूचा बहुतेक कार्यभाग सिद्धीस गेला ह्या कारणानें हेमूची रामानुजस्वामीवर चांगली श्रद्धा होती. स्वामीची असाधारण विद्या–बुद्धि– विद्वता अवलोकन करून हेमू मोहित झाला होता. बहुधा तो कोणतेंही काम स्वामीस विचारल्याशिवाय कधींही करीत नसे असें म्हटलें तरी चालेल. हेमूच्या हातून हुमायुनाचा विनाश केल्यावर हेमूच्या विध्वंसाचा स्वामीनें उपाय आरंभिला. अलिकडे तर तो आपला हेतू कसा सफल होईल याच विचारांत होता. अनूपसिंह जरी हेमूचा शिष्य होता तरी तो आपला हेतू नि:संशय सिद्धीस नेईल; असा स्वामीचा पूर्ण विश्वास, म्हणून त्यानेंच अनूपसिंहास सदुपदेश देऊन स्वज्ञातिबांधवहित साधनार्थ उद्युक्त केलें. हेमूचा रामानुजस्वामीवर जरी विश्वास होता तरी अनूपसिंह आपल्या तैनातींतून जाण्यास स्वामीच सर्वांशीं कारणीभूत आहे, अशी हेमूची पक्की खात्री होऊन तोही त्याचा अंतर्गत तिरस्कार करी. तितक्या संधीसच हेमूनें इलासुंदरीचें हरण केलें होतें. परंतु बरेच दिवस तें वृत्त स्वामीच्या श्रवणीं देखील आलें नव्हतें. इलासुंदरी फार आजारी पडली; तिची वांचण्याची निराशा झाली; तेव्हां हेमूनें तें वृत्त स्वामीस सांगितलें आणि त्याच्या मणिमंत्रौषधी प्रयोगानें ती निरोगी झाली. इतक्या भानगडीनें किंवा ह्या नवीन उपकृतीनें इतकेंच झालें कीं, अनूपसिंह आपल्या पक्षांतून गेल्यामुळें रामानुजस्वामीचा हेमू जो अंतून धि:कार करी तो आतां स्वामीचा आभारी होऊन कांहींसा विशेष कृतज्ञतेनें वागूं लागला. रामानुजस्वामी हा दैविशक्तिसंपन्न, महात्मा व सत्पुरुष आहे असें हेमू

मानूं लागला. तो स्वामीची श्रद्धा भक्ति करी, तसेंच त्याचें भय मानी आणि त्यास सन्मानही देई. केवळ स्वामीच्याच भीतिमुळें दुराचारी हेमूस रजपूत लोकांशीं अत्याचारानें वागतां येत नसे; असें म्हटलें तरी चालेल.

दरबार भरतांच हेमूनें 'देवीमंदिरांत रजपूत लोक एकत्र झाले कीं, हल्ला करावा' असा आपला हेतु थोडक्यांत प्रसिद्ध केला. त्याला सर्वांचें अनुमोदन मिळालें. आणि 'अचानक हल्ला करून रजपुतांचा विध्वंस करणेंच उचित आहे' असें सर्वत्रांनीं आपलें मत जाहीर केलें. परंतु, रामानुजस्वामी विस्मयानें म्हणाला 'जगदीश! तुझी सत्ता प्रबल आहे!

तितक्यांत अजीमखां नांवाचा एक सरदार सांगूं लागला. 'अगदीं रास्त सल्ला आहे. काफर लोकांस सांपडतील त्या युक्तीनें ठार मारून आपल्या तरवारींची रक्ततृष्णा शांत करणें हाच आपला खरा धर्म आणि कर्तव्यकर्म होय. आह्मीं विपत्तींत पडलों आहों, धान्य मिळण्याची आह्मांस पंचाईत पडली आहे; असें ऐकून अनूपसिंहास अत्यानंद झाला आहे आणि लौकरच आह्मीं राण्यास शरण जाऊं असाही त्याचा समज आहे असें आजच मीं ऐकलें.'

रामानंदस्वामी ह्मणाला. 'मिथ्या! समूळ मिथ्या! विपक्षाचे कष्ट किंवा विपत्ती पाहून अनूपसिंह आनंदित होईल अशा नीच स्वभावाचा तो मनुष्यच नव्हे.'

अजीमखां हंसून ह्मणाला. 'तो स्वामीचा पट्टशिष्यच आहे. त्याचे अन्याय झांकण्याचा स्वामीनीं प्रयत्न केला तर त्यांत कांहीं विशेष नवल नाहीं.'

हेमू रागानें ह्मणाला. 'अनूपचें नांव येथें नको. तो कसाही असो. त्याचे आमचे समरंगणांत चार हात होतील तेव्हांच काय तें पाहूं. उद्यीक देवीमंदिरावर आपण हल्ला केला तर आपले श्रम फुकट जातील असें मला कांहीं वाटत नाहीं.'

सैनिक वीरपुरुष ह्मणाले 'एकदम हल्ला!'

सविस्मय स्वामी म्हणाला 'ज्या महाराण्यानें यवनांचे शेंकडों निंद्याचार सहन केले; यवनांशीं निष्कारण युद्ध करून समरभूदेवीस शेंकडों शूर पुरुषांचे बळी द्यावे आणि कोट्यवधी रुपयांचा चुराडा उडवावा;

अशीही ज्याची इच्छा नाहीं. जो धर्मनीतिन्यायानें युद्ध . करणारा; विनाकारण यातना भोगण्यापेक्षां जो यवनांशीं संधी • करावयास उत्सुक; ज्याचें तुह्मीं सर्वस्व लुटलें; जो धर्मभीरु, जो हिंसेला महान पाप समजणारा; त्या स्वदेशप्रेमक, जात्याभिमानी आणि स्वधर्माभिमानी महाराण्याशीं तुह्मांसारख्या परकीय जनांनीं निष्कारण युद्ध करणें आणि तेंही कपटयुद्ध दगा देऊन किंवा अकस्मात् छापा घालून त्याला फशीं पाडण्याचा प्रयत्न करणें तुह्मासारख्या तरवारबहाद्दर व हिंमतदार वीर पुरुषांस अनुचित आहे ! जर तुह्मीं जातीवंत शूर असाल, तर असें चांडालकर्म कधींही करणार नाहीं.

हेमू ह्मणाला ' हें धर्मयुद्ध आहे. फुकटची चालून आलेली संधी दवडून मग पश्चाताप करीत बसण्यांत कांहींच अर्थ नाहीं. आपले शत्रूचा ज्या रीतीनें सूड उगवितां येईल, तसा उगविणें भाग आहे. आणि त्या कामाला देवाच्या दयेनें ही शानदार वेळ चालून आली आहे. '

रामानुजस्वामी हेमूच्या भाषणाकडे अलक्ष करून मनांत ह्मणाला ' हे सर्व शक्तिमान् सर्वेश्वर ! तूं सर्वज्ञ आणि सर्व समर्थ आहेस. अशा नराधमांस जगतांतून नाहींसें करून भूभार कां उतरीनास ? '

हेमूस संबोधून तो उघड म्हणाला ' मीं तुह्मांस सविनय सांगतों कीं, तुमच्या निर्दयाचरणास व अनाचारपरिपूरित कृतीस सालस बिचारे रजपूत फार त्रासले आहेत. त्यांस आणखी लढाईसारख्या दगदगींत पाडून त्रास देऊं नका. ' असें बोलतां बोलतां त्याचा कंठ भरून आला. मुखकमल म्लान दिसूं लागलें. दुःखातिशयानें अंतःकरण विदीर्ण होत असावें असा भास होऊं लागला. नेत्रकमल दुःखाश्रुपूर्ण झालें आणि कित्येक अश्रु टपटप त्याच्या विशाल दाढीवर पडले. तरी तो दुःखावेग आंवरून गद्गद् स्वरानें ह्मणाला ' सेनापते ! तुह्मीं मजवर कृपा करा. मी दूतस्वरूप चितोडास जातों. थोर आणि उदारमनानें तुह्मीं मला इतकी भिक्षा घालल—मजवर अनुग्रह कराल—तर मीं आपला फार अभारी होईन. मी हिंमतीनें सांगतों कीं, संधीचा मी प्रस्ताव काढिला तर रजपूत माझ्या वचनाचा बिलकुल अनादर करणार नाहींत. उभयपक्षांचें समाधान व्हावें असा मी तह ठरवीन. '

आपल्या विनंतीचें काय उत्तर मिळतें तें पहावें. एतदर्थ रामानुज-स्वामी थोडावेळ थांबला. तितक्यांत त्यानें इलासुंदरी शोकमग्न आहे असें पाहिलें. शरदृतूंतील पूर्णचंद्र मेघाच्या छायेनें जसा म्लान दिसतो; तसा तिचा मुखचंद्र दुःखमेघानें आच्छादित दिसत होता. स्वामी ह्मणाला ' मुली ! परदुःखानें तुझें हृदय व्यथित झालें नाहींना ? ' स्वामीनें इतर सभ्य जनांकडे पाहिलें. तेव्हां त्यापैकीं एकाचेंही लक्ष तिच्याकडे नव्हतें. स्वामी पुन्हा दुःखानें ह्मणाले ' अहो ! असें निर्दय- घातक- नीचतम कृत्य करायला तुम्हांस कांहींच शरम वाटत नाहीं कशी ? रजपूत निःशस्त्र असतां दग्यानें त्यांचा संहार करणें अयोग्य ! अहो ! अशा लोमहर्षण अत्यंत भयानक कर्माच्या परिणामाकडे तुह्मीं यत्किंचित् तरी लक्ष द्या. विचार करा-असे मदांध होऊं नका. दुष्कर्माचा परिणाम कधींही वाईट झाल्याशिवाय रहाणार नाहीं. '

अजीमखां ह्मणाला ' आह्मीं तरवार गाजवून शत्रूचें राज्य बळकावण्यास आलों आहों. ते सशस्त्र असोत किंवा शस्त्ररहित असोत. आह्मांस ते सांपडतील तेव्हां व तेथें त्यांचा नाश हा केलाच पाहिजे. '

हेमू ह्मणाला ' अशा असार वादविवादांत कांहींच तथ्य नाहीं. दरबार बरखास्त करा. आणि उद्यां दोनप्रहरीं देवीमंदिरावर छापा घालण्याची जय्यत तयारी ठेवा. '

रामानुजस्वामी हात वर करून ह्मणाला ' हे परमेश ! तूं सर्वांतर्यामीं व सर्वसाक्षी आहेस. फार दिवस झाले. मीं संसाराश्रम सोडून तुझ्या आराधनेंत मनोनिवेष केला. परंतु दैव विडंबना कधीं कधीं मला सांसारिक व सामाजिक कार्यांत फशीं पाडते. माझें कर्मच खोटें, त्याला ती तरी बिचारी काय करील ? भारतवर्षांत सदैव शांतता असावी. अशी माझी मनःपूर्वक इच्छा आणि त्याकरतां मी यथाशक्ति व यथामति अविश्रांत श्रमही करितों. परंतु जेथें असे दुष्ट नराधम- नरपिशाच्च- घातकी- दगलबाज व पातकी लोक वास्तव्य करितात; तेथें हे प्रभो ! माझी वासना कशी सुफल व्हावी ! पापमार्गांतून या दुष्ट लोकांचें मन बदलून ह्यांनीं सन्मार्गवर्ती व्हावें ह्मणून, मीं आजवर होते तितके प्रयत्न केलें. परंतु व्यर्थ ! पाषाणास द्रव

कुठला ! असो, हे करुणाकर देवाधिदेवा, आतां तूं तरी या यवनांचा दुष्ट हेतू समूळ फसावा; इतकी कृपा कर. ' असें बोलतां बोलतां स्वामीचे दोन्ही नेत्र अग्निसारखे अत्यारक्त दिसूं लागले. भृकुटी वर चढल्या; सर्व देह स्फुरण पावूं लागला, अंगावर रोमांच थरारले; आणि तो परम संतापानें निःश्वास सोडीत कठीण स्वरानें ह्मणाला ' उद्यीक तुह्मीं जें पापकर्म करणार त्यांत तुह्मांस बिलकुल यशप्राप्ति होऊं नये अशी मी कायावाचामनानें सर्वेश्वर प्रभूची प्रार्थना करितों. मी निश्चयानें सांगतों कीं, रजपूतलोक तुमचा सफाई पराजय करतील. तुमचा दर्प-चूर्ण—संचूर्ण होईल. तुमचा सर्वथैव अपमान व दुष्कीर्ति होईल. तुह्माला पळतां भूमि थोडी होईल. तुमच्या हेतूंचा, तुमच्या मानसिक आशेचा चुराडा होईल. तुह्मीं रजपुतांच्या स्त्रियांस अनाथ व बालकांस निराधार करूं पहात आहां; पण अधमानो ? तुमच्या स्त्रिया विधवा आणि बालकें अनाथ होतील. मी माझे परमाराध्य व परमपूज्य देवाची शपथ वाहून सांगतों कीं, तुमचा सर्व नाश होईल. '

रामानुजस्वामी यवनांस असा अभिश्राप देत असतांना त्याच्या नेत्रांतून अग्नीच्या जणूं ठिणग्या निघताहेत असा भास सर्वांस होऊं लागला. सर्व सभ्यजन चित्रासारखे तटस्थ होऊन त्याकडे पाहूं लागले. कोणाच्याही तोंडांतून शब्द निघेना. सभागृहांत निश्चलता व निःस्तब्धता फैलावली. इतक्यांत स्वामी पुन्हा शांततेचा भंग करून ह्मणाले ' जें होणार तें देवादिकांसही चुकवितां येणार नाहीं. ठीक आहे. आतां मनुष्य वस्तींत रहाणें निरर्थक. आजपासून मी एखाद्या सघनवनाचा आश्रय करितों आणि अवशिष्ट जीवनांश ईश्वरचिंतनांत घालवितों. '

असें सांगून स्वामी शिबिराच्या द्वारापर्यंत गेला. तेव्हां सुंदरीही त्याच्यामागून रडत रडत जाऊं लागली. ती ह्मणाली ' भगवन्, या अनाथ दासीसही आतां आपल्याबरोबर न्या. मीही बनवासांत दिवस घालवीन. आतां ह्या पातकपूर्ण संसारांत मला ठेवूं नका. '

स्वामी सप्रेम इलासुंदरीस सांगूं लागले ' मुली ? तूं अद्यापि लहान आहेस. अशा कोमल प्रकृतीस अरण्यवासांतील परिश्रम सहन होणार नाहींत. आणखी कांहीं दिवस तूं येथें रहा. आपलें आचरण निष्कलंक

ठेव. माझा कार्यभाग होतांच तुला लौकर मी येथून नेईन. यापूर्वीच यवनांच्या तावडींतून तुझी मुक्तता केली असती. परंतु, कांहीं विशेष कारणानें तसें केलें नाहीं. बाळे ? मनुष्याचें किती विचित्र चरित्र आहे पहा ? कोणाच्याही मनांत धर्मोपदेशास स्थल मिळत नाहीं. त्यांच्या हिताचें सुविचार त्यांस सुचत नाहींत. कोणी सांगितलें तरी ऐकून त्याप्रमाणें वागणारे थोडे आणि कर्तव्याकर्तव्याकडे दृष्टी देणारे मुळींच नाहींत म्हटलें तरी चालेल. तुझें मन कोमल म्हणूनच असे उद्गार तुझ्या मुखांतून निघाले. सेनापतीचें मन सन्मार्गवर्ती होईल तर पहा. पण ती आशा व्यर्थच. इतके दिवस तो तुझ्याशीं प्रेमानें वागला आहे. तुझ्याशीं लग्न करावें, अशी त्याची प्रबल इच्छा आहे. परंतु, जातिधर्म त्याग करणं अयोग्य आणि तूं तो करणार नाहींस ही माझी खात्री आहे. परंतु आपला सतीत्वधर्म नष्ट होतो, असें जेव्हां तुला वाटेल; तेव्हां ही कुबडी घे. हींत एक कट्यार आहे. तिचा उपयोग कर. जगदीश तुझें मंगल करील. हा माझा आशीर्वाद आहे !'

असें सांगून रामानुजस्वामी चालते झाले आणि इलासुंदरी परत सभागृहांत आली. तेव्हां तिला हेमूनें विचारले, 'स्वामी काय सांगत होता ?'

सुंदरी म्हणाली 'सांगणार काय ? आपले गुणानुवाद गाऊन धन्यवाद देत होते. !'

हेमूनें विचारलें 'आणि ही कुबडी कशाला दिली ?'

सुंदरीनें सांगितलें 'ही एक औषधी आहे. मी आजारी पडलें तर ही उगाळून प्यावी इतक्याच करतां.'

प्रकरण ६ वें.

:o.

दुराशा

रामानुजस्वामी शिबिरांतून जातांच सर्व सभासदांस परमानंद झाला; आपल्या मागची एक कटकट गेली असें पाहून सभाजनाच्या पुन्हा मुखा-

रविंद्रावर टवटवी चढली. हेमू निर्धास्त झाला. तो सुंदरीस विचारूं लागला. ' स्वामी काय सांगत होता ? '

सुंदरी ह्मणाली " बोलून चालून तो विरक्त मनुष्य. त्याला राजकीय गोष्टाचें ज्ञान किती आणि तो सांगणार काय ? परंतु, या कृत्यांत कोणाची चूक आहे ? हेंच मला समजत नाहीं. " असें बोलतां बोलतां तिचा कंठ दाटला. नेत्रकमलांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. आणि तिच्यानें पुढें कांहींच बोलवेना.

तेव्हां हेमू ह्मणाला ' मला वाटतें दुसऱ्याचें दुःख पाहून किंवा ऐकून स्त्रीजातीस दुःख व्हावें असें देवानेंच त्यांचें मन कोमल केलें असावें. '

सुंदरी पदरानें नेत्र पुशीत ह्मणाली ' आणि धर्मज्ञान किंवा कर्तव्य-ज्ञान हें पुरुषांचें प्रधानलक्षण असावें. '

अजीमखां ह्मणाला. ' शुक्रहैकेइलाहीच्या कृपेनें आज आह्मी त्या मूर्खा-च्या कटकटींतून सुटलों. आतां तो गोसावडा अनूपमसिंहास भेटेल. ' हेमू विचारांत निमग्न होता ह्मणून अजीमखानें आपलें भाषण लांबविलें. ' आणि आह्मीं उद्यां छापा घालणार, हें वर्तमान त्याला सांगेल. त्याच्या सांग-ण्यानें आपलें काय अनहित होणार ? उद्यांच्या लढाईंत आह्मीं हटकून विजयी होऊं. चितोड सर करूं. सर्व राजपुतान्यावर आपला अंमल बसवूं. मग दिल्लीचें तख्त आपले ताब्यांत घेण्यास सेनापतीस फार प्रयास पडतील असें मला मुळींच वाटत नाहीं. '

हेमू ह्मणाला ' माझाही मानसिक उद्देश तसाच आहे. मेवाड सर करून आपण दिल्लीकडे वळलों ह्मणजे मात्र मागील व्यवस्था ठेवण्याची पंचा-ईत पडेल. न जाणो, शिकंदरशहाचे स्नेही समयीं हुमायुनास पुनः हिंदुस्थानांत बोलावतील आणि त्यास रजपूत मिळाले किंवा स्वतंत्रतेनें लढाई करूं लागले कीं, दोन्हीं फौजांशीं युद्ध करणें फार जड जाईल. कांहीं होवो ' देर आयद् दुरुस्त आयद् ' या निय-माप्रमाणें वागलें पाहिजे. शिकंदरशहाची मला मुळींच फिकीर नाहीं. फक्त मींच त्याचा मदतगार आहे आणि ' चितोड हस्तगत कराल तर मीं आपली आवडती कन्या तुह्मांस देईन ' असें त्यानें मला वचन दिलें आहे. त्याचा मजवर पुरा विश्वास आहे. तूर्तच्या चिन्हांवरून शहाला

लौंकरच आपलें वचन पुरें करण्याचा प्रसंग येईल असें स्पष्ट दिसतें. एकदां चितोड हस्तगत झालें कीं, मग काय पाहिजे तें करतां येईल— आपण अवघ्या हिंदुस्थानचे बादशहा बनूं. मग इतर राजेरजवाडे आपलें काय करणार ? ते आह्मांशीं बांकून वागतील अशी आपण त्यांना संधीच साधूं देणार नाहीं ह्मणजे आपले सर्व हेतू सहज साध्य होतील. '

दानेशखां या नांवाचा एक सरदार ह्मणाला ' सेनापतिसाहेब जसे लष्करी कामांत तसेच मुल्की कामांतही फार वाकबगार आहेत. त्यांच्या दूरदृष्टीची, चातुर्याची, हुषारीची आणि अक्लेची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच होईल. '

हेमू म्हणाला ' प्रिये ऐकलेंस ना हें ?

सुंदरी म्हणाली ' ऐकतें तर खरें. '

उदासीनतेनें इलेस पुन्हा घेरिलें असें पाहून हेमू म्हणाला ' माझ्या गोष्टींनीं तूं वारंवार उदास कां होतेस ? मीं हिंदुस्थानचा बादशहा झालों किंवा शिकंदरशहानें आपल्या कन्येची मजबरोबर शादी केली; म्हणून मीं तुला कधीं विसरणार नाहीं. तूं ती चिंता मुळींच मनांत आणूं नकोस. तुजविषयीं माझ्या मनांत जो प्रेमांकुर आहे; तो चांगल जोमानें दिवसें-दिवस वृद्धिंगत होईल हें मी दृढनिश्चयानें सांगतों. माझें कांहीं होवो. मीं कोणत्याही स्थितींत असलों तरी तुझ्याविषयीं माझी प्रेमबुद्धी आमरण अशीच राहील. मी तुला कधीं अंतर देणार नाहीं. तूं अगदीं निराश होऊं नकोस. '

मानसिकभाव मनांत ठेवून सुंदरी करुणस्वरानें ह्मणाली. ' आपली उच्चपदाभिलाषा पूर्ण होवो ह्मणून मीं देवाची प्रार्थना करीन. '

आश्चर्यचकित होऊन हेमू ह्मणाला ' या मतलबी भाषणाचा भावार्थ मला कांहींच समजला नाहीं. '

सुंदरी ह्मणाली. ' अहो, बोलून चालून आह्मी स्त्रिया ! आमचें काय ! जें आह्मांस सुचेल तें बोलतों. त्यांत भाव कसचा न अर्थ काय ? '

इलेचें भाषण समाप्त झालें नाहीं तोंच तंबूच्या बाहेर महान् कोलाहल-ध्वनि ऐकूं येऊं लागला. तेव्हां हेमू ह्मणाला ' वा: आपली फौज इतक्यांत सिद्ध होऊन सलामीस देखील आली ! आतां येथें राहणें चांगलें

नव्हे. ' असें बोलतच तो आसनावरून उठून तंबूबाहेर येऊं लागला आणि येतां येतां सुंदरीस म्हणाला ' तूं आपल्या फौजेची तयारी पाहायला येतेस ? '

सुंदरी ह्मणाली ' हो-हो. आणखी चितोड तुह्मीं सर केलें कीं, मी प्रथमतः आपल्यास दिल्लीश्वर ह्मणून आपला हेतू सफळ करीन. '

प्रकरण ७ वें.

रजपुतांची स्वामिनिष्ठा.

हेमू आणि सुंदरी प्रशस्त मैदानांत आलीं. तेव्हां त्यांना सर्वांनीं आदबीनें वंदन केलें. हेमू एका उच्चासनावर बसला. दुसऱ्या एका आसनावर इलासुंदरी बसली. हुजऱ्यानें नैचाची नळी हेमूपुढें केली, तेव्हां तो नैचा ओढूं लागला. सर्व सैनिकवीर हेमूपुढें शस्त्रास्त्रें सज्ज करून उभे होते. तितक्यांत गफुरखां नांवाचा एक सरदार हेमूच्या आसनाजवळ आला. त्यानें परम लीनतेनें हेमूस वंदन करून सांगितलें ' माझ्या तंबूजवळून जातांना एका वृद्ध रजपुतास आणि त्याच्या नोकरास मीं पकडून ठेविलें आहे. आज्ञा होईल तसें करीन. ' हेमू ह्मणाला ' जा त्याला घेऊन ये. '

' जो हुकम ' ह्मणून गफूर गेल्यावर सेनानायकांसहेमू सांगूं लागला ' आतां हरयुक्तीनें आह्मीं त्या रजपुतास त्यांच्या फौजेची संख्या, तयारी, किल्ल्याची स्थिती, व चोर वाटांची माहिती विचारूं. '

रजपुतांस गफूरखांनें कैद करून आणिलें. तो फार वृद्ध होता. त्याचें नांव आत्मारामसिंह. हा आत्मारामसिंह उदयपूरच्या महाराण्याकडे कारभारी होता. आणि कांहीं जरूरीच्या कामाकरितां चितोडाहून कमलमीर किल्ल्यांत जात असतांना मार्गांत त्यास शेंकडों मुसलमानांनीं कैद केलें. आपली खरी स्थिती कोणास समजूं नये, इतक्याचकरितां त्यानें बरोबर एक नोकर घेऊन प्रवासी पोषाख केला होता. दरबारांत पाय ठेवतांच आत्मारामानें विचारिलें ' ह्या चोरांचा सरदार कोण ? '

डोळे वटारून रागानें दानेषखां ह्मणाला ' खबरदार ! तोंड सांभाळून

बोंऊ. असें उद्धट आचरण करशील तर येथच्यायेथें ठार मारूं ! समजलास ? ’

आत्मारामसिंह त्वेषानें म्हणाला ‘ जारे जा ! सर्व समजलों. सिंह बकऱ्याच्या टोळींत गेला तर कधीं भिईल काय ? खबरदार कोणाला ह्मणतोस ? जे पापी किंवा अपराधी असतील त्यांस ह्मण. निर्लज्ज ! एका निरस्त्र, निरपराधी, ८० वर्षांच्या वृद्ध प्रवाशास विनाकारण तुह्मीं पकडून आणलें ! तुम्हांला लाज नाहीं ? काय तुमचें मजकडे काम आहे ? काय मीं तुमचा अन्याय केला ? कांहीं नाहीं. बरें, इतकेंही करून तुम्हींच मला दरडावतां ? बेवकूब—कमअक्कल. मला मृत्यूचें भय नाहीं. तो मीं तुम्हांसारख्या दरवडेखोरांस थोडाच जुमानणार ! अरे, भ्यावें एकलिंगभगवंतास ! ’

दानेषखां म्यानांतून तरवार काढून म्हणाला ‘ सांभाळ ! उगीच फाजीलपणा करशील तर शिरच्छेद करीन. ’

हेमू म्हणाला ‘ तूं विनाकारण आपला प्राण कां दवडतोस ? आह्मीं तुला विचारतों तें सत्य सांग ह्मणजे आम्हीं तुला सोडूं. ’

आत्मारामसिंहानें निष्काळजीपणानें सांगितलें ‘ जितकें दिसतें तितकें नाशवंत आहे. मीही कधींना कधीं मरणारच. आणखी जगून तरी मला काय करावयाचें आहे ? आतां मीं खळग्याच्या कांठीं आलों आहें. आणि मला मृत्यूची बिलकुल भीति वाटत नाहीं. कारण, माझा देह वृद्ध झाला. आणखी आजपर्यंत मी कधीं पापकर्म केलें नाहीं—हिंसा केली नाहीं. परस्त्री किंवा परद्रव्यापहार केला नाहीं. चोरीचहाडी, दगलबाजपणा, प्रवंचना किंवा प्रतरणाही केली नाहीं. मग कां मी मृत्यूला भिऊं ? माझ्याहातून झाला तितका परोपकार केला, दान-ध्यान केलें. मी मेलों तरी माझी सत्कीर्ति—माझें नांव जगांत अक्षय्य राहील. माझे [illegible] पुत्र [illegible] असतांना मला मृत्यु आला तरी मीं आनंदानें मरेन. तुह्मीं मला काय विचारणार आहां ? तुमचा माझा काय संबंध ? ’

हेमूची खात्री झाली कीं, आत्मारामास धमकी देऊन शत्रूकडील भेद समजावा तसा समजणार नाहीं. खुशामत करून अथवा लोभ दाखवूनच

आपला मतलब साधला पाहिजे. हेमू ह्मणाला ' आमच्या प्रश्नाचा तुह्मीं सरळ जबाब द्याल तर आह्मीं तुमचा चांगला गौरव करूं. या झाडींतून चितोडांत प्रवेश करण्याचें एक भुयार आहे असें आह्मीं ऐकतों. तो मार्ग तुह्मी आह्मांस दाखवाल तर आह्मीं तुमचे फार आभारी होऊं. तुमचे सर्व मनोरथ पूर्ण करूं -- मागाल तितकें धन देऊं— जीवदान देऊं. '

हेमूचें भाषण ऐकतांच आत्मारामाचे नेत्र इंगळ्यासारखे लाल झाले. अंगावर रोमांच थरारले. ओंठ स्फुरण पावूं लागले आणि तो ह्मणाला ' अधमाधम कृत्य ! तुह्मीं मनुष्य असतां आणि मीं क्षत्रीय आहे हें तुह्मांला माहीत असतें तर तुह्मीं असे प्रश्न मला विचारलेच नसते. मी प्रवासी आहे. मला यागोष्टी माहीत असण्याचा संभव काय ? आणि असल्या ह्मणून मीं स्वामीद्रोही होऊन त्या सांगेन असें तुह्माला वाटतें ? छीः छीः ! प्राण गेला तरी बेहत्तर ! अशा गोष्टी तुह्मीं मला विचारूंच नका. धनाची आणि मातीची योग्यता मला सारखीच आहे. '

दानेषखानें आत्मारामाच्या मानेवर तरवार ठेविली. तितक्यांत हेमूनें त्याला ' मारूं नका ' असा नेत्रसंकेत केला. आणि तो ह्मणाला ' ह्मातान्या, पहा ! आतांच तुजवर मृत्यू झडप घालीत होता. तूं केवळ काळाच्या दाढेंत आहेस. आमच्या प्रश्नांचा खरा जबाब देणार नाहींस तर तुझ्या देहाचे राईएवढे तुकडे करून त्यांकडून आह्मीं जबाब घेऊं; तूं काय समजलास ? बोल, तुमच्याकडे किती फौज आहे ? '

आत्मारामसिंह क्रोधसंतप्त होऊन म्हणाला ' आमच्या फौजेची संख्या समजण्याकरतां जवळच्या वृक्षश्रेणीवरील पत्रावळी मोजून आपली समाधानी करून घ्या. मला कोणी हालहाल करून ठार मारिलें; किंवा तापलेल्या तव्यावर उभें केलें; तरी मी आपल्या फौजेची संख्या किंवा कोणत्याही प्रकारचा भेद सांगणार नाहीं. '

हेमू ह्मणाला ' बरें, तुमच्या किल्ल्याची कोणती बाजू कमजोर आहे ? तुह्मीं आपलीं बायकामुलें कोणत्या सुरक्षितस्थलीं ठेविलीं आहेत ? '

आत्मारामसिंह सगर्व ह्मणाला ' आमचे सर्व किल्ले सद्धर्माच्या नद्यानें

अभेद्य आहेत. आणि आमच्या अविवाहित कन्या पित्याच्या व विवाहित स्त्रिया पतीच्या निर्भय हृदयमंदिरांत खुशाल निवास करित आहेत. रजपुतांच्या अंगीं जोंपर्यंत क्षात्रतेज चमकत आहे, तोंपर्यंत त्यांचें नखाग्र देखील तुमच्या दृष्टीस पडणार नाहीं ! '

हेमू ह्मणाला ' तुह्मी अनूपसिंहास ओळखतां ? '

आत्मारामसिंह म्हणाला. ' त्याला आबालवृद्ध ओळखतात. कारण अवघ्या राजपुतान्याचा तोच एक उद्धारकर्ता आहे. अनूपसिंह शूराग्रगण्य, महावीर, खरा जात्याभिमानी, धर्माभिमानी आणि प्रत्यक्ष देवतास्वरूप आहे. त्याच्या देशोद्धवतेची किर्ति दिगंत गाजत आहे. '

हेमू ह्मणाला ' त्याला तुह्मीं देवता समजतां असे कोणते सद्गुण त्याचे अंगीं आहेत ? '

आत्मारामानें सांगितलें ' सर्व सद्गुणांचा तो मूर्तिमंत पुतळा आहे. '

हेमूनें विचारिलें ' जयश्री ह्मणून कोणीएक गृहस्थ अनूपसिंहाचा दिलजान दोस्त आहे आणि ते दोघेही रजपूत सेनेचे सेनाधिपति आहेत; असें आह्मीं ऐकतों तें खरें ? तुह्मांला जयश्री माहीत आहे ? '

आत्माराम ह्मणाला ' वीर पुरुषांचीं नांवें ऐकिलीं तरी माझ्या मानसास उत्साहानंदानें भरतें येतें. जयश्री केवळ शत्रूंचा काळ आणि मित्राचा प्राण आहे. आहा ! त्याच्या स्वार्थत्यागाची व निःस्वार्थ बंधुतेची स्मृति झाली कीं, त्या सन्मान्य वीरशिरोमणीस हजारों धन्यवाद दिले तरी थोडेच वाटतात. काय त्याची धीरता, काय वीरता, काय उदारता, धन्य त्याची माता ! शाबास ! जी अशा सत्पुत्रास प्रसवली; जिनें वीर माता आणि वीरांगना असें जगाकडून ह्मणवून घेतलें ! जगदीश ! जयश्रीस चिरायु करो. त्याचीं शत्रु संहारक जाज्वल्य शस्त्रास्त्रें सदैव विजयी असोत आणि त्याची पौरुषसंपन्न वीरश्री दिवसेंदिवस वृद्धिंगत होवो. '

हेमू साभिमान ह्मणाला ' लौकरच लढाईचा प्रसंग येईल तेव्हां सर्वांचा पुरुषार्थ समजेल. '

आत्माराम ह्मणाला ' तुह्मांला स्वप्राणप्रीय असतील तर तुह्मीं जयश्रीशीं युद्धप्रसंग आणूं नका. '

हेमूनें विचारिलें ' कां बरें ? '

आत्मारामानें सांगितलें ' तद्वाक्यासरसा तो तुह्मांस यमसदन दाखवील इतक्याचकरतां. '

दानेषखां मध्येंच ह्मणाला ' काफर सांभाळ. '

आत्माराम ह्मणाला ' अरे ! तूं कुत्र्यासारखा अंगावर कां येतोस ? बेशरम बटकीचा ! '

दानेषखांचा द्वेष अनावर झाला. त्यानें आत्मारामसिंहाच्या मानेवर तरवारीचा एक वार केला. तो खांद्यावर बसला त्याबरोबर तो वृद्ध रक्तबंबाळ होऊन धाडकन् जमीनीवर पडला. असें लोमहर्षण व दुःखकारक कृत्य पहातांच सुंदरी गहांवरून तेथें गेली. तिनें वृद्धाचें शिरकमळ आपल्या मांडीवर घेतलें. पदरानें वारा घातला आणि शोक करीत ती ह्मणाली ' अरेरे ! काय केलें हें ? अशा निःशस्त्र वृद्धावर विनाकारण शस्त्रप्रहार ! ' वृद्धास संबोधून ती ह्मणाली ' तुमची अशी दीनदशा पाहून माझा हृत्कंप होतो. कसे तुह्मीं या घातक्यांच्या हातीं सांपडला ? आणि विनाकारण मृत्युमुखीं पडला ! '

आत्माराम क्षीणस्वरानें ह्मणाला ' बाई, तूं कां कष्टी होतेस ? असो, भगवान तुझें कल्याण करो. जगदीश ' असें ह्मणत आत्मारामानें प्राण सोडला. तरी इलासुंदरी तेथेंच बसली होती.

आत्मारामसिंहाची अशी भयंकर दशा पहातांच हेमू दिग्मूढ झाला. कांहींवेळ त्याच्या तोंडांतून एक शब्दही निघेना. तो इलासुंदरीकडे पहात विचार करीत स्वस्थ होता. शेवटीं गफूरखांस त्यानें सांगितलें ' या प्रेताला येथून न्या. '

आत्मारामसिंहास तेथून नेल्यावर इलासुंदरी आपल्या आसनावर येऊन बसली आणि तिनें हेमूस विचारलें ' सेनापति ! या वृद्धानें तुमचा काय अन्याय केला आणि तुह्मीं याला देहांताची शिक्षा कां केली ? खरेंच सांगतें, अशीं दुष्टकृत्यें पाहिलीं ह्मणजे मला मृत्यु येईल तर बरें असें वाटतें. हीं कर्में तुमचें मजवर किती प्रेम आहे तें स्पष्ट दाखवितात. अथवा अशा कर्मानें माझा संताप वाढावा; मला होईल तितकें दुःख व्हावें; ह्मणून तर करीत नसाल ना ? '

हेमू ह्मणाला ' झाली गोष्ट परत येत नाहीं. तूं उगीच दुःख करूं नकोस. '

इलासुंदरी ह्मणाली ' या चिन्हांवरून मला इहजन्मीं सुख होईल असें दिसत नाहीं. '

हेमू कर्कश स्वरानें ह्मणाला ' दानेषखां, खबरदार असें दुष्टकृत्य माझ्या आज्ञेशिवाय कोणी करील तर. तुह्मींच पहातां ? आतां तो गोसावडा मनःपूत बडबडला. दुसरा कोणी असता तर त्याला येथेंच ठार मारता, पण त्याच्या बडबडीनें काय होणार ? असें समजुन मीं स्वस्थ राहिलों. या ह्मातान्याकडून कांहींना कांहीं माहिती मिळाली असती. तो हळुहळू सांगण्याच्या मार्गास लागला होता. त्याला तुह्मीं व्यर्थ मारलें. त्याच्या उद्दाम भाषणाकडे चित्त देण्यापेक्षां आपल्या मतलबाकडे देणें भाग होतें. मनुष्यमात्राला सारासार विचार पाहिजे तो इतक्याच करतां. '

दानेषखां हेमूच्या पाया पडला. त्यानें फार आर्जवानें सांगितलें ' वारंवार तो हुजुरास बेजबाब बोलूं लागला ते या निमकहलाल सेवकास ऐकवेना. क्रोधातिशयानें मीं अनावर झालों आणि—'

हेमू ह्मणाला ' झालें तें झालें; पुढें असें करूं नका. त्याच्या चाकरास सोडा. अरे ! तुझ्या धन्यास विचारलेल्या प्रश्नापेक्षीं तुला कांहीं माहिती असेल तर सांग. '

चाकर ह्मणाला ' मला कांहीं माहीत नाहीं. मीं घातलेल्या अन्नाचा आणि सांगितलेल्या कामाचा. मलाहीं मारणार असाल तर खुशाल मारा.'

हेमू ह्मणाला ' जा तुला जीवदान दिलें. '

चाकर, इलासुंदरीस सांगूं लागला. ' तुझी पद्धति पाहून मला फार आश्चर्य दिसतें ! ह्या राक्षसमंडळांत तूं केवळ देवी आहेस. माझ्या धन्याचें प्रेत मजकडे देववशील तर मीं त्याची उत्तरक्रिया करवीन. '

हेमूनें सांगितलें ' जा प्रेत घेऊन जा. '

चाकर आत्मारामसिंहाचें प्रेत घेऊन गेला.

हेमू आपल्या सरदारांस ह्मणाला ' आपल्या फौजेची जय्यत तयारी पाहून माझ्या मनाचें समाधान झालें चितोडावर आमचें निशाण फडकूं लागलें कीं, आपले सर्व हेतु सफल झाले असेंच समजलें पाहिजे. '

सर्व सैनिक वीर आपल्या छावणींत गेले. हेमूही सहल करावयास गेला. इलासुंदरी त्या प्रशांत मैदानांत एकटीच बसली होती. शेरखां तेथेंच होता. सर्व मंडळी तेथून गेल्यावर शेरखां तिच्याजवळ आला आणि ह्मणाला 'आपण पाह्यचें तें पाहिलें; ऐकायचें तें ऐकलें. अजून देखील अशा सैतानी मेळ्यांत रहावें अशी आपली उमेद आहे ?'

इलासुंदरी ह्मणाली 'माझी बुद्धि अगदीं गुंग झाली आहे ! या स्थितीचा मला फारच वीट आला. काय करूं ! माझा सर्व प्रकारें नाइलाज आहे !'

शेरखां म्हणाला 'हा बंदा गुलाम तुमच्या सेवेंत तत्पर आहे. मीं तुमच्या एका केंसासही धक्का लागूं देणार नाहीं. माझ्या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत तुह्मीं मुळींच काळजी करूं नका. फार तर काय ? मीं शपथ वाहून सांगतों कीं, तुह्मीं आज्ञा द्याल तर मीं आतां हेमूचें शीर कापून तुमच्या पायावर आणून ठेवीन.'

इलासुंदरी ह्मणाली 'या धाडसांत अर्थ काय ? जावें तरी कोठें ? माता लहानपणींच मेली. पित्याचीही तीच दशा. आतेनें त्यांचाच मार्ग धरिला. आतां मी राहिलें आहे; ती एकदां मेलें ह्मणजे सुटणार ! आतां माझें चित्त स्थिर नाहीं. मला जगाचा कंटाळा आला आहे. मग केव्हां तरी आपण या गोष्टीचा विचार करू. आतां तुह्मीं चला.'

शेरखांनें सांगितलें 'हुकूम होईल तेव्हां मी चाकरीस हजर आहे' असें सांगून शेरखां गेला.

तिच्या मनांत नानातरंग उद्भवूं लागले. ती स्वप्नांत ह्मणाली 'माझी भावि दशा काय होणार ? कांहीं समजत नाहीं. इतके दिवस कसेही घालविले. आज लग्न करूं, उद्यां करूं असें सांगून वेळ मारून गेली. ह्मणून त्या नरपशूच्या जुलमांतून बचावलें. नाहींतर माझे हाल कुत्रा-देखील न खाता ! शेरखांसारख्या हलकटाशीं भाषण करणेंही अयोग्य. जो स्वार्थांध आपल्या धन्यास मारण्यास तयार; त्याच्या शपथेवर कोणी विश्वास ठेवावा ? तो माझें मन तर पहात नसेल ? पाहीना. त्याची कोण पर्वा करतें ? मीं इतके दिवस काढले ते माझी इच्छा पूर्ण केल्याशिवाय येथून जाईन ? नाहीं. ज्यानें माझ्याशीं कपट केलें, त्याचा प्राण घेत-ल्याशिवाय मीं जाईन ? नाहीं. अशा दुष्टाशीं गोड बोलन त्याचा

गळा कापला पाहिजे. देवाच्या दयेनें कट्यारही मिळाली आहे. तिशींचा त्या चांडाळाचें लग्न लावतें. काय मूर्खाची साम्राज्याभिलाषा स्त्रिया आपल्या प्रियकराचें जसें प्रिय करतात; तसाच त्यांस अप्रिय करणाराचा घातही करतां येतो. हेमू ! तूं नागिणीस दुखविलें आहेस. ध्यानांत ठेव. ती केव्हां तुला जगांतून उठवील ह्याचा नेम नाहीं. तूं माझा सर्व नाश केलास. त्याचा मीं सूड उगविल्याशिवाय कधीं रहाणार नाहीं. क्षत्रियनारींच्या अंगीं किती अलौकिक पराक्रम असतो हें तुला दाखवीन तर मीच दाखवीन. माझ्या क्रोधाग्निकुंडांत तुला दग्ध करून जगांतील एक कांटा काढून टाकण्यास मला आतां वेळ नको. रात्रीच्या-वेळीं कैफानें धुंद होऊन तूं पडलास कीं, ही कट्यार तुझ्या छातींत आरपार खुपशीन. तुझ्या रक्ताचा सडा घालून माझा क्रोधाग्नि शांत करीन. माझ्या पित्याच्या मरणास तूं कारण झालास. चांडाळा, तुझा प्राण घेऊन त्याच्या आत्म्याचें समाधान करीन तेव्हां मी स्वस्थ होईन.'

अशाप्रकारच्या अनेक विचारांनीं इलासुंदरीचें मन क्षुब्ध झालें. तिला कोठेंच करमेना. म्हणून ती तेथून आपल्या तंबूंत गेली.

प्रकरण ८ वें.

:o:

तरुण आणि तरुणी.

सायंकाळची वेळ. एका सुशृंगारित महालांत जगत् जनमन मोहन तरुण आणि तरुणी शांत मनानें बोलत बसलीं होती. ह्या तरुणाचें नांव वाचकांच्या परिचयांतील आहे. आतां हा प्रत्यक्षच पहाण्याचा प्रसंग आला. ठीक आहे. ह्याचें नांव अनूपसिंह आणि ह्याच्या पित्याचें नांव अजितसिंह. अजितसिंह चांगला गुणग्राहक, उदारहृदय, सत्यप्रिय, परोपकारी, गंभीर, प्रामाणिक वीरश्रीसंपन्न होता. कोणीही दुःखानें गांजून किंवा विपत्तिग्रस्त होऊन त्याकडे येवो, तो यथाशक्ति त्याला सहाय करी. त्याची दीनवत्सलता लोकप्रसिद्ध होती. अंध, पंगु, दरिद्री व अनाथ लोक दात्याच्या धनाचे अधिकारी आहेत तें त्यांस दिलेंच पाहिजे. असा त्याचा

दृढ समज होता. दाता बहुधा परदुःखानें दुःखी व सुखानें सुखी असतो. तो विपुलधनाधीश कां असेना ! त्याचें भांडार लौकरच द्रव्यशून्य होतें. आणि तेंही खरेंच. जो जें मागायला येणार त्याला तें देत राहिलें तर कुबेरासारख्याचेंही भांडागार लौकरच रिकामें होईल. यामुळेंच दाता दरिद्री व कृपण, धनसंपन्न असतो. अजितसिंह उदयपुराधिपतीचा खजिनदार होता. तरी त्याच्या दातृत्वामुळें त्याकडे त्याच्या स्वतःची म्हणून कांहींच शिल्लक नव्हती असें म्हटलें तरी अतिशयोक्तीचा दोष पदरीं घ्यावा लागेल असें वाटत नाहीं. अजितसिंह परलोकवासी झाला तेव्हां उदयपुराधिपतीनें त्याच्या उत्तरक्रीयेस द्रव्याची वगैरे मदत दिली ! यावरून अजितसिंहाकडे द्रव्यसंचय किती होता ही कल्पना सहज करतां येईल. तो शांतिनिकेतन स्वर्गधामवासी होतांच त्याची साध्वी व सुशील स्त्री त्याबरोबरच मतिलोकयात्रेस गेली. अर्थातच अनूपसिंह निराधार झाला. तेव्हां, त्याच्या एका दूरच्या नातलगानें त्याला आपल्याकडे नेलें. तो नातलग हेमूकडे रिसालदार होता. त्याबरोबर अनूपसिंह वारंवार हेमूकडे जात असे. अनूपसिंह फार सुरेख होता. त्याचे आयतलोचन, उन्नत कपाल, विशाल वक्षस्थल, सुगोल हस्त व पाय, हृष्टपुष्ट व बलिष्ट देहकांति पहातांच कोणाच्याही मनांत तो चांगला ठसे. हेमूनें त्याला पहातांच तो कोण वगैरे चौकशी केली आणि त्याची हकिगत एकतांच, हेमूच्या मनांत दया व स्नेह यांचा संचार झाला. हेमूनें त्याला आपल्याकडे ठेवून घेतलें आणि सर्व प्रकारची युद्धकला शिकविली. अनूपसिंह जसा सुरेख होता तशीच त्याची बुद्धिमत्ताही चांगली नांवाजण्यासारखी होती. लौकरच तो युद्धकलाविशारद व अद्वितीय वीरपुरुष बनला किंतीएक दिवस तो हेमूच्या वतीनें रजपूतांशीं युद्ध करी आणि हिंदुलोकास पीडा देण्याच्या कामीं चांगलें सहाय्य देई. अशा स्थितींत कांहीं काळ लोटल्यावर त्याची आणि रामानुजस्वामींची भेट झाली. स्वामींच्या उपदेशामृतानें अनूपसिंहाच्या अंतरांत नवजीवन संचार झाला—त्याचा समज बदलला—आपण हिंदु, हिंदुलोकांशीं युद्ध करणें आणि आपल्या देशबांधवांच्या रक्तानें आपली तरवार कलंकित करणें आपल्यास योग्य नव्हे असें त्याच्या मनांत चांगलें

उसलें. त्यानें हेमूस पुष्कळ प्रकारांनीं सांगितलें कीं, हिंदुलोकांस व्यर्थ त्रास देणें आपल्यासारख्या थोरांस अनुचित. हेमू कसला वस्ताद ? आणि तो अनूपसिंहासारख्या आपल्या शिष्याचें थोडेंच ऐकणार ? त्यानें तिकडे अलक्ष्यच केलें. शेवटीं अनूपसिंहाचा अगदीं नाइलाज झाला. तो हताश झाला. हेमू आपलें म्हणणें बिलकुल जुमानणार नाहीं अशी त्याची खात्री झाली; तेव्हां त्यानें हेमूच्या पक्षाचा त्याग करून स्वदेशीयांचा व स्वज्ञातिबांधवांचा पक्ष स्वीकारला. अनूपसिंह हेमूकडून गेल्यादिवसापासून हेमूनें एकादेखील लढाईंत जय संपादन केला नाहीं. हेमची अनूपसिंहाच्या अलौकिक शौर्यप्रभावाविषयीं खातरजमा होती. तो जिवंत असेपर्यंत रजपुतांशीं युद्ध करून आपणास जयप्राप्ति होणार नाहीं असें तो पक्कें समजून होता. आपला शिष्य आणि तो आपल्याविरुद्ध; ह्यामुळें हेमूचा नेहमी तिळपापड उडे ! तो अनूपसिंहाच्या विघातास टपलेलाच होता. त्यानें पुन्हां आपल्याकडे यावें एतदर्थ हेमूनें आपल्या अकलेप्रमाणें होते तितके प्रयत्न केले; परंतु त्यापैकीं एकदेखील उपयोगीं पडला नाहीं.

अनूपसिंहाजवळ बसलेली यौवनसंपन्न बालिका त्याची धर्मपत्नी होय. तिचें नांव क्रीडा. क्रीडा ही आनंदरावाची लाडकी कन्या. लहानपणीं क्रीडेचें चित्त बालक्रीडेकडे फार असे. ती समवयस्क कन्यकांशीं पहावी तेव्हां खेळांत गुंतलेली असे. एकदां ती आपल्या खेळांत गर्क झाली कीं, खाण्यापिण्याकडेही तिचें मन जात नसे म्हणून आनंदरावानें तिचें नांव क्रीडा ठेविलें होतें. आनंदराव हा जोधपूरचा मुख्य प्रधान होता. चंद्रकलेप्रमाणें क्रीडा जशी तारुण्यावस्थेंत येऊं लागली; तसतशी अनुपम सुंदर दिसूं लागली. ती गजगामिनी आपल्या मैत्रिणींसह उपवनविहारार्थ रमणीय पुष्पवाटिकेंतून जाऊं लागली कीं, अवघा बगीचा तिच्या परममनोरम लावण्यसंपन्नतेकडे पाहून लज्जित होई. चंपा तिच्या सरल नासिकाकडे पाहून, कुंदकळ्या तिच्या दंतपंक्ती पाहून, गुलाब तिच्या गालांकडे पाहून, नील कमलें तिच्या नेत्रांकडे पाहून, सुवर्णचंपक तिच्या अंगकांतिकडे पाहून, आरक्तकमलें तिच्या पदकमलांची आरक्तता पाहून परम लज्जित होत. भ्रमरपंक्ति तर गुलाबाकडे गुंजारव करू

जावें कीं, गालाकडे जावें ? हेंहीं विसरून जात ! आणि मंदसुगंधशीतळ वायूनें हिंदोलित होणाऱ्या कंजकलिका तिला आपल्याकडे बोलावित आहेत असें दिसे.

क्रीडेच्या सुंदर रूपराशीची प्रशंसा ऐकून मालश्री राण्यानें आपल्या जयश्रीनामक पुत्राशीं तिचा विवाह करण्याची मागणी घातली. मालश्री उदयपुराधिपतीचा प्रधानमंत्री होता. या संधीसच हुमायुनबादशहानें कान्यकुब्ज प्रांतावर स्वारी केली. त्या लढाईंत अनूपसिंहानें चांगली तरवार गाजविली. त्याच्या रणनैपुण्यानें व अलौकिक युद्ध चापल्यानें मोंगल परास्त झाले. आणि हुमायुनास हिंदुस्थानांतून पळून जाण्याचा प्रसंग आला.

विजयी वीरशिरोमणि अनूपसिंह जोधपुरास आला; तेव्हां त्याचा सत्कार करण्याकरतां कुलीन कामिनी मांगलिक कलश घेऊन राजपथाच्या दोन्हीं बाजूंस उभ्या होत्या. जिकडे तिकडे मंगलवाद्यें वाजत होतीं. गुढ्या तोरणांनीं सर्व शहर शृंगारलें होतें. कित्येक स्त्रिया मंजुळस्वानें मंगलगीतें गात होत्या. त्यांत क्रीडाही होती. अनूपसिंहाची आणि तिची दृष्टादृष्ट होतांच परस्परांनीं परस्परांच्या हृदयमंदिरांत आपला अधिकार बसविला. आणि भाग्यबलानें दोघांसही संभाषणाची सवड सांपडली, तेव्हां तर त्यांच्या अंतःकरणांत प्रबल प्रेमसंचार झाला.

उदयपुराधिपतीच्या मंत्रीपुत्र जयश्री रजपूतसैन्याचा अधिपति होता. तो महानपराक्रमी असे. त्याचें आणि अनूपसिंहाचें अतिशय सख्य होतें. दोघेही जीवास जीव देणारे सन्मित्र होते. त्यांची निःस्वार्थबंधुता होती. ह्या पापकर्दमलिप्त संसारांत अशा निःस्वार्थभावानें मनास मन मिळणें कठीण ! हें तर खरेंच. सद्यस्थितीकडे दृष्टि दिली तर स्वार्थ हीच एक समाजाची प्रधान देवताच बनलेली आहे. अवघें जगच स्वार्थांध आहे. स्त्रिया पतींची रात्रंदिवस सेवा करतात; सेवक स्वामीच्या मनाचें समाधान व्हावें म्हणून अविश्रांत श्रम करितात; पिता पुत्राचें परम यत्नानें लालनपालन करितो; आपला उपासमार करून पुत्राच्या शिक्षणास द्रव्य खर्च करतो; त्याला वस्त्रपात्र व पुस्तकें वगैरे देतो; माता

लडिवाळपणानें कन्येचें पालन पोषण करितात; पुत्र किंवा कन्या माता पितरांनीं ताडण केलें तरी त्यांच्या आज्ञेंत वागतात; हें कां ? केवळ स्वार्थाकरतां. सर्व कृत्यांत स्वार्थाशिवाय दुसरा कोणताच उद्देश नाहीं. स्वार्थानें चटसारें जगच बांधलेलें आहे. जावें तेथें आणि पहावें तिकडे स्वार्थ–स्वार्थ आणि स्वार्थ. असो. स्वार्थप्रिय जगांत निःस्वार्थ प्रेमा विरळाच, तरी जयश्री व अनूपसिंह यांचे प्रेमांत निःस्वार्थ प्रेम मूर्तिमंत दिसत असे. त्यांच्या प्रेमांत स्वार्थाचा गंधही नव्हता. दोघांचेंही मन एका विचारस्रोतांत प्रवाहित होत असे. आपल्या आर्यभूमातेचें कसें हित होईल ? स्वज्ञातिबांधवांची व आपल्या सनातन आर्यधर्माची उन्नतावस्था कशी होईल ? कोणत्या सदुपायानें परकीयांच्या त्रासांतून आपले लोक सुटतील ? असे आणि अशाचप्रकारचे दोघांचेही स्वदेशहितचिंतक विचार असून ते सिद्धीस नेण्याकरतां ते अविश्रांत श्रमही करीत. ते जसे वीरपुरुष होते; तशीच त्यांचीं मनेंही धीरोदार असत. दोघांचेंही अंतरंग निष्कलंक व निष्पाप होतें. यामुळें त्यांचें मित्रत्वही तसेंच स्तुतिपात्र होतें. दोघेही थोर मनाचे, गंभीर, सुखी व महत्पुरुष होते. जणू श्रीरामलक्ष्मणाप्रमाणें त्यांची जोडी जमली होती.

एकदां ते दोघेही शांतमनानें बोलत असतांना, अनूपसिंहानें क्रीडेवर आपलें मन मोहित झालें आहे; असें जयश्रीस सांगितलें. जयश्रीच्या मनांत देखील तिजविषयीं प्रेम होतेंच. त्यानेंही ती आपल्यास देण्याची वाटाघाट चालली आहे; असें प्रांजळ मनानें कबूल केलें. काय चमत्कार पहा ? एका तरुणीवर दोघांची प्रीति आणि तशांतही ते सन्मित्र. मग तेथें मित्रता कसची ? पण नाहीं. ते पडले खरे मित्र. तशांत अभिन्नहृदय. त्यांनीं क्रीडेचा नाद सफाई सोडून दिला. दोघांपैकीं एकही तिच्याशीं विवाह करूं इच्छिना. अनूपसिंहास विचारलें तर तो जयश्रीचें नांव सांगे आणि जयश्री अनूपसिंहाकडे बोट दाखवी. अशा भानगडींत कांहीं दिवस गेल्यावर जयश्रीनें बारीक तपास केला. तेव्हां क्रीडेची खरी प्रीति अनूपसिंहावर आहे; असें त्यास समजलें. तेव्हां त्यानें क्रीडेचें अनूपसिंहाशीं लग्न लाविलें आणि तो तिला बहिणीप्रमाणें मानूं लागला. इतकेंच नव्हे तर त्यानें आतां " आपण अविवाहितच रहाणार

अशी दृढ प्रतिज्ञा केली. कोठें असें मित्रत्व सांपडेल ? कोठें अशी बंधु-प्रीति आहे ? आणि कोठें अशी निःस्वार्थ बुद्धि आहे ? कां आह्मी तिला निःस्वार्थबंधुता ह्मणूं नये ? कां आपण त्याला प्रातःस्मरणीय मानूं नये ? कां तो सत्पुरुष नव्हे ? खरेंच असें मित्रत्व मिळणें कठीण ! तुह्मीं पाहिलें किंवा निदान ऐकलें तरी असल कीं, पिता पुत्राशीं एखाद्या कन्येचा विवाह करण्याचा निश्चय करता; आणि आपणच तिच्याशीं लग्न लावून स्वस्थ बसतो. पुत्र पित्याकरितां; बंधु बंधुकरितां एखादी स्त्री ठरवून तिशीं स्वतःच लग्न करून मोकळे होतात ! धिःकार असो अशा जीवितास ! ! !

अनूपसिंहाची क्रीडेवर अतुलनीय प्रीति होती आणि क्रीडाही अनूप-सिंहास देवाप्रमाणें सन्मान देऊन भक्तीनें त्याची सेवा करी. भाग्यवती क्रीडा लग्न झाल्यावर लौकरच गर्भवती होऊन यथाकाल पुत्रवतीही झाली. तिनें आपल्या पुत्राचें नांव प्रतापसिंह ठेविलें ती प्रतापाचें संगोपन व सुश्रूशा यथानियम प्रफुल्लित मनानें करी बालशिक्षणाची तिला चांगली माहिती होती. प्रतापसिंहही जात्या मोजिरवाणें बालक होतें. आणि त्यावर क्रीडा प्राणापेक्षांही विशेष प्रीति करी.

एके दिवशीं क्रीडा, प्रतापसिंहास अनूपसिंहाकडे देऊन विनोदानें ह्मणाली ' प्राण ! आपल्या प्रतापाचें स्वरूप, सौंदर्य अगदीं आपल्या-सारखें आहे. '

स्मित हास्य करून अनूपसिंह ह्मणाला ' मला वाटतें आपला सुकु-मार कुमार हुबेहुब तुझ्यासारखा आहे त्याचें सुहास्यवदन, नेत्रकमल, गुलाबी गाल, धनुष्यासारख्या भृकुटी, विस्तृत कपाळ, सरळनाक – '

क्रीडा मध्येंच ह्मणाली ' आणि तुमच्यासारखे इतर सुरेख अवयव आहेत ते ? हें बाळ मला फारच आवडतें. क्षणभर जर हें दृष्टिआड झालें तर माझा जीव तळमळूं लागतो. काय मला याची इतकी प्रीति वाटते कोण जाणें ! माझा तर खास असा समज आहे कीं, माझा लाडका प्रताप माझे हृदयमंदिरांतील अधिष्ठात्या देवतेचाच केवळ नमुना आहे. कसला माझा सुंदर बाळ तो. असें ह्मणत अनूपकडे प्रताप अस-तांनाच तिनें प्रतापसिंहाचा मुका घेतला.

अनूपसिंह म्हणाला ' प्रिये ! या बालकाचें मुख पाहिलें कीं, तुझी जनमोहिनी सुंदर मूर्ति माझे अंतःकरणांत चित्रित होते आणि मला जो आनंद होतो त्याला खरोखर सीमा नाहीं. बरें, स्त्रियांस मुलें झालीं म्हणजे त्यांची पतिवरील प्रीति कमी होते; असें म्हणतात तें खरें काय ? '

क्रीडा म्हणाली ' इतर स्त्रियांविषयीं माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं; पण माझा स्वतःचा समज असा आहे कीं, ती प्रीति मुलें झाल्यावर वृद्धिंगत होत जाते. '

अनूपसिंह म्हणाला ' असें कसें होईल ? प्रीति एक. ती दोनस्थळीं विभक्त होत नाहीं काय ? '

क्रीडा संदिग्ध मनानें म्हणाली ' आजच आपण असा प्रश्न केला त्यामुळें माझें मन साशंक झालें. मजविषयीं तुमच्या मनांत कांहीं शंका आली नाहींना ? '

अनूपसिंह म्हणाला ' छीः छीः ! तसें नाहीं. तूं शंकित होऊं नकोस. तुझ्याविषयीं माझें मन शुद्ध आहे. तूं निष्कपट आणि पतिप्राणस्त्री आहेस यांत मुळींच संशय नाहीं. तूं दुःखित होऊं नकोस. मी तो प्रश्न साहजिक विचारला. '

क्रीडा आग्रहानें विचारूं लागली ' असें खरें तर माझी शपथ घ्या '

अनूपसिंह म्हणाला ' मी केव्हां तरी मिथ्या भाषण करतों काय ? तुझ्या गळ्याची शपथ. झालें आतां. '

अशा मधुर गोष्टी चालल्या असतांना मध्येंच अनूपसिंहानें ' जगदीश ' असें म्हणून जांभई दिली. तेव्हां क्रीडस आश्चर्य वाटून ती म्हणाली, या दासीकडून अनुचित व्यवहार घडला असेल असें दिसल्यामुळें तुम्हीं असे ' उद्गार काढले ! नाहीं तर तुम्हीं असे चिंताग्रस्त कां दिसतां ? इतक्यांत तुमची चित्तवृत्ति व मुखश्री पालटली कशी ? काय असेल तें सांगा. मला अशा दुःखांत ठेवूं नका— '

क्रीडा आणखी आग्रहानें विचारणार होतीच. परंतु अनूपसिंह मध्येंच म्हणाला ' वेडी कुठची ! उगीच अधीर होऊं नकोस. मी तुला सर्व सांगतों. यवनसैन्य आमच्या प्रांतावर चढाई करून आलें आहे. आमचा सर्व नाश करावा असा त्यांचा इरादा आहे. हें तुला माहीत आहेना ? '

क्रीडा ह्मणाली 'जयापजयाचा कांहीं नेम नाहीं हें खरें. तरी सिंहपराक्रमापुढें बकऱ्यांचें जितकें शौर्य; किंवा सूर्यापुढें काजव्याचा जितका प्रकाश; तितकाच प्रियकराच्या वीरश्रीपुढें यवनांचा !'

गीरगंभीर स्वरानें अनूपसिंह म्हणाला 'कोणाचा जय होईल व कोणाचा नाहीं ? हें सांगवत नाहीं. परंतु वाईट कल्पना प्रथम मनांत येते. न जाणो, यवनांचा जय झाला आणि ते दुर्मति नगरांत शिरले तर ते तुह्मांसारख्या अबला स्त्रियांची काय दुर्दशा करतील तें सांगवत नाहीं. याच विचारानें माझें मन चिंताग्रस्त झालें आहे. आह्मी आज आनंदानें गोष्टी बोलत आहों; पण उद्यां कसा कठीण प्रसंग येईल ह्याचा काय नेम आहे ? तुझें कसें होईल हीच माझ्या जिवास मोठी तळमळ लागली आहे. जगदीश ! तूं सर्व समर्थ आहेस. सत्याचा जय करणें किंवा आमच्या अब्रूचें संरक्षण करणें तुझ्या स्वाधीन आहे.'

क्रीडा सदर्प ह्मणाली 'यवनांचा जय झाला ह्मणून काय झालें. ते दुष्ट यवन शहरांत प्रवेश करण्यापूर्वींच मी लाडक्यास घेऊन दुर्भेद्य दुर्गांत जाईन. माझी काळजी मुळींच करूं नका तुह्मी मात्र आपल्या जिवास सांभाळा—आपला जीव धोक्यांत पडेल असें करूं नका ह्मणजे झालें.'

अनूपसिंहानें सांगितलें. 'विपत्तिकाळीं धैर्य धरणारा विरळा. मनुष्यास एकदां विपत्तीनें ग्रासिलें ह्मणजे त्याला कांहींच सुचत नाहीं असें होतें. कदाचित सुचलेंच तर त्याचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. विपत्तिग्रस्त दशेंत मनुष्याची बुद्धि विपरीत होते. आणि त्याला कर्तव्याकर्तव्याचें भान रहात नाहीं. तेव्हां आपले प्राण कसे वांचतील ? हीच मुख्य चिंता असते. प्रसंगाचा काय नेम आहे ? तूंच पहा कीं, किल्ल्यांत पोंचण्यापूर्वींच तूं संकटांत पडणार नाहींस, याचा काय नेम आहे ? मग तूं आपले प्राण वांचविण्याचा प्रयत्न करशील कीं, प्रतापाच्या संरक्षणाची तजवीज पहाशील ?'

क्रीडा ह्मणाली 'केव्हां कोण कशा विपत्तींत सांपडेल याचा नेम नाहीं हें खरें. एतदर्थ विपत्तिकाळ येण्यापूर्वींच सावधानता ठेवावी; हा मनुष्यमात्राचा धर्मच आहे आणि भाविदशा सांगून येते असेंही नाहीं. परंतु मीं खात्रीनें सांगतें कीं, स्त्रिया स्वप्राणार्पण करूनही स्वसंतानाचें

संरक्षण करण्यांत कधीं माघार घेणार नाहींत. माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी लाडक्याच्या एका केंसासही धका लागूं देणार नाहीं. मी माझ्या रत्नास—मी माझ्या छबकड्यास असा हृदयाशीं धरून किल्ल्यांत जाईन. ' असें ह्मणून तिनें प्रतापास आपल्याकडे घेतलें.

अनूपसिंहानें सांगितलें ' मी चिंतासागरांत सांपडूं नये असा तुझा विचार असेल; तर तूं आतांच प्रतापास घेऊन किल्ल्यांत जा. आज महाराण्यानें सर्व शहरभर अशी दौंडी पिटविली आहे कीं, उद्यां दोन-प्रहरीं कराला देवीची पूजा झाल्यावर उदयपुरांतील सुशील स्त्रीयांनीं आपल्या मुलांलेकरांस घेऊन किल्ल्यांत जावें. तूंही त्यांच्या बरोबरच जा ह्मणजे झालें. '

क्रीडा सभय ह्मणाली ' तुह्मांला पाहिल्याशिवाय मला क्षणभर देखील चैन पडत नाहीं. तुह्मांला सोडून मी जाऊं कशी ? तुह्मी जवळ नाही तर माझे प्राण वाचतील असें तुह्मांस वाटतें कां ? '

अनूपसिंह प्रीतीनें म्हणाला. ' तुझें मन मोडावें; तुला दुःख होईल असें करावें; असें माझ्या मनांत मुळीच नाहीं. परंतु महाराणाजीची आज्ञा शिरसावंद्य करणें हा आह्मां प्रजाजनांचा धर्म आहे. इतक्याकरतांच तूं गेलें पाहिजेस असें मी आग्रहानें सांगतों. '

असे त्या स्त्रीपुरुषाचे वार्तालाप चालले होते; इतक्यांत, ' जयश्री आला आहे ' अशा सूचना आली आणि त्याला परवानगी मिळतांच तो दिवाणखान्यांत आला. क्रीडा उठून सलज्ज उभी राहिली. तिनें, प्रतापसिंहास कडेवर घेतलें. तरी तो खालीं उतरण्याची उत्कंठा दाखवूं लागला. ह्मणून तिनें त्याला जमिनीवर ठेविला. तेव्हां तो जयश्रीकडे गेला. त्यानें त्याला उचलून घेतलें आणि तो म्हणाला ' लहान मुलास कांहीं समजत नाहीं, असें कित्येकांस वाटतें; परंतु माझा तर समज त्याविरुद्ध आहे. आपल्यावर कोण प्रीति करते ? कोणाकडे आपणास सौख्य होतें ? कोणाचें वर्तन आपल्याशीं कसें असतें ? हें सारें त्यांना चांगलें समजतें. प्रताप—हा लबाडा ? तुला हें समजतें काय ? '

प्रतापसिंह ' हूं करून हांसला. '

जयश्री ह्मणाला ' हें पाहिलें ? यानें आपल्या भाषेनं आह्मांला जबाब

दिला. प्रभूनें या प्रतापसिंहास चिरंजीव करावें. अशी मी मनोभावानें परमेश्वराची प्रार्थना करतों. अनूपसिंह, तुला काय सांगूं ? याला पाहिलें कीं, माझ्या मनाला अत्यानंद होतो. आतां मी महाराणाजीकडून आलों. त्यांनीं मला सांगितलें कीं, कराला देवीची पूजा होतांच सर्व कुलकामिनींनीं आपल्या मुलालेंकरांस घेऊन किल्ल्यांत जावें अशी तजवीज करा. ताई, तूं प्रतापास घेऊन महाराणाजींच्या आज्ञेप्रमाणें किल्ल्यांत जा. '

धीरगंभीरतेनें क्रीडा ह्मणाली. ' तुह्मासारख्या शौर्यवान् पुरुषांच्या संरक्षणाहून किल्ल्यांत आमचें संरक्षण चांगलें होईल असें तुह्मांस वाटतें कां ? खरोखर मला एकटीला किल्ल्यांत कसें चैन पडेल ? '

जयश्री ह्मणाला. ' असें नव्हे. आमच्या हातून तुमचें रक्षण होणार नाहीं किंवा आह्मीं असमर्थ आहों असा अर्थ नव्हे. एका म्यानांत जशा दोन तरवारी रहात नाहींत; तसेंच एकाकालीं दोन विचार अमलांत येऊं शकत नाहींत. तूं विचारी व शहाणी आहेस. तूंच पहा. आह्मीं शत्रूशीं युद्ध करूं लागलों आणि तितक्यांत तुमच्या संरक्षणाची चिंता आमच्या मनांत उत्पन्न झाली ह्मणजे आमच्या हातून एकही काम यथास्थित होणार नाहीं. तव्हां आह्मीं समरांगणांत युद्ध करावें किंवा युद्धव्यापार मध्येंच बंद ठेवून तुमच्या रक्षणास धांवावें ? तशांत आह्मी असावध असतांना ते चांडाळ आह्मांवर अचानक छापा घालणार; असेंही वर्तमान समजलें आहे. ते नराधम केव्हां काय करतील याचा नियम नाहीं. एतदर्थ तुला इतक्या आग्रहानें सांगणें भाग पडत आहे. '

अनूपसिंह ह्मणाला. ' मीं आतां हिला तेंच सांगत होतों. स्त्रियांची व लेंकरांची आमच्या मागील एक फिकीर दूर झाली कीं, समरक्षेत्र आणि आह्मीं ! '

क्रीडा ह्मणाली, ' आमचें आह्मीं संरक्षण करणार नाहीं असें कां तुह्मांला वाटतें ? तसा आणीबाणीचा प्रसंग आला तर आह्मीं जोहार करूं. '

जयश्री ह्मणाला, ' रजपूत स्त्रियांस तें बालकडूच पाजलेलें आहे ! परंतु मुलांचें कसें कराल ? ताई, मातेचा बालकांवर प्रगाढ स्नेह किंवा ममता असते; त्या आपल्या प्राणाच्या पलीकडे त्यांस जपतात. परमेश्व-

रानें मात्र ह्या लेंकरांकरतां आपल्या प्रतिनिधी करून पाठविल्या आहेत; पण शत्रूंनीं अकल्पित छापा घातला तर तुह्मीं काय करणार ? तुमचें रक्षण, पतीस सहाय्य, कीं बालकांचें संरक्षण ? आमच्या मागें लढाईचीच काळजी पण तुमच्या मागें चिंतेचे डोंगर पडले आहेत ! '

क्रीडा पुत्रवात्सल्यानें, पतिप्रेमानें व इष्टमित्रांच्या चिंतेनें उदास दिसूं लागली. अनेक प्रकारच्या साधकबाधक विचारलहरींनीं तिचें कोमल मन उद्विग्न होऊन मुद्रा म्लान दिसूं लागली. आतां काय सांगावें हें तिला समजेना. पतिबरोबर समरांत जावें तरी पंचाईत ! शहरांत रहावें तरी कठीण, शेवटीं नाइलाजानें ती ह्मणाली, ' मी आज्ञाधारक दासी आहे पतीच्या आज्ञेंत वागणें हा सतीचा मुख्य धर्म होय. स्त्रियांपेक्षां पुरुषांचे विचार दूरदृष्टीचे असतात. आमच्यापेक्षां चांगलें वाईट, खरें खोटें, हित अहित त्यांस चांगलें समजतें. मला काय समजणार ? तुह्मीं सांगतां तर मी मुलास घेऊन किल्ल्यांत जाईन. '

अनूपसिंह ह्मणाला, ' आतां आमचें मन एका घोरांतून सुटलें. '

जयश्री ह्मणाला ' आणि चिंता व गोंधळ नाहींसा झाला. '

इतक्यांत गंभीरस्वरानें नगारा वाजला. तो ऐकतांच, जयश्री ह्मणाला, ' महाराणाजी मंत्रागारांत गेले. चला आपणही जाऊं. '

अनूपसिंह ह्मणाला. ' उद्यांच आह्मांवर छापा घालण्याची दुष्टांनीं तयारी केली हें ऐकून माझें मन अस्थिर झालें. काणा एका रजपूतास मुसलमानांनीं पकडून हेमूकडे नेलें असें मीं मघांच ऐकिलें. त्याला भीति घालून किंवा लालूच दाखवून जर त्या घातक्यांनीं वश केलें तर तो आमचा गुप्त भेद सांगणार नाहीं ना ? '

जयश्री ह्मणाला - तो कोण ? त्याचें नांव काय ? आणि त्यानें काय केलें हें समजलें काय ?

अनूपसिंह ह्मणाला, ' त्याच्या शोधास मीं मनुष्य पाठविला आहे '.

जयश्री ह्मणाला, ' देव करो आणि तो विश्वासघातकी, स्वदेशद्रोहक किंवा स्वज्ञातिविघातक न निपजो ह्मणजे झालें. '

अनूपसिंह आणि जयश्री महाराण्याकडे गेले. क्रीडा आपल्या गृहकृत्यास लागली.

प्रकरण ९ वें.

देवीपूजा.

दुर्भेद्य अरवलीपर्वतानें परिवेष्टित आणि संगमरवरी प्रस्तरानें विराजित, असें महामाया करालादेवीचें मंदीर परम शोभायमान व भव्य दिसत असे. त्याचीं अत्युच्च गोपुरें गगनमंडलाचा भेद करीत आहेत असा भास होई. मंदिराचे सुवर्णखचित कळस सूर्यकिरणमालेनें विशेष प्रज्वलित दिसत होते. मंदिराचा सभामंडपही शोभिवंत व विस्तीर्ण होता. त्याच्या सभोंवार अनेक प्रकारच्या सुंदर, सुवासिक व सुरम्य वृक्षलतादिकांचें उपवन केलेलें होतें. त्यांतील मधुरतरसुवासानें दाही दिशा दरवळून जात होत्या आणि त्या रमणीय उद्यानवाटिकेंत मधुलोलुप भ्रमरपंक्ति एकसारखी गुंजारव करीत होती.

करालादेवी सर्व रजपुतांची कुलस्वामिनी होती. ती त्यांस परमप्रिय, परमवंद्य आणि परमपूजनीय असे. ती देवीच त्यांचे आराध्यदैवत असल्यामुळें, संकट प्रसंगीं तिचा धांवा करावा अशी त्यांची फार प्राचीन काळापासून चालत चालेली पद्धत होती. नवरात्रांत तेथें मोठा उत्साह होत असे. आधींच तें देवालय शानदार, त्यांत दीपावलीच्या थाटमाटानें; सुगंधपरिमल धूप, अगरु, चंदन, उदबत्ती व अगरबत्ती ह्यांच्या घमघमाटानें; वाद्यांच्या कलकलाटानें; ताशे, ढोल, मर्फे, नगारे व दुंदुभी वगैरे रणवाद्यांच्या दणदणाटानें परमभाविक आणि निःसीम स्वदेशभक्त रजपुतांच्या गजबजाटानें अवघीं गजबजून गेलें होतें. जिकडे पहावें तिकडे उत्सवरंगानें सर्वांचीं मुखकमलें प्रफुल्लित दिसत होतीं. चित्रविचित्र पोषाखानें सुशृंगारित झालेल्या नरनारींच्या झुंडी दर्शनलालसेनें तेथें येत होत्या. उदयपूरवासी सर्व जनांच्या महान् उत्सवाचा तो दिवस; मग त्यांचा आनंद किती वर्णन करावा ?

देवीमंदिरापुढें भव्य होमाग्निकुंड होतें. तेथें धूप, दीप, नैवेद्य, वस्त्रालंकारप्रभृति नानाविध पूजाद्रव्यें व उपकरणीं व्यवस्थेनें मांडिलीं होतीं. तेथेंच यज्ञकाष्ठें, समिधा व घृतकलश होते. स्नान करून शुचिर्भूत झालेले,

रक्तपीतांबर परिधान केलेले, आणि रुद्राक्षमाला व त्रिपुंड्र धारण केलेले पुजारी चंडीपाठ करीत होते. कित्येक होमहवन करीत होते. दोनप्रहरचा वेळ. सूर्य मेघरहित नीलाकाशांत माध्यान्हीं आला. त्याच्या प्रखरतर किरणमालेचा वर्षाव होऊं लागला. शंख, घंटा, झांज, करताल, मधुर-मंद्र मृदंग, ढोलकीं व टाळ इत्यादि अनेक वाद्यें वाजूं लागलीं. देवीपूजेची सर्व तयारी झाली. तेव्हां अमात्यादिपारिषद्वर्गानें परिवेष्टित असा महाराणा मंदीरांत येऊन पोंचला.

महाराण्याची आज्ञा होतांच पुजाऱ्यांनीं देवीपूजेस प्रारंभ केला. देवी-मंदिरांतील व सभामंडपांतील सर्व लोक हात जोडून उभे राहिले. इतक्यांत, जयश्री व अनूपसिंह तेथें आले. प्रतापसिंहास घेऊन क्रीडाशी ललनामंडलांत गेली.

महाराणा ह्मणाला 'देवीचा आशिर्वाद घेण्यास सर्व सैनिक व नागरिक लोक आले काय ?'

जयश्री ह्मणाला 'आज्ञेप्रमाणें सर्व लोक आले महाराज.'

महाराण्यानें विचारलें 'नगराच्या व किल्ल्यांच्या रक्षणार्थ ठेविलेले लोक आले नसतील !'

अनूपसिंह ह्मणाला 'फक्त पांच हजार सैन्य त्याकामीं मुकर केलेलें आहे; बाकीचें येथेंच आहे.'

इतक्यांत आकाशांतून विजेमारखी परमजाज्वल्य अग्निशिखा अग्नि-कुंडांत पडली. यज्ञाग्नि प्रज्वलित झाला. त्या स्वर्गीय देदीप्यमान अग्नि-शिखेनें देवी मंदिरास एकदां प्रदक्षिणा घातली आणि ती अदृश्य झाली. असा अत्यद्भुत चमत्कार पहातांच तेथें जमलेल्या भाविक भक्तजनांचें अंतःकरण भक्तिरसार्द्र झालें. भीतीनें व आश्चर्यानें सर्व लोक चकित झाले. ते एकमेकांकडे टकमक पाहूं लागले. कित्येकांच्या अंगावर रोमांच थरारले आणि कित्येक आनंदाश्रु गाळू लागले. तितक्यांतच आशिर्वाद-सूचक उर्ध्व बाहू करून पुजारी ह्मणाले 'महामायेचा जयजयकार असो. महाराण्याचा जयजयकार असो. आर्यलोकांचा जयजयकार असो. आर्यधर्माचा जयजयकार असो.'

जयजयकारानें दाही दिशा गजबजून राहिल्या. त्या विजयकारांचा

घनघोरध्वनि आरवली पर्वतांतील गिरिकंदरांत प्रतिध्वनित होऊं लागला. तोंच गंभीर वाद्यें वाजूं लागलीं. तितक्यांतच सर्वांनीं ' महाराण्याचा जयजयकार असो. महामायेचा जयजयकार असो. आर्यलोकांचा जयजयकार असो. ' असा आनंद गजराचा कल्लोळ केला. त्यांच्या गजरानें दाहीदिशा परिकंपित झाल्या. सर्वांचीं मुखकमलें वीरश्रीनें प्रफुल्लित दिसूं लागलीं. आनंदाश्रूंनीं त्यांनीं स्नान केलें. जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. तेव्हां आरक्तगंधाची, आरक्तवस्त्रांची व आरक्तपुष्पांची होमाग्नींत पूर्णाहुति पडली. होमाग्निद्रव्यांच्या आहुतींनीं परमपवित्र अग्नीच्या ज्वाला आकाशांत भडकूं लागल्या. अग्निज्वालेप्रमाणेंच वीरश्रीसंपन्न पुरुषांच्या अंगांत शौर्याग्नि प्रज्वलित झाला. त्यांच्या अंगरख्याचे बंद तटातट तुटले. आणि केव्हां जाऊन दुष्ट शत्रूंचा संहार करूं असें त्यांस वाटूं लागलें. त्यांनीं देवीच्या, महाराण्याच्या व आर्यलोकांच्या जयजयकारध्वनीनें आकाशपाताळ एक करून सोडिलें.

महाराण्यानें अनुमति देतांच आरतीस प्रारंभ झाला. पुन्हा अनेक सुस्वर वाद्यें वाजूं लागलीं. कर्पूरधूपागरूच्या सुगंधानें अवघें मंदीर सुवासित झालें. त्यांतच जयजयकाराचे तुमुलध्वनि होऊं लागले. आरती होतांच पुष्पांजली समर्पण करून सर्वांनीं साष्टांगनमस्कार घातले. महाराणा व सेनापती यांच्या तरवारी घेऊन पुजाऱ्यानें देवीपुढें ठेविल्या. तिच्या मस्तकावरील शेंदूर काढून त्यांस लाविला. आणि त्याच तरवारी प्रसादस्वरूप ज्यांच्या त्यांस दिल्या. नंतर एकेक सेनानायक आपआपली फौज घेऊन तेथें येऊं लागला आणि दर्शन, वंदन व प्रसाद घेऊन जाऊं लागला. पुरुषांमागून पडदपोशींतील स्त्रिया देवीदर्शन घेऊन आणि कपाळीं सिंदूरतिलक लावून जाऊं लागल्या. जातां जातां क्रीडा अनूपसिंहास भेटली आणि ह्मणाली, ' आपल्याआज्ञेप्रमाणें मी प्रतापास घेऊन जातें बरें '-असें सांगतां सांगतां तिचे नेत्र अश्रूंनीं भरले. अनूपसिंहाचें हृदय देखील गहींवरलें. त्यानें प्रतापास आपल्याकडे घेतलें आणि चुंबन घेऊन क्रीडेकडे पुन्हा देतांना तो ह्मणाला ' महाकाली देवी तुमचें संरक्षण करो. ' त्याबरोबर अनूपसिंहाच्या नेत्रांतून दुःखाश्रू वाहूं लागले. ते वस्त्रानें पुसून तो ह्मणाला ' जगदंबा कृपा करील तर तुह्मांस फार दिवस किल्ल्यांत रहावें

लागणार नाहीं. प्रतापाला सांभाळ त्याच्या बाललीला पहातां पहातां तुझा वेळ निघून जाईल. तूं उगाच फार कष्ट करशील तर बालकासही समयीं दुःख भोगणें भाग पडेल. फार काय सांगूं, धीर धरून रहा. परमेश्वर तुह्मांस सौख्यांत ठेवो.'

जयश्रीही तितक्यांत तेथें आला. त्याला क्रीडा हात जोडून सांगूं लागली. 'भाऊराय ! तुमच्या आज्ञेप्रमाणें सर्व स्त्रियांबरोबर मीं बालकास घेऊन किल्ल्यांत जात आहें. आतां सर्व भिस्त तुह्मांवर आहे. फार काय सांगूं ? केवळ तुह्मांवर भंवसा ठेऊन मीं हे पाय—' क्रीडेचा कंठ भरून आला. तिच्यानें पुढें कांहीं बोलवेना.

जयश्री ह्मणाला 'परमेश्वरावर विश्वास ठेऊन तूं निर्धास्त रहा. जगन्नियंता तुमचें कल्याण करील.'

अनूपसिंह आणि जयश्री मंदिराबाहेर आले. महाराणा आपल्या सेनेस संबोधून ह्मणाला. 'महादेवीनें आह्मांवर कृपादृष्टि केली आणि आमची पूजा ग्रहण केली; हें तुह्मीं सर्वांनीं प्रत्यक्ष पाहिलें आहेच. आतां आपण लढाईस सिद्ध झालों आहों. सर्वांनीं केशरी रंगाचीं वस्त्रें परिधान केलीं आहेत. तुह्मी शस्त्रास्त्रसिद्ध आहां. यवनांचा विध्वंस करा. स्वजातियांचें व स्वदेशाचें नांव राखा ! आह्मां रजपुतांची प्रार्थना देवीच्या कानीं पोंचली. रजपूतांच्या विमल कीर्तीस देवीच्या कृपेनें आजपर्यंत कधींही अपयशकलंक लागलेला नाहीं. तुमच्या तरवारबहाद्दर शूराग्रेसर पूर्वजांनीं आपल्या पराक्रमानें दिगंत कीर्ति फैलाविली आहे. स्वदेशसेवा, स्वधर्मश्रद्धा, स्वातंत्र्यप्रियता, खरा स्वदेशाभिमान आणि स्वाभिमान हा आह्मां रजपूतांचा जातिस्वभाव आहे. समरांगणांत तरवार गाजवावी आणि शत्रूंचा संहार करावा हेंच आह्मां लोकांचें ब्रीद. तुह्मीं मारीन किंवा मरेन अशा दृढनिश्चयानें लढला; आपल्या पूर्वजांचीं अलौकिक कर्में मनांत आणिलीं आणि जोमानें चाल केली तर त्या चांडाळांची काय मगदूर लागली आहे कीं, ते एक पाऊल पुढें येतील ! माझे देशबांधवहो ! तुह्मीं सूक्ष्म विचार करून पहा ! आह्मीं त्यांच्या देशांत गेलों नाहीं; किंवा त्यांस नाहक त्रास द्यावा असा आमचा इरादा नाहीं; पण तेच शिरजोर आपल्या देशांतून आमच्या देशांत येऊन आम्हांवरच

उलट जुलूम करूं पहातात! आमच्या राजलक्ष्मीच्या अंगावरील पदर ते अधमाधम दूर ओढूं पहातात! त्या पापात्म्यांनीं आमच्या पवित्र देवमंदिरांची राखरांगोळी केली. आमच्या सहस्रावधी देश बांधवांस त्या नीचांनीं विनाकारण ठार मारिलें. जे आर्यमातेवर हात टाकण्यास मागेंपुढें पहात नाहींत, त्यांचा तुह्मीं संहार करूं मात आहां हें ध्यानांत ठेवा. तुह्मीं घनघोर संग्राम कराल; शत्रूंचा धुव्वा उडवाल आणि शत्रूच्या आरक्तरक्तानें भूदेवी शांत कराल, ह्यांत बिलकुल शंका नाहीं. महामायेस विदेशीयांच्या आरक्तरक्ताची तृषा लागली आहे. शत्रुनरमुंडांची भव्य माला ती आपल्या सुंदर कंठांत धारण करणार आहे. किंवा कंदुकक्रीडा करावी अशी तिची वासना असेल. एतदर्थ ती स्वेच्छेनें चाहेल तशी लीला करीत असेल. शत्रूस पाठ दाखवूं नये हें तर तुमचें व्रतच आहे. शत्रूंची संख्या आमच्यापेक्षां फाजील आहे; पण एक लहानशी अग्नीची ठिणगी विस्तीर्ण जंगलाचा क्षणांत संहार करते. असो, मीं फार सांगत नाहीं. तुह्मीं देशभक्ति, मातृभक्ति, स्वधर्मश्रद्धा आणि स्वामिभक्ति गाजवा. रजपुतांची यशोदुंदुभी सर्वत्र गाजवा आणि विजयमाला धारण करा. इतकेंच माझें तुह्मांस विनयपूर्वक सांगणें आहे.'

जयश्री उच्चस्वरानें ह्मणाला. 'मत्प्रिय देशबांधव आणि सैनिकवीर पुरुषहो, तुह्मीं स्वदेशावर अत्यंत प्रेम करणार अहां. स्वदेशास तुह्मीं मातापित्याप्रमाणें सन्मान देतां. तुह्मीं स्वाभिमानसंरक्षक आहां. कुलिन कामिनींचा धर्म रक्षण करण्यापुढें तुह्मांस प्राणांची पर्वा वाटत नाहीं. तुह्मीं वीरकुलोत्पन्न आणि वीरशिरोमणी आहां. तुह्माला मीं अल्पमतीनें सांगावें असा अर्थ नाहीं. परंतु, अशा आणीबाणीच्यावेळीं मीं जे चार शब्द सांगतों ते ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें मनःपूर्वक वागाल अशी मला उमेद असून ती पूर्ण करणें तुह्मांकडे आहे. माझ्या भाषणानें तुमचा उत्साह वृद्धिंगत होईल; अशी सर्वोत्कृष्ट वाक्शक्ति प्रभूनें मला दिलेली नाहीं. धन्याची आज्ञा वंद्य करावी आणि तरवार चालवावी इतकेंच मला माहीत आहे. केवळ तुह्मांसारख्या शूरांचीं तेजस्वी आणि वीरश्रीयुक्त मुखकमलें पाहूनच मला तुमचा हिय्या

दिसला. तुमच्या उत्साहपूरित मुखश्री पाहूनच मी उत्साही झालों. तुमचा धर्म, तुमचा जातिस्वभाव किंवा तुमचें कर्तव्यच तुह्मांस अशा प्रसंगीं उत्साह देतें. पामर यवन शहराच्या द्वारभागीं आले तरी आह्मीं युद्धास प्रवर्त झालों नाहीं. याचें कारण इतकेंच कीं, आपण प्रथमतः त्यांवर चाल करून जाऊं नये असा आमचा इरादा हाता. शत्रू आज आह्मांवर हल्ला करणार असें वर्तमान समजलें आहे. आतां आह्मीं स्वस्थ बसणें चांगलें नव्हे. यवनदल आमच्या नगरींत घुसलें तर आमची, आमच्या बायकामुलांची, बंधुभगिनींची, देवमंदिरांची, आणि शहराची किती दुर्दशा करतील तें मीं तुह्मांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. कारण, तुह्मी विचारी, समंजस व दूरदृष्टि आहां. वीरगण जे नराधम आमच्या पूजनीय व वंद्य देवमूर्तीचा विध्वंस करितात; जे पापमति आमचीं पवित्र स्थानें हेकडपणानें गोमातेच्या रक्तानें अपवित्र करितात; जे आमच्या पवित्र व टोलेजंगी मंदिरांचा मुद्दाम चुराडा करून तेथें मशिदी बांधितात, ते नीच लोक शहरांत आले तर आमचें सर्वस्व लुटण्यास मागें पुढें पहाणार नाहींत. यवन शहरांत घुसले तर जेथें आज पवित्र वेदध्वनि ऐकूं येत आहे आणि जेथें पुराणपठण होत असतें तेथें कुराण ऐकण्याचा प्रसंग येईल. एकदां त्या दुर्मति यवनांनीं शहरांत प्रवेश केला कीं, ते आमच्या सुंदर घरादारांची, मोठमोठ्या हवेल्यांची आणि टोलेजंग वाड्यांची राखरांगोळी उडावितील. ते घातकी आमच्या कुलीन व पतिव्रता स्त्रियांच्या सतीत्वाचा विनाश करितील. पण मीं विचारतो, जे लोक स्वार्थाचे सर्वस्वी दास बनलेले, ज्यांकडून इंद्रियदमन होत नाहीं, ज्यांच्या अंतरांत पापरूप अंधार सारखा भरलेला, जे जंगली, जे पापी; ते आह्मास जिंकून कदाचित् आह्मास धर्मभ्रष्ट करणार नाहींत काय? आणखीही त्यांची घातक कर्मे इतकीं आहेत कीं, तो सांगूं लागलें तर संपणार नाहींत. तरी त्यांतील कित्येक सांगून मी आटोपतें घेतों. ते शिखानष्ट आणि कर्मभ्रष्ट ह्मणतात कीं, आह्मीं बाहेरच्या शत्रूंकडून तुमचा बचाव करूं. तुमचें आपसांत ज्यांशीं वैमनस्य असेल; त्यांचें आपण आक्रमण करून तुह्मांस निरापद करूं. आतां आह्माला युद्धाचें नांव घ्यायला नको. ते

आह्मांस निर्विघ्न करणार. परंतु, यांतील मतलब इतकाच कीं, आह्मीं नामशेष तरी रहातों कीं नाहीं हाच वानवा! मित्रगण, तुह्मीं सावध व्हां! त्यांच्या भुलथापी गोष्टीवर बिलकुल विश्वास ठेवूं नका. चिरविख्यात रजपूत हो, हे तुह्मास भीरू करूं पहातात. आमच्या हातींपायीं पराधीनतारूप दृढ शृंखला घालून आह्मांस माकडासारखें पाहिजे तिकडे नाचवावें असा त्यांचा मानसिक उद्देश आहे. आमचे स्वातंत्र्य, आमचा देशाभिमान; आमचा धर्माभिमान सफाई नाहींसा करावा; आमची दुर्दशा करावी; आह्मीं मातीमोल व्हावें इतकाच त्या अधमांचा विचार आहे. एतदर्थ त्यांचे दुष्ट हेतू ज्या उपायांनीं हाणून पडतील असें करणें— जोमानें युद्ध करून त्यांचा पराजय करणें हें तुमचें कर्तव्य होय. तुह्मी आपल्या कर्तव्याचा विचार करा आणि शत्रूंस एक पाऊल देखील पुढें येऊं देऊं नका. जगदीश तुमचें मंगल करो. ”

अनूपसिंह ह्मणाला ‘ महाराणाजींनीं व माझे परमप्रिय मित्र जयश्री सेनाधिपतींनें जें सांगितलें त्याहून मीं कांहीं विशेष सांगणार आहे असा अर्थ नाहीं. जयश्रीनें सांगितल्याप्रमाणें तरवारीशीं आणि शत्रूशीं माझा प्रसंग तेव्हां मीं विशेष काय सांगावें. परंतु. बंधुगण, यवन लोक आह्मांस धर्मांध किंवा मूर्तिपूजक समजून आमचा धि:कार करितात. आह्मांस उपहासानें पापी व नीच ह्मणतात. पण मीं असें ह्मणतों कीं, ज्यांचे धर्मांत परद्रव्य खुशाल लुटावें; परस्त्रियांचें पातिव्रत्य बेधडक नष्ट करावें; आणि निर्दोष बालकांची नि:शंक प्राणहिंसा करावी; असल्या निंद्य कृत्यांचा दोष सांगितलेला नाहीं किंवा तीं दुष्कृत्यें ह्मणजे महान् पातक किंवा अकर्म मानलें जात नाहीं. त्यांच्या धर्माविषयीं विचार करणें अप्रशस्त होय. तें काम मीं तुह्मांवरच सोंपवितों. कारण, अशा निरर्थक गोष्टींचा विचार करणें म्हणजे काळाचा अपव्यय करणें होय. आणखी अशा लोकांनीं आम्हांस धर्मांध म्हटलें, तरी त्यांच्या म्हणण्याची तुह्मीं सहज किंमत कराल. मी तर असेंच समजतों कीं, ते आम्हांस असें म्हणत नाहींत. काळ ह्मणतो आणि हुशार करतो. आमचा काळच तसा फिरला आहे. ह्मणून आह्मीं स्वस्थ बसणें किंवा काळ फिरेल तेव्हां सर्व चांगलें होईल असें समजणें कोणालाही योग्य नाहीं. मनुष्य उद्योग करील तर काळासही

हात टेंकावयास लावील. मला सांगायचें फार आणि वेळ थोडा. त्याला माझा नाइलाज आहे. परंतु वीरश्रेष्ठ ! एकदां त्या पापिष्ठांनीं कौशल्यानें आमच्या राज्यांत पाय ठेविला कीं, आर्यरजपूतांचा गौरव-सूर्य अस्तंगत झाला असेंच समजलें पाहिजे. मग आमच्या शौर्याची, धैर्याची, जात्याभिमानाची किंवा स्वाभिमानाची घोर रात्र उगवली ! मग पुन्हा स्वातंत्र्यसूर्योदयाची दुराशाच. माझे परमप्रिय देशबांधव ! पर-मेश्वरानें रजपूत या नावांतच ओतप्रोत शौर्य आणि स्वातंत्र्य भरून ठेविलें आहे. तें त्या दुष्टांनीं एकदां हरण केलें, मग तुह्मांकडे काय राहिलें ? मग तुह्मी असलां काय आणि नसलां काय अर्थ सारखाच. तुह्मीं कट्टे स्वदेशभक्त, तुह्मीं बीजाचे रजपूत, तुह्मीं जातिवंत क्षत्रिय आहां. सद्यस्थितीचा व भावी स्थितीचा विचार करा आणि हिंमतीनें आपलें नांव अजरामर करा. तह्मीं आपल्या वीरताप्राचुर्य नांवाला कलंक लावूं पहाणाऱ्या अधमांचा निःपात करा. ते नष्ट आह्मांला दासत्व-शृंखलेंत परिबद्ध करूं पहातात; पण तुह्मी परतंत्र राहूं इच्छिता ? छीः छीः नाहीं. तुह्माला पराधीनतेंतील सर्व दुःख माहीत आहे ! यवनांस तुह्मीं वेशीच्या आंत पाय ठेवूं देऊं नका. तुह्मीं प्राणाची बेपर्वा करून लढला तर हटकून जय मिळवाल. तुह्मीं स्वामिसेवादक्ष आहां ! महाराण्याची आज्ञा वंद्य करून आणि महाकाली देवीवरभरिभार ठेवून दृढनिश्चयानें लढा. तुमचीं शत्रुसंहारक शस्त्रास्त्रें शत्रूंच्या आरक्त रक्तानें रंगवा. तुमचे पाणीदार घोडे शत्रुरुधिरांत तरं-गवा. तुमची अक्षय्य कुलकीर्ति अजरामर करा. महामाया जगदंबिकेनें दुष्ट राक्षसांचा जसा संहार केला; तसें तुह्मीं यांना ठार मारून विजयी व्हा. तुह्मीं जगज्जननी महादेवीचे निःसीम भक्त आहां. देवीनें अभयवरप्रदानानें तुह्मीं विजयी व्हाल अशी सूचना दिली आहे. मग काय पर्वा आहे. हां हां ह्मणतां यवनांचा पराजय होईल. युद्धांत जय मिळवाल तर कीर्तीच्या शिखरास पोंचाल आणि पडला तर स्वर्गांत जाऊन अक्षय्यसौख्यधामांत निरंतर वास्तव्य कराल. दोन्हींकडून तुमचा फायदाच आहे. ' जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ' हें अमोलिक वाक्य सदैव ध्यानांत ठेवा. भारतभूमि रत्नगर्भा

आहे. तिला लुटावी—तिच्या सौभाग्याचा विनाश करावा—तिच्या पतिपुत्रांस व बालकबालिकांस ठार मारावें; तिच्या सर्वस्वाचा चुराडा करावा अशा दुराशेनें ते यवनलोक इकडे आले आहेत. आमचें द्रव्य व स्वातंत्र्य हरण करावें असा त्यांचा मानसिक विचार आहे. आमच्या हजारों प्रासादपूर्ण नगरीचा विध्वंस करावा असा त्यांचा मतलब आहे. अमरावतीपेक्षांही श्रेष्ठ अशा मेवाडप्रांतास स्मशानवत् करावें असा त्या नीचांचा दुराग्रह आहे. तुह्मीं निकरानें युद्ध केलें—तुह्मीं त्यांच्या फौजेची बेपर्वा केली तर पहिल्याच तडाक्यांस शत्रूचा धुव्वा उडवाल. जे लोक कांहीं दिवसांपूर्वी अगदीं नीचावस्थेंत होते ते लोक आह्मांला तत्त्वज्ञानाच्या व शहाणपणाच्या गोष्टी शिकवूं लागले आहेत. वस्त्र कशाला ह्मणतात हें ज्यांना ऐकूनही माहीत नाहीं; ते आज आह्मांला विज्ञानशास्त्राच्या गोष्टी सांगूं पहातात. आणि काफर ह्मणून आमची निंदा व तिरस्कार करितात. काय दैवानें त्यांनाच अलौकिक शक्ति दिली आहे ? नाहीं. त्यांचे देह वज्राचे केलेले आहेत ? नाहीं. त्यांना चार हात दिलेले आहेत ? नाहींत. जसे ते, तसेच आम्हीं. पण ते जसे एका जुटीनें वागतात तसे तुह्मीं वागा. पहातां काय ? हां हां ह्मणतां विजयी व्हाल. आमच्या अन्नानें ते लहानाचे थोर झाले आणि आह्मांशींच निमकहरामपणा करूं लागले ! फिकीर नाहीं. तुह्मीं मनावर घ्याल तर आतां त्याचें उसनें फेडाल. तर्त आह्मीं स्वाधीन आहों. आमचा राजा स्वजातीय आहे. आज आमच्या बलप्रभावानें महाराण्यास राज्यपदाधिकार मिळालेला आहे. तो आमच्या आर्यपूर्वजांनीं - आर्यऋषिमुनींनीं सांगितलेल्या नियमानुसार राज्यशासन करीत आहे; पण जेव्हां यवन राजा होईल तेव्हां तो आमच्या शास्त्रांस मानणार नाहीं. आमच्या पवित्र नियमास जुमानणार नाहीं; आमच्या हितानहिताकडे बिलकुल पहाणार नाहीं. वीरपुरुष ! तुह्मीं प्राणांत झाला तरी आर्यत्व दवडूं नका. वीरत्वास कलंक लागूं देऊं नका. आर्यजननीवर जुलूम करूं पाहणाऱ्या नराधमांचा संहार करा. शत्रूच्या शिरकमलांची भूदेवीच्या गळ्यांत माला घाला. वीरगण ! चला उठा- पहातां काय ? आपल्या पराक्रमानें शत्रूंस दाहीदिशा पळवा. भूमिमातेची शत्रुरक्त पिपासा शांत करा. तुह्मीं स्वतं-

त्रतेचें, सद्धर्माचें आणि स्वदेशाचें संरक्षण करण्यास सिद्ध व्हा. हिम-तीनें कमरा बांधा आणि महामाया कराला देवीचा जयजयकार करा.

पुन्हा जयजयकार ध्वनीनें दाही दिशा दरवळून राहिल्या– रजपूतांच्या विजयध्वनीचा यवनांच्या छावणींत प्रतिध्वनि उठतांच, यवनांनीं कूच करण्याचा नगारा वाजविला. त्याबरोबर पाळतीवर ठेवलेला उमरावसिंह महाराण्याकडे तीरासारखा आला आणि सांगूं लागला, “ यवन-सेनेनें आपला तळ उठविला. आणखी मंदिराकडेच यावें असा त्यांचा रोख दिसतो. ”

जयश्री ह्मणाला. “ फिकीर नाहीं. ते बोडाळ खडकाळ जमिनीवर येण्यापूर्वींच आपण त्यांना गाठूं ! ”

महाराण्यानें आपली तरवार म्यानांतून बाहेर काढिली आणि सांगितलें, “ वीरश्रेष्ठ ! तुह्मीं समरांगणांत आपल्या जाज्वल्य तरवारी चांगल्या गाजवाल आणि बहाद्दरी कराल अशी माझी खात्री आहे. तुह्मीं खूप ध्यानांत ठेवा कीं, जो शूर पुरुष रणक्षेत्रांत स्वदेहार्पण करितो तोच शांतिनिकेतन स्वर्गधामांतील वीरलोकीं सुखानें अक्षय्य वास्तव्य करतो आणि जो शत्रुचा पराजय करून विजयी होतो त्याला देशोद्धारक असा महान सन्मान मिळतो. ”

अनूपसिंह ! तुमच्या तैनातींतील तीन हजार योद्धे शहरांत येण्याचा जो गुप्त मार्ग आहे तेथें ठेवा. तुह्मीं माझ्या उजव्या बाजूस रहा. जयश्री ! तुमच्या तैनातींतील तीन हजार वीर पुरुष घांटांतून आण्याचे जे मार्ग आहेत तेथे ठेवा आणि तुमच्या बाकीच्या सैन्यासह तुह्मीं माझे डावे बाजूस रहा. मी अघाडीस रहातों. आजच्या लढाईचा मूळ मंत्र ‘ स्वधर्माचा जयजयकार होवो ’ हाच आहे. ’

प्रकरण १० वें.

जयजगदीश.

चितोडगडच्या दक्षिण दिशेस एक मोठें अरण्य होतें. त्यांतून गडांत प्रवेश करण्याचा एक गुप्त मार्ग किंवा भुयार होतें. त्याचें संरक्षण करण्याचा भार जयश्रीकडे होता. आणि अनूपसिंहानें पहाडांतील घांटाचें किंवा मार्गाचें संरक्षण करावें अशी महाराण्याची आज्ञा होतांच ते दोघेही कालादेवीस व महाराण्यास वंदन करून निघाले. लढाईचा प्रसंग ! केव्हां कोणावर कसा वेळ येईल याचा नेम नाहीं. दोघेही मित्र परस्परांस भेटले. तेव्हां जयश्री ह्मणाला " शत्रु केव्हां येईल याचा नेम नाहीं. सांभाळून रहा. आतां लढाई समाप्त झाल्यावर तुझी आमची भेट होईल तो सुदीन. "

अनूपसिंह ह्मणाला. " हीच आमची शेवटची भेट नसेल कशावरून ? लढाईस जाण्यापूर्वी तुला-माझ्या हितचिंतक सन्मित्रास मीं इतकीं विनंती करतों.... " त्याच्यानें पुढें बोलवेना.

जयश्री गहींवरून ह्मणाला. " मनोमय ईश्वरसाक्ष. मित्रप्रेम बोलून दाखवितां येत नाहीं. प्रसंगींच त्याची खरी परीक्षा होते. अंतरंग गोष्टी अंतरंगासच समजतात. त्या बोलून दाखविण्यांत अर्थ नाहीं. "

अनूपसिंह ह्मणाला ' असें तर खरेंच. सांगायचें इतकेंच कीं, आपला प्रताप आणि ती—'

जयश्री ह्मणाला. ' तुझा भावार्थ मला समजला नाहीं. '

अनूपसिंहानें सांगितलें ' आतां आह्मीं लढाईवर जात आहों. '

जयश्रीनें सांगितलें ' काय फिकीर ? जय किंवा मृत्यु '

अनूपसिंह ह्मणाला ' दोघांपैकीं एक जयी झाला आणि एक मृत्यु पावला तर ? '

जयश्रीनें सांगितलें ' दोघेही विजयी झाले किंवा मृत्यु पावले तर ? प्रसंगाचा काय नियम आहे ? भावी दशा अगोदरच कोण सांगेल ? '

अनूपसिंह ह्मणाला ' समयीं मीं लढाईत पडलों तर बाळाचें व तिचें तूं संरक्षण कर. '

जयश्री ह्मणाला, ' मींच पडलों तर ? '

अनुपसिंह ह्मणाला, " दोघेही पडलों तर जगज्जननी व जगत्पिता त्यांचें संरक्षण करील ! "

बोलतां बोलतां त्याच्या नेत्रांतून दुःखाश्रु गळूं लागले. त्याचा कंठ दाटला. जयश्रीसही फार वाईट वाटलें. तरी तो आपला शोकावेग आंवरून ह्मणाला, ' काय हें ? तुझ्यासारख्या वीरपुंगवानें अशा मंगल प्रसंगीं अमंगलकारक चिंतेस हृदयांत स्थान देणें आणि कसें होईल काय होईल हा विचार करीत रहाणें; चांगलें नव्हे. आपण हातांत शीर घेऊन जात आहों. कोण जगेल आणि कोण मरेल. आपण मेलों तर आपल्या बायकामुलांचें कसें होईल काय होईल हा विचार व्यर्थ. काय होईल ते होईल. त्याची इतकी पर्वा कसची ? उदास होऊं नकोस. हिंमत धर. जयजगदीश ! जयजगदीश ! प्रतापसिंहाच्या दैवीं असेल तें होईल. दैवलिखित कोण चुकवील ? मला तूं सांगितलेंस आणि त्याप्रमाणें मीं वागलों नाहीं तर ? आणि वागणार असलों तरी मला तूं सांगितलें आणि न सांगितलें अर्थ सारखाच. त्यागोष्टीच नकोत. ' भवितव्यताना द्वाराणि भवंति सर्वत्र ' जेव्हां जें होणार तें कधीं चुकणार नाहीं. परंतु मित्रानें मित्रास असें सांगण्याची रीतच असते; त्याप्रमाणें तूं कलेस ठीक आहे. '

अनूपसिंह ह्मणाला ' तसें नव्हे. हे विचार माझ्या मनांत येऊं नयेत ह्मणून मीं बरेंच प्रयत्न केले. परंतु, माझा निरुपाय झाला. मीं या त्रासदायक चिंतेस बरेच वेळ दूर झुगारिलें. तरी ती केव्हाच येऊन आपलें स्थान बळकावते ! त्याला मी तरी काय करूं ? '

जयश्री ह्मणाला " जा; तूं निःशंक जा. परमेश्वर तुला सुखी ठेवो. तुझ्या मनाची समाधानी होण्याकरतां— तूं चिंताग्रस्त होऊं नयेस ह्मणून मी खात्रीनें– प्रतिज्ञापूर्वक– माझ्या तरवारीची शपथ वाहून सांगतों कीं, समयीं तूं युद्धांत पडलास आणि मी जिवंत राहिलों तर माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत, माझ्या मित्राच्या— माझ्या प्रियमित्राच्या बालकाचें व स्त्रीचें मीं माझ्या प्राणापलीकडे संरक्षण करीन. मी पडलों तर गेलोंच आणि दोघेही पडलों तर तूंच आतां सांगितल्याप्रमाणें परमेश्वर समर्थ आहेच. मित्रा, हें धर्मयुद्ध आहे. कालादेवीनें आह्मांवर कृपादृष्टि

केली आहे. ती आह्मांस प्रसन्न झाली आहे. देवीच्या दयेनें आमची सेना उत्साही झाली आहे. एतदर्थ या युद्धांत आह्मी निश्चयपूर्वक विजयी होऊं. पुढें प्रभूची मर्जी. ”

अनूपसिंह ह्मणाला. “ आतां माझें मन निर्घोर झालें. मी जातों. जयजगदीश ! ” जयश्री ह्मणाला. “ जयजगदीश. ”

प्रकरण १२ वें.

:o:

युद्धवार्ता.

लढाईच्या गोष्टी ऐकायला बऱ्या. तुह्मांला युद्धभूमीवर न्या आणि संकटांत घाला; इतकी दगदग सांगितली आहे कोणी ? त्रास न देतां जें काम सुखानें होतें तें बरें. युद्धस्थलापासून बऱ्याच लांबीवर एक जंगल दिसतें आहे. आणि तेंही समरक्षेत्रापेक्षां बऱ्याच उंचीवर आहे. तेथें आपण जाऊं आणि तेथूनच आपण समरांगणांतील युद्धप्रकार पाहूं. तो पाहिला एक भव्य वट वृक्ष दिसतो आहे. त्याच्या छायेंत दोन मनुष्यें बसलीं आहेत. एक फार वृद्ध आहे. त्याची अंगकांती शिथील दिसते तरी तो पौरुषसंपन्न असावा असें त्याची मुखश्रीच सांगते. अरेरे ! बिचारा वृद्ध आणि अंध ! त्याच्याजवळ एक मुलगा बसला आहे. त्याला तो युद्धवार्ता विचारीत आहे. तीच आपण ऐकूं. तो वृद्ध तरी पुष्कळ युद्धक्षेत्रांत कसलेला असावा असें दिसतें. काय त्याची उमेद पहा ? तो काय ह्मणाला तें ऐकलें कां ? ‘ अजूनें रणक्षेत्रांतून कोणी आलें नाहीं ? ’

बालकानें सांगितलें ‘ नाहीं आजोबा ! ’

इतक्यांत रणांगणांत भयंकर कोलाहल उठला. त्याबरोबर त्वेषानें वृद्धाचें अंग लटलट कांपूं लागलें आणि उत्साहानें उत्तेजित होऊन तो ह्मणाला, ‘ माझे नेत्र गेले नसते तर मी येथें बसतों काय ? मला वारंवार स्फुरण येतें. माझे हात वळवळतात. पण काय करूं ? नाहीं तर समरांगणांत जावें, तुमुलयुद्ध करावें, शत्रूच्या नरडीचा घोट घ्यावा,

शत्रूच्या रक्ताचा सडा घालावा. परंतु, नाइलाज ! मला अंधत्व आलें नसतें तर माझ्या हाताचा तडाका कसा आहे तें दाखविलें असतें ! क्षत्रियकुलांत जन्म घेतल्याचें मीं अशा वयांत कां होईना खचित खचित सार्थक्य केलें असतें. अशा वयांत माझी प्रिय तरवार घेऊन शेंकडो लोकांच्या माना तडाक्यासरशा कापून काढल्या असत्या. माझ्या जन्मभूमिकरतां प्राणांत होईपर्यंत मी लढलों असतों. आणि लढाईंत पडतों तर अक्षय्य स्वर्गसुख भोगतों. कसा मी कमनशीब ! हायरे दैवा ! कशी माझी दृष्टि गेली ! ' बोलतां बोलतां तो वृद्ध फार थकला. तरी त्याच्यानें स्वस्थ रहावेना. तो ह्मणाला, ' बाळा ! या वनांत आणखी कोणी नाहींना ? '

चारी दिशा अवलोकन करून बालक ह्मणाला, " नाहीं आजोबा ? आजच्या लढाईंत बाबाला जय मिळेल काहो ? "

वृद्ध अभिमानानें ह्मणाला ' अलबत. तो आपलें कर्तव्य करील. तो कधीं शत्रूस पाठ दाखविणार नाहीं. प्राणरक्षणाकरतां पळून जावें असें कधीं मनांत आणणार नाहीं. स्वामिसेवेंत आळस करणार नाहीं. महाराण्याची आज्ञा शिरसावंद्य करील. त्याच्या आज्ञेप्रमाणें वागेल. आतां जयापजयाचा नेम सांगवत नाहीं देवाच्या मनांत येईल त्या पक्षास तो विजयी करील. तुझ्या पित्याची मला अगदीं फिकीर वाटत नाहीं. तुझें कां होईल ? हाच मला विचार पडला आहे. '

बालक आश्चर्यचकित होऊन ह्मणाला ' मी तुमच्याजवळ आहें, मग माझी काळजी कसली ? '

वृद्ध ह्मणाला ' समयीं ते दुष्ट इकडे आले तर मग कसें ? '

बालक औदासिन्यानें ह्मणाला ' व्हायचें काय ? '

वृद्धानें विचारलें ' त्यांनीं तुला नेलें; तर मग ? '

बालक ह्मणाला ' ते आंधळे नव्हत. तुमचें ह्मातारपण, तशांत अंधता. मी आंधळ्याची काठी. तें कांहीं सारासार विचार करतील कीं, आपले येतील ते मला घेऊनच जातील ? आणि मी ह्मणतों, नेलें तर ते माझें काय करणार ? '

वृद्धानें सांगितलें " त्या पापमतींना तूं ओळखलें नाहींस. ते दुष्ट

आहेत. धर्माचें, कर्तव्याचें, किंवा सारासार विचाराचें त्यांस अगदीं ज्ञान नाहीं. मी अंध तुझ्या आधारानें इकडे आलों असें त्यांस दिसलें कीं पुरे, ते तुला नेतील; बाटवितील आणि तुझे फार हाल करतील. गमतीखातर जातां जातां ते मलाही ठार मारावयास कमी करणार नाहीत. "

बालक ह्मणाला, " तर मग ते लोक फारच दुष्ट ! "

वृद्धानें सांगितलें, ' अरे, ते बोलून चालून यवन ! असो. आतां तूं या वृक्षावर चढ आणि युद्धभूमीवर उभयदलांची रचना कशी काय आहे ? तें पाहून मला सांग. '

बालक वटवृक्षावर चढला. आणि सांगूं लागला ' आजोबा, अबब ! किती हो लोक हे ! यांच्या डोक्यावरून चालत जातां येईल. आपले महाराज हत्तीवरील अंबारींत बसले आहेत. काय ती चकाकत आहे. तिकडे पहावतच नाहीं. चंद्रा सभोंवार जशी नक्षत्रमाला चमकावी तशा तरवारी आणि भाले चमकत आहेत. महाराजांच्या सभोंवार बोथाटी-बारदार, विटेबारदार, खासबारदार, बाणदार आणि लगी अशी जिलबीची फौज आहे. सर्वांच्या पुढें तोफखाना आहे. आपली फौज व्यवस्थेनें उभी राहिली आहे. अजून तोफखान्यास बत्ती दिली नाहीं. '

वृद्धानें विचारलें, " मुसलमानांच्या फौजेची व्यवस्था कशी आहे ? "

बालक ह्मणाला, " आमच्यासारखीच त्यांचीही व्यवस्था आहे. आजोबा, अद्यापि तोफांचा कडाका कसा उडेना ? "

वृद्ध ह्मणाला, " तुला त्याची मौज वाटत असेल ? "

बालक ह्मणाला, " होय तर काय. एकदां धुमधडाका उडाला असतां कीं, गंमत झाली असती ! "

दोघांचें असें संभाषण चाललें आहे तोंच गगनमंडल विदीर्ण करणाऱ्या तोफांचे परम भयंकर आवाज होऊं लागले. त्यांनी भूकंप होतो कीं काय असा भास झाला ! समरांगणांतील धुरळ्यानें व धुरानें दाही दिशा अंध झाल्या. शत्रु कोण आणि मित्र कोण हें ओळखतां येईना. उभयसेनेची कडाक्यानें लढाई जुंपली. शस्त्रास्त्रांची चांगली चकमक झडली. ' धरो ' ' मारो ' ' पकडो ' ' अल्ला हो अकबर ' आणि ' हरहर महादेव ' ' कराला देवीकी जय ' असे वीरश्रीसंपन्न व शौर्योत्पादक ध्वनि होऊं लागले. रक्त-

आवाजानें धुराळा बसला. कित्येक योद्धे गतप्राण झाले. कित्येक घायाळ झाले. जिकडे तिकडे हा हा:कार उसळला ! समोर सांपडेल त्याचा नाश करीत दोन्ही फौजा अर्धा तास निकरानें लढल्या. आतां यवन विजयी होतात असें दिसे. क्षणांत रजपुतांस विजयदेवी जयमाला समर्पण करील असें वाटे. पहिला हल्ला यवनांनीं चांगल्या जोमानें व हिकमतीनें केला. तरी रजपुतांनीं त्याचा प्रतिकार केला. त्यांत रजपुतांचे बरेच लोक जाया झाले. यवनांचाही बराच पाठारा उडाला. दुसऱ्या हल्ल्याचे वेळीं तोफा मागें घेऊन तरवारींशीं प्रसंग आला. तेव्हां रजपुतांनीं चांगला तडाका माजविला. समरंगणांत अशी धुमश्चक्री चालली होती; तेव्हां वृद्धाचे मनांत अनेक विचार तरंग उठत होते. त्यानें पुष्कळ लढाईत तरवार गाजविली होती. एकदां त्याला वाटे तडाक्यासरसें जावें आणि यवनदलाचा चेंदामेंदा करावा. त्याचें मन उमेदींत आलें तरी हत्यार नाहीं आणि अंधता अशा विचारानें तो हताश होई. अशा स्थितींत कांहीं वेळ गेल्यावर तो ह्मणाला, 'अरेरे ! त्या राक्षसांनीं तोफखान्यास बत्ती दिली. आतां रजपुतांचा संहार होईल. देवा ! हीच बलविक्रमाची किंवा तरवारीची लढाई असती तर काय विषाद होती ! त्या दुष्टांची तडाक्यासरसींच सफाई उडाली असती. प्रतारणा, प्रवंचना व छलना हेंच त्या शिवानष्टांचें बल, बुद्धि आणि भरंवसा. कांहीं दिसत नाहीं. कांहीं समजत नाहीं. बाळा ! ये. आपण परमेश्वराचा स्तव करूं आणि आमच्या पक्षास जय दे अशी त्याची प्रार्थना करूं. दुसरें आतां आपल्या हातून काय होणार ?'

बालक खालीं येतांच वृद्धानें त्यांस जवळ घेतलें. दोन्ही हात जोडिले. आणि तो ह्मणाला, 'जगदीश ! तूं जगताची उत्पत्ति, स्थिति आणि लयकर्ता आहेस. तूं दुष्टांचा संहारकर्ता आणि सज्जनांचा रक्षणकर्ता आहेस. सत्यासत्य तुला सर्व समजलें. तूं कृपा कर आणि महाराण्यास विजयी कर, यवन लोक दुष्टबुद्धीनें आह्मांशीं लढाई करण्यास आले आहेत. ते आमचा विनाकारण सर्व नाश करूं पहात आहेत. दीनबंधो ! महाराणा धार्मिक आहे. तूं त्याला सहाय कर. तूं सर्वशक्तिसंपन्न आहेस. तूं काय पाहिजे तें करशील. प्रभो ! 'जेथें धर्म तेथें देव आणि

दैव तेथें जय ' हा ठेवलेलाच आहे. असें तूं सांगितलेलें आहे. आह्मांवर उपकार कर—– आमची लाज राख. सत्याचा जय कर आणि आपलें वाक्य सार्थ करून दाखीव. तझ्याशिवाय आमची लज्जा कोण रक्षण करील. तूं निराधाराचा आधार आहेस. तुला सर्व समजतें. '

वृद्ध देवाची प्रार्थना करीत होता तोंच, बालक उठून उभा राहिला आणि दूर पाहून म्हणाला, ' आजोबा, दोन स्वार इकडे येत आहेत ! '

वृद्ध विचारूं लागला, ' ते यवन कीं हिंदु आहेत ? '

बालक म्हणाला, ' हिंदु. '

वृद्ध म्हणाला. ' रजपूत ? अरेरे ! रजपूत रणांतून पळाले कीं काय ? प्रत्यक्ष दृष्टीनें पाहिलें तरी अशा गोष्टीवर विश्वास ठेववणार नाहीं. मग कानांनीं ऐकलेल्या गोष्टीवर कसा विश्वास बसेल ? रजपुतांनीं शत्रूंस पाठ दाखविली असें कालत्रयींही घडणार नाहीं बाळा ! तूं चुकत असशील, नीट पहा. ते दुष्ट यवन असतील. '

वृद्धाचें भाषण संपलें नाहीं तोंच दोघे रजपूत स्वार तेथें आले. त्यांस वृद्धानें विचारलें, ' भाई ! युद्धांतील कांहीं वर्तमान तुह्मांस माहीत आहे ? '

एक स्वार ह्मणाला, ' तोफांच्या मारानें रजपूत फार भयाभीत झाले आहेत. शहराच्या व किल्ल्याच्या रक्षणास जे लोक ठेविले आहेत; त्यांस मदतीसाठीं आह्मीं बोलावूं जात आहों. '

वृद्ध ह्मणाला, ' जा, बाबांनो जा. वेळ गमाऊं नका. '

शिपाई निघून गेले. बालक पुन्हां टकमक पहात राहिला. आणि ह्मणाला, ' आणखी कित्येक शिपाई येत आहेत. '

तितक्यांत तेही तेथें आले. त्यांस बालकानेंच विचारिलें, ' बाबांनो !! लढाईचें काय वर्तमान ? '

शिपायांनीं वृद्धाकडे व बालकाकडे न्याहाळून पाहिलें आणि सांगितलें, ' बाळा ! धांव—पळ—या ह्यातार्‍यास घेऊन धांव. किल्ल्यांत चला. संरक्षण करा. आमची जयाशा खुंटली. महाराणा पडला. तुह्मीं जा. आपले प्राण वाचवा. ' असें सांगून तेही शिपाई गेले.

वृद्ध बालकास सांगूं लागला, ' माझ्या जिवाची मला मुळींच काळजी

नाहीं. तुझे प्राण कसे वांचतील ? ह्याच दु.खरूप चिंतेनें माझें मन घेरलें आहे. बाळ, चल, मला धर, आपण किल्ल्यांत जाऊं. '

वृद्ध उठला. बालकानें त्याचा हात धरिला. आणि आतां ते चालूं लागणार इतक्यांत वृद्धास दुःखाचें भरतें आलें. नेत्रांतून अश्रू वाहूं लागले आणि तो गद्गदस्वरानें ह्मणाला, ' कोठें जाणार आणि काय करणार ? किल्ल्यांत गेलें तर मरण येणार नाहीं असें कांहीं नाहीं. येथें होणार तेंच तेथें. कोण जातो किल्ल्यांत ! तुझा पिता युद्धांत पडला तर मला तरी जगून काय करायचें आहे ! किती दुःख भोगावें ! किती संकटें ! किती चिंता दुःखा मागून दुःख प्रसवतें असें ह्मणतात तें अक्षरशः खरें. किती दिवस या देहाचा भार वहावा ? अशी हृदय-विदारक—प्राणघातक वार्ता ऐकण्यापूर्वी मरण येतें तर चांगलें झालें असतें. आमच्यासारख्या वृद्धांस मृत्यु भितो ह्मणतात तेंच खरें. हाय ! हाय ! काय संकटकाळ आला ! बाळा तूं जा किल्ल्यांत. मीं येथेंच रहातों आणि यवनांच्या हातून मरण्यापेक्षां आत्मघात करितों. शिवशिव ! आत्महत्येसारखें महत्पाप नाहीं असें ह्मणतात. काय करावें ? कोठें जावें ? जा तूं माझें कांहीं होवो. पातक असो कीं पुण्य असो. आत्मघात करून भूमिमातेच्या मांडीवर अक्षय्य सौख्य-निद्रा घेतों. तूंच आतां माझा कुलदीपक आहेस. तूंच माझ्या वंशलतेचा आधार. तुझ्या मातेचाही तूंच एकुलताएक पुत्र आहेस आणि आतां माझाही पुत्र तूंच तुझ्याशिवाय मला आई ह्मणन हाक मारणारें कोणी नाहीं. जा तूं—माझा पुत्र रणांत पडला तर बाळा ! तुझी माता सती जाईल यांत बिलकुल शंका नाहीं. तूं निराधार होशील. आठवावें तितकें दुःख—दुःख आणि दुःख ! ' असें सांगत तो हताश होऊन पुन्हा खालीं बसला. त्याचा दुःखोदधि उचंबळला. लहान मुलासारखा हुंदके काढून तो रडूं लागला. बालकही निराश झाला. त्यानेंही आक्रोश केला. इतक्यांत महाराण्यास घेऊन उमरावसिंह कित्येक शिपायांसह तेथें आला. त्यानें महाराण्याच्या जखमेवर त्या जंगलांतील एक वनस्पति काढून तिचा रस पिळला. त्याबरोबर ती जखम बंद होऊन महाराणा हुषार झाला. आश्चर्यानें बालक महाराण्याकडे पाहूं लागला. वृद्धासही मनुष्यांची

जाम समजतांच, तो कोण काय वगैरे प्रश्न करणार त्यापूर्वीच महाराणा
ह्मणाला, ' ही सामान्य जखम आहे आणि तुमच्या औषधीनें उत्तम गुण
आला आहे. पहा रक्तप्रवाह अगदीं बंद झाला. आतां वेळ लावूं नका.
चला उठा— आपण युद्धक्षेत्रांत ताबडतोब जाऊं. मी घायाळ होऊन
पडलों असें आपल्या लोकांस समजलें तर तें व्यर्थ उदास होतील. त्यांचा
हिय्या नाहींसा होईल. मोठी चुक झाली. आपण तेथून निघालों हेंच
वाईट. देव करो आणि माझें वर्तमान त्यांस न समजो. न जाणो,
त्यांची जयाशा नष्ट देखील झाली असेल. काय होतें कोण जाणें ! '

उमरावसिंह ह्मणाला, ' समरांगणांतील स्थिति येथून दिसते आहे
आणि रजपुताची नीति महाराजांस अवगत आहे. मी सांगितली पाहिजे
असा अर्थ नाहीं. परंतु महाराण्यानें घायाळ होऊन पुन्हा युद्धांत जाणें
अमंगलसूचक आहे. '

उदासीनतेनें भृकुटी वर चढवून महाराणा ह्मणाला, " काय दैवगति
विचित्र आहे पहा ! काय दुःखाची गोष्ट ! काय हे आह्मां लोकांचे
कठोर नियम. माझे लोक जिवापाड परिश्रम करीत आहेत. त्यांनीं
हातांत शिरकमलें घेऊन दारुणयुद्ध चालविलें आहे. यवनशोणितानें
धारामाता प्लावित झाली आहे. जिकडे तिकडे यवनांच्या प्रेतांचा खच
पडला आहे आणि अशा भयंकर वेळीं मी तेथें नाहीं. काय माझें
हतभाग्य ! काय हें माझ्या दैवाचे दुर्विलास ! अरेरे ! अशा आणीबा-
णीच्या वेळीं मी तेथें असतों तर शत्रुपक्षांतील शेंकडों लोकांस ठार
मारतों. माझ्या सैनिकवीरांस उत्साह देतों. कोण तरवारबहादूर कशा
हिंमतीनें युद्ध करतो हें पाहिलें असतें. परंतु नाहीं. माझ्या प्राक्त-
नांत तें नाहीं. तुह्मीं मला इकडे आणला नसतां तर फार चांगलें झालें
असतें. घात झाला. कसा मी असावध झालों ! बेहत्तर मीं लढाईंत
मरतों तर ! असो. माझें नशीब आणि मीं, काय होणार तें होवो.
तुह्मी युद्धक्षेत्रांत जा. माझ्या हौद्यांत बसा. मीं समरांत नाहीं असें
कोणाला दिसूं देऊं नका. सैनिकांचीं मनें उल्हासानें भरा— त्यांस उमेद
द्या. माझी काळजी करूं नका. तुह्मीं अमंगलाची कल्पना काढली नसती
तर बरें होतें. मी तेव्हांच गेलों असतों. अरे ! भ्याडासारखा अशा निर्ज-

नास मीं तोंड लपवून राहणारा काय ? छी: ! छातीं ठोकून शत्रुसंहार करीत—दुष्टांस मारतां मारतां मेलों असतों तर काय हरकत होती ? काय हा परमेश्वराचा मजवर कोप ! काय तुमुलयुद्ध चाललें होतें ! तें पाहून देवादिकांनीं पुष्पवृष्टि केली असेल. अप्सरा आपला शृंगार नीट-नेटका करूं लागल्या असतील. सूर्यास धाक पडला असेल. हरहर ! ऐन रंगाच्या वेळेस मीं युद्धांत नाहीं ! धि:कार असो माझ्या जीवितास ! अकस्मात् हत्ती घायाळ व्हावा ! मीं त्याच्या किलाण्यांत पाय अडकून पडावें—जखमी व्हावें. आणि शत्रूस पाठ दाखवून रणभूमिवरून परत यावें ! हाय हायरे देवा ! उमरावसिंह ! माझ्या तोंडांत पाडाव झालेल्या वीरशिरोमणींच्या पायाखालील रक्तगंगानें रंगलली धूळ कोंबा. नाहीं तर हें कृष्णवदन लोकांच्या दृष्टीस पडण्यापूर्वींच मला जमिनींत गाडा. काय हा घोर प्रसंग ! माझे प्राण घोंटाळू लागले. युद्धाचा परिणाम समजेपर्यंत मला मृत्यु येणार नाहीं. तुह्मीं एकजूट करा आणि शत्रूचा संहार करा जा. माझ्या प्रजेकरतां— माझ्या सैनिकवीर-श्रेष्ठांकरतां माझें हृदय दुभंग होतें. चला तुह्मीं — तावडतोब चला — माझें कांहीं होवो. ”

महाराण्याच्या आज्ञेप्रमाणें उमरावसिंह बरोबरच्या लोकांसह गेला. तेव्हां वृद्धानें बाळकास विचारलें ‘ येथें आतां कोण बोलत होते ? ’

वृद्धाचे शब्द ऐकतांच महाराणा ह्मणाला, ‘ बाबा, तुह्मीं निराशा-समुद्रांत बुडालेले कोण हतभाग्य आहां ? ’

वृद्धानें त्याला मुळीं ओळखलेंच नाहीं, त्याच्या मनांत जे विचार घोळत होते तेच त्यानें व्यक्त केले. तो म्हणाला, ‘ तुम्हांस युद्धभूमी-वरील वर्तमान माहीत आहे ? महाराणा पडला असें वर्तमान आतांच मी ऐकलें तें खरें काय ? तो जिवंत आहे, कीं या नश्वर जगतास सोडून गेला ? ’

महाराणा ह्मणाला, “ असला काय आणि नसला काय अर्थ सारखाच. ”

वृद्ध ह्मणाला, “ तूं निराश होऊन येथें कां आलास ? महाराणा जिवंत आहे तर तूं औदासिन्यानें कां घेरलास ? जें राजाचें सौख्य तेंच त्याच्या प्रजेचें. ”

महाराणा ह्मणाला, " बाबा ! तुझें भाषण सत्य होय पण अशा विपत्तींत महाराण्यास कोण सभाग्य अभय देईल ? कोण त्याचें संरक्षण करील ? "

वृद्धानें सांगितलें, " धर्म त्याचें रक्षण करील. जगदीश्वर भगवंत त्याचा अभिलाषा पूर्ण करील. जो राजा प्रजेच्या दृढ श्रद्धाभक्तिवुर्गांत वास करितो त्याला कधीं संकट येणार नाहीं. "

महाराणा ह्मणाला, " जगदीश ! तुझा महिमा अपार आहे. एका क्षणापूर्वीं मला वाटत होतें कीं, माझ्यासारखा दुर्भाग्य जगांत नसेल ! पण आतां वाटतें कीं, माझ्यासारखा भाग्यवंत अवनितलावर कोणीच नाहीं. माझी प्रजा मजवर अशी भक्ति ठेवते आणि प्रीति करते मग माझ्या सौख्याला कमी काय ? "

बालक मध्येंच ओरडला ' शेंकडो यवन इकडे येत आहेत. आतां कसें होईल ? कोठें जावें ? आजोबा, आतां कसें करावें ? ' असें सांगत बालकानें एक जाड व लांबलचक काठी काढिली आणि जसा काय तो दुष्टांस मारण्यास तयार झाला.

महाराणा मनांत ह्मणूं लागला. ' दुःखामागून दुःख. मीं निःशस्त्र येथून पळून जाणेंही अयोग्य. मजजवळ फक्त एक तरवार असती तर रजपुतांचा हस्तप्रहार किती प्रखर आहे तें त्यांस चांगलें दाखविलें असतें. असो, नाहीं त्याचा विचार कशाला ? कट्यार आहे तितकीच बस्स ! प्रसंग येईल तसें करूं. '

प्रकरण १२ वें.

धर्माचा जय.

महाराण्यास उमरावसिंहानें समरभूमीवरून जेथें वृद्ध होता त्या जंगलांत आणिलें. तेव्हां पुन्हां दारुण युद्धास प्रारंभ झाला. रजपूत लोक युद्धरंगांत दंग असल्यामुळें त्यांचें महाराण्याकडे असावें तितकें लक्ष्य नव्हतें. किंवा युद्धाच्या कडाक्यापुढें महाराण्याची त्यांस स्मृतिही नव्हती.

तोफांचा असह्य मार रजपुतांस सहन झाला नाहीं आणि हेमू तशाच उमेदीनें लढता तर त्याच लढाईत रजपुतांचा धुव्वा उडाला असता. परंतु, हेमूचा समज बदलून तसें होवो किंवा रजपुतांनीं त्याच्या तोफखान्याची बेपर्वा करून चांगल्या नेटानें जेव्हां तरवारीशीं प्रसंग आणिला तेव्हां यवनसेनेस ‘ दे माय धरणी ठाय ’ झालें ! त्या तडाक्यांत हेमूचें फार नुकसान झालें आणि सर्वथैव पराभूत होऊन त्यास मागें हटणें भाग पडलें. हेमू मागें हटतांच रजपुतांस फार चेव आला. ते समोर सांपडेल त्यास ठार मारीत निघाले. हेमूची पळण्याची शिस्त सफाई ढांसळली. ज्यास जिकडे मार्ग सांपडला तिकडे तो पळत सुटला. अशा धांदलीमुळें हेमूच्या तोफखान्याची व सामान सरंजामाची फार नुकसानी झाली. व रजपुतांस लांडगेतोड करण्यास चांगलें फावलें.

अजीमखां आणि गफूरखां या नांवांचे हेमूचे दोन सरदार आपल्या बरोबर सुमारें दीडशें पळपुटे लोक घेऊन जेथें महाराणा बसला होता तेथें आले. गफूरखांनें महाराण्यास तेव्हांच ओळखलें. आणि तो अजीमखांस सांगूं लागला, ‘ निःसंशय हाच महाराणा. आमचा पराजय झालाच आहे ! येथें कोणी मनुष्यही नाहीं. आपण राण्यास कैद करून नेऊं. सेनापतीकडे याला नेलें तर तो फार खुष होईल आणि बक्षीसही देईल. माझी खात्री आहे कीं, महाराणा सेनापतीचे हातीं सांपडला तर तो आजचा पराभव जयापेक्षांही फाजील सौख्याचा मानील. आणि रजपुतांस आपुला पराजय झाला असें दिसेल. खरेंच, खुदातालानें आह्मांवर ही मेहरबानीच केली. आपलें नशीब शिकंदर ह्मणून आह्मांस या वाटेनें पळण्याची बुद्धि सुचली. ’

अजीमखां ह्मणाला, ‘ उचला पहातां काय ? आपली मदत खरोखर पूर्ण होईल तर माझी तयारी आहे. ’

गफूरखांनें आपल्या बरोबरच्या लोकांस हुकूम करितांच पन्नास स्वार त्याच्या अंगावर धांवले. त्यांनीं महाराण्यास वेढा दिला. महाराण्यानें त्वेषानें कट्यार काढून त्यांच्यावर चाल केली. तेव्हां गफूरखां ह्मणाला, “ खबरदार, एक तसूभर हालशील तर येथच्या येथें ठार मारूं. ”

महाराण्याची खात्री झाली कीं, आपण जास्त कांहीं गडबड करूं तर

हे दुष्ट ठार मारल्याशिवाय राहणार नाहींत. तेव्हां सोईच्या मार्गानेंच पहावें; असा विचार करून तो ह्मणाला, ' तुमची काय इच्छा आहे ? '

गफूरखां आश्चर्यतेनें ह्मणाला ' आह्मीं तुला पकडून सेनापतीकडे नेणार. निमूटपणें आमच्या बरोबर चल. '

महाराणा ह्मणाला ' मग त्यांत इतका विचार कशाला ? चला मीच होऊन तुमच्याबरोबर येतों. आतां या हतभाग्याच्या कपाळीं हाल, बंदीवास आणि मरण हें ठरलेंच आहे ! '

महाराणा उठला. गफूरखानाच्या शिपायांनीं त्याला वेढा दिला व ते लोक तसेंच पळत सुटले. तें पाहून आमच्या वृद्धाचा कोपाग्नि भडकला. तो क्रोधानें, लज्जेनें व अभिमानानें विव्हल झाला. आणि बालकास ह्मणाला, " माझ्या जिवीतास धिःकार असो ! काय मी दुर्दैवी ! मी हयात असतांना माझे समक्ष महाराण्यास यवनांनीं पकडून न्यावें ! आणि तें पाहून मी स्वस्थ रहावें ? तुझी देखील मति कशी गुंग झाली ? तूं मला कां नाहीं पुढें लोटलेंस ? सर्वप्रकारें घात झाला ! मी स्वामीकार्यांत स्वदेहार्पण केलें नाहीं. परमेश्वरा ! तूं मला कसेंरे अंध केलेंस ? महाराणा गेला. तो आतां कसचा वांचतो ! "

वृद्धाच्या भाषणास प्रत्युत्तर न देतां तो बालक पुन्हा ओरडला. " आजोबा, आणखी कित्येक लोक इकडे येत आहेत. आजोबा ! आले; अगदीं जवळ आले. '

वृद्ध ह्मणाला, " बाळा ते हिंदु आहेत कीं मुसलमान ? "

बालकानें सांगितलें, " रजपूत. "

वृद्धास कांहींसा धीर आला असें त्याच्या चेहऱ्यावरून दिसूं लागलें. तो ह्मणाला, ' ते लोक बहुधा महाराण्यास यवनांच्या तढाक्यांतून सोडविण्यास आले असावेत-- '

वृद्धाचें वाक्य पुरें होतें न होतें तोंच रजपूतलोक धापा टाकीत तेथें येऊन पोंचले. त्यांच्या पाठोपाठ उमरावसिंह देखील तेथें आला आणि स्वजातियांची अशी दुर्दशा पाहून ह्मणाला, ' अरे रजपूत कुलकलंकानो ! कोठें पळून जाल ? हे पहा जयश्री इकडे येत आहेत. भिऊं नका— भयाचें कांहीं कारण नाहीं. शत्रूस पाठ दाखवायला तुह्मांला लाज वाटली नाहीं ? '

पळपुट्या लोकांनीं सांगितलें, ' तोफांचा धडाका उडाला तेव्हांच आह्मीं उधळलों. तशांत आमचे महाराज पडले ! मग धन्याशिवाय दुनिया काय कामाची असें समजून आह्मीं रणभूमीवरून इकडे आलों.'

जयश्रीनें त्यांचें भाषण समग्र ऐकलें. त्यासरसाच तो क्रोधानें लाल झाला आणि संतापानें ह्मणाला, "अरे भिऱ्यांनो, मला वाटतें तुह्मीं शुद्ध नपुंसक आहां. तुह्मी रजपूत नव्हे. पौरुषाचा लवलेशही तुमच्या अंगीं नाहीं. यःकश्चित प्राणभीतीनें तुह्मीं पळालां काय ? तुह्मांला लाज नाहीं वाटत ? शत्रूस पाठ दाखवून तुह्मीं पळता त्यापेक्षां जन्मास न येता तर बरें होतें. झाला तेव्हांच कां मेला नाहीं ? अरे मी जिवत आहे तोंपर्यंत तरी तुह्मी असें करायचें नव्हतें. तुमच्या शरीरांत सजीव रक्ताचा जोंपर्यंत एक तरी बिंदु आहे तोंपर्यंत तुह्मांस असें निर्लज्जपणें पळणें शोभत नाहीं. जोंपर्यंत तुमचे अवयव चलनवलन करीत होते तोंवर तुह्मीं मारूं किंवा मरूं अशा निश्चयानें रणभूमी न सोडतां युद्ध करायचें होतें. तुह्मीं पळून कोठें जाल ? मरण येत नाहीं असें एखादें स्थल तुह्मांस सांपडलें आहे ? तुह्मीं असे नीच — अधम आणखी जगून काय करणार ? या, हा पहा मी छाति ठोकून तुमच्यापुढें उभा आहे. मजवर खड्गप्रहार करा ! ठार मारा आणि मग तुह्मांस वाटेल तिकडे जा. म्हणजे अशा षंढांचें मुखावलोकन तरी होणार नाहीं. मी जिवंत असेपर्यंत तुम्हांला कोणी भ्याड ह्मटलेलें माझ्यानें ऐकवणार नाहीं. मूर्खांनो, रजपूत हें नांव ऐकिलें कीं, शत्रू गर्भगलितवत होतात. त्यांचें हृदय फाटून जातें. रजपुतांच्या रणमैदानावरील भयंकर रणगर्जनेनें दुश्मनचा थरकाप होतो. रजपुतांच्या वीर्यवंत हस्तांतील प्रखरतर शस्त्रास्त्रें पाहून शत्रूचे नेत्र अंध होऊन ते खालीं मान घालितात. रजपुतांचे समरांगणांतील शौर्यानें खदिरांगारासारखे जाज्वल्य नेत्र तेज पहातांच, ते आम्हांस जाळून आमची राख करतात काय असें शत्रूंस वाटतें, ज्या रजपुतांच्या पदाघातानें शत्रुहृदयांत भूमिकंपाचा भास होतो, ज्या रजपुतांचे खड्गधर बाहु पहातांच शत्रूस कालपाशाची स्मृति होते; त्या रजपूत या वीर्यसंपन्न आणि तेजस्वी नांवास तुह्मीं कलंक लावूं पहातां ! कसे तुह्मी लाजा वाटून प्यालां ? का तुमच्या वीर्यतेचा लोप झाला ? भिऱ्यांनो; जे लोक

तुमच्या माना चराचर कापायला आलेले—जे दुष्ट तुमचा सर्व नाश करूं पहाणारे—जे चांडाळ तुमचें सर्वस्व लुटूं पहाणार—जे अधमाधम तुमच्या देशबांधवांस ठार मारूं पहाणारे—जे नीच तुमच्या मायबहिणींची लाज लुटणारे—जे पापी तुमच्या धर्मावर व देवादिकांवर लत्ताप्रहार करणारे—जे तुम्हांसारख्या पळपुट्या मेंढरांस फाडून खाणार—त्यांस तुम्हीं पाठ दाखवून कोठें चाललां ? निमकहराम- स्वामिद्रोहक-दगलबाज-बेईमानं ! अरे, मी हयात असेपर्यंत भयानें जो एक अंगूल पाछें हटेल त्याला येथच्यायेथें लाथ मारून याच भूमातेच्या पोटांत दडपीन. याद राखा ! तो आकाशांत जावो-पाताळांत जावो सर्व सुरासुरांची शक्ति माझ्या अंगीं आली आहे. मी—हा जयश्री —त्याला खेंचून समरांगणांत आणीन. तुम्हीं काय समजतां. निर्लज्ज ! तुमच्यावर आकाश कां कोसळले नाहीं ? भूमीनें तुम्हांस आपल्या पोटांत कां घेतलें नाहीं ? पंचमहाभूतें तुम्हांवर कशीं खवळलीं नाहींत ? वायूनें तुम्हांला शत्रूकडे पृष्ठभाग कसा करूं दिला ? कोठें गेली तुमची स्वदेशभक्ति, स्वामिभक्ति—स्वधर्मश्रद्धा आणि स्वातंत्र्यप्रीयता ! जो वीरपुंगव शस्त्रास्त्र सज्ज होऊन समरांत आला त्यानें पंचप्राण तेथें अर्पण करावे किंवा कीर्तीचा तुरा लावावा. उमरावसिंह महाराणाजी कोठें आहेत ? '

उमरावसिंह तटस्थ झाला. तो त्या वृद्धाकडे गेला आणि त्याला विचारूं लागला, ' बाबा, महाराणाजी येथून कोठें गेले ? '

वृद्ध ह्मणाला, ' तुमच्या पुढेंच कित्येक मुसलमान त्यास घेऊन गेले. तुम्हीं त्वरा कराल तर ते तुम्हांस सांपडतील. ते अजून फार लांब गेले नसतील. '

जयश्री ह्मणाला ' हाय हाय ! मूर्खांनो, फिरा मागें. महाराणा पहला अशी खोटी कंडी पिकवून तुम्हीं पळण्याचा मार्ग धरलात ? फिरा मागें. महाराण्यास त्या दुष्ट शत्रूंनीं तुम्ही जिवंत असतां पकडून न्यावें ? धिःकार ! तुम्हीं मतमातेचें दूध प्यालां काय ? असें दुःखकारक वृत्त ऐकून देखील तुमचा थरकंप होत नाहीं ? तुमचे हात वळवळत नाहींत ? तुमच्या अंगावर शहारे उठत नाहींत ? तुमचें मस्तक अग्निप्रमाणें तापून फणफणत नाहीं ? कशाला तुम्हीं शस्त्र हातीं धरलें ? तुमचा राजा, तुमचा अन्नदाता, तुमचें लेंकराप्रमाणें पालन पोषण करणारा, दुष्टांनीं तुमच्या डोळ्यांत

धूळ फेंकून बांधून नेला आणि तुह्मी टकमक पहात राहिलां काय? ‘ आर्यजननीच्या उदरीं पृथ्वीप्रलयापर्यंत वीर पुरुष अवतीर्ण होतील ’ या वाक्यास हरताळ लावण्याकरतां तुह्मीं जन्म घेतलेत? बेहत्तर, आर्यमाता वंध्या राहती तर! तोफखान्यास बत्ती दिली नाहीं तोंच तुह्मीं पळालां? हजार वेळ धिःकार!! शत्रूस पाठ दाखवून तुह्मीं नरकाचें साधन केलेंत. यमास तुह्मांकरतां निराळाच नरक तयार करावा लागेल. कशी तुमची बुद्धि भ्रष्ट झाली? तुह्मीं कोणाचें अन्न खातां? तुमच्या अंगांत कोणाचें वीर्य खेळत आहे? तुह्मीं कोण, हें तरी तुह्मांला समजतें? तुह्मीं रजपुतांचे पराक्रम शेंकडो वेळां पाहिले. निदान ऐकिले तरी असतील. मग तुमचें आर्यत्व कोठें गेलें? मान खालीं कां घालतां? चला मजबरोबर या, आपण आतां जाऊन महाराण्यास सोडवूं. ’

पळपुटे लोक ह्मणाले ‘ आह्मीं चुकलों; क्षमा करा. ’

वृद्ध ह्मणाला, ‘ माझा नाइलाज आहे. मी अंध. तशांत मजजवळ शस्त्र नाहीं. असतें तर महाराण्याच्या केंसासही धक्का लागूं दिला नसता. पण काय करूं? देवानें मला अंध केलें तेंही एकप्रकारें चांगलेंच झालें. नाहीं तर शत्रूस पाठ दाखविणारांचीं कृष्णवदनें पहाण्याचा मला प्रसंग येता. जयश्री! तूं खरा क्षत्रिय आहेस. परमेश्वर तुला चिरकाल सौख्यांत ठेवो. ’

जयश्री पळपुट्या लोकांस सांगूं लागला. “ भ्याडांनो! कान उघडा आणि हा विगलित देहवृद्ध काय सांगतो तें नीट ऐका. या वृद्धा इतकी जरी तुमच्या अंगीं हिंमत असती तर तुह्मीं चित्रासारखे स्वस्थ राहिला नसता! बाबा, आपण चिंता करूं नका. मी एकटा जाऊन महाराण्यास सोडवून आणतों. जोंपर्यंत माझा श्वासोच्छ्वास सुरू आहे, जोंपर्यंत जातिवंत रजपुताचें वीर्य माझ्या अंगांत खेळत आहे, जोंपर्यंत मला जयापजयाची चाड आहे तोंपर्यंत काय मगदूर लागली आहे कीं, ते दुष्ट महाराण्यास घेऊन पळून जातील? आतां वीजेसारखा जातों व त्या कृतघ्नांचा शिरच्छेद करतों. त्यांचें मांस कुत्र्यागिधाडांस घालून महाराण्यास सोडवून आणतों. अहो, फार काय मी माझे तरवारीची शपथ वाहून सांगतों कीं, मीं जर महाराण्यास सोडवून आणलें नाहीं तर जगांत तोंड दाखविणार नाहीं. ”

जयश्री निघाला असें पहातांच, ते लोकही क्रोधानें लाल झाले व ह्मणाले ' आह्मीं बरोबर येतों. यापुढें अशी चूक आमचे हातून होणार नाहीं. एकवेळ आमचे हातून अपराध घडला. एकदां आह्मांस क्षमा करा. '

जयश्रीनें उमरावसिंह आणि ते लोक बराबर घेतले आणि आपला मार्ग सुधारला.

वृद्ध ह्मणाला, " वाहवारे प्रभो ! जयश्री मनुष्य नव्हे. केवळ देवता आहे. खरा वीरपुरुष– जातीचा क्षत्रिय– शाबास ! जयश्री शाबास ! धन्य तूं आणि हजार वेळ धन्य तुझी माता ! आज त्या वीरांगनेनें वीर माता हें नांव सार्थ केलें. देवाधिदेव कृपा कर. आज तुझें अमोघवज्र जयश्रीस दे — हे आदित्यराज, तुझ्या परम प्रखरतर कीर्तिकिरणांनीं जयश्रीस तेजस्वी कर. तुझ्या कृपेनें महाराणा यवनांच्या हातून मुक्त होवो. बाळ ! तूं झाडावर चढून पहा बरें; तुला आतां काय दिसतें तें. जयश्री गेला तिकडेच पहा. "

बालक वटवृक्षावर चढला आणि आसमंतांत पाहून सांगूं लागला, " आजोबा ! मुसलमान लोक पुढें जाताहेत. जयश्री आपल्या लोकांस तरवारी उपसून माझ्या मागून लौकर या असें सांगत त्यांचा पाठलाग करीत चालला आहे. तें पहा, जयश्रीनें यवनांस पकडलें. दोन्हीं पक्षांत मारामारी सुरू झाली.

अहाहा अजोबा, जयश्रीनें यवनसैनिकांस ठार मारून महाराण्यास सोडविलें. त्या चकमकींत जयश्री कडील कित्येक लोक पडले. मुसलमानांचेही कित्येक लोक ठार झाले आणि कितीएक घायाळ होऊन पडले आहेत. अजीमखां व गफूरखां पळून गेले. जयश्री महाराण्यास घेऊन पुन्हा वटवृक्षाकडे येऊं लागला. "

आजच्या लढाईत जय झाला आणि महाराण्याची मुक्तता झाली ह्मणून महाराणा व जयश्री मनांत हंसत होते. आणि तेंही खरेंच. आज हंसण्याचाच दिवस आहे. खुशाल हंसा. आज नाहीं हंसणार तर केव्हां हंसणार ? परंतु या अल्प आनंदाचा काय नियम आहे ? पुढच्या क्षणास तुह्मीं हंसाल कीं, रडाल हें कोण सांगेल ? तें सांगण्याची कोणाची प्राज्ञा

आहे ? सुख किंवा दुःख; आनंद किंवा निरानंद; हा सर्व प्रकृतीचा खेळ आहे. मनुष्यमात्र अज्ञान बालकाप्रमाणें चेष्टा करत आहे. बालकें जशीं एखादी शानदार वस्तु मिळाली ह्मणजे प्रसन्न होतात आणि ती हरवली, मोडली किंवा हिरावून गेली ह्मणजे रडूं लागतात. तसेंच मनुष्य केवळ आपल्या अज्ञानतेमुळें क्षणिक सुखदुःखानें आनंदी व दुःखी होतात. मनुष्य अज्ञान ! तुह्मीं हसणार तर हंसा. पण तुह्मीं रडून जगाला मात्र हंसवूं नका.

प्रकरण १३ वें.

सुखांत दुःख.

महाराणा, जयश्री, उमरावसिंहप्रभृतिमंडळी, वृद्ध ज्या वटवृक्षाखालीं बसला होता तेथें आली. महाराणा जयश्रीस ह्मणाला ' आज तुह्मीं उदयपुराधिपतीची यवनांच्या काळदाढेंतून मुक्तता केली. तुह्मींच आपल्या अलौकिक शौर्यानें आणि महान् पराक्रमानें उदयपुरवासी जनांची लाज, मानखंडना व नांव राखिलें. तुह्मांवरून हा जीव ओंवळून टाकावा. आजच्या बिकटप्रसंगीं केवळ मजवरच नव्हे तर सर्व रजपुतांवर आपण अनंत उपकार केलेत आणि अवघ्या रजपुतांस कृतज्ञतापाशानें परिबद्ध केलेत. विशेषतः मी जन्मोजन्मी तुमचे उपकार विसरणार नाहीं. मी तुमचा सर्वस्वी ऋणि आहे. आजच्या लढाईत आह्मांस जय मिळाला तोही तुमच्या वीरश्रीनेंच. तुमच्या उपकाराची फेड होणार नाहीं हें तर खरेंच. परंतु कृतज्ञतेचें केवळ निदर्शन ह्मणून माझ्या कंठांतील हा बहुमोल मौक्तिकहार मी प्रेमपूर्वक तुह्मांस अर्पण करितों. तुमच्या बंधूनें दिलेला हा मौक्तिकहार तुह्मीं अवश्य घ्या. ' असें ह्मणून महाराण्यानें आपल्या कंठांतील हार काढून जयश्रीच्या गळ्यांत घातला.

जयश्री नम्रतेनें ह्मणाला, " महाराज ! ही सर्व देवीची कृपा आणि गादीचा प्रताप होय. माझा इतका सत्कार व्हावा असें मीं कांहींच महत्कृत्य केलें नाहीं. माझें कर्तव्य मीं केलें. तुह्मीं माझे प्रभु आहां. मी तुमचा आज्ञाधारक सेवक. तुह्मीं राजा मी प्रजा. महाराण्यास मी शत्रूचे हातीं न-

सांपडूं देणें आणि यदाकदाचित् ते सांपडले तर अश्रांत श्रम करून प्राणा-च्चीही पर्वा करून अगर हरतऱ्हे करून त्यांची सुटका करणें हें माझें मुख्य कर्तव्यकर्म आहे. असा अमोलिक हार मला बक्षीस देऊन तुह्मीं माझा सन्मान केला आणि आपली मजवर जी प्रीति आहे ती व आपल्या मनाची उदारता व्यक्त केली. खरें ह्मटलें तर या सन्मानास मी पात्र नाहीं. तरी धीरोदार व गंभीर मनाचे महत्पुरुष माझ्यासारख्या अल्पगु-णाची किती व कशी प्रशंसा करितात हें मशहूर झालें आणि त्याबरोबरच आपली गुणग्राहकताही लोकप्रसिद्ध झाली. जगदीश ! तूंच महाराण्यास सर्वप्रकारें यश दिलेंस. हे सर्व तुझ्या कृपेचे खेळ आहेत. '

महाराणाजी वृद्धास सांगूं लागले, ' दोन घटकापूर्वीं मी विपत्तिग्रस्त होतों. माझे मन निराशासागरांत तरंगत होतें. तव्हां आश्वासन वाक्यांनीं तुह्मीं मला उत्तेजन दिलें–बुडूं पहाणाऱ्या हृदयनौकेस तुह्मीं तारिलें. मी तुह्मांला दृढालिंगन देतों. -आणि माझे परितप्तप्राण आनंदजलसिंचनानें शांत करतों. '

महाराणा वृद्धास भेटतांच वृद्धाचें मानस आनंदातिशयानें उचंबळूं लागलें. तो प्रेमानें महाराण्यास भेटला. महाराणा ह्मणाला, ' आपण कोण व इकडे कां आला ? '

वृद्धानें सांगितलें ! महाराज ! मी अमृतसिंहाचा पिता. माझें नांव समरसिंह. आजपर्यंत मीं पुष्कळ लढाया मारिल्या. माझ्या अंगावर ६३ जखमा आहेत. परंतु त्या सर्व पुढच्या भागास. मीं आजपर्यंत शत्रूस पाठ दाखविली नाहीं. आणि माझ्या पृष्ठभागीं एकही जखम नाहीं. वृद्धत्वामुळें माझे नेत्र गेले. मी शक्तिहीन झालों तरी मला लढाईची हौस. आजच्या लढाईचा कसा शेवट होतो तो ऐकावा ह्मणून मी येथें माझ्याबरोबर अमृतसिंहाच्या मुलास घेऊन आलों. अमृतसिंह जयश्रीच्या सैनातींत शतनायक आहे. '

महाराणा ह्मणाला ' तुह्मी जातिवंत रजपूत आहां. तुमच्यांत नख-शिखांत क्षात्रतेज चमकत आहे. खरोखर तुह्मी रजपूत या नांवास सर्व प्रकारें योग्य आहां. '

जयश्री ह्मणाला, ' अमृतसिंहदेखील पाणीदार वीर आहे. आजच्या

युद्धांत त्यानें चांगली तरवार गाजविली. त्या लढवय्याचें शौर्य व पराक्रम पाहून मला फार आनंद झाला. माझ्या मनांत त्याला सहस्राधिप करावें असें आलें आहे. परंतु, जशी महाराजांची आज्ञा.'

महाराणा ह्मणाला 'तुमच्या मुखानें अमृतसिंहाची प्रशंसा ऐकून माझें मन फार संतुष्ट झालें. जे इमानी इतबारी पुरुष असतात; जे धन्याची आज्ञा शिरसा वंद्य करून तदनुसार वागतात; जे आपलें कर्तव्य करण्यांत कधीं कसूर करीत नाहींत; जे स्वामिसेवादक्ष त्यांची पदोन्नति करणें न्याय्य आहे. तुह्मांस अमृतसिंहाचा पदाधिकार वाढविण्याच्या कामीं माझी सल्लामसलत पाहिजे असें नाहीं. कारण, तें काम तुमच्या अधिकारांतील आहे. अमृतसिंहाचे सद्गुण तुह्मी मला कळविलेत ह्मणून त्यावर मी आजपासून विशेष प्रीति करीन.' नंतर तो वृद्धास ह्मणाला, 'क्षत्रियश्रेष्ठ आतां मीं तुह्मांला एक विनंति करतों.'

वृद्ध ह्मणाला, 'महाराज जी आज्ञा करतील ती मला वंद्य आहे. महाराजांच्या आज्ञेचा मी ताबेदार आहें. आपला हुकूम मी प्राणांचीही बेपर्वा करून अमलांत आणीन.'

महाराणा ह्मणाला, 'तुह्मीं अमृतसिंहाच्या मुलास आह्मांकडे द्या. आह्मीं याचा प्रतिपाल चांगला करूं. राजकुमारांबरोबर हा शस्त्रास्त्र विद्या शिकेल आणि ज्या उपायांनीं हा नांवलौकिकास येईल अशी व्यवस्था आह्मीं ठेवूं.'

वृद्धाच्या नेत्रांत आनंदाश्रु आले. तो कृतज्ञताभावानें ह्मणाला, 'आह्मीं तुमचे आज्ञाधारक सेवक आहों. आज्ञेप्रमाणें या मुलास मी तुमच्या सेवेंत सादर करतों.'

महाराणा ह्मणाला, 'असेंच केवळ नव्हे. प्रातःकालीं हा आमच्याकडे येईल आणि सायंकालीं तुमच्या सुश्रुषेकरितां घरीं जाईल.'

वृद्ध ह्मणाला, 'जशी महाराजांची आज्ञा.'

इतक्यांत कित्येक शिपायांसह अमृतसिंहही तेथें आला आणि वंदन करून लीननेनें उभा राहिला.

अमृतसिंह ह्मणाला, 'यवनसेनेचा पराभव होतांच ते लोक दाही दिशांस उधळले. ते सैरावैरा धांवत असतांना हजारो लोकांची एक टोळी

अनूपसिंह सेनापतीच्या समोरून जातांना त्यांनीं पाहिली. तेव्हां ते तिच्या मागें लागले. मुसलमान चांगल्या जोमानें व व्यवस्थेनें पळत होते. तरी सेनापतींनीं त्यांस गांठिलें. दोन्हीं पक्षांत दारुण युद्ध झालें. अनूपसिंहाबरोबर गेलेल्या लोकांपैकीं कोणीच मागें आला नाहीं. आणि त्यांच्याकडील कांहींच विशेष वर्तमान समजत नाहीं.'

जयश्री ह्मणाला, 'खरोखर घात झाला!

महाराणा ह्मणाला, 'अनूपसिंहास शत्रूनीं ठार मारिलें असेल तर आजच्या लढाईंत झालेला जयलाभ निरर्थक असें समजलें पाहिजे. प्राक्तनास कोण चुकवील? आतां व्यर्थ वेळ दवडण्यांत तथ्य नाहीं. अमृतसिंहानें सांगितलेल्या हकीकतीवरून कोणत्याचप्रकारचा निश्चय करवत नाहीं. आणि अनूपसिंहाची दशा काय झाली असेल हेंही कायम समजत नाहीं. उमरावसिंह! तुह्मीं आतांच्या आतां फकीराचा वेष घ्या आणि यवनांच्या छावणींत जाऊन अनूपसिंहाचें काय वर्तमान आहे ह्याचा पुरा शोध लावून या. आपण किल्ल्यांत जाऊं आणि तेथील लोकांचें शांतवन करूं.'

जयश्रीचें मुखकमल म्लान दिसूं लागलें. उमरावसिंह वंदन करून निघाला. तो मनांत ह्मणूं लागला "असा हृदयविदारक-प्राणसंहारक वृत्तांत ह्मीडेस कोण सांगेल? असें दुःखकारक वर्तमान एकतांच ती बिचारी वांचेल कशाला? मित्रा अनूपसिंहा, तुझ्या जिवासजीव देणाऱ्या या मित्रापूर्वींच तूं समरक्षेत्रांत आपला देह ठेविलास. महाराज, वज्रप्रहारासही न डगमगणारें हृदय विदीर्ण झालें. माझा उजवा हात गेला. उदयपूरचा आधारस्तंभ गेला—माझी उमेद, माझें सहाय रसातळास गेलें. शौर्यतेचा मूर्तिमंत पुतळा गेला. रजपुतांचें नाक गेलें. माझ्या यशाचा व संकटाचा भागिदार गेला. माझा प्राणमित्र हरवला. आमच्या राज्यवैभववृक्षावर कुऱ्हाड पडली. गौरवमंदिरावर वीज पडली! अनूपसिंह, तुला मरतांना माझी स्मृति झाली असेल—तुझे प्राण घोंटाळले असतील. त्या दुष्टांनीं तुझे हाल हाल केले असतील. थांब, मीं आलोंच! अनूपसिंह, थांब, त्याच रणभूमीवर मुसलमानांच्या रक्ताचे सडे घालतों आणि तुझ्या मर्दुमकीची, स्वदेशैक-

निष्ठेची; धाष्टर्याची व स्नेहातिशयाची आज कमाल करून तुझ्या सहवासांत चिरकाल रहाण्याकरतां स्वर्गाची वाट धरतों. ”

महाराणा ह्मणाला, ‘ सेनापती, असा अविचार करणें तुह्मांला योग्य नव्हे. विचार करा. उतावीळ होऊं नका. सर्वांनाच दुःखसमुद्रांत लोटणें तुह्मांस उचित नव्हे. असें अविचारी कृत्य करणें तुह्मांला अनुचित आहे. उमरावसिंह गेला आहे. तो काय तपास करून येतो तें पाहूं आणि मग कायतें करूं. ’

जयश्री ह्मणाला, ‘ आतां माझा धीर खचला. अनूपसिंहाच्या स्त्रीस आतां मीं सांगूं ? ती असें दुर्वृत्त ऐकेल तर प्राण देईल ! लढाईवर निघतांना त्यांनीं सांगितलेले शब्द माझ्या हृदयांत जसेच्या तसे आहेत. घात झाला. आजचा जय झाला आणि नाहीं सारखाच. ’

महाराणा ह्मणाला, ‘ पतिप्राण हेंच ज्यांचे दैवत अशा स्त्रियांस पतिविरहवेदना असह्य असते हें जरी खरें तरी ती चांगल्या कुलीन घराण्यांतील समंजस व विचारी स्त्री आहे. चार समाधानाच्या गोष्टी तिला सांगितल्या ह्मणजे तिचें शांतवन होईल. आतां आपण येथून लौकर जाऊं. ’

जयश्री ह्मणाला, ‘ जशी आज्ञा. ’

प्रकरण १४ वें.

शांतता.

उदयपूरच्या किल्ल्यांतील एका प्रशस्त कोटांत कुलीन स्त्रिया होत्या. त्यांचें लढाईच्या परिणामाकडे एकसारखें लक्ष लागलें होतें. आतां काय झालें असेल. काय वर्तमान येतें कोण जाणें ! अशा विचारलहरींत सुंदरींचें मन वेधून गेलेलें होतें. रजपुतांस जय मिळावा ह्मणून प्रभूचा त्या उत्कंठितमनानें स्तव करीत होत्या. प्रत्येक स्त्री करालादेवीस व आपल्या कुलस्वामीस कांहींना कांहीं नवस बोलत होती. कोणी आपल्या पतीकरतां; कोणी बंधूकरितां आणि कोणी आपल्या प्रियपुत्राकरता मंगलप्रार्थना करीत होत्या. इतक्यांत एक रजपूत वीर तेथें आला. त्यास

पहातांच, त्या मोठ्या उत्साहानें युद्धवार्ता विचारूं लागल्या; तेव्हां त्यानें 'महाराणा जखमी होऊन पडला!' असें सांगितलें. त्याबरोबर सर्व स्त्रियांनीं रडून आकांत केला. त्यांच्या आक्रंदन ध्वनीनें अवघा किल्ला मजबजला. सर्व स्त्रियांच्या मनांत चिंतेनें घर केलें. त्यांना कांहींच सुचेना. इतक्यांत दुसरा शिपाई आला. परंतु तो काय भयंकर वार्ता सांगेल देव जाणें! अशा भीतीनें त्याला कोणीच कांहीं विचारीना. त्या ओक्साबोक्शीं रडत आणि स्फुंदत त्याकडे पहात राहिल्या. तेव्हां त्या शिपायानें त्यांच्या दुःखाचें कारण विचारून सांगितलें, 'तुम्हीं आक्रोश करूं नका— दुःख करूं नका. युद्धांत महाराणाजीचा जय झाला. हें आनंदकारक वर्तमान तुम्हांस सांगावें म्हणून त्यानींच मला पुढें पाठविलें. महाराणाजी आतांच नगरप्रवेश करणार. व स्वतःच येथें येऊन तुम्हांस आपआपल्या घरीं जाण्याची परवानगी देणार आहेत. तुम्हीं अगदीं निर्धास्त रहा.'

त्या अबलांचें अवलमन आनंदी झालें. त्यांचीं कोमेजलेलीं मुखकमलें प्रफुल्ल दिसूं लागलीं. देवीनें आम्हावर कृपा केली. आमचें सौभाग्य राखिलें. आज सोन्याचा दिवस उगवला. जगदंबा आमचे नवसास पावली. अशीं हर्षभरित वाक्यें निघूं लागलीं. महाराणा प्रथमतः इकडे येणार असें समजतांच, त्या सौभाग्यवतींनीं आपलीं शृंगारभूषणें नीटनेटकीं केलीं. जलकुंभ, पुष्पें, दीप व दहीं वगैरे मांगलिक पदार्थ घेऊन त्या मंगलगीत गात गजगतीनें किल्ल्याच्या द्वारापर्यंत सामोऱ्या गेल्या. महाराणाजी किल्ल्यांत येतांच त्यांनीं पुष्पवृष्टी केली आणि समारंभानें ते एका सुसज्ज गृहांत गेले.

महाराणा आसनावर बसला. अष्टप्रधान व सेनापति आपल्या दर्जाप्रमाणें बसले. सर्व सरदार, मानकरी वगैरे आनंदानें बसले आहेत इतक्यांत एका वृद्धेनें विचारिलें, " महाराजांस जखम झाली असें ऐकल्यापासून आम्हीं फार काळजी करीत होतों."

महाराणा म्हणाला, " म्हणण्यासारखी ती जखम नव्हती; परंतु मी असावध पडलों हें खरें. असो, आज महादेवीच्या कृपेनें आमचा जय झाला. आतां स्त्रीसमुदायानें खुशाल नगरांत जावें. आमच्या फौजेनें यवनांचा

पराभव केला. आतां त्यांची रग चांगली जिरली आहे. नगरवासीजनांस त्यांकडून कोणत्याहीप्रकारची पीडा होईल असा संभव दिसत नाहीं. ”

नारीजनसमूहांत क्रीडा ही आपल्या मुलास कडेवर घेऊन उभी होती. तेथें जमलेल्या पुरुषमंडळांत अनूपसिंह नाहीं असें पहातांच तिच्या जिवांत जीव नाहींसा झाला. स्वपतीचें कुशलवृत्त विचारण्याकरतां ती जयश्रीकडे एकसारखी पहात होती. तिची आणि त्याची दृष्टादृष्ट होतांच, जयश्री अगदीं उदास झाला. दुःखानें त्याचें हृदय दुभंग झालें. नेत्र पाण्यानें भरून आले. तो सभागृहाच्या बाहेर आला. तितक्यांत क्रीडाही भयभीत होऊन तो होता तेथें आली आणि ह्मणाली, “तुह्मीं गेल्यापासून मला प्रत्येक क्षण युगाप्रमाणें जात होता. मीं एकसारखी चिंताग्रस्त होतें. तुह्मांला पाहिलें तेव्हां मला कांहींसा धीर आला. ते कोठें आहेत? ”

जयश्रीस क्रीडेच्या प्रश्नाचें कांहींच उत्तर देववेना. त्यानें दीर्घ निःश्वास सोडून बराच वेळ खालीं मान घातली. नेत्राश्रूनीं जमीन भिजविली असें पहातांच, क्रीडेचा हृत्कंप झाला. आपल्यावर एकाएकीं वीज पडली काय, असें तिला भासलें. आपल्या कडेवर पुत्र आहे कीं नाहीं हेंहीं तिला भान नाहींसें झालें. तिच्यानें उभें रहावेना. तितक्यांत महाराणाही तेथें आला. आणि तो जयश्रीस विचारूं लागला “ सेनापति, झालें काय ? ”

जयश्री म्हणाला ‘ ही अनूपसिंहाची स्त्री आणि हा तिचा मुलगा. ही अनूपसिंह कां आले नाहींत हें विचारण्याकरितां इकडे आली आहे. ’

महाराणा निरुत्तर झाला. कारण अनूपसिंहाचें खरें वर्तमान काय आहे हें त्यालाही माहीत नव्हतें. तो तटस्थ राहिला. तितक्यांत क्रीडेनें प्रतापसिंहास महाराण्याच्या पायांवर घातलें. तेव्हां राणा फारच गहिंवरला. तो स्वगत म्हणाला, ‘ काय संकट ? अशा आनंदाच्यावेळीं अनूपसिंह येथें नाहीं. काय दैव ! आतां या अबलेस मीं काय सांगूं ? आणि हिचें मन शांत तरी करूं कसें ? ’

महाराणा कांहींच बोलत नाहीं असें पहातांच क्रीडेचा धीर खचला. तिला आकाश कोसळल्यासारखें झालें. आतां काय करूं असें तिला झालें. तेव्हां भूमाता दुभंग होती तर ती उडीच घेती. अतिशयच दुःख झालें ह्मणजे त्याचा थोडासा परिहार रडून होतो; पण रडून

रडून तिचे नेत्रच अनार्द्र झाले होते. तरी तिनें रडण्यास प्रारंभ केला. तेव्हां महाराणा ' बाई ! रडूं नको. करालादेवी सर्वांचें चांगलं करील. तूं आपल्या मनांत भलताच संशय आणूं नकोस. धीर धर. या अज्ञान लेंकरास कडेवर घे. अनूपसिंहाच्या शोधास आह्मीं मनुष्य पाठविला आहे तो इतक्यांत येईल. '

क्रीडा गद्गद्स्वरानें जयश्रीस ह्मणाली, ' भाऊराय ! तुह्मीं कधीं असत्य भाषण करीत नाहीं. आणि आजच खरें वर्तमान काय आहे तें कां सांगत नाहीं ? तुह्मीं आणि ते बरोबर गेलां आणि त्यांचें वर्तमान काय आहे हें तुह्मांला माहीत नाहीं असें कसें होइल ? त्यांना तुह्मीं एकटे सोडून कसे हो आला ? आजपर्यंत त्यांस तुह्मीं कधीं अंतर दिलें नाहीं आणि आजच तुह्मांस अशी बुद्धि कशी झाली ? माझे प्राण घोटाळूं लागले. सांगाहो सांगा ? आतां मला त्राण राहिलें नाहीं. खरें काय असेल तें सांगा ? माझें हृदय मीं आत्तां दगडासारखें घट्ट केलें आहे ! देवी अंबे ! मीं तुला इतके नवस केले. मनोभावानें तुझी पूजा केली. तुझा मला आधार. पण माझे दुर्दैवापुढें तूं तरी काय करशील ? भाऊराय ! माझ्या सौभाग्यमंदिरावर दरवडा घालणाऱ्या काळास ठार मारून तुह्मीं माझें सौभाग्य राखाल — अहो, तुह्मीं त्यांचें संरक्षण कराल अशी मला मनापासून उमेद होती. पण व्यर्थ हो व्यर्थ ! सर्वस्वी घात झाला ! आतां हें कृष्णवदन कोणासहो दाखवूं ? देवा, कसारे घात केलास ? माझें सौभाग्य, माझें सौख्य, माझा आनंद, माझा प्राणाधार— माझें जीवन कसें विलयास नेलेंस ! मीं अनाथ झालें. परमेश्वरानें मला निराधार केलें ! आतां हे प्राण पाहिजेत कशाला ? भाऊराय, तुह्मांसारखे जिवलगमित्र शूरस्नेही— अहो, प्राणमित्र जवळ असतांना असें कसेहो होऊं दिलें. मीं येतें ह्मणून सांगत होतें; पण मला येऊं दिलें नाहीं. आतां मी सर्वथैव उघडी पडलें. शेवटीं या अभागिनीस त्यांचें मुखावलोकनही झालें नाहीं. किती मी हतभाग्य ! मीं सती जाणार— झाला माझा निश्चय. तुह्मीं कृपाकरून माझी तयारी करून द्या. तिकडे माझी वाट पहाणें होत असेल. ह्या जीवलोकांत आतां माझें काहीं काम नाहीं. मी सती जाऊन माझ्या प्रियपतीबरोबर अक्षय्य स्वर्गांत राहणार. तुह्माला मीं एकटेच पाहिलें तेव्हांच माझ्या

जिवास चल्स झालें; पण झटलें लढाईचें काम. कोठें जाणें किंवा पाठविणें झालें असेल, पण असें कायमचें जाणें होईल हें माझ्या ध्यानीं—मनीं किंवा स्वप्नींही नव्हतें. किती मीं पातकी ? कसें एकाएकीं मला टाकून जाणें झालें ! मीं जन्मास आलें तेव्हांच माझ्या आईनें माझी 'दूध-पिती' कां केली नाहीं ! झालें तेव्हांच मरतें तर मला असें दुःख कां भोगावें लागतें ? पण माझ्या कपाळीं असें दुःख भोगायचें होतें तें कसें चुकेल ? शिव शिव ! जगदंबे ! या अज्ञान बालकाकडे तरी पहा-वयाचें होतेस, याची देखील तुला कींव आली नाहीं ? आतां येथें फार वेळ रहाणें व्यर्थ. कसें माझ्या अन्यजन्माचें पातक उभें राहिलें पहा ! या जन्मांत कायावाचा मनानें मीं कोणतेंच पातक केलें नाहीं. हाय हाय ! काय दुःखाचा डोंगर अचानक कोसळला पहा ! '

क्रीडा असा शोक करीत असतांना जयश्रीनें तिला आश्वासन देऊन सांगितलें, ' असा शोक विनाकारण करूं नकोस. आह्मीं काय सांगतों तें ऐक. उगांच सती जाण्याची तयारी कशी बरें करतां येईल ? माझ्या मित्राचें काय झालें ? हा प्रकार आह्मांपैकीं कोणालाच समजावा तसा समजला नाहीं. युद्धप्रसंगी ते आणि मी एकाच जागीं होतों हें खरें. परंतु महाराणाजी पडले ! असें वर्तमान ऐकतांच मीं महाराणाजींच्या शोधास गेलों. अनूपसिंह यवनांच्या पाठलागावर गेले इतकेंच वर्तमान आह्मांस समजलें आहे. मी शपथ वाहून सांगतों— त्याचें पुढें काय झालें तें यथातथ्य आह्मांस अजून समजलें नाहीं. आह्मीं त्याचे तपासास मनुष्य पाठविला आहे. तो येईपर्यंत धीर धर. विनाकारण असा शोक करूं नकोस. आपला जीव अशा दुःखांत आणि तोही व्यर्थ घालणें तुझ्या-सारख्या समंजस स्त्रीस योग्य नव्हे. अनूपसिंहाचें काय वर्तमान आहे हें इतक्यांत समजेल. शोधांती तुला जसें प्रशस्त वाटेल तसें कर. उगांच सती जाणें ह्मणजे काय ? त्याला कांहीं तरी आधार नको का ? या बाल-काकडे पहा आणि जिवास धीर दे. प्रतापाकडे पहा बरें ! हा तुझी दुःख-कारक अवस्था पाहून कसा दीनवदन मजकडे पहात आहे ! ' असें ह्मणत जयश्रीनें प्रतापसिंहास आपल्याजवळ घेतलें.

महाराणा ह्मणाला, " जयश्रीचें सांगणें खरें आहे, कोणत्याही गोष्टीचा

पुरा शोध लागल्याशिवाय दुःख करणें अयोग्य. तूं विचारी स्त्री आहेस. धीर धर— विचार कर. सती जाणें हा पतिव्रता स्त्रियांचा धर्म होय; पण त्यांतही सारासार विचार ह्मणून केलाच पाहिजे. अनूपसिंहाचें सर्व वर्तमान समजेंपर्यंत उगीच घाई करूं नको."

क्रीडेनें बराच विचार केला. जयश्री व महाराणाजी सांगतात तें एकदां तिला खरें वाटे. एकदां आपल्या मनाची समजूत करण्याकरितां तर हे भलतेंच सांगत नसतील कशावरून ? असेंही वाटे. असे अनेक विचार तिच्या मनांत येत. माहाराण्याच्या आज्ञेप्रमाणें सर्व कुलवधू नगरांत निघाल्या. त्यांबरोबर क्रीडाही निघाली. आणि महाराणा व जयश्री-प्रभृति सर्व सरदार व प्रधानमंडल करालादेवीच्या दर्शनास गेले.

प्रकरण १५वें.

वृथा वेदना.

अरवलीपर्वतावर शालतमालप्रभृति वृक्षश्रेणींनें सुशोभित आणि विहंगकुलकूजित एक फार विस्तीर्ण कानन होतें. त्या कमनीय काननांत प्रतापसिंहास कडेवर घेऊन क्रीडा हिंडत होती. ती कुणाला तरी शोधीत होती. कोणाला बरें ती शोधीत असावी ? ज्याला ती शोधीत होती; तें तिला सांपडलें काय ? नाहीं. ह्मणूनच ती उन्मादिनीसारखी अस्थिर व सचकित नयनानें इकडे तिकडे पहात हिंडत होती. क्रीडे ! शोध— शोधलेंस ह्मणजे तुला सांपडेल. झाडाच्या बुंध्याकडे ती पहात आहे. काय पहाते ? काय विचार करते आणि वनदेवतेसारखी हिंडते तरी काय ? काय करील बिचारी ? ' पडले कष्ट शरीर सोशी. ' ती एका वृक्षाच्या बुंध्यावर बसली. तिनें मुलास मांडीवर घेतलें. त्याकडे ती निरखून पाहूं लागली. मातेचें मुखकमल पहातांच प्रताप गालांतल्या-गालांत हंसला. त्याला क्रीडा ह्मणाली, ' बाळ ! तुला काय ? काय समजतें आहे ? तूं हंसतोस, खिदळतोस; पण तुझ्या नशीबीं देवानें काय लिहिलें आहे प्रभु जाणें ! '

क्रीडा ज्या काननांत बसली होती तेथें अकस्मात् जयश्री आला आणि

वात्सल्यानें ह्मणाला, " तूं मला इकडे बोलावलेंस ह्मणून मीं आलों. " क्रीडेचें त्याच्या भाषणाकडे लक्ष्यच नव्हतें. तिची चित्तवृत्ति कोठें परिभ्रमण करीत होती कोणाला माहीत! तिला जयश्री आला कीं नाहीं? त्याला आपण बोलावलें होतें कीं नाहीं? तो आला तर कांहीं बोलला कीं काय? ह्यांतील एकाही गोष्टीची दाद नव्हती. भ्रमिष्ठासारखें ती मनास वाटतील ते चाळे करीत आणि तोंडास येईल तें बडबडत होती. ती पुन्हा मुलास ह्मणाली, " तुझा बाप जिवंत आहे? त्याला तुझी स्मृति तरी होत असेल? तुला कोठें त्यांची स्मृति होते? मला होते; पण त्यांना होत असेल कीं नाहीं? हें तरी कोणी सांगवें? देवा! जर का ते युद्धांत पडले असले तर बाळा, तुझी कायरे दशा होईल? पितृहीन—अनाथ— "

जयश्री मध्येंच म्हणाला, " मी जिवंत असेंपर्यंत प्रताप कधीं अनाथ होणार नाहीं. "

तरीही जयश्रीच्या भाषणाकडे क्रीडेचें लक्ष्यच नव्हतें. ती म्हणाली, ' बाळा! तूं पितृहीन झालास कीं, मातृहीन होशीलरे. तुझ्या पित्याच्या विरहानें तुझी अभागी माता कसची जिवंत रहाते? तुझें कोण लालनपालन करील? या जगांत तुझ्या ममतेचें मग कोणीच नाहीं ना? अरेरे! तुला कोणाच्या प्रतिपालनांत देऊं! कोण तुला ममतेनें सांभाळील? कोण तुझे लाड पुरवील? देवी माते! तूं माझें सौभाग्य हरण केलेंस त्यापेक्षां माझे प्राण नेतीस तर मला मुळींच दुःख झालें नसतें. हजारो नरमुंडांची विस्तीर्णमाला तुझ्या गळ्यांत पडली तरी तुझी समाधानी झाली नाहीं? जयश्रीनें तर असा दगा दिला नसेल? त्यानें आपला दावा साधला नाहींना! असेल; असेंच झालें असेल. नाहीं तर असा घाला कधींच पडला नसता! इतके दिवस बंधूपेक्षांही जास्त प्रेमानें वागून त्यानें असें चांडाळकर्म करावें काय? प्रताप! तुला मीं येथें ठेवून जाणार नाहीं. बरें! माझ्या बरोबर तुला नेईन मग तूं कसा अनाथ होशील!'

जयश्री ह्मणाला ' भलत्याच कल्पना मनांत आणून तूं दुःख करूं नकोस. या निराधार बालकासाठीं तरी तूं वांच. लढाईवर जातांना अनूपसिंहानें मला जें सांगितलें आहे तें मी तुला सांगतों ऐक. '

क्रीडा ध्यानभ्रष्टासारखें जयश्रीकडे पाहून ह्मणाली ' तुह्मीं केव्हां आणि कां इकडे आलां ? त्यांनीं तुह्मांला काय सांगितलें ? लढाईसारख्या आणीबाणीच्यावेळीं, या दुर्भागी अबलेची त्यांस कसची स्मृति होते ! '

जयश्री ह्मणाला, ' युद्धासारखा जरी भयंकर प्रसंग होता तरी ते तुह्मांस विसरले नव्हते. किंवा तुमच्याशिवाय त्यांस दुसरी कोणतीच महत्वाची काळजी नव्हती. त्यांनीं मला सांगितलें, कदाचित् मी युद्धांत पडलों— देव करो आणि असें न होवो— तर तूं माझ्या स्त्रीचा व पुत्राचा सांभाळ कर. '

क्रीडा सविस्मय ह्मणाली, ' मी स्वप्नांत आहें कीं जागृतींत आहे ? मी शुद्धींत आहे ना ? मी वेडी तर झालें नाहीं ? मी ऐकतें हें काय ? कोण मला काय सांगतें हें ? हाय हायरे दैवा ! कपटी मित्राच्या घातकी जाळांत तुह्मीं सांपडलां आणि फशीं पडलां हो ! जयश्री, तुझें पाप—निंद्यकर्म मी समजलें. तुझ्या मनांत माझ्याशीं लग्न करावें असें होतें; पण तुझी ती वासना निष्फळ झाली ह्मणून तूं तो दावा मनांत धरून माझा घात करण्याचा तेव्हांपासूनच प्रयत्न चालविलास. त्यांच्याशीं मित्रत्वानें वागण्याचा ढंग दाखवून तूं माझा केंसानें गळा कापलास. तुझ्या कपटी व मोहकभाषणास भुलून त्यांनीं तुजवर विश्वास ठेविला. अरे ! त्यांच्याशीं असा विश्वासघात करणें तुला चांगलें वाटलें काय ? हेंच सन्मित्राचें लक्षण ? त्यांचा घात होतांच क्रीडा आपली आहे अशा दुष्ट वासनेनें तूं अविवाहित राहिलास ! करीन तर क्रीडेशींच विवाह करीन अशी तूं अंतःकरणांत दृढ प्रतिज्ञाच केली असशील. अरे दुष्टा, असें चांडाळकर्म करायला तुझी मति कशी धजली ? मांगासारखें ज्याचें हृदय असेल त्याच्या हातून देखील असें नीच कर्म होणार नाहीं. नीचा,— अधमा,— निष्ठुर, घातक्या, तुजवर विश्वास ठेवून वागणाऱ्या मित्राचे युक्ति प्रयुक्तीनें प्राण घ्यावयास तुला बिलकुल शरम वाटली नाहीं ? पाषाण हृदया ! तुझ्या मनास दयेचा लवलेश पाझर फुटला नाहीं ? मजसारख्या अबलेवर आग पाखडण्यास— अरे, माझा सर्व प्रकारें घात करण्यास तुला कांहींच लाच वाटली नाहीं.

निर्दया— पापमति ? असें चांडालकर्म करतांना—अशा गरीब धेनूची चरचर मान कापतांना तुला मुळींच संकोच वाटला नाहीं ? जनाची राहो—तिला आग लागो— पण मनाची भीतिही तूं गुंडाळून ठेविलीस ? देवाचें देखील तुला भय वाटलें नाहीं ? अरे निर्लज्जा, अशा दुष्ट कर्माचें फल अक्षय्य नरकवास ! देव सर्वांचीं चांगलीं वाईट कर्में पहातो. त्याला सर्वांचे अंतरंगहेतू देखील समजतात. त्याला तुझ्यासारखा विश्वासघातकी, दगलबाज पातक्यांकरतां निराळीच एखादी भयंकर शिक्षा योजावी लागेल. आग लागली तुझ्या वचनास. कोणी तुला बोलावलें ? तूं आपला कार्यभाग सफल झाला असें समजून माझें काळें तोंड पहावयास आलास ! जा, जा—माझ्यासमोर उभा राहूं नकोस. मी तुझें कृष्णवदन पाहूं इच्छित नाहीं. आमचें आजपर्यंत चांगलें सहाय केलेंस. असा मानभाविपणा पूर्वींच समजता तर असा घात कां होता ? हेंच सन्मित्रलक्षण ? अशा ह्या कसाबाच्या करणीस सन्मित्रलक्षण कोण ह्मणेल ? हा शुद्ध दगा ! ‘ मी लढाईत पडलों तर क्रीडेचें व प्रतापसिंहाचें तूं संरक्षण कर ’ हा तिकडला निरोप सांगतांना तुझ्या जिव्हेचा तुकडा पडला नाहीं कसा ? मीं तुझी स्त्री व्हावें आणि माझ्या लाडक्यानें तुला बाबा ह्मणावें— ह्मणावें कशाला ! मानावें असें त्यांनीं तुला सांगितलें ? हा धंदा ! कोण तुझ्यापासून आमचा प्रतिपाल व्हावा अशी इच्छा करील ? तुझी काय किंमत ?—’

क्रीडेच्या मर्मभेदक भाषणानें जयश्रीचें हृदय दुभंग झालें. इतकेंच नाहीं तर तें भाषण ऐकण्यापेक्षां मरण आलें असतें तर बरें ! असें त्यास दिसलें. तो ह्मणाला, “ तुझ्या मनांत अकल्पित पापाचा उदय कसा झाला ? तूं शुद्धींत आहेस ? कोणाला काय बोलतेस याचें तुला भान आहे ? काय मी हतभाग्य ! माझ्या कमनशीबानें तुझे विचार कसे खोटे केले ! अनूपसिंहाची काय दशा झाली असेल ? या दुःखानें मी दुःखित आहें. त्यांत तूं असें हृदयविदारक —— असें प्राणघातक – मिथ्याभाषण बोलून माझ्या दुःखावर आणखी डागण्या देऊं नकोस. तूं समजतेस तसा मी निष्ठुर, घातकी, दुर्मति किंवा अधम नाहीं. विचार कर — शुद्धींत ये. आपण कोण ? बोलतों काय ? प्रसंग कोणता ? आणि तोही कोणावर ?

हा विचार कर. कोणत्याही गोष्टीचा कोणावर दोषारोप करतांना कांहीं तरी विचार करावा. हें तुला मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. परंतु; पतिविरहानें तुझी बुद्धि गुंग झाली आहे. ह्मणून तुझ्या मुखानें असे शब्द निघाले ? ”

क्रीडेचे नेत्र अग्निसारखे आरक्त दिसूं लागले. भिंवया वक्र झाल्या आणि कर्कश स्वरानें ती ह्मणाली, ‘ जारे—जा; हें ब्रह्मज्ञान—असा तोंडपुजेपणा माझ्या समोर नको. तुझें भाषण ऐकलें कीं मरणप्राय दुःख होतें. मला सारें समजतें. केवळ तुझ्या कृष्णकारस्थानांत सांपडल्यामुळें आमचा सर्व नाश झाला ह्यांत मुळींच शंका नाहीं. माझ्या सौभाग्यमंदिरास तूं आपला स्वार्थ साधेल अशा आशेनें अग्नि लाविलास. तुझ्या मनांत दुर्वासना होती ह्मणून चांडाळा, तूं त्यांस यवनसेनेंत एकटें जाऊं दिलेस; नाहीं तर तूंच गुप्त मारेकरी घालून त्यांस ठार मारले असशील ! व्याघ्रांच्या टोळींत एकटा गज काय करील ? तुझ्या दगाबाजीनें, तुझ्या लुच्चेगिरीनें त्यांचा घात झाला. अरे, भोगाल अशा दुष्टकर्माचें फळ. इह नसलेंच तर परलोकीं खचित भोगाल. देवा, माझे एकदां डोळे झांक. ते गेले. त्यांचा कोणी तरी तपास करतें आहे कां ? नाहीं. ! कां करील ? त्यांचें काय झालें तें सर्व तुला माहीत आहे. पण मला खोटें नाटें सांगून स्वार्थ साधावा हीच तुझी आकांक्षा ! कितीरे तुझें मन पापी ? मेल्या, आतां आपलें अभीष्ट साधेल असें तुला दिसलें होय ? व्यर्थरे व्यर्थ ही आशा. मी जातीची रजपूत आहें. माझें कर्तव्य मी करीन. त्यांत कधींही अंतर होणार नाहीं. माझ्या बाळानें वीरांगनेच्या पोटीं जन्म घेतला आहे. त्याचें संरक्षण करायला तुझ्यासारख्या पाजीची मुळींच गरज नाहीं. त्यांनीं तुझा नीच स्वभाव ओळखूनच स्वर्गाचा मार्ग धरला नसेल कशावरून ? त्यांनीं परलोकीं जावें आणि मीं तुझ्या दुष्ट लालसेप्रमाणें तुझी अर्धांगी ह्मणून या पापमय जगांत रहावें ! छीः छीः ! ! तिकडे माझी वाट पहाणें होत असेल. ’

जयश्री स्वगत ह्मणाला, “ हे अंतर्यामिन् ! माझ्या अंतरांतील भाव तूं जाणत असशील. या जगत्संसारांतील सर्व कृत्यें तुला माहीत आहेत. हे परमेश ! आतां मी काय करून आणि कोणतें सांगून क्रीडेचा संशय

घालवूं ? हे वाक्प्रहार माझ्यासारख्या अल्पमतीला खरोखर असह्य होत. माझ्या बुद्धीनें — शक्तीनें आतां हात टेंकले. प्रभो ! तूं हिच्या मनांत भलतीच कल्पना कशी येऊं दिलीस ? आतां तरी हिला सद्बुद्धि दे. नाहीं तर मला तरी सदुपाय सांग.

क्रीडे ? ताई ! मीं तुला कितीही सांगितलें तरी तुझी समजूत होणार नाहीं. कारण तुझें मन अगदीं भडकून गेलें आहे. तूं शुद्धींत नाहींस. तुझ्या मनास येईल तें तूं बडबडत आहेस. मी तुला हात जोडतों— तुझ्या पायां पडतों. विनाकारण असे वाक्बाण मारूं नकोस. अशा बाणांनीं मनास जीं क्षतें पडतात तीं आमरण जात नाहींत. माझ्यानें हे प्रहार सोसवत नाहींत. तुला शंका असेल तर ही तरवार घे आणि बेधक माझी मान काप—अथवा तुला परीक्षा असेल तर माझें हृदय याच तरवारीनें चिरून पहा. पण असें दुःख देऊं नकोस. माझा अंत पहाणें तुला अयोग्य. ताई ! निष्पाप मानसास उगाच पातकानलांत दग्ध करणें तुझ्यासारख्या विचारी स्त्रीस योग्य नव्हे. असे प्राणहारक शब्द ऐकण्यापूर्वींच मला मरण येतें तर फार चांगलें होतें. ”

क्रीडा ह्मणाली, ' मी चांगली शुद्धींत आहें. मला सर्व समजतें. तूं कां मरणास सिद्ध होतोस ? चिरंजीव हो ! देव तुला उदंड आयुष्य देवो. छे ! छे ! असा परस्त्रीलंपट पुरुष मेला तरी चांगलेंच. पण तूं खुशाल वांचच ! ह्मणजे ' जगांत तुझ्या मित्रत्वकीर्तीचा झेंडा फडकेल ! मित्रास दगलबाजीनें ठार मारून त्याच्या अनाथ स्त्रीची इच्छा करणारा अधमाधम जयश्री आहे असें सर्वांकडून ह्मणवून घे. काय मेला माझा सांभाळ करून माझ्या बाळाचा बाप बनणार ! अरे, ते स्वर्गस्थ झाले असें समजतांच मी मरेन. मी मेलें कीं, माझा हा लाडका बालक निराधार होऊन माझ्या मागून येईल. त्यानें वीरमातेच्या उदरीं जन्म घेतला आहे. आणि मीही वीरांगना आहें. समजलास ? नाहीं तर जगत्पिता आणि जगज्जननी माझ्या पुत्राचें संरक्षण करणारी समर्थ आहेत. अशा हलकटाच्या प्रतिपालाची त्याला मुळींच जरूर नाहीं. तुझ्यासारख्या पापी प्राण्याच्या पालनांत त्याला ठेविलें तर तो

तत्काळ बिघडेल. जा– तूं जा. तुझी आह्मांला अगर्दी जरूर नाहीं. तूं पुष्कळ दिवस वांच आणि पापमय जगतांत आपली पापलालसा पूर्ण कर. पण ध्यानांत ठेव. मर्कटा ! याद राख. ही क्रीडा– ही सती— ही पतिप्राणा क्रीडा— ही पतिव्रता क्रीडा आहे. हिला या विनाशी जगांत पतीशिवाय दुसरें कांहींच प्रिय नाहीं. आजपर्यंत हिनें पतीशिवाय इतर सर्व पुरुषांस पितापितृवत् मानिलें. तूर्त ही तसेंच मानिते आणि पुढेंही तसेंच मानील. माझा प्रियकर—माझा जीवनाधार–माझ्या प्राणाचा प्राण इहलोकीं नाहीं–माझें कपाळ फुटलें— माझें सौभाग्य नष्ट झालें असें जेव्हां मला खात्रीपूर्वक समजेल तेव्हां मी प्राण ठेवणार नाहीं. तुला आपली पापवासना तृप्त होईल अशी आशा असेल; पण छीः ती कधीं सफल होणार नाहीं. '

जयश्री ह्मणाला, ' काय असंबद्ध भाषण हें ? क्रीडे ! मी तुझे पतीचा बंधु तसाच तुझाही बंधु आहे. असें हजार वेळ सांगतों. शपथ वाहून सांगतों. तूं भलतीच वटवट करूं नकोस. '

क्रीडा ह्मणाली, ' जगदीश आमचा रक्षक आहे. प्रभु अनाथ, अनाथिनींचा संरक्षक आहे. मी अशा माकडाची बिलकुल पर्वा करीत नाहीं. माझ्या प्रतापास घेऊन मी समरभूमीवर जाईन. तेथील प्रेतन् प्रेत पाहीन. त्यांचें नांव' घेऊन मरेपर्यंत ओरडेन. त्यांना धुगधुगी असली तरी ते माझा शब्द तेव्हांच ओळखतील. त्यांनीं मजकडे पाहिलें कीं पुरे. तशीच मी त्यांना घेऊन येईन आणि सहगमन करीन. अर्धांग टाकून ते कधीं स्वर्गीं जाणार नाहींत. दुष्टांनीं त्यांना पकडून नेलें अथवा त्यांचें प्रेत घेऊन ते गेले असें समजलें तर बाळ ! तुला घेऊन मी त्यांच्या छावणींत जाईन. ते कितीही दुष्ट असले तरी मनुष्य आहेत. तुझ्यासारखे अनाथ बालक पित्याच्या नांवानें टाहो फोडीत आहे असें पहातांच त्यांस कांहीं तरी करुणा येईल. माझ्या पतीकरितां मी राक्षसांच्या–प्रत्यक्ष काळाच्या तोंडांत उडी टाकायला भिणार नाहीं ! मग यवनांच्या छावणींत मला भीति कसली ? एखादी साध्वी स्त्री, स्वपतीच्या शोधास, किंकाळ्या फोडीत— रडत— आक्रोश करीत आली, तर तिला कोण हांकून लावील ? स्वपित्यास पहाण्याकरतां

'एखादें सोन्यासारखें गोजिरवाणें बाळ आलें तर त्याच्या तोंडांत मारून कोणता चांडाळ त्याला हुसकून लावील ? ते यवन झाले ह्मणून काय झालें ? ते तुझ्यासारखे पापीष्ट नसतील. ते कधीं अत्याचार करणार नाहींत. वैधव्य प्राप्त झालेल्या अबला स्त्रीस पतिप्रेताच्या शोधार्थ बालकास कडेवर घेऊन आक्रोश करीत जाण्यास त्यांच्यापैकीं कोणीही मना करणार नाहींत. चल— बाळ आपण जाऊं. या मेल्याचें तोंड पहा कसें काळें ठिक्कर पडलें आहे ? नको, त्याचें मुखावलोकनही नको. झालें तितके पुरे.' असें ह्मणून ती तेथून निघाली आणि समरांगण क्षेत्रांत आली.

जयश्री आपल्याशींच ह्मणूं लागला, ' पंचमहाभूतांनो ? माझे देहांतून तुह्मीं आपआपले अंश अजून कां काढून घेतले नाहींत ? वीज पडून किंवा वज्रप्रहार होऊन या देहाची राखरांगोळी कां झाली नाहीं ? भूमिमातेनें आपला भयंकर आ पसरून मला गडप कां केलें नाहीं. शिव शिव ! आणखी काय वीज पडणार ? आणखी काय वज्रप्रहार होणार ? झालें हें काय थोडें ? मग मी जिवंत कसा राहिलों ? काळें ठिक्कर तोंड ! आग ! आग ! इतका वणवा पेटला तरी मी जळून मेलों नाहीं ? प्रलयकाळचा झंजावायु सुटून तो या देहास कोठच्या कोठें दडपून कां टाकीत नाहीं ? सप्तसमुद्रही मला भितात ? पंचमहाभूतांची या पापी देहापुढें मात्रा चालत नाहीं ! मग मी निरपराधी कसा ? कसा मी निष्कलंक ? निःसंशय पातकी—महान् पातकी. कसा वांचलास काळतोंड्या ? तुला तेव्हांच मृत्यु आला नाहीं कसा ? मृत्यूही माझ्या पातकास भितो ? धिःकार ! हजार वेळ धिःकार ! ! ! क्रीडे ! पतिविरहानें तूं वेडी झाली आहेस. जर माझें हृदय फोडून दाखवितां आलें असतें तर मी किती शुद्ध आहें तें तेव्हाच दाखविलें असतें. पण काय करूं ? तूं माझें मन ओळखलें नाहींस. ओळखतीस तर अशीं कुत्सित भाषणें बोलली नसतीस. तुझ्या मनांत अशा मिथ्या कल्पनांचा संचार होताच ना. असो, झालें तें झालें. आतां त्याचें दुःख करून काय उपयोग ? प्रभो ! जी गोष्ट माझ्या स्वप्नांतही आलेली नाहीं ती तूं आज मला प्रत्यक्ष पहावयास लाविलीस. मी निष्कलंक आहें. मी खात्रीनें सांगेन कीं, मी निष्पाप आहें. माझें कर्तव्य करणें मला भाग आहे. तूं विपत्तींत पडणार

नाहींस अशी तजवीज मला प्रथम केली पाहिजे. अनूपसिंहाचा शोध लाविला पाहिजे. तो जिवंत आहे इतकें समजलें कीं, मी त्याला काळाच्याही तावडींतन सोडवीन–त्याकरतां प्राण खर्ची घालावे लागले तरी बेहेतर. प्राण आज ना उद्यां जाणारच. ते मित्राकारणें घालविणें महत् पुण्य. माझें निःस्वार्थ प्रेम असेल तर मी ह्मणतों असेंच करीन. जातों मी. रजपूत वीरांनो ! माझे हातून अपूर्ण राहिलेली देशसेवा तुह्मीं तडीस न्या. आतां हें काळतोंड तुमच्या दृष्टीस पडणार नाहीं. वीरांच्या अंगांतील रक्त खवळून टाकणाऱ्या रणवाद्यांनो ! तुह्मीं दाही दिशा एक करून टाकणारा किंवा भूगोल फोडून टाकणारा घनघोर ध्वनि केला तरी त्याचा माझ्या अंतःकरणावर कांहींच परिणाम होणार नाहीं. इंद्राच्या आकाशपाताळ एक करून टाकणाऱ्या गडगडाटाशीं स्पर्धा करणाऱ्या उल्हाद यंत्रांनो ! तुमचा प्रताप आतां माझ्या दृष्टीस पडणार नाहीं. घोर कल्पना ! प्रचंड वादळ ! विचित्र दैवयोग ! ! ! माझ्या जन्मभूमीस मी आतां शेवटचा प्रणाम करतों. माझ्या अपराधाची सर्वांनीं क्षमा करावी. आत्मघात करतों. आतां हें काळें तोंड जमास दाखवीत नाहीं. अपकीर्तीपेक्षां आत्मघाताचें पातक विशेष नाहीं. ”

जयश्रीस देहभान नाहीसें झालें. क्रोधानें तो फारच संतप्त झाला. आपण कोण आणि करतों काय ? ह्याचेंही त्याला भान नव्हतें. तो मनःपूत बडबडत सैरावैरा हिंडत होता. तितक्यांत धापा टाकीत उमरावसिंह तेथें आला, आणि सांगूं लागला. ‘ महाराण्यांनीं मला सांगितल्याप्रमाणें मी फकिराचा वेष घेऊन हेमूच्या छावणीत गेलों. ’

जयश्री ह्मणाला, “ फार चांगलें. तुह्मांला वाटेल तिकडे जा आणि काय पाहिजे तें करा ”

उमरावसिंह ह्मणाला, “ तेथें आनंदाचें वर्तमान ऐकलें. पूर्वपुण्याई सबळ खरी. ”

जयश्रीनें सांगितलें, “ अत्यानंद, आणि पूर्वपुण्याईही सबल खरी. ”

उमरावसिंह ह्मणाला, ‘ नाहीं का आनंद ? ’

जयश्रीनें सांगितलें, ‘ कावळे कुत्रे आणि गिधाडें यांस आनंद ! ’

उमरावसिंह ह्मणाला, ‘ समरभूमीवर त्यांस मोठी मेजवानी. ’

जयश्रीनें सांगितलें, ' इतक्यांतच त्यांस घाई झाली आणि त्यांनीं अधाशिपणा आरंभिला ? इतकी घाई कां ? हा मी आलों पहा. '

उमरावसिंह ह्मणाला, ' वाजवूं तर लढाईचें शिंग ? '

जयश्री ह्मणाला, ' लढाई कशाला ? तें काम तूंच सहज करशील. '

उमरावसिंह तरवार उपसून ह्मणाला, ' आज्ञेची खोटी कीं, तयारी. '

जयश्री मान पुढें करून ह्मणाला, ' हं आटप झटपट.

उमराव सखेदाश्चर्यानें विचारूं लागला. ' महाराज हें काय ! '

जयश्रीनें सांगितलें ' पूर्वपुण्याई ' !

उमरावसिंह ह्मणाला, ' मीं अनूपसिंहाविषयीं सांगत आहें '.

जयश्री ह्मणाला, ' तो इहलोकीं नामशेष आहे इतकेंच. '

उमरावसिंह ह्मणाला, ' नाहीं महाराज. '

जयश्रीनें विचारलें, ' नामशेष देखील नाहीं ? अत्याश्चर्य ! '

उमरावसिंह ह्मणाला, त्यांस यवनांनीं कैद केलें आहे. '

जयश्री ह्मणाला, ' कोणास ? '

उमरावसिंह ह्मणाला, ' अनूपसिंह सेनापतीस. '

जयश्रीनें विचारलें, ' हाय हाय ! मेल्यावर त्या चांडाळांनीं माझ्या मित्रास कैद केलें ? थांबा घातक्यांनो ? '

उमरावसिंह ह्मणाला, ' ते मेले नाहींत ! '

जयश्रीनें सांगितलें, ' आतां मीं त्यास ठार मारतों. '

उमरावसिंह विचारूं लागला, ' कोणास ? '

जयश्रीनें सांगितलें, ' यवनांस ! ते पापमति दुष्ट काय समजले आहेत ? आतां त्यांच्या नरडीचा घोट घेईन. एकाक्षणांत त्यांचा नायनाट करीन. '

उमरावसिंह ह्मणाला, ' मी अनूपसिंह सेनापतींविषयीं सांगत आहें. आणि तुह्मीं यवनाविषयीं काय बोलतां ? '

जयश्री ह्मणाला, ' काय ? तूं काय सांगतोस ? '

उमरावसिंह ह्मणाला, ' नीट ऐका. असें काय करतां ? मला महाराजांनीं अनूपसिंह सेनापतींचा शोध काढण्यास पाठविलें होतें. ते जिवंत आहेत. हें सांगण्याकरतां मी इकडे आलों. '

जयश्री ह्मणाला, ' इहलोकीं, परलोकीं, कीं कीर्तिरूपानें ? '

उमरावसिंह ह्मणाला, ' त्यांस यवनांनीं कैद करून ठेविलें आहे. तें इहलोकींच जिवंत आहेत. '

जयश्री ह्मणाला, ' कोणापुढें काय सांगतां ? मला ओळखतां ? मी कोण ? तुह्मीं शुद्धींत आहां ? '

उमरावसिंह ह्मणाला, ' तुमच्या पायांची शपथ, अनूपसिंह सेनापती जिवंत आहेत. युद्ध करतां करतां त्यांस मूर्छा आली तेव्हां यवनांनीं त्यांस पकडून आपल्या छावणींत नेलें. तेथें ते सावध झाले आणि जिवंत आहेत. मी आतांच तिकडून आलों. '

जयश्री ह्मणाला, " अं: ! तर मी वायूला मागें टाकून जाईन. आकाश पाताळ एक करीन. माझ्या मित्राला सोडवीन. शाबास उमरावसिंह ! तुह्मीं आनंदाचें वर्तमान आणलें. हें घ्या बक्षीस. (हातांतील कडें काढून देतो.) मी माझ्या मित्राचा उद्धार करीन तेव्हां क्रीडे, तुझी खात्री होईल कीं, माझा स्नेह सकपट होता कीं, निष्कपट होता. अनूपसिंहाची मुक्तता करीन तेंव्हांच तुला तोंड दाखवीन. तेव्हांच माझें प्रेम निःस्वार्थ होतें असें तुला दिसेल. तो जिवंत आहे तर कोट्यावधि यवनांस कस्पटाप्रमाणें उडवून मी हरतऱ्हेनें त्यास सोडवून आणीन. बरें, उमरावसिंह ! क्रीडा तुह्मांला कोठें दिसली काय ? "

उमरावसिंह ह्मणाला, ' ती मुलास कडेवर घेऊन रणक्षेत्राकडे गेली असें वाटेंत मला समजलें. '

जयश्री ह्मणाला, ' आतांच मी जातों. पण मला एक फकिराचा वेष पाहिजे होता. '

उमरावसिंह ह्मणाला, ' मीही त्याच वेषानें गेलों होतो. मजबरोबर या. वेष तयार आहे. '

जयश्री ह्मणला, ' चला, लौकर चला. महाराण्यास तुह्मीं हें वृत्त कळवा. '

उमरावसिंह ह्मणाला, ' जशी आज्ञा. '

प्रकरण १६ वें.

दुःखांत सुख.

यवनसेनापति हेमू आपल्या तंबूंत स्वस्थ बसला होता. त्याच्या मुख-श्रीवर उमेदीचें कोणतेंच चिन्ह दिसत नव्हतें. तो ज्या उमेदीनें आला ती केवळ रसातळास गेल्यामुळें त्याला गंभीर चिंतेनें आलिंगन देणें स्वभाविकच होतें. आपण रजपुतांस जिंकूं, चितोड सर करूं, दिल्लीच्या तख्ताच्या उपभोग घेऊं; अशी जी त्याची उत्कटेच्छा होती ती सफाई नाहींशी झाल्यामुळें तो केवळ औदासिन्यानें घेरला. तो मनांत ह्मणत होता, 'आजपर्यंत रजपुत लोकांच्या नशिबाचा तारा जसा चमकत आहे; तसाच या लढाईत देखील जयलाभ झाल्यामुळें तो विशेष चमकणें साह-जिक आहे. फिकीर नाहीं. कांहीं होवो. काफर रजपुतांचा सर्व नाश करीन—त्यांचा फन्ना उडवीन. त्यांच्या राज्याची धूळधाण करीन. नाना-तऱ्हेच्या पीडा देऊन त्यांस हा लोक नकोसा करीन तर मींच करीन. या लढा-ईत त्यांनीं जय मिळविला ह्मणून काय झालें ? आपण हिंमत धरूं—पुन्हा जय्यत तयारी करूं. आणखी फौजफांटा व दारुगोळा जमा करूं आणि काफर हें नांव जगांत नाहीं असें करूं. काफर ह्मणजे कःपदार्थ ! त्यांची मला बिलकुल पर्वा वाटत नाहीं. आज अपजय झाला. उद्यां जय मिळेल. जयापजयाचा नियम नाहीं. पाहून घेऊं.' अशा मनोराज्यांत तो तरंगत होता. त्यानें आपले दोन्ही नेत्र मिटले होते. इतक्यांत त्यास कोणी तरी तंबूत येत असावें असा भास झाला. त्याबरोबर त्यानें नेत्र उघडून पाहिलें तों सौंदर्यवती सुंदरी इला त्याच्या दृष्टीस पडली. तिला पहातांच, आश्चर्यतेनें तो ह्मणाला, 'देवडीवाला कोठें आहे ? त्यानें कोणाच्या हुकमानें तुला आंत येऊं दिलें ? काय ही अंदाधुंदी ! काय बेअदब !'

सुंदरीही डौलानें ह्मणाली, 'या अकस्मित लढाईत तुमचा पराजय झाला त्या सरशींच मीही तुह्मांला नकोशारखी दिसूं लागलें ? तुमच्या देवडीवाल्यानें आपलें कर्तव्य केलें बरें कां ! आणि तो भिकार खीदम-तीच्या योग्यतेचा मनुष्य. मला परवानगी घायला पाहिजे कशाला !

पण आतां मला परवानगी पाहिजे असें झालें ना ? आजच मी तुह्मांला परकी झालें ? देवडीवाला परवानगी न देता तर मी कोठें त्याला जुमानणार होतें ? देवडीवाल्याची आणि पहारेकऱ्याची मला इतकी प्रतिष्ठा नको. काय मेली फुकटची घमेंडी ! माझा कंटाळा आला असेल तर मी जातें. ज्याचें करावें बरें; तो ह्मणतो माझेंच खरें. त्यांतलाच हा प्रकार. तुह्मांला त्रास देण्याचा माझा बिलकुल उद्देश नव्हता. येण्याचें कारण ऐकलें असतें ह्मणजे असें कधीं विचारलें नसतें. पण तुमच्या उतावीळ स्वभावास तुह्मी तरी काय कराल ? तुमचाही नाइलाज आणि माझाही निरुपाय. "

हेमू ह्मणाला " मंगलाचरण तर झालेंच. शुभ शकूनच हा ! असो इकडे येण्याचा हेतु ? "

इला ह्मणाली, ' मी होय ? जावें ह्मटलें सहज आणि पहावें कीं, लढाईंत पराभूत झालेले आपण कोणत्या गहनविचारांत गर्क आहां तें. पण नाहीं. आपण खुष मिजाशींत नाहीं. केवळ उदासीनतेनें तुह्मांवर आपला पूर्ण अधिकार बसविला आहे. आणि तेंही खरेंच. '

हेमू ह्मणाला, ' दुस्मानचा जय झाला. आमची इज्जत गेली. आमची बेअब्रु झाली. लोकांत तोंड दाखविण्यास आह्मांस मार्ग राहिला नाहीं ! आमचें जबर नुकसान झालें. आतां तरी तुझें समाधान झालें ? एकट्या अनूपसिंहानें आमचे हजारो लोक पाडाव केले. आफसोस ! आफसोस !! दुःखानें व त्वेषानें माझें काळीज जळतें आहे. काय करणार ? '

सुंदरी ह्मणाली, ' तुह्मीं खुशींत असाल असें मलाही वाटलें नव्हतें. पण न जाणो, ह्मटलें पाहूं तर खरें. भयंकर तुफान झाल्यानंतर एकदां जशी शांति फैलावते त्याप्रमाणें आपणही शांत व गंभीरभाव धारण केला असेल असें मला वाटलें. कोणाच्याही नशिबीं एकसारखें सुख किंवा दुःखच लिहिलें असतें असें नाहीं. कांहीं दिवस सुखाचे तर कांहीं दुःखाचे दिवस येतात आणि जातात. चढती आणि पडती ही वस्तुमात्राच्या मागें लागलेलीच आहे. लढाई झाली कीं, त्यांत हार आणि जीत ही असतेंच. एका पक्षाचा जय झाला तर दुसऱ्याचा पराजय होतोच. पण पराभूत झालेला पक्ष उदास होऊन स्वस्थ राहील तर तो आपली भावि स्थिती

कशी सुधारील ? तो जर कां हातपाय पांघरून दैवास बोल लावीत स्वस्थ बसला तर समजावें, कीं, आतां हा विजयी होईल ही आशा व्यर्थ. पराजय झाला तरी हिंमत सोडणें वीरपुरुषास योग्य नव्हे. पुनःपुन्हा प्रयत्न करून जय मिळविणें यांतच खरा पुरुषार्थ. लढवय्ये लोकांनीं आपल्या विजयाच्या विचारांत व तत्प्रीत्यर्थ उद्योग करण्यांत निमग्न राहिलेंच पाहिजे. ’

हेमू ह्मणाला, ‘ आमचे देखील तसेच विचार आहेत. आमचे लोक पराभवानें कधीं नाउमेद होत नाहींत. तोडलेला वृक्ष जसा जोमानें पुन्हा वाढतो किंवा पेटलेली मशाल जशी खालीं धरली तरी तिच्या ज्वाला वरतीच जातात; तशीच आह्मां लोकांची स्थिति आहे. पराजय झाला तरी नवीन हुरूप ठेवलेलाच. ’

सुंदरी आश्चर्यानें ह्मणाली, ‘ तशी उत्साहवृत्ति असती तर तुह्मीं केव्हांच दिल्लीतख्तनशीन झालां असतां. माझ्यामतें तुह्मां लोकांचा जसा पराभव होईल तसे तुह्मीं खचत जातां ! आणि असेच वारंवार पराजय होत गेले तर आपल्या लोकांस विजय मिळेल किंवा नाहीं हा वानवाच ! ’

हेमू ह्मणाला, ‘ अनूपसिंह जिवंत असेपर्यंत दिल्लीच्या तख्ताची आशा व्यर्थच आहे. ’

इलासुंदरी ह्मणाली, ‘ प्रत्येकवेळीं तुह्मी अनूपसिंहाची प्रतिष्ठा सांगतां, त्याच्यासारखा तरवारबहाद्दर आणि अलोट छातीचा वीर पुरुष नाहीं असें ह्मणतां, त्याच्या हिंमतीची आपण वारंवार तारीफ करतां, त्याला एकदां पहावें ह्मणूनच मी इकडे आलें. आपल्या लोकांनीं त्याला पकडून आणलें आहे हें आनंदाचें वर्तमान तुह्मांस प्रथम सांगावें ह्मणन उमेदीनें मी इकडे आलें तों तुह्मींच मजवर हत्यार उपसलें. अनूपसिंहास पकडून आणलें असें आनंदकारक वर्तमान ऐकून आपलें परितप्तहृदय कांहींतरी समाधान पावेल अशी मला फार आशा आहे. ’

हेमू आनंदभरित होऊन आश्चर्यानें विचारूं लागला ‘ काय सांगितलेंस तूं ? अनूप आमचा कैदी ? असंभाव्य ! थट्टा नव्हेना ही ? खरेंच काय ? ’

सुंदरी ह्मणाली, ' खोटें सांगून मला काय मिळणार ? केव्हां थट्टा करावी ? हें मला समजतें. मी अशी बोलण्यानें दूध पीत नाहीं. खरो-खर पकडलें हो त्याला ! इतक्यांत तो येथें यावा देखील. '

हेमू ह्मणाला, ' सुंदरी ? तुझ्या तोंडानें अशी खुशखबर, अशी संतोष-प्रद गोष्ट ऐकून मला जो आनंद झाला आहे तो दिल्लीची गादी मिळाली तरी होणार नाहीं. आज अनूप कैदी ! माझा बंदीवान ! ! काय मी ऐकतों हें ! अनूप, तूं माझे हातीं सांपडलास ? बस्स झालें. रजपुतांचे बहादुरीची आज अखेरी झाली. त्यांचा कीर्तिसूर्य मावळला. आजचा पराजय मी हजार जयांपेक्षांही थोर मानीन ! आतां हां हां ह्मणतां चितोड घेईन, आतां माझ्या हातचें काम–आतां एका लढाईंत सर्वांचा फडशा पाडीन. काफर ! पहातां पहातां मीं तुमचें सर्वस्व लुटीन. सांभाळा. आमच्या लोकांनीं अनूपसिंहास ताबडतोब इकडे कां आणलें नाहीं ? काय सुस्ती ? काय हा गाफीलपणा ? मी तुझी प्रारंभीं बेपर्वा केली त्याबद्दल मनापासून क्षमा मागतों. ? '

इला गंभीरतेनें ह्मणाली, ' त्यांत क्षमा कसची ? माझें कर्तव्य मीं केलें. परंतु आतांचें तुमचें भाषण ऐकून मला फार आश्चर्य वाटतें. माझें मन संतप्त होतें आणि मला फार लज्जाही वाटते. अहो, ज्याचे शौर्यप्रभावानें तुमचें हृदय जळतें, असा जो वीरश्रेष्ठ तो तुमचा कैदी झालेला पाहून तुह्मांस काय वाटतें ? त्याला तशा स्थितींत पहावयास तुह्मीं इतके उतावीळ कां झालां ? '

हेमूनें सुंदरीच्या भाषणाकडे अलक्ष्य केलें आणि द्वाररक्षकास हाक मारून सांगितलें, ' तूं ताबडतोड जा आणि आमच्या लोकांनीं अनूपसिंह या नांवाचा एक रजपूत कैद करून आणला आहे त्यास लौकर दरबारी तंबूंत घेऊन ये. '

' हुकूम ' ह्मणून द्वाररक्षक तंबूबाहेर गेला.

सुंदरी ह्मणाली, ' तुह्मीं त्या रजपुतास काय शिक्षा द्यावी असें मनांत आणिलें आहे ? '

हेमू ह्मणाला, ' कत्तल ! आह्मीं त्याला कैद केलें आहे. त्याला ठार मार-ण्याचा आह्मांस अधिकार आहे. त्याचें आतां आह्मीं काय पाहिजे तें

करूं. पाहिजे तर ठार मारूं नाहींतर फांशीं देऊं. किंवा हाल हाल करून मारूं. काय बहार झाली ! किती असंभाव्य गोष्ट घडली. ”

इंदा ह्मणाली, “ काय शरमेची गोष्ट ही ! धिःकार असो अशा विचाराला. लोक काय ह्मणतील हा तरी विचार करा. दंड घेऊन त्याला सोडा किंवा तुमच्या अंगीं पौरुष असेल तर त्याचा गौरव करून त्याला सोडून द्या. हेंच तुह्मांला भूषणास्पद होईल. ”

हेमू उद्दामपणानें ह्मणाला, “ लोकांशीं आह्मांला काय करायचें आहे ? त्यांच्या ह्मणण्याशीं आपला काय संबंध ? कोण त्यांचे ह्मणण्याचा विचार करतो ? कोणाला त्याची पर्वा आहे ? आजपर्यंत लोकांनीं कोणाला चांगलें ह्मटलें आहे ? चांगलें केलें तरी वाईट आणि वाईट केलें तरी तेंच ! कीर्ति काय आणि अपकीर्ति काय ? ज्यांत आपला मतलब साधेल तेंच खरें. एकदां त्याची कतल करण्याचा निश्चय ठरला तो कांहीं झालें तरी बदलणार नाहीं. ”

सुंदरी ह्मणाली, ‘ ठीक आहे. तुह्मीं मुखत्यार आहां. पाहिजे तें कराल; पण मी खात्रीनें सांगतें कीं, तुमची मजविषयीं प्रेमबुद्धि असेल; तुह्मांस मी पाहिजे असेन; तुह्मीं माझें ऐकणार असाल तर माझें सांगणें ऐका. मजवर उपकार करा. कीर्ति अपकीर्तिची चाड तुमच्यासारखी मीं अजून सोडिली नाहीं. जी तुमची कीर्ति तीच माझी असें मी समजतें. अपकीर्तीच्या जिण्यापेक्षां मेलेलें बरें. इतकेंही असून जर कां त्या रजपुताच्या रक्ताचा एक थेंब जमिनीवर पडतांना मीं पाहिलें. तर कोणाची भीडमुर्वत ठेवणार नाहीं. मी प्राणत्याग करीन ! बोलूनचालून मी तापट बायको. माझा राग माझ्या स्वाधीन नसतो हें तुह्मांला माहीत आहेच. मग मी ती नव्हे. समजलें ? ’

हेमू ह्मणाला, “ अनूप मेला काय आणि जगला काय ? तूं कां इतकी जिवावर उदार होतेस ? तुझी त्याची जान नाहीं पैछान नाहीं. त्याला तूं कधीं पाहिलें नाहींस कांहीं नाहीं. तो जिवंत असला तर तुझा फायदा नाहीं; मेला तर नुकसानही नाहीं. उगांच उचलली जीभ आणि लावली टाळ्याला ह्मणजे कोणी शहाणें ह्मणतें असें नाहीं. आपला राग स्वाधीन ठेवला पाहिजे. राजकारस्थानाच्या गोष्टींत तुह्मां बायकांना काय सम-

जतें ? सारासार विचार करून न्यायानें जें योग्य ठरेल तेंच आम्हीं करूं."

त्यावर इला म्हणाली, "त्याचा व माझा कांहीं संबंध नाहीं हें खरें. परंतु, ज्या कृत्यांत तुमचा दुर्लौकिक होणार नाहीं; ज्यांत तुमची अपकीर्ति होणार नाहीं अशीं कृत्यें तुमच्या हातून झालीं तरच त्यांत माझें समाधान. तुमचा लौकिक तोच माझा. तुमची किर्ति तीच माझी. असें जोंवर मी समजतें तोंवर योग्य दिसेल तें सांगणें मला भाग आहे. ऐकणें किंवा न ऐकणें तुमच्या मर्जीवर आहे. लोकांत तुमचा दुर्लौकिक झालेला मला कधीं सहन होणार नाहीं आणि तसा तुम्हीं प्रसंग आणला तर माझीही मी मुखत्यार आहें. देव करो आणि असा कठीण प्रसंग न येवो आणि कमनशिबानें आलाच तर मी कोणत्या तऱ्हेची मानी स्त्री आहें हें दिसेलच."

हेमू म्हणाला, 'माझें शील कसें आहे ? हेंही तुला समजेल. जो माझें अनहित करतो; त्या दुस्मानचा सूड उगविल्याशिवाय, त्याच्या नरडीचा घोट घेतल्याशिवाय-माझें मन थंड होत नाहीं.' असें म्हणत तो गांभिर्यानें उठतांना इलेस म्हणाला, 'त्याचा इनसाफ पहावा अशी तुझी इच्छा असेल तर चल.'

सुंदरी म्हणाली, 'फिकीर नाहीं, चला. तुमचा न्यायीपणा तरी मला डोळेभर पाहूंद्या.'

प्रकरण १७ वें,

अनूपसिंहाचा न्याय.

दरबारच्या मंडपांत एक समुच्चकाष्ठमंचक ठेविलेला होता. त्यावर लाल मखमलीची गादी हंतरली होती. त्या गादीवर शुभ्र असा सरपोस होता. त्यावर एक मोठा तक्या ठेविलेला होता. दोन बाजूंस दोन लोड होत्या. गादीपुढें अत्तरदान, पानदान, फुलदान व कलमदान वगैरे यथास्थानीं ठेविलें होतें. तक्याच्या मागें दोन बाजूंस दोन रूपवान तरुण हातांत मोरचेलें घेऊन उभे होते. मंचकाच्या दोन्ही बाजूंस अमात्य,

सेनानायक व पारिषदगण होता. मंडपाच्या द्वारापासून सेनापतीच्या मंचकापर्यंत एक गालीचा पसरला होता. त्याच्या चित्रविचित्र रंगाकडे पहाणांच मनाचें समाधान होत असे. त्या नरमगालिचाचे दोन्ही बाजूंस हत्यारबंद सैनिकलोक उभे होते. मंडपाच्या द्वारभागा नकीब, चोपदार, बरकंदाज व प्रहरीप्रभृति भृत्यवर्ग, सोनेरी व रुपेरी काठ्या, वल्लभ व तरवारी, पेशकवज इ० आयुधें सज्ज करून नवाबी थाटमाटाचा रिसाला सेनापति हेमूची मार्गप्रतीक्षा करीत होता. जो पहावा तो उदास दिसे. जो पहावा तो सचकित नयनानें सेनापतीची आतां काय आज्ञा होते ? लढाई तहकूब होते कीं, तह करतात ? नवीन काय बेतबात ठरतात ? अशाप्रकारच्या अनेक विचारांनीं सर्व सभासदांचीं मनें व्यग्र झालेलीं होतीं. दरबारी तंबूंतील कोणाच्याचे मुखश्रीवर वीरश्री चमकत नव्हती. नाहींतर यवनांचा दरबार ह्मटला ह्मणजे त्यांत हजार तऱ्हेचीं लफडीं असायचीं. परंतु, त्यापैकीं एकही चैनीची किंवा आरामाची भानगड मुळींच दिसत नव्हती. जिकडे पहावें तिकडे औदासिन्य.

हेमू दरबारी तंबूच्या द्वारांत आला. त्याबरोबर सैनिकवीरांनीं तरवारी उचलून त्यास सलाम केला. चोपदार पुकारूं लागले. मंडपांत जितके लोक बसले होते; तितके आपलें काम जेथच्या तेथें ठेवून उभे राहिले. हेमू आपल्या आसनावर बसला. त्याच्याजवळच दुसऱ्या एका सुशोभित आसनावर सुंदरी इला बसली. सर्व लोकांनीं हेमूस वंदन केलें. तेव्हां भालदारानें सर्वांस आपआपल्या जागीं आदबीनें बसा असें सांगितलें. जिकडे तिकडे स्थिरस्थावरता झाली. इतक्यांत कैद केलेल्या अनूपसिंहास घेऊन कित्येक शिपाई तेथें आले. तेव्हां निंदाद्योतक शब्दानें हेमू ह्मणाला, ' आज रजपुतांच्या सेनानायकास आमच्या लोकांनीं कैद करून आणिलें; ह्यामुळें ही जागा पवित्र झाली असें मी समजतों. अनूप ! तुमच्या आमच्या मुलाखतीस फार दिवस झालें. तुमची तबियत ठीक आहे ना ? आह्मांला वाटतें कीं, तुह्मीं तनदुरुस्त आहां; नाहींतर लढाईसारख्या फार जोखमीच्या कामांवर आपली नेमणूक झालेली; तेव्हां त्या मानानें तुमच्या मागें फार काळजी असणें स्वाभाविक आहे. परंतु तसें कांहींच दिसत नाहीं. '

वीर गंभीरतेनें अनूपसिंह ह्मणाला, ' मीं तनदुरुस्त आहें किंवा नाहीं, स्थिर आहें कीं चंचल आहें, आणि कोणत्याही प्रकारें माझी काय दशा आहे, या गोष्टीचा विचार करण्याचें तुह्मांला कांहींच कारण नाहीं. अथवा त्याशीं तुमच्या हितानहिताचा संबंध आहे असाही अर्थ नाहीं. युद्धासारख्या किंवा त्याहूनही भयंकर अशा हजारो चिंता असल्या तरी मी खात्रीनें सांगतों कीं, ज्याचें मन निष्पाप-जो निष्कलंक तो नेहमीं शांत-मनानें संतोषसौख्य भोगतो आणि मनांत सौख्य असलें कीं, शरीरही सुखी असतें. '

हेमू मान हालवून ह्मणाला, ' या गोष्टी मला समजतात. त्या तुह्मीं सांगायला नको. परंतु, ज्याअर्थी तुह्मीं सांगतां आहां त्याअर्थी तुह्मीं माझी थट्टा करतां असें मी समजतों— '

सुंदरी मध्येंच ह्मणाली, ' आपल्या प्रश्नाचें यथायोग्य उत्तर कैद्यानें दिलें असें मला वाटतें. '

हेमूनें इलेच्या भाषणाकडे अलक्ष्य करून अनूपसिंहास विचारलें, ' तुमचें लग्न झालें आणि तुह्मांस एक मुलगा देखील झाला असें ऐकलों तें खरें काय ? '

अनूपसिंह ह्मणाला, ' मग त्यांत इतकें विशेष तें काय ? असेच प्रश्न विचारण्याकरतां मला इकडे आणिलें आहे काय ? '

हेमू व्यंगस्वरानें ह्मणाला, ' अफसोस ! मला तुमच्या मुलाची फार कींव येते. कारण, उद्या या जगांतून तुह्मीं नाहींसे झाला आणि तसेंच होणार. ह्मणजे तो मुलगा निराधार होणार ! तुह्मीं समजलां ? आतां सांगितला हाच तुमच्या अपराधाचा अखेरचा निकाल आहे. '

सुंदरी ह्मणाली, ' मनुष्याच्या आयुष्याची हद्द कायम करणें ह्मणजे आपणच परमेश्वरत्व पत्करणें होय. ब्रह्मलिखितें देखील साधुपुरुषांच्या कृपेनें बदलतात. या गोष्टीचा आपण विचार केला नाहीं वाटते ? '

हेमू ह्मणाला, ' या कैद्याला काय हुकूम सांगितला तो तूं ऐकलासच. आतां तुझें येथें रहाणें अगत्याचें आहे असें मला दिसत नाहीं. तूं आपल्या तंबूंत जाईनास. '

सुंदरी ह्मणाली, ' तुह्मीं गरम होऊं नका. मला वाटेल तेव्हां मी जाईन. '

अनूपसिंह ह्मणाला, ' बाईसाहेब ! तुह्मीं मजकरतां सेनापतीस कांहीं सांगूं नका. भुकेलेल्या श्वापदाच्या तोंडांत जर शिकार येऊन पडली तर तो तिला सोडील काय ? नाहीं; कधीं सोडणार नाहीं. ही माझी खात्री आहे. '

हेमू संतापानें ह्मणाला, ' अनूप ! तूं कोणासमोर काय बोलतोस हा विचार केलास ? दगलबाज— निमकहराम ! तुला मीं सांगितली ही फार क्षुल्लक शिक्षा आहे. याहून जर कडक शिक्षा असती तर ती सांगण्यास मीं कधींही कमी केलें नसतें. '

अनूपसिंह साभिमानानें ह्मणाला, ' तुह्मीं म्हणतां ह्यापैकीं मीं एक देखील अन्याय केला नाहीं. '

हेमू म्हणाला, ' काय ? तूं गुन्हेगार नाहींस ? अरे, ज्यानें तुला लहानाचा मोठा केला; ज्यानें तुला शस्त्रास्त्र विद्यादान दिलें; ज्यानें तुझें पालन पोषण करून वाढविलें, त्यावरच तूं फिरलास ? त्याशींच तूं निमकहरामपणा केलास. यावरून तूं बेइमान नव्हेस ? अशीं नीच कृत्यें करणारा दगलबाज — विश्वासघातक नव्हे तर कोण ? '

अनूपसिंह ह्मणाला, ' तुह्मीं माझे गुरु, प्रतिपालक व अन्नदाते आहां. तुमच्याच कृपेनें मीं इतक्या योग्यतेस चढलों हें मी मोकळ्यामनानें कबूल करतों. तुह्मीं मला पित्यासमान वंद्य आहां हेंही मला मान्य आहे. परंतु, पिता किंवा गुरु जर लोभवश झाला आणि कोणतेंही निंद्य कृत्य जें केवळ आपल्या स्वार्थाचेंच असेल तें बेपर्वाईनें करूं लागला. कीर्तीची त्याला चाडच राहिली नाहीं. सुचेल त्या मार्गानें—चऱ्यावाईटाचा—खऱ्याखोट्याचा विचार न करतां परद्रव्य हरण करूं लागला. दांडगाईनें लोकांवर जुलूम करूं लागला. मानवीहृदयाचा त्याग करून तो पाषाणहृदयी बनला. राक्षसाप्रमाणें अनाचारानें वागूं लागला. त्याच्या निर्दयतेला सीमाच नाहींशीं झाली. दयामाया, सारासारविचार त्यानें झुगारून दिला. आणि नरपिशाच्चाप्रमाणें तो घोरतर निंद्यकर्में करूं लागला. जगास पीडा देणें हेंच आपलें मुख्य कर्तव्य असा त्याचा दृढ समज होऊन त्याप्रमाणें तो बेधडक वागूं लागला. मी ह्मणेन तें करीन; मी करीन तें खरें; अशा समजानें परमेश्वराची भीतीही त्यानें झुगारून दिली.

त्यानें केवळ स्वार्थसाधनार्थ व्यत्यय येऊं नये ह्मणून जर धर्मभीरू पुत्राचा अथवा शिष्याचा परित्याग केला तर त्या परित्यागदोषाचा अपराधी कोण ? तुमच्या हातून पापमार्गाचें अवलंबन होऊं नये; एतदर्थ माझ्या बुद्धिसामर्थ्याप्रमाणें मीं झाले तितके प्रयत्न केले. निरनिराळ्या तऱ्हेनें तुमचें पातकप्रपूरित हृदय शुद्ध करून तुह्मांस ताळ्यावर आणण्याची खटपट केली; पण तुह्मीं माझें सांगणें बिलकुल ऐकिलें नाहीं. क्षणोक्षणीं तुह्मीं माझा तिरस्कार व अवहेलना केली. ज्या रितीनें माझे मनास दुःख होईल; ज्या कृत्यांत माझी अपकीर्ति होईल; ज्या कर्मानें मला वाईट वाटेल असेच सर्व प्रयत्न तुह्मीं करूं लागला. तुमच्या कृतींत मुळींच बदल झाला नाहीं.—तुह्मीं सन्मार्गास लागला नाहीं. जेथें तेथें माझा पाणउतारा होऊं लागला. तुमच्या दुष्ट कृत्यांची मला किळस आली; तेव्हां मीं तुमचा संसर्ग सोडला. लोकांस विनाकारण दुःख देणें तुह्मांसारख्यांस उचित नव्हे असें मीं कित्येकदां सांगितलें. स्त्रियांवर जुलूम करणें महानूपातक. आर्यलोकांचीं देवमंदिरें अग्निनारायणाच्या भक्ष्यस्थानीं घालून त्यांचीं मनें उच्छृखल करूं नका; तशा कृत्यानें ते लोक विनाकारण बिथरतात; आपणास लढाईशीं प्रसंग येतो; आपलें व त्यांचें निष्कारण नुकसान होतें आणि उगाच द्वेषाग्नि भडकतो असे एक आणि दोन प्रकार नव्हेत. तुह्मीं मूर्तिमंत पापावतार धारण केला. माझें हितवचन मुळींच जुमानलें नाहीं. सारांश, जेव्हां माझ्या मनाची पूर्ण खात्री झाली कीं, पातक्याच्या सहवासांत राहून त्याच्या पापकर्माचें आपणास भागीदार व्हावें लागेल तेव्हांच मीं तुमची संगती सोडली किंवा तुह्मीं मला तसें करणें भाग पाडिलें असेंच ह्मटलें पाहिजे. माझा नाइलाज झाला तेव्हांच मीं तुमची चाकरी सोडली. तुमच्याकडे मी होतों तेव्हां कधीं तुह्मांवर शस्त्र उगारलें नाहीं. किंवा तुमच्या अहिताचें कोणतेंच काम केलें नाहीं. मग मी विश्वासघातकी किंवा निमकहराम कसा ? ’

हेमू म्हणाला, ‘ अं:, गत गोष्टी ! तें राहो ! आतां तरी तुझा इन्साफ करणें, तुला वाटेल ती शिक्षा करणें हा अधिकार मजकडे आला ना ? ’

अनूपसिंह ह्मणाला, ‘ तुह्मांसारख्या मंदमति यवनांकडे ‘ इन्साफ ’ हा शब्द मात्र आहे. तुह्मांला न्यायान्याय बिलकुल समजत नाहीं. येथें माझा

न्याय कसला ! तुह्मी न्यायाधीश ह्मणजे माझे कट्टे शत्रु. माझा न्याया-न्याय पहाण्यापूर्वीच तुह्मीं मला प्राणदंडाची शिक्षा ठरविली असेल. तुह्मांला न्याय समजणार काय आणि तुह्मीं करणार काय ? सर्वांच्या पापपुण्याचा विचार करणारा फक्त एकच व तो स्वर्गांत बसला आहे. तेथें एकदांच काय तो न्याय होईल. '

हेमू ह्मणाला, ' तूं निरपराधी आहेस अशाविषयीं तुझा कांहीं पुरावा असेल तर सांग. आह्मीं ऐकावयास तयार आहोंत. '

अनूपसिंह ह्मणाला, ' तुमचें मन तुह्मांस सांगेल तो न्याय. तुह्मीं सांगाल तो निकाल आणि तुह्मांस वाटेल तो पुरावा. येथें माझ्यासारख्याचा पुरावा—शाबिदी—काय कामाची ? परंतु रामानुजस्वामि येथें असते तर ते मी अपराधी किंवा निरपराधी आहे हें स्पष्ट सांगते. '

हेमू ह्मणाला, ' तो मूर्ख गोसावडा येथें नाहीं आणि कोठें गेला ? त्याचा पत्ताही नाहीं. '

सुंदरी मध्येंच ह्मणाली, ' रामानुजस्वामिसारख्या पुण्यमूर्ति साधपुरुषाची निंदा करणें हें फाजील शहाणपण ! ' ती मनांत म्हणाली, ' अशा महात्म्याची निंदा करणाऱ्या चांडाळाची जिव्हा कशी गळून पडली नाहीं ? देव जाणें ! ' (उघड) ज्यानें तुह्मांवर उपकार केले त्याशींही तुह्मीं कृतघ्नता करतां आणि त्याच्या पाठीमागें त्याला शिव्या देण्यासही तुह्माला कांहींच संकोच वाटत नाहीं ? '

अनूपसिंह ह्मणाला, ' मी निर्दोषी आहें अशाविषयीं पुरावा देणें आणि न देणें अर्थ सारखाच. असें मीं पूर्वीच सांगितलें आहे. पुरावा देणें ह्मणजे अरण्यरोदन करणें होय. परंतु मला जें सांगावयाचें—तें जरी निष्फल होणार—तें सांगितलें नाहीं तर लोक मला समयीं ' खराच अपराधी होता ह्मणून कांहीं बोलला नाहीं. ' असें म्हणतील; इतक्याकरतांच सांगतों. जोंपर्यंत मी तुमच्या तैनातींत होतों तोंपर्यंत तुमचा कोणताही अपराध केला नाहीं. कोणत्याही प्रकारचें अन्यायाचरण केलें नाहीं. कधीं तुमच्या आज्ञेबाहेर वागलों नाहीं. तुह्मीं जी आज्ञा केली ती जरी माझ्या समजाच्या विरुद्ध होती तरी शिरोधार्य केली. केवळ एकनिष्ठेनें व स्वामिसेवक

भाव स्मरून वागलों. त्यांत मजकडून कधींही अंतर पडलें नाहीं. फार तर काय ? तुह्मीं सांगितलेलें कृत्य जुलमी असो, तेंही करण्यास आळस किंवा अलक्ष्य केलें नाहीं. परंतु, मी करतों हें कृत्य परमेश्वरास कधीं आवडणार नाहीं. तो माझ्या अपराधाची मला शिक्षा करील असें जेव्हां मला दिसलें तेव्हां मीं तुमचा पक्ष सोडला किंवा तुह्मींच मला तसें करणें भाग पाडलें. आतां मीं तुमचा ताबेदार नाहीं. जशी तुमची इमानेंइतबारें चाकरी केली तशीच आतां रजपुतांची करीत आहें. आतां ज्यांचें अन्न खातों त्यांची एकनिष्ठेनें सेवा चाकरी करतों. तुमच्याकडे असतांना जसे शेंकडो रजपूत ठार मारिले तसेच आतां यवनलोकही मारीत आहे; तेव्हां माझें कर्तव्य काय ? हें मला समजत नव्हतें. परंतु, जेव्हां समजूं लागलें तेव्हांपासूनच मीं तुमची नोकरी सोडली आणि यवनांच्या जुलमानें राजपुताना मरुभूमिप्रमाणें भयाण व जनशून्य होणार होता; त्यास धनधान्य पूर्ण व भरभराटीचा प्रांत बनविला. जेथें कंटकाकीर्ण अरण्यें होतीं; तीं स्थलें फलपुष्प सुशोभित, सुंदर व उपयुक्त उद्यानें बनविलीं. व्याघ्र, सिंह, भल्लुकादि हिंसक पशूंच्या गजबजाटानें परम भयंकर असलेल्या पर्वतप्रांताची रसाळ भूमि बनाविली. रजपुतांकडे राहिल्यापासून कित्येक विपथगामी रजपुतांस निर्दोष— सरल— धर्ममार्गास लाविलें. विपथगामी यवन दुष्टांच्या तडाक्यांतून माझ्या हातानें झालें तितकें रजपुतांचें संरक्षण केलें. अशा सत्कृत्यास जर कोणी अन्याय समजेल तर मी अपराधी आहे. यापेक्षांही मजकडे आणखी पुष्कळ पुरावा आहे; पण तो हजर करण्यांत तथ्य नाहीं. तूर्त इतक्यावरच काय तो इन्साफ होऊंद्या. बाकीचा पुरावा पुढें.'

सुंदरी मध्येंच ह्मणाली, ' शाबास ! रजपूतसेनापति ! धन्य तुह्मी. हजार वेळ धन्य ! ! ! तुह्मीं मूर्तिमंत वीर पुरुष आहां ! शौर्याचे पुतळे, न्यायी व धीरोदार आहां आणि यवनसेनापति असे बहादूर आहेत कीं, समृद्धीवान् व आबादीआबाद प्रांतांचें स्मशान करीन अशी भीति दाखवून आपली अपकीर्ति करून घेऊं पहातात.'

हेमू ह्मणाला, ' तूं कांहींही ह्मण. तुझें ह्मणणें आपण ऐकतच नाहीं मग त्यांत विचार कसला ? अनूप ! तूं अपराधी नव्हे ह्मणून जो पुरावा

दिलास, तो जर रामानुजस्वामी ऐकते तर तुला डोक्यावर घेऊन नाचते. आणि देवदूत समजून बेशर्थ तारीफ करते. परंतु, आह्मीं तुझ्या पुराव्यास कौडीचीही योग्यता देऊं शकत नाहीं. त्यावर आमचा बिलकुल विश्वास नाहीं. आणि आमच्या इन्साफाचे कामीं त्याची जरूर देखील नाहीं. तुझ्या पुराव्यावरून तूं दगलबाजपणा व निमकहरामी केली नाहींस असें शाबीद होत नाहीं. असें आह्मीं स्पष्ट सांगतों. इतकेंच नव्हे तर तूं दिलेल्या पुराव्यावरून तूं सर्वप्रकारें अपराधी आहेस असेंच उलट शाबीत होतें असें आमचें मत आहे. तूं केवळ आमचाच शत्रू आहेस असें नाहीं. दिल्लीच्या बादशहाचा आणि बादशहाचा बादशहा जो ईश्वर त्याचाही अपराधी आहेस. तुला हाल हाल करून ठार मारलें पाहिजे आणि तुझ्या अपराधास चांगलें प्रायश्चित्त देऊन जगांतील एक महान् अपराधी मनुष्य कमी करून जगाचा बोजा हलका केला पाहिजे. ’

सुंदरी हेमूच्या विसंगत प्रलापवाक्यांनीं फार क्रुद्ध झाली आणि ह्मणाली, ‘ तुह्मीं ह्या कैद्याला विनाकारण अन्यायी ठरवितां आणि आपणांस लोकांनीं तरवारबहाद्दर ह्मणावें इतक्याचकरतां केवळ तो तुमचा शत्रू म्हणून ठार मारूं पहातां यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं, अशा पराक्रमी पुरुषास आपण ठार मारिलें इतक्याच शुष्क घमेंडीची तुह्मांस प्रतिष्ठा दिसते. तुह्मांला न्यायान्याय कांहींच दिसत नाहीं. जबरदस्ताचा बोजा खांद्यावर हाच तुमचा न्याय. परंतु अशा कृतीनें तुमचा दुर्लौकिक होईल. आज हा कैदी जसा तुमच्या तावडींत सांपडला आहे; तसेच तुमचेही कित्येक नामांकित योद्धे रजपुतांनीं कैद केले असतील. त्यांस जर त्यांनीं अशाच अविचारानें ठार मारिलें तर तुमचें किती नुकसान होईल ? हा विचार करा. पाडाव करून आणलेल्या लोकांचें रक्षण करून त्यांस जिकडच्या तिकडे पाठविणें हा राजधर्म आहे. इतकें असून जर तुह्मांस वीरत्वाची आढ्यता असेल तर तुम्हीं द्वंद्वयुद्ध करा आणि कोण न्यायी आहे हें लढाईच्या मैदानांत जाऊन ठरवा. ’

कर्कशस्वरानें हेमू म्हणाला, ‘ तूं अशा गोष्टींत मन घालूं नकोस असें तुला हजारवेळ सांगितलें तरी जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं ह्मणतात तेंच खरें. ’

सुंदरी ह्मणाली, ' आणि मी तरी तेंच ह्मणतें. जर मी तुह्मांला पाहिजे असेन तर तुह्मी असें अन्यायाचरण करूं नका. तुमचा दुर्लौकिक किंवा अपकीर्ति झाली तर ती मला अगदीं सहन होणार नाहीं. त्याला माझा उपाय नाहीं असें मींही हजारवेळ सांगितलें. परंतु, तुह्मी कोठें ऐकतां आहां ? ज्यावेळीं तुह्मी माझें ऐकतां अशी माझी खात्री होईल तेव्हां मी तुमची दासी आहें. तोंपर्यंत मीं अशीच अविवाहित राहीन. तुमच्या कीर्तीकरतां मला मरण आलें तरी फिकीर नाहीं. पण तुम्हांला बादशहाच्या कन्येची आवड आहे म्हणून तुम्हीं माझा उपमर्द करतां असें मी समजतें. '

हेमू ह्मणाला, " या खासगी गोष्टींचा संबंध अशा कामांत नको. आह्मांस स्त्रियांच्या सल्लामसलतींची जरूर नाहीं. आणि अशा निमकहराम अपराध्याच्या इन्साफांत आह्मांला कोणाची शिफारस ऐकावयाची नाहीं. आह्मी करूं तो न्याय असा जरी प्रकार आहे तरी या कैद्यास आतां सक्त पहाऱ्यांत ठेवा. याचा न्याय झाला. पण सुंदरीच्या आग्रहाकरतां आह्मी सांगितलेली शिक्षा आतांच्या आतां अमलांत न आणतां उद्या तिची बजावणी करा. आतां याला येथून न्या. "

अनूपसिंह ह्मणाला, " उद्यींक प्राणदंडाची शिक्षा मला सांगितली म्हणून मी तुम्हांस धन्यवाद देतों. ताईसाहेब ! तुम्हीं कोण आणि काय ? हें जरी मला माहीत नाहीं. तरी तुमचें साहस, निस्पृहता, न्यायी व दयाळु स्वभाव पाहून मी तुह्मांस हजारवेळ धन्यता देतों. माझी दशा पाहून तुम्हांस फार वाईट वाटलें. माझ्याकरतीनें तुह्मी हेमूस फार सांगितलें. पण त्याचा उपयोग झाला नाहीं तो प्रकार निराळा. जसें पालथ्या घड्यावर कितीही पाणी ओतलें तरी तें आंत जाऊं शकत नाहीं. तसेंच हेमूला कितीही सुविचार सांगितले तरी तो ह्मणेल तें खरें. असो, आतां त्याच्या स्वभावाची चर्चा नकोच. परंतु, मी तुह्मांला सांगतों त्याचा तुह्मी राग मानूं नका. तुमच्यासारख्या सद्गुणी स्त्रीनें अशा पिशाच्चांच्या मेळ्यांत रहाणें निदान मला तरी प्रशस्त वाटत नाहीं. तुह्मी रजपूतकामिनींच्या सहवासांत रहाल तर तुह्मांला खरें सौख्य प्राप्त होईल. क्षत्रियवीरांगना तुह्मांसारख्या रमणीरत्नास कंठमालेप्रमाणें हृद-

यांत प्रारंभ करतील. रजपूत लोक गुणग्राही आहेत. ते गुणांचे खरे परीक्षक आहेत. ते तुमचा आदरसत्कार करितील आणि मोकळ्यामनानें तुम्हांशीं निष्कपट स्नेह ठेवितील. "

उपहासपूर्वक हेमू म्हणाला, ' आपली शिफारस नको. तुम्हांला उद्या ठार मारिलें म्हणजे हिला रजपुतांच्या स्त्रियांकडे त्यांतही विशेषतः तुमच्या स्त्रीकडे तुमची मृत्युवार्ता सांण्यास अवश्य पाठवूं. '

अनूपसिंह त्वेषानें म्हणाला, ' नराधम ! नरपिशाच. ! !

हेमू म्हणाला, " बे आदब ! तूं उद्यां फाशी जाणार आणि आज असें भाषण — "

अनूपसिंहानें सांगितलें, " जारे जा ! मी मरणाची पर्वा करीत नाहीं. तुझ्यासारख्या राक्षसाच्या तडाक्यांत सांपडून मी वांचेन असें मला वाटलेंच नव्हतें. मीं असावध पडलों म्हणून अशा दशेस पोंचलों ! फिकीर नाहीं. माझ्या मृत्यूची दुःखवार्ता ऐकून अबालवृद्ध स्त्रीपुरुष शोकसागरांत निमग्न होतील. अरे ! सर्व लोक मजसाठीं रडतील. पण तूं मरशील तेव्हां सर्व लोक सुखी होतील आणि ' पापमूर्ति मेला ! जगांतील एक खराब कांटा नाहींसा झाला. फार चांगलें झालें ! ' असें म्हणून आनंदाचा गजर करतील मेल्यावर देखील तुला आपल्या पातकपर्वताचा झाडा देण्याकरितां परमेश्वरापुढें खालीं मान घालून उभें रहावें लागेल आणि अनंतकाल रौरवापेक्षांही भयंकर त्रासदायक नरकवासांत पचावें लागेल.— "

हेमूनें नेत्रसंकेतानें ' अनूपसिंहास येथून न्या ' असें सुचवितांच शिपायांनीं त्यास पुढें बोलूं दिलें नाहीं. ते त्यास घेऊन गेले. तेव्हां हेमू आनंदानें सर्व सभ्यजनांस सांगूं लागला, ' आतां रात्रीचा निमाज पढण्याची वेळ झाली. तुम्हीं आपल्या तंबूंत जा. आजच्या लढाईंत जे श्रम झाले असतील त्यांचा परिहार करा. उद्यां चितोडावर केव्हां आणि कसा हल्ला करावा हें आपण कायम करूं. अनूप फार पराक्रमी होता. त्यामुळें चितोड आमच्या कबजांत येण्यास फार प्रयत्न करावा लागला. आपलें कित्येक नामांकित योद्धे खर्ची पडले. आणखीही आमचें एकंदरींत फार नुकसान झालें. हें जरी खरें तरी तोच आतां आमच्या

हातीं सांपडला आहे. आतां जय मिळण्यास वेळ लागणार नाहीं. ब-फारशी खटपट करावी लागणार नाहीं. फार तर एखाद्या सामान्य लढा-ईचें काम. हां हां म्हणतां चितोड स्वाधीन होईल. आजच्या लढाईत जे वीर पडले त्याबद्दल मला फार दिलगिरी वाटते. जखमी लोकांची चांगली व्यवस्था ठेवा. आणि आजच्या लढाईत आमचें किती नुकसान झालें इत्यादि माहिती उद्यां कळवा. '

असें सांगून हेमू उठला. सुंदरीही निघाली. त्यांच्या मागून सर्व निघून गेले.

प्रकरण १८ वें

इला आणि हेमू.

सुंदरी इला आपल्या तंबूंतील पलंगावर विचार करीत बसली होती. क्षणांत तिचें मुखकमल प्रफुल्ल दिसे; क्षणांत ती उदासीन होई; क्षणांत तिच्या मुखकमलावर वीरश्रीचें तेज चमकत आहे असा भास होई. क्षणांत ती दीर्घ निश्वास सोडी. अशी क्षणोक्षणीं तिची चित्तवृत्ति पालटत होती. सारांश, यवनसेनापतीचें अन्यायाचरण पाहून तिचें मन परितापा-नलानें दग्ध होत होतें. रात्रीचा समय. सुंदरी विचारसागरांत गटंगळ्या खात आहे; तितक्यांत हेमू तिच्या तंबूंत आला. तो तिच्या पर्यंकापासून जवळच एका सुखासनावर बसला. सहाजिक त्याची दृष्टि सुंदरीकडे गेली. तों तिचे नेत्र दुःखाश्रूंनीं भरले आहेत असें त्यास दिसलें. ' सुंदरी ! तूं माझें हित पहाणारी आहेस. जो माझा मित्र तो तुझा मित्र व जो माझा शत्रु तो तुझा शत्रु. मग माझ्या दुश्मनकरतां तूं इतके कष्ट कां भोग-तेस ? तूंच विचार करून पहा कीं, आपला शत्रु सहज हातीं सांपडला तर त्याला कोणी तरी सोडील काय ? नाहीं. कधीं सोडणार नाहीं. '

इला म्हणाली, ' यावेळीं तो बिचारा तुमचा बंदीवान आहे. तुमच्या कबजांत आहे. तुम्हांला वाटेल तर त्याला सोडाल किंवा माराल; म्हणून त्याला दुश्मन म्हणतां येत नाहीं. किंवा दुश्मन म्हणणें तुम्हांस शोभत

नाहीं. लोक जर आपणास दिलदार समजतात तर आपणही केव्हां केव्हां औदार्याचें अथवा थोरपणाचें कृत्य करणें जरूर आहे. तसें केलें ह्मणजे आपलें लोकांत वजन रहातें आणि आपण कितीही निंद्य कृत्यें केलीं तरी लोक त्यावर पांघरूण घालितात. स्वार्थसाधनार्थ अशाच स्वभावाची अत्यावश्यकता आहे. आतां अनूपसिंहास तुह्मीं सोडून द्या. तो तुमचा आभारी होईल इतकेंच नव्हे तर त्याला तुमच्या समोर मान वर करायला जागा रहाणार नाहीं. सर्व रजपूत लोक तुमचे ओशाळे रहातील तुह्मांला धन्यवाद देतील. तुमचे शेंकडो कैदी सोडून देतील मैदानांतील गोष्टींचा तेथेंच विचार करावा. पण माझ्या गोष्ट आहे. यांत तुह्मीं दिलदारी केली, आपलें औदार्य तुमची कीर्ति होईल. तशांत इतके दिवस तो तुमच्या हाताखाल. त्यानेंही तुह्मांशीं बेइमानपणा केला नाहीं. तो प्रत्येक लढाईत विजयी होत असे. त्याचेही तुह्मीं आभारी आहां. त्याला तुह्मीं युद्धकलाशिकविली. तुह्मीं त्याचे गुरु. शिष्याकडून गुरूचा पराभव होणें हें गुरूस भूषणावह होय. आतां तो रजपुतांचा चाकर आहे. ज्याचें अन्न खावें त्याची इमानें इतबारें सेवा करणें हा मुख्य धर्म आहे. तुमचा एखादा असाच जाडा योद्धा रजपुतांच्या हातीं सांपडला आणि त्यांनीं त्याला ठार मारिलें तर तुह्मांस किती बरें वाईट वाटेल ? केवळ तो शूर पुरुष आहे. आपल्यापेक्षां बलाढ्य आहे. आणि आपला शिष्य असून दुसऱ्याच्या आश्रयांत गेला. केवळ आतां फुकटचा हातीं सांपडला ह्मणून त्याला ठार मारणें ह्मणजे द्वेषबुद्धि आणि परोत्कर्ष- असहिष्णुताच प्रकट करणें होय. माझ्यामतें त्याला तुह्मीं अजून सोडा. तसें सोडावें असें तुह्मांस वाटत नसेल तर दंड ठरवा. आणि तो रजपुतांनीं भरला तर त्याला सोडा. पण त्याला ठार मारणें सर्वथैव अयोग्य. शत्रू आपल्या हातीं सांपडला तर त्यावर दया करावी. पकडून आणलेल्या कैद्यावर शस्त्र उचलणें शूरपुरुषाचें काम नव्हे. तुमचें आजपर्यंत मजवर निष्कपट प्रेम आहे. मीही तापट असलें तरी सत्यप्रिय व मानी स्त्री आहें. मी दिलेल्या वचनांत कधींही अंतर करणार नाहीं. तुह्मीं आजपर्यंत माझ्याशीं सौजन्यानें वागला. माझ्या नियमाचा कधीं भंग केला नाहीं. माझ्याशीं

कधीं अन्यायाचरण केलें नाहीं. कधीं माझ्या मनाच्या विरुद्ध वागलो नाहीं. इतर स्त्रियांसारखी मी हांजी हांजी करणारी बायको नव्हे. मला लोकांची खुशामत करतां येत नाहीं. तुह्मीं स्तुतिप्रिय आहां. पण मला देवाशिवाय कोणाचीच स्तुति करतां येत नाहीं. तुमची कीर्ति—यश आणि शूरत्वाच्या गोष्टी मी प्रत्यक्ष पाहतें किंवा कानांनीं ऐकतें तेव्हां सुखी असतें. आणि तसें नसतें तेव्हां मला महत् दुःख होतें. तुह्मीं थोर—धीरगंभीर व शूर पुरुष आहां असें लोकांनीं ह्मणावें आणि मीं नेहमी तुमच्या सहवासांत असावें अशी माझी इच्छा आहे. तुह्मीं माझ्या मनोगताप्रमाणें वागलां कीं, तुमचे मनोरथ सिद्धीस गेलेच असें समजा.'

हेमू ह्मणाला, 'तुझ्यासारखी स्त्री या दुनयेंत मिळणें कठीण ! तुझ्या सौंदर्याची, तुझ्या सद्गुणांची तारीफ करावी तितकी थोडी. दुसऱ्याचें दुःख पाहून तूं ताबडतोब दुःखी होतेस हें खरें; पण राजकारणांत तुला कांहींच समजत नाहीं. आजच्या लढाईंत अनूपनें आमचें फार नुकसान केलें. तें माझ्या मनांतून कधीं जाणार नाहीं. त्याला सोडण्याचा तूं मुळींच आग्रह धरूं नकोस. त्यांत तुला यश येणार नाहीं. सर्पावर एकदां हात टाकला कीं, त्याला जमीनदोस्तच केला पाहिजे. असाच एकदां जयमी हातीं सांपडला पाहिजे, मग रजपुतांचा कुलक्षय करण्यास वेळ लागणार नाहीं. तो झाला कीं, आपण दिल्लीचे सार्वभौम बादशहा होऊं.'

सुंदरी ह्मणाली, 'त्यांत मला आनंद आहे. पण लोकांत तुमची अपकीर्ति होईल; लोक निंदा करतील. असें तुह्मीं कांहींच करूं नये इतकीच माझी विनंती आहे. माझें तुह्मीं ऐकणार नाहीं. ही माझी खात्री होतीच. परंतु माझ्या बुद्धीस जें योग्य दिसलें तें मीं सांगितलें. पुढें तुमची मर्जी ! तुमच्याच दुराग्रहानें तुह्मीं आपलें नुकसान करून घेतां याचें मला मरणप्राण दुःख होतें. हो; बिचारें कपाळीं असेल तें भोगलें पाहिजे.'

हेमू ह्मणाला, 'वेडी कशी तूं ! अग, नेकनामी आणि बदनामी हे शब्द फक्त मुलांस आणि अल्प समजुतीच्या बायकांस फसविण्यापुरतेच आहेत. याहून त्यांत जास्त कांहींच मतलब नाहीं. मी आजपर्यंत तिकडे लक्ष दिलें नाहीं आणि यापुढें देणारही नाहीं. मला माझा स्वार्थ पाहिला

पाहिजे. लोक कांहीं ह्मणोत. ह्मणेनात बिचारे. त्यांचीं तोंडें दुखतील. स्वार्थापुढें कीर्ति आणि अपकीर्तीची पर्वा कोण करतो ! एकदां आपला मतलब साधला मग कोणाची मकदूर लागली आहे कीं, तो माझ्या विरुद्ध एक शब्द बोलेल ! किंवा मजकडे वाकड्या नजरेनें पाहील ! '

सुंदरीची सर्व निराशा झाली. ती मनांत ह्मणूं लागली ! ' ठीक आहे. हेमू निःसंशय स्वार्थांध आहे. स्वार्थाचा केवळ दास आहे. इतके दिवस याला मी शूर समजत होतें; पण हा नपुंसक होय. याला वीरतेचा गंधही नाहीं. या दुराग्रही हेमूचा घातच केला पाहिजे. ह्याला विश्वासानेंच दगा दिला पाहिजे. हाय ! हाय ! काय हलकटपणा ! या चांडाळास धर्म नाहीं. कर्तव्य समजत नाहीं. यश, ख्याति व कीर्तीची पर्वा नाहीं. जो याच्याशीं तोंडपुजेपणा करील तो चोंबडा याला प्रिय. प्रवंचना, प्रतारणा, शठता व स्वार्थ यांचा हा पुतळा आहे. धर्म, नीति व उपदेश यांनीं हा सन्मार्गास लागेल ही आशा व्यर्थ आहे. रामानुज-स्वामींच्या वचनास मान देऊन मी येथें राहिलें; पण व्यर्थ. त्या महत्-पुरुषाच्या अभिश्रापानेंच हेमूचा आजच्या लढाईंत पराजय झाला. त्याच्या आशिर्वादाशिवाय याचें कालत्रयींही कल्याण होणार नाहीं. हा मांगहृदय ! पाषाणास द्रव फुटेल पण ह्याला जन्मांत दयेचा पाझर फुटणार नाहीं. याला इतक्या तऱ्हेनें सांगितलें परंतु फुकट ! असो गोडीगुलाबीच्या गोष्टींनीं याचें मन फिरेल तर पाहूं. ' (उघड) ' सेना-पति ? तुह्मीं सूक्ष्म विचार करा. तुह्मीं मला येथें आणल्यापासून मी आजपर्यंत तुमच्या बरोबर आहें. तुमच्याशिवाय आतां माझें या जगांत कोणी नाहीं-माझा बाप गेला ! मला कोणाचा आधार राहिला नाहीं. केवळ तुमच्या कृपेनें मी वांचलें आहें. तुमच्याकरतां मी घरादारास व आप्तइष्टांस मुकलें. मीं तुमच्या बरोबर रानांत तशी गांवांत, महालांत तशी जंगलांत, सुंदर गृहांत तशी जंगीं लढाईत तुमचे बरोबर असतें. तुह्मीं कोठेंही असला तरी एकनिष्ठेनें तुमच्याशीं वागतें. तुह्मीं जर माझें ऐक-णार नाहीं तर दुसरें कोण बरें ऐकेल ? '

हेमू ह्मणाला, " तूं ह्मणतेस तें खरें. तूं माझे हेतु पूर्ण करशील ही मला खात्री आहे. नाहीं तर मीं केव्हांच जबरी केली असती; पण

तुला आमच्या धर्माची दीक्षा द्यावी आणि मग तुझ्याशीं विवाह करावा अशा इरायानें मी स्वस्थ आहें. तूं निराधार आहेस. तुझें मीं ऐकावें हें खरें. पण या गोष्टींत तूं मला भीड घालूं नकोस. तुझें त्यांत हित नाहीं व अनहितही नाहीं. उगांच हट्ट कां घेतेस ?"

इला ह्मणाली; "हट्ट कसला ? आणि घेतला तरी चालविते कोण ? मला जें कृत्य न्यायाचें दिसलें तें मीं सांगितलें. तुह्मीं माझें ऐकत नाहीं ना ?"

हेमू ह्मणाला, "हें काम ऐकण्यासारखेंच नव्हे."

सुंदरी ह्मणाली, "झालें तर. त्यांत इतकी पंचाईत कसली ?"

हेमू ह्मणाला, "आतां बरीच रात्र झाली. तूं स्वस्थ झोंप घे. मीही जातों." असें सांगून तो आपल्या तंबूंत गेला.

सुंदरी एकटींच बसून विचार करूं लागली. विचार प्राबल्यामुळें तिला झोंप येईना. ती मनांत ह्मणूं लागली, 'मी जातीवंत रजपुताची कन्या. या राक्षसानें मला माझ्या घरांतून काढून येथें आणून टाकिलें. मी आजारी पडलें तेव्हांच मरतें तर बरें होतें. पण माझें नशीबांतील हे सुख-सोहळे कसे चुकावेत ? रावणानें जशी सीतेस नेली तशीच या नरपशूनें माझी अवस्था केली. लोक कांहीं ह्मणोत; पण जशी सीता त्या दुष्ट राक्षसाच्या घरीं निष्कलंक राहिली होती तशीच मीही आजपर्यंत शुद्ध आहे. आतां आत्मघात केल्याशिवाय गत्यंतरच राहिलें नाहीं. नाहीं तर रामानुजस्वामीनें दिलेल्या कट्यारीनें त्या नरपिशाच्च हेमूचा कंठ चिरून मग आत्मघात करावा ह्मणजे सर्व दगदग सुटली. यावेळीं तो निशा करून स्वस्थ घोरत पडला असेल. आतां त्याचें कंठनाळ छेदन करण्यास वेळ नको. पण छीः झोंपलेल्यावर किंवा असावध असलेल्या मनुष्यावर शस्त्रप्रहार करणें हा आह्मां रजपुतांचा धर्म नव्हे. काय करूं ? माझी अक्कल गुंग झाली. आतां असें नाहीं. अनूपसिंहास मींच जाऊन सोडवितें आणि त्याकडूनच हेमूला ठार मारवितें; ह्मणजे औषधावांचून खोकला गेला. मला रामानुजस्वामीनें येथें ठेविलें तें इतक्याचकरतां. ठीक झालें. शानदार युक्ति सुचली. हेमू, याद राख ! तूं जेव्हां मला येथें आणिलेंस तेव्हांच तुझ्या नाशास प्रारंभ झाला. तूं जसा माझा घात केलास तसाच मीही तुझा करीन तरच नांवाची इला होईन. फार बोलण्यापेक्षां काय तें करूनच

दाखवावें ह्मणजे झालें. स्त्रिया आपल्या वैऱ्याचा कसा सूड उगवितात ? हें त्या दुष्टास चांगलें दाखविलें पाहिजे. अनूपसिंहाच्या जेवणाची तजवीज आपण केलीच आहे. असो. ' असा विचार करून ती तेथून निघून गेली.

प्रकरण १९ वें.

मुक्तता.

शृंखलाबद्ध केसरीप्रमाणें अनूपसिंह यवनांच्या बंदीवासांत पडला होता. त्याची देहकांती शोभाशून्य दिसत होती. उज्वळ नेत्रकमल कोमेजलें होतें. गाल बसलेले दिसत आणि तो चिंताग्रस्तासारखा गंभीर विचार करीत असावा असें भासे. रात्रीचा काळोख किट्ट पडला. त्याच्या कोठडींत एक दिवा मिणमिणत होता. ती कोठडी तरी कसची ? साधारण काठ्यांच्या सार्टीवर मातीचा गिलावा देऊन एक बंदिवास ह्मणून तयार केली होती इतकेंच. रात्रीनें कृष्णवस्त्र परिधान केलें. क्वचित् नक्षत्रमाला चमकूं लागली. जिकडे तिकडे शांतता होत चालली. तेव्हां अनूपसिंह मनांत ह्मणूं लागला, ' मजबरोबर फारच थोडे लोक होते, तरी त्यांचें काय झालें हें समजण्यास मला मार्ग राहिला नाहीं. कसें माझें दैव प्रतिकूल झालें ? कशी मला अकस्मात् घेरी आली ? असो, जगदीश ! तूं जीवगणांचे सद्सत्कार्यांचा साक्षी आहेस. तूंच जगाचा उत्पत्ति, स्थिति व लयकर्ता आहेस. तूंच प्राणीमात्रांच्या जीवन मरणाचा आधार आहेस. हे जगत्चक्षुत्, तुला सर्व दिसतें. तुला सर्व समजतें. माने कराल ! मी उद्यां मरणार तो आजच मलों असतों तरी फिकीर नव्हती. जन्मास येईल तो कधीं ना कधीं मरणारच. परंतु माझ्या मृत्यूची वार्ता कानीं पडतांच, एक निराधार अबला आपल्या कडेवरील केवळ एक वर्षाच्या तान्ह्या अर्भकासह प्राणत्याग करील याच दुःखानें मीं फार दुःखित झालों आहें. तूं जगज्जननी आहेस. त्यांचें तूं संरक्षण कर. ईश्वरा, मीं कायावाचा मनानें जर कांहीं पातक केलें असेल, तर त्याची तूं मला क्षमा कर.

तुझ्या बालकास सदय अंतःकरणानें पहा. तूं सर्वेश आणि मंगलालय आहेस. भरतखंडास यवनांच्या तडाक्यांतून सोडीव. साधुजनांचें पालन आणि दुष्टांचा संहार करण्याकरतां युगायुगाचें ठायीं तूं अवतार धारण करतोस. तसा एखादा अवतार घेऊन यवनांचा संहार कर. मी मरणार? कोण सांगतो! मी मरणार? माझा देह पडेल, त्याचा नाश होईल. होईना. मी कधीं मरणार नाहीं. राजपुतान्यांतील आर्यजनांच्या हृदयपटलावर माझें नाव चिरकाल राहील. मी कीर्तिरूपानें जिवंत राहीन. काय हरकत आहे? मग मी मरणार कसा? सर्व रजपूतलोक माझ्या कीर्तीचे पवाडे अक्षय्य गातील. हें काय थोडें झालें? कीं, स्वदेशाच्या व ज्ञातिबांधवांच्या हितार्थ, मीं अविश्रांत श्रम केले आहेत. स्वदेशोद्धारार्थ मीं हाडाची काडें आणि रक्ताचें पाणी केलें आहे. स्वदेशाची देवाप्रमाणें सेवा केली. त्यांत मला प्राणांचीही पर्वा दिसली नाहीं. स्वदेशास पित्याप्रमाणें परमपूज्य मानिलें आणि त्याची एकनिष्ठेनें सेवा केली. आर्यजननीस दुःख देणारांचा धुव्वा उडविला. माझ्या कर्तव्यांत मीं कधीं कसूर केली नाहीं. लोकांकडून वाहवा ह्मणवून घेतलें. रजपूतलोक माझे गुणानुवाद गातील. ते मजकरतां मंगल प्रार्थना करतील. ते अनाथ बालकाचें व माझ्या निराधार स्त्रीचें संरक्षण करतील. पतीचें अर्धपुण्य स्त्रीला मिळतें. पुत्र पित्याच्या पुण्याचा अधिकारी आहे असें ह्मणतात तें जर खरें आहे तर मग माझ्या पुत्रास व स्त्रीस कधींही दुःख होणार नाहीं. आतां मी मायापाशानें बद्ध होऊन अवशिष्ट काळ व्यर्थ कां दवडूं? आजची सर्व रात्र मी सर्वव्यापक, अनाथनाथ, सच्चिदानंदकंदाचें ध्यान करीन. तो दयाळु आहे. तो चित्शक्तिसंपन्न परमेश्वर मजवर दया करील. जगदीश्वराशिवाय दीन जनांचा उद्धार करणारा कोण आहे? आतां मी मृत्यूला भीत नाहीं. अरेरे! तरी मला दुःख होतेंच; कारण, प्रबळ पराक्रमसंपन्न शत्रूशीं लढतांना जो देह धारातीर्थी पडावयाचा त्याची अशी विटंबना व्हावी? दुष्टसंहारक कराले! जो पारतंत्र्याचा कट्टा धिःकार करणारा; जो स्वतंत्रताप्रिय; जो स्वाधीनता देवीचा निःसीम भक्त; त्याची ही दशा काय? माते वसुंधरे! काळाशीं झगडणारे लक्षावधी वीर तुझ्या उदरांत समाविष्ट होऊन पडले आहेत; त्यांस

बाहेर काढ आणि या परदेशीय यवनांपासून आर्यलोकांस जें वारंवार दुःख भोगावें लागतें तें सफाई नाहींसें कर. आकाशांतील नक्षत्रांपासून दिव्य पुरुषांची उत्पत्ति होते असे ह्मणतात तें जर खरें असेल तर तुह्मीं खालीं उतरून दुष्टांचा संहार करा. पंचमहाभूतें देखील अगदीं शिथील झालीं ? त्यांच्या अंगचें दैवीतेज विलयास गेलें ? त्यांचा सर्व प्रभाव लयास गेला ? हाय हाय ! ईश्वरी क्षोभ. दुसरें कांहीं नाहीं— "

अनूपसिंह अशा विचारांत गर्क होता इतक्यांत अन्नाचें ताट व पाण्याचा तांब्या घेऊन एक मनुष्य तेथें आला. त्याला अनूपसिंहानें पाहिलें आणि तो ह्मणाला, " तूं कोण ? येथें कां आलास ? आणि तुझ्या हातांत हें काय आहे ? "

तो मनुष्य सांगूं लागला. " मला बाईसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें मी हिंदुलोकांच्या हातचें हें अन्न घेऊन येथें आलों आहे. मीही हिंदु आहें. या पवित्र अन्नोदकाचा स्वीकार करा असें मी लीनतेनें तुम्हांस सांगत आहें."

अनूपसिंह ह्मणाला " कोण बाईसाहेब ? "

मनुष्य ह्मणाला, " इलाबाईसाहेब. ज्यांनीं तुमच्या मुक्ततेसाठीं सेनापतीकडे शिफारस केली त्या. तुह्मीं भोजन करतां तोंवर ' मी तुमच्या मुलाखतीस येतें असेंही त्यांनीं सांगितलें आहे. '

अनुपसिंह मनांत ह्मणाला, ' काय त्या स्त्रीरत्नाचा जात्याभिमान पहा ? आतां तिचे तरी उपकार आपल्यास पाहिजे कशाला ? उद्यां मरायचें आहेच. शिवशिव ! काय माझी दशा ? जयश्री, आहा ! माझा प्राण मित्र. देव त्याला सुखांत ठेवो. तो या लढाईत पडला तर रजपुतांच्या हालांस पारावारच नाहीं. जखमी झाला तर परमेश त्याला लौकर आराम देवो. माझी दशा त्याला समजली तर तो हरतऱ्हेनें मला सोडवील पण माझी दशा त्याला कोण सांगणार ? महाराण्याचें काय झालें असेल प्रभु जाणें ! क्रीडा आणि प्रतापाची काय अवस्था असेल तीं काय करीत असतील ! करणार काय ? नको ती चिंता. माझें कांहीं होवो. जगन्नियंत्यानें माझ्या जिवलग जयश्रीस सौख्यांत ठेवावें; कारण माझ्या " स्त्रीपुत्राचें संरक्षण करीन " असें त्यानें मला वचन दिलें आहे. मी मेलों तर तो आपले वचनाप्रमाणें वागेल.

यांत अगदीं संशय नाहीं. मी मेलों तरी जयश्री तूं कष्टी होऊं नकोस. तुझे उपकार मी जन्मोजन्म विसरणार नाहीं. तूं स्वधर्म व स्वदेशसंरक्षणार्थ हातांत शिरकमल घेऊन आपल्या मर्दुमकीनें यवनांचा विध्वंस कर. आणि रजपूत हें नांव गाजीव. आपलें नांव अजरामर कर. यवनांना आर्यस्थानांतून हांकून काढ. स्वातंत्र्य ही आराध्यदेवता स्थापन कर. तूं स्वतंत्रतादेवीस यवनांचे बळी दे. आणि स्वदेशाभिमान, बंधुप्रीति, स्वराजनिष्ठा व ऐक्यता ह्यांचा विमलध्वज दिगंत फडकीव. कोडे ? तूं वीरनारी आहेस. तूं पातिव्रत्याचें खडतर तपाचरण आजपर्यंत एकनिष्ठेनें करीत आली आहेस. तुला मुक्ति मिळेल. प्रताप ? तूं साध्वीच्या उदरीं जन्म धारण केलें आहेस. तूं वीरतनय आहेस. आपलें क्षात्रतेज विसरूं नकोस. आपली कीर्ति दाहीदिशा परिप्रसृत करून तुझ्या मातेस लोकांनीं वीरमाता ह्मणावें असा लौकिक कर. देव तुला चिरंजीव करो. '

भोजन घेऊन आलेला मनुष्य मनांत ह्मणाला, ' आपल्या भाषणाकडे या बिचाऱ्याचें लक्षच नाहीं. मीं काय सांगितलें तें यानें ऐकिलें कीं नाहीं प्रभु जाणें. आतां आपलें काम लौकर आटोपावें हें बरें. ' तो उघड ह्मणाला, ' मीं काय सांगितलें तें आपण ऐकलें काय ? हें भोजनाचें ताट देऊन इलाबाईसाहेबांनीं मला पाठविलें आहे. याचा तुह्मी स्वीकार करा. '

अनूपसिंहाच्या विचाराचा ओघ एकदम बदलला. तो ह्मणाला, ' कसें झालें ? माझ्याकरतां बाईसाहेबांनीं अन्न पाठविलें आहे ? देव त्यांचें कल्याण करो. मी त्यांचा फार आभारी आहें. परंतु मला अन्नाची अवश्यकता नाहीं. हें ताट तुह्मी परत न्या. आणि मला क्षमा करा असें त्यांना सांगा. अन्नाचा अव्हेर करूं नये हें मला समजतें. परंतु काय करूं ? माझा नाइलाज आहे. मी उद्यां मरणार मग यवनांचा किंवा त्यांच्या सहवासांतील हिंदूंचा तरी कां आभारी होऊं ? '

तो हिंदु ह्मणाला, ' मला तुह्मीं ओळखलें नाहीं ? तुह्मीं सेनापतिकडे होतां तेव्हां मीं तुमच्या हाताखालीं पुष्कळवेळ काम केलें आहे. तुह्मीं कृपा करून या अन्नाचा धि:कार करूं नका. अन्नासाठीं मनुष्यमात्राचे अनेक प्रयत्न चालले आहेत. तुह्मीं स्वीकार करणार नाहीं तर बाईसाहेबांच्या आणि माझ्याही मनास फार वाईट वाटेल. '.

अनूपसिंहानें आणखी कांहींवेळ विचार केला आणि त्या मनुष्याच्या अत्याग्रहास्तव त्यानें एक घांस घेतला आणि एकच घोट पाणी तो प्याला. तेव्हां तो मनुष्य समाधान मानून तेथून निघून गेला. अनूपसिंह मनांत ह्मणूं लागला, 'या दुष्ट यवनांच्या छावणींत दया कोठून आली ? मूर्तिमंत दया जर येथें आली तर या शिलानष्टांच्या सहवासानें निर्दया होईल मग असें कसें ? ती साध्वी कोण असावी ? कां तिनें मजवर इतके उपकार करावे ? कां तिला माझी दया यावी ? हें काय असेल तें असो. कोणी असो आणि कांहीं होवो. आपणास आतां त्या गोष्टीचा विचारच नको. आणि करून तरी अर्थ काय ? उद्यां या जगांतून आपणास जावयाचें आहे. आतां शांतमनानें भवसागरतारकाचें ध्यान करूं—परम वंद्य आणि परमपवित्र देवाधिदेवाच्या पदकमलाचें चिंतन करूं. तोच अखिल सुखदुःखाचा दाता आहे. अनंतब्रह्मगोल हीं ज्या प्रभुसमर्थाचीं कार्यें केवळ इच्छामात्रें चालत आहेत त्याला काय कमी आहे ? जो परमेश्वर, जगताची उत्पत्ति, स्थिती व लयकर्ता. ज्या जगत्पतीनें साधुजनांचें पालन आणि दुष्टांचें निर्दालन केलें. त्याच्या अद्भुत मायेचा पार मजसारख्या पामरास काय लागणार ? जगदीश ! तुझी इच्छा बलवत्तर आहे. मीं तुला अनन्यभावें शरण आलों आहें. समजून किंवा न समजतां मजकडून जे अपराध झाले असतील त्यांचीं तूं मला क्षमा कर.'

अनूपसिंह भगवंताच्या ध्यानांत निमग्न होता. त्यानें ध्यानासन घातलें होतें. दोन्ही नेत्र मिटले होते. उभय हस्त जोडून तो, अखिल दुःखदैन्यहारक प्रभूच्या ध्यानांत निमग्न होता. इतक्यांत एक फकीर बंदीशाळेच्या द्वारांत आला आणि ह्मणाला;-

" भूकेको दाल रोटी; नंगेको कुछ उढाना ॥
यहांका येही मझेह है; खाना है खिलाना ॥
तेरा वोही है जो कुछ अबपेषकर मरेगा ॥
जबवक्त आपुकार तब कुछ न बन सकेगा ॥
जो नर चलन चले है; चल तूं भी उस चलन को ॥
गर मर्द है तो आषेक कौडी न रख कफनको ॥
जिसने ये झर दियाहे फिर वोही धनभि देगा ॥
मरजाय आवो बोझा ॥ तुजको कफनभि देगा ॥

द्वाररक्षक म्हणाला, ' इकडे तूं निरर्थक आलास. येथें तुला कांहीं मिळणार नाहीं. '

फकीर ह्मणाला, ' परवरदिगारची मर्जी ! बरें तें राहो. पण मी तुह्मांला नम्रतेनें विचारतों येथें कोणी रजपूत कैदी आहे काय ? '

द्वाररक्षकानें सांगितलें ' होय आहे. '

फकीर ह्मणाला, ' एकदां त्याला भेटावें असें माझ्या मनांत आहे. तूं मेहरबानी करशील आणि मला त्यास भेटूं देशील तर मी तुझा आभारी होईन. '

द्वाररक्षकानें सांगितलें, ' सेनापतींच्या आज्ञेशिवाय तिकडे कोणालाही जातां येणार नाहीं. '

फकीर ह्मणाला, ' मी बोलून चालून फकीर आहें. जगाच्या भानगडीं-तून अगदीं मोकळा आहें. मला माहीत असतें तर मी सेनापतीची परवानगीही आणिली असती पण आतां काय त्याचें ? तुह्मी मेहरबानी कराल आणि मला आंत जाऊं द्याल तर सेनापतीची मर्जी खपा होईल असें नाहीं. माझें तेथें फार वेळाचें कामच नाहीं. मी फकीर आहें आणि तुह्मी मुसलमान आहां. जातीचा विचार करा—मजवर दया करा आणि हीच मला भिक्षा घाला. नाहीं ह्मणू नका. मीं आंत जातो. त्याला एक निरोप सांगतों आणि तसाच परत येतो. तुमच्या हातीं सर्व आहे. सेनापती एव्हां झोंपेंत असतील. त्यांच्या निद्रेचा भंग करणें चांगलें नव्हे. तुह्मी सूज्ञ आहां तुह्माला सर्व समजतें. मी गरीब मनुष्य काय विशेष सांगणार ? कसें जाऊं आंत ? '

द्वाररक्षकानें सांगितलें " अहो ! सेनापतीस हें समजेल तर ते माझें डोकेंच मारितील ! '

फकीर ह्मणाला, ' असा तो घातकी नाहीं. सेनापती फार दयाळु आहे. त्याला कोण सांगावयाला जातो ? सांगावें तर मी किंवा तुह्मी ? मी खुदातालाची शपथ वाहून सांगतों कीं, आमरण ही गोष्ट मी कधीं कोणाशींच बोलणार नाहीं. तुमची खात्री तुह्मांला आहेच. '

द्वाररक्षक ह्मणाला. ' तरी पण त्याच्या आज्ञेचा भंग केला असें होतें ना ? '

फकीर म्हणला, ' त्यास कोणाची भेट होऊं देऊं नका; अशी तर सेनापतीची आज्ञा नाहीं ? '

द्वाररक्षक म्हणाला, ' नाहीं. '

फकीर सांगूं लागला, " झालें तर. त्यांत इतकी पंचाईत कसली ? उद्यां तो मला कदाचित् भेटणार नाहीं इतक्यासाठींच तुमचे आर्जव करून मी सांगतों; कसेंही करून त्याची माझी भेट होईल इतकीच कृपा करा '

द्वाररक्षक म्हणाला, " उद्यां त्याला फांशीं देणार ! "

फकीर म्हणाला, " अरेरे ! तुम्हीं निवाललेल्या बुद्धीचे व उदार मनाचें गृहस्थ आहां. आतां नाहीं म्हणूं नका. तुमचे उपकार मी जन्मोजन्म विसरणार नाहीं. एका क्षणाचा अवकाश. गेलों, निरोप सांगितला कीं, मागें आलोंच. '

द्वाररक्षक म्हणाला, ' काय करावें ? हा प्रसंग मोठा कठीण आहे. '

फकीर म्हणाला, ' त्यांत हो विचार कसचा ? मोठमोठे बादशहा देखील फांशीं जाणाऱ्यास, फांसावर चढविण्यापूर्वीं पाहिजे त्यास भेटूं देतात. त्यांत इतकें महत्व कसलें ? '

द्वाररक्षक म्हणाला, ' तुम्हीं सांगतां तें सर्व रास्त आहे परंतु— '

फकीर म्हणाला, ' परंतु नको आणि कांहीं नको. आम्हीं फकीर लोक आम्हांला तुमचे डांवपेंच काय समजणार ? पण तें असो. आतां आलें माझे ध्यानांत. त्याच्या घरच्या मनुष्यांनीं सांगितलेंच होतें. हें घ्या कडें. ' असें म्हणून त्या फकिरानें आपल्या हातांतील सुवर्णाचें एक कडें काढून त्या द्वाररक्षकाच्या हातावर ठेविलें. तें दिव्याच्या प्रकाशांत चमकतांच, द्वाररक्षकाचे डोळे दिपले आणि त्याच्या मनास दयेचा पाझर फुटला. तरी त्याची एकीकडे आड आणि एकीकडे अग्नि अशी दशा झाली. फकीरास आंत सोडावा तरी पंचाईत न सोडावा तरी विचारच. तितक्यांत फकीर म्हणाला, ' तें कडें तुम्हीं घ्या आणि आपल्या परिवार-वर्गासह खुशाल आनंद करा. अगदीं थोडे तरी त्याचे पांचशें रुपये येतील असें त्यांनीं सांगितलें आहे. '

द्वाररक्षक म्हणाला, ' उगांच तुम्हीं मला लोभांत पाडतां. नको बुवा

हें कडें; तुम्हीं घ्यात घ्या ' असें त्यानें म्हटलें तरी हें कडें त्याच्याच हातांत होतें.

फकीर म्हणाला, ' असूं द्या हो. घेतां येईल; दोस्त ! तुम्हांला मुलें-बाळें किती आहेत ? '

द्वाररक्षकानें सांगितलें, ' देवाच्या दयेनें चार मुलगे आहेत. '

फकीरानें विचारलें, ' ते कोठें असतात ? '

द्वारक्षकानें सांगितलें, ' आमच्या घरीं—घरीं दिल्लीस. '

फकीर म्हणाला, ' त्यांवर तुमचें फार प्रेम असेल नाहीं बरें ' ?

द्वाररक्षक म्हणाला, अलबत ! अहो ते माझ्या गळ्यांतील ताईत आहेत. '

फकीर म्हणाला, ' अहो असलेच पाहिजेत. आतां तुम्हीं विचार करा. अशा परदेशांत तुम्हांला फांशीं देण्याची शिक्षा झाली— देव असें न करो; पण उदाहरणार्थ घेऊं—तर तेव्हां तुमची काय आज्ञा राहील ? '

द्वाररक्षक म्हणाला, ' आपल्या मित्रास किंवा आप्तइष्टांस भेटावें. आपल्या पश्चात् कशी व्यवस्था करावी वगैरे सांगावें असें वाटणें स्वाभाविकच आहे. '

फकीर म्हणाला, ' तुमच्याच मताप्रमाणें कां होईना ! तशा समयीं तुमचा बंधु तुम्हांस भेटावयास आला आणि द्वारपालानें त्यास आंत जाण्याची परवानगी दिली नाहीं तर तशा अगदीं शेवटच्या आणीबाणीच्या प्रसंगीं तुम्हांला काय वाटेल ? खरेंच सांगा तुमच्या अंगाचा तीळपापड होईल कीं नाहीं ? तुम्हीं कशाही स्थितींत असलां तरी त्या द्वारपालाच्या नरडीचा घोट घ्यावा असें तुम्हांला वाटेल कीं, नाहीं ? कोणालाही वाटणें स्वाभाविकच आहे. अहा, प्रसंगच तसा ता. तसेंच माझें झालें आहे. नाहीं तर मला या भानगडी पाहिजे होत्या कशाला ? त्याच्या घरच्या मनुष्यांस तो कांहीं सांगणार असेल तर ऐकायचें आणि त्यांचा निरोप त्यास सांगायचा म्हणजे झालें. याहून माझें तेथें कांहींच महत्त्वाचें काम नाहीं. '

द्वाररक्षक म्हणाला, ' बरें तर जा बुवा, पण लौकर परत या म्हणजे झालें. नाहींतर तेथें बोलत बसाल आणि कोणी ऐकेल तर पंचाईत ! '

मंत्रमुग्ध द्वाररक्षकाच्या मोहनिद्रेचा भंग होऊं नये म्हणून तो फकीर एकदम आंत गेला.

संसारबंधन पाशरूपिणी माये ! तुझ्या मोहप्रदायिनी शक्तीपुढें सर्वांस हात टेंकावे लागतात ! तुझी अत्यद्भुत शक्ति धन्य खरी. मनुष्य, पशु, पक्षी, कीटक, पतंगादि यच्चयावत् जीवमात्र तुझ्या असामान्य शक्तीनें परिबद्ध झालेले आहेत. कोणी कसाही पाषाण— लोह—वज्रहृदयी असो; तूं स्वसामर्थ्यानें त्याला तेव्हांच वश करितेस.

फकीर कारागारांत गेला. तेथें एक मंद दिवा जळत होता. जिकडे तिकडे शांत व भयाण दिसत होतें. अनूपसिंह जगदीश चिंतनांत गर्क होता. तो देहभानावर नसावा असें स्पष्ट दिसत होतें. फकिरानें हळूंच अनुप '! अनुप !' अशी हांक मारिली. तरी त्याला जबाब मिळाला नाहीं. पुन्हा त्यानें 'अनूपसिंह ! झोंपलास काय ?' असें म्हणून हातानें चाळविलें. तेव्हां अनूपसिंह दचकून सावध झाला आणि म्हणाला, 'सूर्योदय झाला चिंता नाहीं. चला माझी तयारी आहे.

फकीर म्हणाला. ' अनूपसिंह ! तूं मला ओळखलें नाहींस ? मीं कोण ? सावध हो. नीट पहा. माझ्या वेषाकडे दृष्टि देऊं नकोस. माझा शब्द तूं ओळखलास '?

अनूपसिंह म्हणाला, " मी स्वप्नांत तर नाहीं ? जयश्रीसारखा शब्द आणि फकिराचा वेष ? काय हें विचित्र स्वप्न ! मी झोंपेंत नाहीं—स्वप्नावस्थेंतही नाहीं तर मग असें कसें ? "

फकीर म्हणाला, " मित्रा ! मी तो जयश्री. आतां तुझी खात्री पटली. अनूपसिंहानें त्याच्या गळ्यास एकदम मिठी मारून म्हटलें, " मित्रा ! तूं येथें कसा आलास ? "

जयश्री म्हणाला, " या छावणींत फकिराचा वेष होता म्हणून मला कोणीच विचारलें नाहीं. येथें आल्यावर तुला उद्यांच फांशीं देणार असें माझ्या कानीं आलें. तेव्हां तूं कोठें आहेस हा तपास करीत मी येथें आलों. पहारेवाल्यानें माझें सांगणें ऐकलें आणि मला आंत येऊं दिलें. '

अनूपसिंह म्हणाला, ' तर मग तूं काळाच्या तडाक्यांतून सुटलास असें म्हटलें पाहिजे. महाराणा सुखरूप आहे ? आजच्या लढाईत आपलें किती नुकसान झालें.? '

जयश्री ह्मणाला, ‘ त्या गोष्टी आतां नकोत. सर्व ठीक आहे. आतां व्यर्थ वेळ दवडण्यांत हांशील नाहीं. आपला प्रत्येक क्षण मोलाचा आहे. हाच वेष चढव आणि येथून तावडतोब नीघ. ’

अनूपसिंहानें विचारलें ‘ आणि तूं ? ’

जयश्री ह्मणाला, ‘ तुझ्याबद्दल मला येथें राहणें भाग आहे. ’

अनूपसिंह ह्मणाला, “ तूं मजसाठीं विनाकारण प्राण देण्यास सिद्ध होणार ? ”

जयश्रीनें सांगितलें, ‘ अलबत. माझें कर्तव्यच तें. तें मला केलेंच पाहिजे. त्याच्या आड तूं येऊं नकोस. ’

अनूपसिंह ह्मणाला, ‘ छीः छीः मजकडून तसें होणार नाहीं. तुला मृत्यूच्या तोंडांत बळी देऊन मीं जाऊं ? छीः छीः परमेश्वरानें असें मला येथें आणिलें तसेंच त्याच्या मनांत असेल तर तो मला येथून मुक्त करील; नाहींतर मारील. मी तूं म्हणतोस तसें राक्षसीकृत्य करूं ? मला तें शोभेल ? मित्रास तोफेच्या तोंडीं देऊन मी जाऊं ? लोक मला काय ह्मणतील आणि माझ्या हातून तरी तसें कसें होईल ? मी साफ सांगतों तुला येथें ठेवून मी जात नाहीं. ’

जयश्री ह्मणाला, ‘ प्रेमापुढें मनुष्याचा सारासार विचारही नष्ट होतो. उगांच वेळ दवडूं नको. तूं येथून चालता हो. अरे ! सेनापति माझें कांहीं करणार नाहीं. त्याचा राग काय तो तुजवर आहे. तूं येथून गेलास कीं, माझें संरक्षण झालेंच असें मी समजतों. आणि तुझेंही संरक्षण झालेंच. कदाचित् सेनापतीनें मला फांशीं दिलें किंवा ठार मारिलें तरी फारशी फिकीर नाहीं. कारण या जगत्संसारांत मी एकटाच आहें ! माझ्यामागें मजकरितां कोणी रडणार नाहीं. मला मूल ना बाळ. बायको ना बिऱ्हाड. तूं जिवंत असलास ह्मणजे राजपूतान्याचें यवनांच्या तडाक्यांतून संरक्षण कर ह्मणजे झालें आणि तूं करशील अशी माझी खात्री आहेच. आतां वेळ लावूं नको. लौकर नीघ. तूं असा वेळ दवडीत राहशील तर दोघांसही एकदम मरण्याचा प्रसंग येईल. माझें ऐक. आणखीही तुला सांगतों. तूं भलताच हट्ट धरून येथें राहशील तर तुला क्रीडा भेटेल कीं नाहीं हेंही माझ्यानें सांगवत नाहीं. मजवर उपकार कर आणि तावडतोब येथून चालता हो. ’

अनूपसिंह ह्मणाला, ' अरे ! मला असा मोहजालांत गुंतवूं नको. माझें मन पाहूं नको. कांहीं झालें तरी तुला येथें ठेवून माझ्यानें जाव-वत नाहीं; त्याला मीं तरी काय करूं ? माझा देखील नाइलाज आहे. तुला येथें ठेवून गेलों तर लोक माझ्या तोंडावर थुंकतील ! लोकांस तोंड दाखविण्यास मला मार्ग राहणार नाहीं. आपण दोघेही येथेंच राहूं किंवा दोघेही एकदम जाऊं. '

जयश्री ह्मणाला, ' माझी कर्मकथा ऐकण्यांत वेळ घालवायचा असेल तर स्वस्थ येथेंच रहा. नाहीं तर येथून चालता हो पाहूं ! माझी दशा मी सांगूं इच्छित नाहीं. एकाच्या जागीं दोघांनीं मरावें असें तुला वाटत असेल तर खुशाल येथेंच रहा नाहीं तर मी सांगतों तें ऐक. त्या द्वार-पालास आपल्या बरोबर ठार मारावें असें आणखी तुझ्या मनांत असेल तर होऊन जाऊं दे. काय बिचारा तो प्रामाणिक मनुष्य ! त्याचा तरी तूं घात करूं नकोस. तो मला आंत येण्यास परवागी देत नव्हता. त्याचीं मीं किती आर्जवें केलीं ? तीं तुला काय सांगूं ? त्याकरतां तरी तूं माझें ऐक. विनाकारण त्याचा तरी कुटुंबघात करूं नकोस. त्याला आपल्या बायकापोरांतून आणि मुलाबाळांतून उठवून यमसदनाचा मार्ग दाखवूं नकोस. '

अनूपसिंह गद्गद स्वरानें ह्मणाला, ' मी तरी काय करूं रे ' माझ्यानें तुझी शपथ येथून जाववत नाहीं. तुला येथें ठेवून मी एकट कसा रे जाऊं ? काय कठीण प्रसंग ! काय विचित्र दैवगती ! ! कसें करूं ? कसा जाऊं ? '

जयश्री उत्कंठित स्वरानें ह्मणाला, ' तुला इतकें सांगितलें तरी तुझा समज पडत नाहीं; काय हें आश्चर्य ! अरे ! तूं धर्माला साक्षी ठेवून धर्म-पत्नी ह्मणून जिचें पाणीग्रहण केलेंस. तिला अनाथ करणें— तिला रस्त्या-वरील कंगाल भिकारीण करणें किंवा सती दवडणें; तशांत तूं जिवंत असतांना ह्मणजे काय झालें ? काय हें शहाणपण ? असें करणें तुला अनुचित. तुझे बुद्धीचा माझ्या दैवासारखा असा अस्त झाला ? कोण जाणें ! तूं माझें ऐक. तूं आपल्या हातानें आपल्या शिरावर दगड घालून घेऊं नकोस. तूं आपल्या साध्वी स्त्रीच्या घातास कारण होऊं नकोस.

आणि तसें करण्याचा तुला अधिकारही नाहीं. मी स्पष्ट सांगतों.: तुला आपल्या प्रिय पत्नीकरतां–अरे ! दूध पिणाऱ्या लहान अर्भकाच्या पालन-पोषणाकरतां-मी सांगतों-तुझा खरा मित्र-अरे तुझ्या जिवास जीव देणारा मित्र हा जयश्री सांगतो ह्मणून तुला येथून जाणें भाग आहे. तूं होईल तितक्या त्वरेनें येथून गेला नाहींस तर मी खात्रीनें सांगतों कीं, क्रीडेची व तुझी भेट या लोकीं होणार नाहीं. तिला तुजकरतां मेलेली पहावी असें तुझ्या मनांत असेल– माझें ऐकावयाचें नाहीं असें तुझें मन तुला सांगत असेल– महाराण्याचा विध्वंस व्हावा असें तुझ्या मनांत असेल–आपणांस देशद्रोही असें लोकांनीं ह्मणावें असें तुला वाटत असेल— रजपुतांचा सर्व नाश करावा असें तुझ्या मनांत आलें असेल तर खुशाल तूं येथें रहा ! आणि मीही रहातों. काय हें अज्ञान. तुला सदसद्विचार कसा रे समजत नाहीं ? अरे ! तुझी धर्मपत्नी मृत झाली कीं, मातृहीन प्रताप कसा रे वाचेल ? तुला कोणाचीच दया येत नाहीं कशी ? विचार कर– मीं सांगतों तें ऐक. आपलाच हेका आणि तो अशा कठीण प्रसंगीं मुळींच खरा करूं पाहूं नकोस. तुला सर्व समजतें. मीं सांगितलें पाहिजे असा अर्थ नाहीं. सद्यस्थितीचा आणि भाविदशेचा विचार केला तर तुला येथून जाणेंच भाग आहे असें मी निक्षून सांगतों. माझें तुला ऐकायचें आहे कीं नाहीं बोल– यवनांच्या हातून मरायचें तें तुझ्याच पायांवर डोकें आपटून मी आत्मघात करून घेतों. इतकें तुला सांगितलें तरी तुझे ध्यानांत येत नाहीं कसें ? ”

अनूपसिंह ह्मणाला, “ सर्व ध्यानांत येतें. पण माझा पाय उचलत नाहीं त्याला मी तरी काय करूं ? ”

जयश्रीनें सांगितलें, “ तुला मी सोडवीन अशी प्रतिज्ञा करून आलों आहे. माझी प्रतिज्ञा शेवटास नेणें तुझें कर्तव्य होय. जर तूं माझा खरा मित्र ह्मणवितोस तर माझ्या हिताकरतां झटणें तुला भाग आहे. तूं माझ्या प्रतिज्ञेंत विघ्न आणूं नकोस. माझी प्रतिज्ञा शेवटास जाऊं द्यावयाची नाहीं असें तुझ्या मनांत असेल तर तूंही जाऊं नकोस आणि मीही जात नाहीं. तुझ्या मनाप्रमाणेंच क्रीडेचें व प्रतापाचें संरक्षण जगत्पिता आणि जगज्जननी करील ! काय हा दुराग्रह ! ”

अनूपसिंह ह्मणाला, ' ही मित्रत्वाची कमाल झाली ! आतां माझ्यानें कांहींच बोलवत नाहीं. आतां मी कसें करूं ? तें तूंच सांग. जयश्री, माझेकरतां तूं मरणार ? '

जयश्री ह्मणाला, ' कोणी मरत नाहीं अशीच ही युक्ति आहे. तूं माझी काळजी करूं नकोस. जितका लौकर तूं येथून जाशील तितकें माझें हित होईल. मी सेनापतीकडे संधी करण्याचें बोलणें लावीन. त्यांला लोभ दाखवीन; हजार ढंग करीन आणि माझे प्राण वाचविण्याचा प्रयत्न करीन. नाहीं तर तोंपर्यंत तूं सैन्य घेऊन ये आणि लढाई करून माझे प्राण वांचतील अशी तजवीज कर. मुकाट्यानें जा. '

पुन्हा त्यांनीं दृढालिंगन दिलें. दोघांचेही नेत्र पाण्यानें भरून आले. अनूपसिंहानें फकिराचा वेष चढविला आणि ह्मणाला, ' जगत्पालक परमेश, माझे मित्राचा सांभाळ तूंच कर. याची माझी भेट पुन्हा लौकर होईल अशी कृपा कर. जयश्री ! तुला सोडून माझ्यानें जाववत नाहीं. पण काय करूं ? आतां एकदां शेवटचें आलिंगन दे. '

जयश्रीनें अनूपसिंहास आलिंगन दिलें आणि सांगितलें, ' तुह्मी या यवनांच्या छावणींतून निर्विघ्न सुटका व्हावी अशी मी देवाची प्रार्थना करतों. जातां जातां तो द्वारपाल जागा असला तर त्याचे आभार मान आणि जा. क्रीडा तुला बहुतांशीं जंगलांत भेटेल. '

अनूपसिंह तेथून निघाला. द्वारपाल झोंपला होता. त्याला कोणी कांहींच विचारलें नाहीं. जयश्री जसा आला तसाच अनूपसिंह यवनांच्या छावणींतून निरापद निघून गेला.

जयश्रीनें अनूपसिंहाचा वेष धारण केला. आणि तो मनांत ह्मणाला. ' जगदीशा ! अनूपसिंह कोणत्याही प्रकारच्या संकटांत न सांपडतां सुखरूप शहरांत पोंचूं दे. क्रीडे तूं मला व्यर्थ कडु भाषणें बोललीस. तुला अनूपसिंह भेटेल तेव्हां माझ्या शुद्ध मनाची खात्री पटेल. असो, क्रीडेस सौभाग्यदान आणि अनूपसिंहास जीवदान देऊन मी कृतकृत्य झालों. पुढें काय होतें पाहूं. '

प्रकरण २० वें.

अपूर्व दर्शन.

इला हेमूच्या तंबूंत आल्यापासून नेहमीं सेनापतीचा धिःकार करी. त्यानें आपल्याशीं उद्दामपणाचें आचरण ठेवूं नये. आपलें सांगणें ऐकावें न्यायान्यायाकडे—कीर्तिअपकीर्तिकडे लक्ष द्यावें. लोक आपणास वाईट ह्मणणार नाहींत असें आपलें आचरण असावें असें तिच्या मनांत वागे आणि त्याप्रमाणें वारंवार ती त्याला सांगे. परंतु हेमूच्या स्वार्थी व दुराग्रही स्वभावापुढें तिचें कांहींच चालत नसे. बाहेरून ती हेमूशीं लग्न करण्यास आपण सिद्ध आहों असें दाखवी. परंतु, आपल्या कुलास कलंक लावावा असें तिच्या मनांत कधींच आलें नाहीं, तिचा नाइलाज होता ह्मणूनच ती तेथें राहिली होती. आई नाहीं बाप नाहीं अथवा कोणी आप्तेंचें मनुष्य नाहीं. हेमूनें आपला सर्व-प्रकारें घात केला. आपणही त्याचा सूड घेतला पाहिजे; अशाच इराद्यानें ती तेथें होती. तिचा स्वभाव फार रागीट होता. तरी स्वकार्यसाधनार्थ ती बहुतांशीं आपला राग आंवरून धरी. लढाईचा निकाल झाल्यावर दिल्लीस जाऊन मोठ्या थाटमाटानें सुंदरीशीं विवाह करावा असा हेमूचा हेतू होता. त्याच्या मनाचें समाधान व्हावें इतक्या करतांच ती मुसल-मानी पोषाख करी. तरी त्यांचा ती मनापासून तिरस्कार करी. अनूपसिं-हास सोडविण्याविषयीं तिनें होती तितकी खटपट केली. परंतु, तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं. त्यामुळें हेमूस ठार मारून त्याची मोक-ळीक करावी असें तिच्या मनानें घेतलें. हेमूकडे जरी तिचें सांगणें फारसें रुचत नसे तरी इतर सैनिकवीरांस तिचें फार भय वाटत होतें. हेमूस ठार मारिलें तरी यवनांच्या कचाट्यांतून आपली सुटका करून घेणें तिला जड वाटे. असो.

मध्यरात्र उलटून गेली. सुंदरीनें आपल्या तोंडावरून चादर घेतली आणि ती अनूपसिंह ज्या कारागारांत होता तेथें आली. द्वारपाळानें तिला पहांताच ओळखलें. तो उठून उभा राहिला. अनूपसिंह केव्हां येला? हें त्या बिचाऱ्यास माहीत नव्हतेंच. त्याच्या मनांत नानातरंग येऊं लागले.

न जाणों फकीर आणि अनूपसिंह एकाच स्थलीं अजून बोलत बसले नसतील कशावरून ? आणि कारागारांत कोणी आहे कीं नाहीं; याचीही त्याला दाद नव्हती. इलेस पहातांच तो फार भ्याला आणि आतां काय बोलावें हेंही त्याला सुचेना.

इला मनांत ह्मणूं लागली, 'ज्या कार्यसाधनाच्या उद्देशानें मी येथें आलें तें अन्यायी आहे ? माझ्या मनांत जें करावयाचें आहे तें कृत्य मी केलें तर मी निंदेस पात्र होईन ? लोकांत माझा दुर्लौकिक होईल ? कां व्हावा ? माझ्या बुद्धीला तर तसें दिसत नाहीं. मीं जर निष्कलंक येथें आहे तर लोक कांहींही ह्मणोत. अनूपसिंहास सोडवून त्याच्या हातून हेमूस ठार मारावें असा माझा हेतू. पण तो सिद्धीस कसा जातो ? अनूपसिंह माझें सांगणें ऐकेल ? ऐको न ऐको. आपलें काम तर आपण करूं. तो तरुण; मी तरुणी. तो सुंदर; मी सुंदरी. एकांतवासांत गेलें तर लोकनिंदेस पात्र होईन ? झालें तरी मी कांहीं त्याच्या स्वरूपास लुब्ध होऊन तेथें जात नाहीं. त्याच्याशीं विवाह करावा अशी माझी वासना नाहीं. मग लोकनिंदेची पर्वा मी कां करूं ? फुकटच्या तोंडानें लोक जर विनाकारण निंदा करूं लागले तर त्याला कोण काय करील ? जनाच्या तोंडावर कोण हात ठेवील ? आपण शुद्ध-मनानें वागावें ह्मणजे झालें. त्याला संकटमुक्त करण्याकरतां मी जात आहें. त्याला काळाच्या दाढेंतून सोडवावें. आणि हेमूचा प्राण घ्यावा इतकेंच माझे मनांत आहे. याशिवाय आणखी कांहीं पाप असेल तर ईश्वर साक्ष. मग मीं कां भ्यावें ? लोकनिंदेची शंका कां घ्यावी ? जो हेतु धरून मी येथें आलें तो निदान माझ्या मतानेंच कां होईना ? पण महान् आहे. हेमूनें माझा सर्वप्रकारें घात केला. त्याचा मोबदला मी केव्हां मिळवीन ? अनूपसिंहास काळस्वरूप हेमूच्या तडाक्यांतून सोडविलें तर रजपूतलोक माझी कीर्ति गातील. हेमूची राज्याभिलाषा निष्फल झाल्याशिवाय—त्याला ठार मारल्याशिवाय—माझ्या मनाचें समाधान होणार नाहीं." असा विचार करून ती द्वाररक्षकास विचारूं लागली, "अनूपसिंह येथेंच आहेना ?"

द्वाररक्षक नम्रतेनें ह्मणाला, "होय."

सुंदरीनें सांगितलें, ' बरें तर मी त्याला भेटून येतें. '

द्वाररक्षक ह्मणाला, ' ' अशी बाईसाहेबांची मर्जी. '

सुंदरी आंत गेली आणि ' अनूपसिंह ! अनुपसिंह ' अशा हळूच हांका मारूं लागली.

जयश्री ह्मणाला, ' कोण आहे '

सुंदरीनें सांगितलें, ' मी इला. मला तुह्मीं ओळखलें नाहीं. '

जयश्री ह्मणाला, ' नाहीं. '

सुंदरीनें सांगितलें, ' मी तुमच्या मुक्ततेसाठीं सेनापतीस मर्वा किती सांगितलें. शिवाय भोजनाचें ताट पाठविलें तें मींच. '

जयश्री ह्मणाला, ' असेल. तें मला कांहीं माहीत नाहीं. '

सुंदरी आश्चर्यानें म्हणाली, ' तर तुह्मीं कोण ? '

जयश्री ह्मणाला, ' मी एक कैदी आहें. '

इलेनें विचारलें, ' तुझें नांव ? '

जयश्रीनें सांगितलें, ' जयश्री. '

सुंदरी विचारमग्न होऊन ह्मणाली, ' अनूपसिंह कोठें आहे ! '

साशंक होऊन जयश्रीनें सांगितलें, ' तो गेला ! '

सुंदरी ह्मणाली, ' खरोखरच तो गेला. त्याला तेथून कोणी पाठविलें ? आणि तुह्मीं येथें कसे आलां ? '

जयश्री बेपर्वाइनें ह्मणाला, ' जसा मी आलों तसाच तो गेला. ' असें जरी त्यानें सांगितलें तरी ही कोण काय ? ही येथें कां आली ? याचा आपण नीट शोध केल्याशिवाय बेपर्वाईनें जबाब दिला असें त्यास वाटलें. न जाणो, ही स्त्री सेनापतीची कोणी आप्त असेल आणि अनूपसिंह गेला अशी त्याला खबर सांगेल तर तो आतांच त्याला पकडण्याची हरतऱ्हा करील. अनूपसिंह इतक्यांत छावणीबाहेर गेला असेल नसेल ! आतां या स्त्रीस येथेंच कांहीं वेळ अडवून ठेवावी असें मनांत येऊन त्यानें सुंदरीचें दोन्ही हात धरिले आणि ह्मटलें, ' मला क्षमा करा. मीं कोणत्याहीप्रकारच्या दुष्ट वासनेनें तुमचें हात धरिलें नाहींत. वास्तविक पाहिलें तर यासमयीं तुमचे पाय धरणें रास्त होईल. तुह्मीं

'कोण ? आणि येथें कां आला ? तें सर्व मला सांगाल तर मी अनूपसिंहाचें सर्व वर्तमान तुम्हांस सांगेन.'

सुंदरी गंभिरपणें ह्मणाली, 'मी हिंदु आहें. माझ्याविषयीं तुम्हीं भलतीच शंका घेऊं नका. माझ्या मनांत अनूपसिंहाचें नुकसान करावें असें असेल तर तुम्हीं माझे हात किंवा पाय धरून काय होणार? पण नाहीं. त्याचें अनहित व्हावें असें माझ्या मनांत बिलकुल नाहीं.'

जयश्री ह्मणाला, 'तुम्हीं हिंदु ह्मणवितां तर तुमचा यवनी पेहराव कसा?'

सुंदरी उदासीनतेनें ह्मणाली, 'ती कर्मकथा फार लांब आहे. मला हेमूनें धरून आणिली आहे. आणि माझ्याशीं लग्न करावें असा त्याचा हेतू आहे.'

जयश्री आश्चर्यचकित होऊन ह्मणाला, 'तुम्हीं त्याशीं लग्न लावणार?'

सुंदरी ह्मणाली, 'नाहीं. तुम्हीं कोण तें प्रथम सांगा ह्मणजे मी सर्व सांगेन.'

जयश्री ह्मणाला, 'मी प्रथमतः सांगितलें तें सर्व खरें.'

सुंदरी साशंक ह्मणाली, 'काय अनूपसिंह फरारी झाला? त्याला तुम्हीं सोडविलें?' असे ह्मणत तिनें जयश्रीच्या हातांतून आपला एक हात झटकन काढून घेतला आणि कट्यार घेऊन ती त्याच्या छातीवर ठेवून ह्मणाली, 'बोल खरें सांग. त्याच्या बद्दला तूं येथें राहिलास? कोण तूं?'

जयश्री धीरतेनें ह्मणाला, 'अशा लक्षावधी कट्यारी माझ्या छातीवर आल्या तरी मी त्यांची पर्वा करीत नाहीं. उद्यां मरायचें तें आज. ही कट्यार तुम्हीं माझ्या छातींत मारा आणि आपला उद्देश सफल करा. मित्रकार्य होऊन माझे प्राण गेले तरी चिंता नाहीं—सर्व लोक माझी कीर्ति गातील. मींच अनूपसिंहास येथून पाठविलें आणि त्याच्या जागीं मी राहिलों. मला जयश्री ह्मणतात.'

सुंदरी शांततेनें ह्मणाली, 'भिऊं नका. अनूपसिंहाचे मित्र आणि रजपुतांचे सेनापति जयश्री ते तुम्हींच?'

जयश्री म्हणाला, 'असें खरें, पण आतां हेमूचा कैदी आहे!'

सुंदरी ह्मणाली, 'हेमूचे ह्मणण्यापेक्षां तुम्हीं आपल्या मित्राचे प्राण

बांचविण्याकरतां स्वतःच कैदी बनला आहां असें कां ह्मणाना ? अनूप-सिंहाचें आणि तुमचें इतकें मित्रत्व आहे कीं, तुह्मीं त्याकरतां मरावयास सिद्ध झाला ! शाबास ! बरें, मी तुमच्या मित्रास सोडविलें तर ! '

जयश्री ह्मणाला, ' काय ? तुह्मीं नवनीत कोमलांगि यवनी ? अपरिचितारमणी ? आश्चर्य ! तुह्मीं सोडवितां तर तुमची कीर्ति जगांत गाइली असती. पण तुमच्या हातून असें कसें होईल ? '

सुंदरी म्हणाली, ' कां बरें ? यवनांत कां होईना ? असा परोपकारी, दयाळु, परदुखानें दुःखित होणाऱ्या स्त्रिया नसतात असा तुमचा समज आहे ? '

जयश्री ह्मणाला, ' असेंच केवळ नव्हे. '

सुंदरी ह्मणाली, ' मला वाटतें तुह्मांस स्त्रियांच्या स्वभावाची फारशी माहिती नसेल. '

जयश्री ह्मणाला, ' स्त्रिया ह्या अमृत आहेत; आणि विषही आहेत असा माझा समज आहे. '

सुंदरी उत्सुकतेनें ह्मणाली, ' बरें, मीं तुह्मांला या बंदीवासांतून सोड-विलें तर तुह्मीं मजविषयीं काय तर्क कराल ? '

जयश्री साशंकतेनें ह्मणाला, ' तुह्मीं कोणत्या अभिप्रायानें मला सोडवूं इच्छितां हें समजल्याशिवाय मी काय सांगूं ? '

सुंदरीनें आपल्या हातांतील कट्यार जयश्रीकडे देऊन आग्रहानें सांगितलें, ' ही कट्यार घ्या आणि मजबरोबर चला. मी तुह्मांस हेमूच्या तंबूंत नेते. तो स्वस्थ घोरत पडला आहे. जो मनुष्य तुमचा व तुमच्या जातीचा कट्टा दुश्मन; जो तुमच्या देशाची राखरांगोळी करावयास तयार; जो तुमच्या सर्व नाशास टपलेला; त्याला दयामाया, न्याय नीति बिलकुल समजत नाहीं. त्याच्याही छातींत खुपसा. '

जयश्री ह्मणाला, " मी तुमचा मतलब समजलों. त्यावरून त्यानें तुह्मांशीं कांहीं तरी अनुचित वर्तन केलें असेल असें दिसतें. "

सुंदरी ह्मणाली, " अहो ! मी उदयपूरच्या माधवराव पेशव्यांची कन्या. या चांडाळानें मला पकडून आणिली. मी येथें महत् संकटांत आहें. त्याच्याशीं गोडगोड बोलून काळाचे दिवस कंठीत • आहे. जसा त्यानें

'माझा घात केला तसाच त्याचाही आपण करावा; अशा इराद्यानें मीं येथें वास्तव्य केलें आहे. अनूपसिंहास सोडा असें मीं त्याला सांगितलें. तो माझें ऐकेना. त्याला सोडण्याकरतां मी इकडे आलें. अनूपसिंहाच्या हातून हेमूस ठार मारावें अशा उद्देशानें मी येथें आलें होते. तो गेलाच. आतां तुम्हीं तरी तें काम करा आणि माझी मुक्तता व तुमचेंही दुःख कमी करा.'

जयश्री ह्मणाला, 'तुम्हीं माधवराव पेशव्यांची कन्या! गेला बिचारा! राजकारणचतुर आणि पराक्रमी पुरुष गेला!'

सुंदरी ह्मणाली, 'माझ्या सर्व घातास हा दुष्ट हेमू कारण.'

जयश्री ह्मणाला, 'काय ह्मणतां? आतां ही कट्यार घेऊन मी त्याचा प्राण घेऊं!'

सुंदरी ह्मणाली 'काय हरकत आहे? त्यांत इतका विचार कसला? अनूपसिंह त्याच्या हातीं सांपडला तेव्हां त्याला तो ठार मारणार होता कीं नाहीं? आतां तुम्हीं सांपडलां आहां तुम्हांस तो सोडील? नाहीं; कधीं सोडणार नाहीं. चला—माझ्या बरोबर या.'

जयश्री ह्मणाला, बंदीवान, निःशस्त्र आणि झोंपलेला यांस मारूं नये असा आमचा नियम आहे.'

सुंदरी ह्मणाली, 'तुमचे नियम तुमच्याकडे! त्यांचा येथें कांहीं उपयोग होणार नाहीं. त्या स्वार्थांधाला काय? तो पापी आहे. तो अधमाधम. त्याला कशाही स्थितींत ठार मारिलें तरी पातक नाहीं. तो अपराध होईल असें मनांत देखील आणूं नका. दुष्टांचा वध आणि सज्जनांचें पालन करण्यांतच पुण्य आहे.'

जयश्री ह्मणाला, 'अनुचित व अन्यायोपायांनीं स्वप्राण रक्षण करणें ह्मणजे तरी पातकच! झोंपलेल्यावर आपण कधीं शस्त्र उचलणार नाहीं. खोटीं कर्मे करून धर्मशाळा बांधिल्या आणि लोकांचीं घरें दारें लुटून देवमंदिरें बांधलीं ह्मणून पुण्य लागणार नाहीं.'

सुंदरी निर्धास्तपणानें ह्मणाली, 'त्याला जागे करून मारा. पण ही फुकटची चालून आलेली संधी दवडूं नका. तुम्हांला भीति वाटत असेल तर मी तें काम शेवटास नेईन.'

जयश्री ह्मणाला, 'तुमच्या एकंदर स्थितीवरून तुम्हीं तें घोर कृत्य

करण्याची प्रतिज्ञाच केली आहे असें दिसतें. काय भयंकर प्रतिज्ञा! तशांत स्त्रीकडून! आश्चर्य!'

इला ह्मणाली, 'त्याकरतांच मी मुद्दाम येथें राहिलें. मी यवनी पोषाख करतें तो इतक्याचकरतां. त्याच्याशीं गोडीगुलाबीनें वागतें ती तरी कां? आपली प्रतिज्ञा शेवटास जावी इतक्याचकरतां.'

जयश्री ह्मणाला, 'अशा सुंदरीचे रमणीय हस्त यवनरक्तानें आरक्त होणें चांगलें नव्हे. तें काम पुरुषाचेंच! आह्मी काय पाहिजे तें करूं.'

सुंदरी ह्मणाली, 'तर मग या. वेळ लावूं नका. चला माझे मागून. जातां जातां त्या पहारेवाल्यास ठार मारा. नाहींतर तो आकांत करील.'

जयश्रीची वीरश्री खचली. तो निरुत्साहानें ह्मणाला, 'ही तुमची कट्यार घ्या. मी पहारेवाल्यास कधीं ठार मारणार नाहीं. कारण त्या थोर मनाच्या पुरुषानें मला येथें येण्याची परवानगी दिली. त्यानें मजवर महान् उपकार केला. त्याच्या उपकाराचा मोबदला माझा प्राण गेला तरी मी अशा रीतीनें देणार नाहीं. असें नीच कृत्य कोणी करावें?'

सुंदरी ह्मणाली, "बरें, त्याची व्यवस्था मी करीन." असें सांगून ती द्वाररक्षकाजवळ आली आणि त्याच्या कानांत तिनें कांहीं सांगितलें. द्वाररक्षकानेंही मान हालवूनच तिला उत्तर दिलें.

जयश्री आणि सुंदरी कारागारांतून बाहेर आलीं. इला पुढें आणि जयश्री तिच्या मागोमाग जात होता. दोघांचींही मनें साशंक होतीं. दोघेही हेमूच्या तंबूकडे चाललीं.

प्रकरण २१ वें

शत्रु आणि मित्र.

मध्यरात्र उलटून गेली. कृष्णवस्त्र परिधान केलेल्या रात्रीनें जिकडे तिकडे आपल्या वस्त्राची छाया पाडिली. अवघें जग निद्रावश झालें. दिवसभर लढाईसारख्या भयंकर संकटांत अतिक्रांत झाल्यानें यवनांच्या छावणींत कोणाच्याही मनास असावी तशी उमेद नव्हती. यवनांच्या

परांभवाबरोबरच त्यांचे कीर्तीचाही लोप झाला. शेंकडों मनुष्यें ठार झालीं. कित्येक लोक जखमी झाले. जे लढाईत पडले त्यांचें सगे-सोयरे व इष्टमित्र दुःख करतां करतां झोंपीं गेले होते. कित्येक जखमी कण्हत कुंथत पडले होते. असे हजारों लोकांचे हजारों प्रकार होते. तरी त्यांतच निद्रादेवीनें आपल्या विस्तीर्ण अंगावर सर्वांस झोंपण्याची सवड करून दिली होती. जिकडे तिकडे शांत दिसत होतें. तरी मधून मधून कुत्रीं उगीच किंकाळून किंवा भुंकून शांततेचा भंग करीत. पहारेवाले व गस्त घालणारे लोक ओरडून छावणींतील लोकांस सावध करीत. मध्येंच केव्हां केव्हां पांच दहा लोकांची टोळी येऊन छावणींत शिरे.

हेमूच्या तंबूत एक दिवा जळत होता. जिकडे तिकडे चिलखतें, बंदुका, तरवारी वगैरे युद्धोपयोगी हत्यारें लटकत होतीं. एका चौरंगावर कुराणाचें पुस्तक होतें. हेमू निद्रावश होता. खरोखर लोक कांहीं ह्मणोत पण झोंप ही ईश्वराची एक अमोलिक देणगी आहे. तिच्या स्वाधीन झालें कीं, दिवसाच्या बहुतेक श्रमांचा परिहार होतो. कित्येकांस झोंपेसाठीं नवस करावे लागतात. कित्येकांचें अंग अंथरुणास लागण्याची खोटी. कित्येक लोक झोंपेंत जे अनेक उद्योग करितात त्यांस सीमाच नाहीं. त्या बिचाऱ्यांच्या दिवसा भानगडी कमी पण झोंपेत ते जगाची उलटापालट करितात. कित्येक लोक दिवसा केलेली कृति झोंपेंत स्पष्ट बोलून दाखवितात. कित्येक आपले मानसीक उद्देश— जे त्यांना दिवसा कापले तरी बोलावयाचे नाहींत ते— सांगूं लागतात. कित्येकांस झोंपेंत चोरी करावयाची संवय असते. कित्येकांचे अंगविक्षेप इतकें विचित्र असतात कीं, सांगतां सोय नाहीं. कित्येक काळासारखे दांत खात असतात. कित्येक राक्षसासारखे हातपाय ताणून घोरत पडतात. कित्येक प्राणोत्क्रमणाचें वेळच्या भयंकर घोरासारखे बेसूर घोरतां घोरतां मध्येंच थांबतात. कित्येकांची झोंप इतकी सावध असते कीं, ते झोंपले असें ह्मणणेंही कठीण पडेल. कोठें कांहीं बारीक आवाज झाला कीं, ते हटकून काय झालें? असें विचारण्यास तयार. कित्येक झोंपले कीं, त्यांस कापलें तरी शुद्ध नसते. जितक्या प्रकृति तितक्या विकृति. सांगायचें काय आणि सोडायचें काय?

सुंदरी आणि जयश्री आपली चाहूल कोणास समजूं न देतां हेमूच्या

तंबूंत दाखल झाली. हेमू घोरत पडला होता. त्याच्या मनांत अनेक तरंग येत होते. सुंदरीचा निश्चय ठरलाच होता. जयश्रीचा चेहरा उग्रमपूर्ण होता. तो हेमूच्या पलंगाजवळ गेला आणि त्याच्या तोंडाकडे पहात तटस्थ राहिला. एकाएकीं त्याचें मन कसें बदललें ? कोणजाणें ! हेमू जरी झोंपला होता तरी त्याचें मन जागृत होतें. तो झोंपेंतच बडबडूं लागला. ' छीः छीः दयेचें आमच्या छावणींत नांव नको. मी मेलों तरी कोणावर दया करणार नाहीं—लोक मला म्हणतील—पण म्हणेनात. निर्दय—चालेल—कोण त्यांची पर्वा करतो. जो न सांपडणारा; जो बलिष्ट; ज्यानें आमचे शेंकडों लोक ठार मारिले—माझ्या अपकीर्तीला जो कारण झाला. तो कसा कां होईना, आमच्या हातीं सांपडला असतां त्याला मी सोडीन ? ही आशाच नको. मी त्या दुष्टाचें काळीज फोडीन. त्याच्या नरडीचा घोट घेईन. शिपाई लोकहो, सावध रहा—हुशार—त्याला घेरा घेऊन रहा. सुंदरीची कोण पर्वा करतो ? ती आपल्या ताब्यांत आहे. पाहिजे तेव्हां तिजवर जबरदस्ती करूं—दया नको. त्याला खेंचून बांधा—ओरडूं दे—दया नको. काय सांगतां ? आलें तुमच्या ध्यानांत—चढवा, फांसावर चढवा मला डोळेभर पाहूं द्या. त्याचें प्रेत कावळ्याकत्र्यांना फाडूं द्या. त्याचें शीर भाल्याच्या टोंकास लावून फिरवा. थुंका त्याच्या तोंडावर .... थू. '

इला म्हणाली ' ऐकले त्या दुष्टाचे विचार. आतां वेळ लावूं नका. होईल तितक्या लौकर आटपा. लौकर तितकें चांगलें. '

जयश्री म्हणाला, ' आतां तुम्ही आपल्या तंबूंत जाल तर बरें. कारण, तुम्हां स्त्रियांचें मन कोमल असतें असें सांगतात आणि हें कृत्य फार घोर आहे. हें तुमच्यानें पहावणार नाहीं. '

सुंदरी म्हणाली, ' आतां माझें मन मी वज्रापेक्षांही कठोर केलें आहे. मला कांहींच वाईट वाटणार नाहीं. काळाचीही भीति वाटणार नाहीं. त्याला ठार मारून तुम्ही येथून गेला कीं, मी मोकळी झालें. पण तुम्हीं सांगतांच तर मी जातें. आतां वेळ लावूं नका. '

जयश्री म्हणाला, ' हा आतां माझ्या तावडींत सांपडला आहे. तुम्हीं खुशाल चला. याला ठार करतों आणि मी जातों. तुमचें या कामीं मला

सहाय आहे किंवा या निष्ठुर कृत्यांत तुमचें अंग आहे असें मी कोणा-लाच समजूं देत नाहीं. चला तुम्ही. '

सुंदरी कांहीं बोलली नाहीं. ती आपल्या तंबूकडे ह्मणून गेली. जयश्री आपल्याशींच विचार करूं लागला. " आज आमचा प्रबल शत्रू आह्मांलोकांवर जुलूम करणारा—आमच्या पवित्र स्त्रियांचें पातिव्रत्य नष्ट करणारा ; आमच्या देवमंदिरांची राखरांगोळी करणारा; आह्मांलोकांच्या घरांद्वारांवर नांगर फिरवून मीठ पेरूं पहाणारा नराधम; आमचा कट्टा वैरी यासमयीं माझे हातीं आहे. इतका वेळ मी त्याचा कैदी होतों. पण आतां त्याचे प्राण माझ्या हातीं आहेत. मला वाटेल तर मी येथल्या-येथें ह्याला ठार मारीन. काय करूं ? काय आश्चर्य ? ज्याचें मन पाप-कर्दमानें लिप्त त्याला सुखानें निद्रा येत नाहीं ह्मणतात; परंतु काय असेल तें असो. "

इतक्यांत हेमूच्या चेहऱ्यावर एकाएकीं दैन्य दशा दिसूं लागली. तेव्हां जयश्री ह्मणाला, ' काय ? याचा प्राणांतसमय आला हें याला समजलें ? अरेरे ! याचें सर्व शरीर कांपूं लागलें. असें कां व्हावें ? मला तर भ्रम झाला नाहीं ? माझें चित्त ठिकाणावर आहे ? आहे; मग हें काय ? पातकी जन झोंपेंत असोत किंवा जागृतावस्थेंत असोत; त्यांचें मन कधीं समाधानी असावयाचें नाहीं. त्यांच्यामागें नेहमीं तळमळ. '

हेमू पुन्हा झोंपेंत बरळूं लागला. " कोण आहे ? मलकूल ? सोतया सैतान ? हूं—हूं—हूं. अरे निर्दय ! माझें काळीज कां फोडतोस ? अरे माझ्यानें सोसवत नाहीं. दया कर—मला प्राणदान दे. नाहीं ? " असें ह्मणत त्यानें रागानें दांत चावले. आणि तो पुढें काय बडबडला तें समजलें नाहीं.

जयश्री स्वगत ह्मणाला, ' मनुष्याची तरी उच्चपदाभिलाषा फार जबरदस्त. दुसऱ्यास आपल्या पायाखालीं तुडवावें; दुसऱ्याचा घात करावा; याला ठार मारावें; आणि हरतऱ्हेनें स्वार्थ साधावा हीच ज्यांची वासना त्यांस मी हात जोडून सांगतों, माझ्यामागून या आणि पहा. स्वार्थी किंवा पापी प्राणी कधीं सुखानें झोंपत नाहींत. त्यांना कधीं सौख्यनिद्रेचें नांव माहीत नसो. त्यांनीं दुःखमूलक पापयंत्रणेंत आला काळ

पाळण्याचा हाच ईश्वरी संकेत. बरें पण मी येथें कोणत्या कामास आलों ? आणि कसले विचार करीत राहिलों ? आतांच्या आतां या दुष्टाच्या छातींत ही कट्यार मारूं ? याला ठार करूं ? छी: ! काय करूं ? असें दुष्ट कृत्य कर असें माझें मन मला सांगत नाहीं. याचे प्राण वांचविले तर आपले प्राण कसे वांचतील ? काय संकट ! माझें मस्तक भडकून गेलें. अंगावर रोमांच थरारले. नेत्र ताउले. त्यांतून क्रोधाग्नीच्या ज्वाळा भडकूं लागल्या. एकदां वाटतें, याचा एकदम प्राण घ्यावा—एका लत्ताप्रहारानें याला जमिनींत गाडावा—या कट्यारीनें याची मान कापून धड आणि शीर फेंकून देऊन रक्ताचा सडा घालावा. पण हा खून ! हा सूड नव्हे. ओढूं, याला मंचकावरून ओढूं ! उलथा पालथा पाडून याचे छातीवर पाय देऊं ? या कट्यारीनें याचे प्रथम नेत्र फोडूं ? नको, याचे हात आणि पाय प्रथम कापून काढतों. मग याच्या देहाचें खिरडें बनवूं. ओढूं खालीं ? तुझें कंठनाळच प्रथम चिरून टाकतों. एकदम तुझ्या नरडीचा घोट घेऊं ? पहातां पहातां तुझे राई एवढे तुकडे तुकडे करून टाकूं ? तुझा कसा प्राण घेऊं ? चांडाळा ! तुझें कसें टाळकें फोडूं ? उन्मत्त झालास ? चल उठ—मरायला तयार हो. चल उठ.'

असें ह्मणत त्यानें हेमूचे हात धरून त्याला एकदम पलंगावरून खालीं ओढिलें. तेव्हां हेमू जागा झाला. त्याबरोबर जयश्रीनें त्याला पुन्हा उलथा जमिनीवर पाडला आणि छातीवर गुडघा ठेवून डाव्या हातानें त्याची मान धरिली आणि उजव्या हातानें कट्यार उगारून तो ह्मणाला, 'हेमू ! सावध झालास ? आतां तुला ठार मारतों. बोल सावध आहेस ? मारूं ही कट्यार ?'

हेमूची बोबडीच वळली. त्याच्यानें एक शब्दही बोलवेना. काळस्वरूप जयश्रीस पहातांच त्यानें पुन्हा नेत्र मिटले. आणि आपले प्राण वांचविण्यास कोणी तरी सहाय्य करावें ह्मणून तो 'पहारे—वाला !' असें अडखळत बोलला. परंतु त्याचा शब्दोच्चार स्पष्ट झाला नाहीं आणि तो कोणीं ऐकिलाही नाहीं.

हेमू ओरडूं लागतांच जयश्रीनें अर्धचंद्र प्रयोगास थोडासा जास्त

जोर दिला आणि सांगितलें, ‘ चुप रहा ! खबरदार ओरडलास तर ! कोणी येथें येण्यापूर्वींच ठार मारीन. ’

जयश्रीचें भाषण ऐकतांच, हेमूची पांचावर धारण बसली. तो अगदींच भांबावला. आतां काय करावें ? हेंही त्याला सुचेना. हा प्रकार आहे काय आणि झाला कसा ? हेंही त्याच्या ध्यानांत येईना. तो दिग्मूढासारखा जयश्रीकडे पहात कांहींवेळ स्वस्थ राहिला आणि नम्रतेनें विचारूं लागला, ‘ तुह्मीं कोण ? येथें कां आलां ? तुमचा इरादा काय ? ’

जयश्री ह्मणाला, ‘ तुझा कट्टा शत्रु जो जयश्री तो मी. मला तूं ओळखलें नाहींस ? तुला ठार मारावें—आमचा एक जबरदस्त शत्रू ठार मारावा ह्मणून मी येथें आलों समजलास ? तूं झोंपला होतास. तशा स्थितींत तुला ठार मारावें हें आमच्या धर्मांत फार निंद्य मानलें आहे; सबब तुला जागें केलें. आतां तुला कोणाचें स्मरण करावयाचें असेल तर कर आणि मरणास तयार हो. ’

हेमू ह्मणाला, ‘ मी तुमच्या पायां पडतों. मला जीवदान द्या. असें घातक्यासारखें मारणें तुह्मा रजपुतांस शोभत नाहीं. हा तुमचा स्वभाव नव्हे. तुह्मी उदार मनानें माझे प्राण वाचवा. मी तुमच्या बंधूप्रमाणें आहे. असे हाल करून मला मारूं नका. यावेळीं तुह्मीं माझे पालक आहां. मजवर कृपा करा. ’

जयश्री बेपर्वाईनें ह्मणाला, ‘ कां तुजवर दया करावी ? तुझ्या तडाक्यांत असा कोणी रजपूत सांपडता तर त्याला तूं सोडतास ? नाहीं. तुझ्या मनांत बिलकुल दया आली नसती. मग आह्मींच कां करावी ? ’

हेमू नम्रपणानें ह्मणाला, ‘ मला क्षमा करा. तुह्मीं सांगाल तें मी ऐकेन असें वचन देतों. आजच्या लढाईंत आमचा सर्व प्रकारें मोड झालेला आहे. उद्यां मी येथून तळ उठवितों. पुन्हां तुमच्या प्रांतांत पाय ठेवणार नाहीं. मी निःशस्त्र आहें. ’

जयश्री धैर्यानें ह्मणाला, ‘ ठीक आहे. घे तुला यांतील पाहिजे तें हत्यार आणि युद्धाची धमक असेल तर उभा रहा. ’ असें ह्मणून तो हेमूच्या छातीवरून उठला. तेव्हां हेमू जमिनीवर उठून बसला.

हेमू आर्जवानें ह्मणाला, ' मला आतां द्वंद्वयुद्धाचीही उमेद नाहीं. युद्धाविषयीं तुह्मीं माझी शिकस्त केली. माझा पराभव झाला. माझे प्राण वांचवा, हीच माझी प्रार्थना. मेलेल्यावर वार करणें तुमचें शील नव्हे. हें पहा मी तुमच्या पायावर डोकें ठेविलें. मला पदरांत घ्या. मला माफ करा. ' असें ह्मणून त्यानें जयश्रीच्या पायांवर कपाळ ठेविलें.

जयश्री ह्मणाला, ' पायां पडून कांहीं होत नाहीं. मी सांगितलेलें ऐकेन अशी कुराणाची शपथ वहा. '

हेमू लीनतेनें ह्मणाला, ' तुह्मी मला प्राणदान दिलें तर तुह्मीं सांगाल तें ऐकेन. त्यांत कधीं अंतर करणार नाहीं. असें कुराणाची शपथ वाहून सांगतों. पीराची शपथ. पैगंबराची शपथ. '

जयश्रीनें सांगितलें, " तुला ठार मारावें असें माझ्या मनांत असतें तर तूं सावध झालास तेव्हांच तुला ठार केलें असतें. तुला कोण आणि काय हें विचारावयासच फुरसत दिली नसती. पण नाहीं. तुला मी असा मारणार नाहीं. लढाईच्या मैदानांतच तुझें आमचें काय काय होणार तें होवो. ही पहा कट्यार फेंकून दिली. तुमच्या सारखा आमचा स्वार्थी किंवा मतलबी स्वभाव नाहीं. तूं झोंपेंत होतास तेव्हांच तुझी मान कापून मी जातों तर तूं काय करतास ? हेमू, तुला मी विचारतों तें खरें सांग ? आतां तूं माझा मित्र आहेस. '

हेमू नम्रतेनें ह्मणाला, ' मी तुमचा ऋणि आहे. तुमचे उपकार मी जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. '

जयश्री गांभिर्यानें ह्मणाला, ' तुह्मां लोकांचें किंवा प्रत्यक्ष तुझें कोणत्या रजपुतानें कधींतरी कांहीं नुकसान केलें होतें ? नाहीं. मग तुह्मींच आह्मांस इतकें कां छळतां ? कोणत्याही यवनाचे कबजांत एखादा रजपूत सांपडला आणि त्यानें त्याचे हाल केले नाहींत असें झालेलें तूं कधीं पाहिलें किंवा ऐकिलें असशील तर सांग ? तो अपराधी असो वा नसो. त्यानें ठार मरावें तरच तुमच्या तडाक्यांतून सुटावें ! काय हा स्वभाव ? तुह्मां लोकांस जात्याभिमान फार असतो. ज्या लोकांस तुह्मी काफर किंवा असभ्य समजतां त्यांचेच हे तुजवर उपकार आहेत. पहा ते शत्रूवर देखील अशी दया करतात. '

हेमू दीनतेनें ह्मणाला, ' मी तुमचा सर्वप्रकारें आभारी आहें. तुह्मीं मला जीवदान दिलें. तुमचे उपकार मी मानीन तितके थोडे. मी तुमचा दास आहें ! बंदा गुलाम आहें. '

जयश्री आणि हेमू इकडे बोलत होते पण तिकडे सुंदरीचें मन चंचळ झालें होतें. ती तंबूपासून जवळच राहून त्यांचें भाषण ऐकत होती. ती हेमूच्या तंबूंत आली आणि पाहूं लागली. तेव्हां जयश्रीनें आपलें, काम अद्यापि आटोपलें नाहीं. हेमू जीवंत आहे आणि दोघांचेंही संभाषण शांत मनानें चाललें आहे असें पहातांच तिच्या अंगाची आग झाली. ती ह्मणाली, ' काय आश्चर्य हें ? मीं ह्मटलें, यानें आपलें काम केव्हांच आटोपलें असेल ! मी तुमचा प्राण वाचवीन आणि तुमच्या हातून जें काम करून घेणार अशी उमेद धरिली ती सफाई फुकट गेली ! जयश्री ! भिञ्यासारखा तेथें काय बोलत बसला आहेस ? मला काय सांगितलेंस आणि हें करतास काय ? तूं शुद्धींत आहेस ? मला काय सांगितलें तें तुझ्या स्मरणांत आहे ? मला हें काम मुळींच जड नव्हतें. माझ्या हाताचा मळ होता. केव्हांच काढून टाकला असता. '

सुंदरीची उग्रमूर्ति आणि रागीट भाषण ऐकतांच, हेमू आश्चर्यचकित झाला. त्याला तिच्या भाषणाचें तात्पर्य कांहींच समजेना. जयश्रीचा आणि सुंदरीचा परिचय कोठला ? ती, त्याला दरडावून सांगते आहे हें काय ? अशा घोंटाळयांत पडून तो ह्मणाला, ' प्यारी ! तुझें काय बिघडलें ? अशा अवेळीं तूं इकडे कां आलीस ? '

सुंदरी स्पष्ट कांहींतरी बोलेल म्हणून जयश्री म्हणाला, ' तूं जा, माझ्या ध्यानांत सर्व आहे. तूं जा—येथें राहूं नकोस. माझें ऐक. '

हेमू साशंक म्हणाला, ' तुह्मांस ही काय सांगत आहे ? '

जयश्री अनास्थेनें ह्मणाला, ' ती काय बडबडली कोण जाणें ! तिच्या प्रलापवाक्यांत अर्थ कसला आणि विचार कसला ? '

जयश्रीनें आपलें काम केलें. पण सुंदरी किती रागीट ? तिनें साभिमानानें खाडकन् सांगितलें, , छीः छीः आतां तें नांव नको. मी थेथून हालणार नाहीं. इतके दिवस धुमसत असलेला क्रोधाग्नि आज भडकला.

जी गोष्ट गुप्त होती ती उघडकीस आली आतां काय ? मीं येथून जात नाहीं आणि हे प्राण देखील ठेवित नाहीं. आतां माझा विचार कायम ठरला. मला कोणाचीच आतां पर्वा नाहीं. मी कोणाला भिणार नाहीं. या दुष्टास तुह्मीं या जगांतून उठवाल–तुह्मीं याला ठार माराल ह्मणून मीं विश्वासानें जी कट्यार तुमच्याकडे दिली आणि तुह्मीं या दगलबा-जाशीं खलबतें करीत बसलां ? झालें काय तुह्मांला ? कां बायकासारखे भितां ? तुह्मी हातांत कंकणें घालून आलां आहां काय ? तुमच्या हातांत वीरकंकण नाहीं ? माझ्यासारख्या अबलेनें हें काम हां हां ह्मणतां तडीस लावलें असतें. पण तुह्मीं मला खात्रीनें सांगितलें. तुमच्या वचनावर मी विश्वास ठेविला. ह्मणून माझा असा घात झाला. माझ्या आत्मघाताच्या पातकाचे आधिकारी तु... आहां. तुह्मीं माझा सर्व नाश केला. नाहीं तर याची केव्हांच मान कापून मी मोकळी झालें असतें. माझें कार्य साधावें एतदर्थ मीं दुःख गिळून येथें दिवस काढिले ज्याचें काम त्यानेंच करावें हें खरें. व्यर्थ मी फसलें. तुह्मीं मर्दासारखेमर्द ह्मणविता आणि नेभळ्या-सारखे स्वस्थ बसलां हें काय ? तुह्मीं इतके भ्याड आहां असें मला समजतें तर मी तुह्मांकडे कशाला कट्यार देत ? मला हात होते. तें कर्म मी केव्हांच पार करतें आणि या कानाचें त्या कानाला समजूं देखील दिलें नसतें. करूनसवरून अगदीं मोकळी ! कोणाला दाद दिली नसती. कारण हा नरपशू माझ्या हातांत होता. पाहिजे तेव्हां याला मी चिरून टाकतें आणि माझ्यामनाचें पारणें फेडतें. जयश्री ! मीं तुह्माला इतकें बजावून सांगितलें आणि तुह्मीं तें कबूल करून आतां असे हात पाय गांधरून आणि डोळ्यांवर कान पाडून स्वस्थ बसलां काय ? रजपुतांच्या जातीस तुह्मीं कलंक लाविला—एका अनाथ स्त्रीहत्येचें पातक शिरावर घेतलें. जसा सर्प तडाक्यांत सांपडला कीं, त्याला तेथच्यातेथें ठेंचलाच पाहिजे, तसाच हा दुष्ट ! तुह्मीं या नराधमावर कितीही उपकार करा. हा पापी खालच्याघरचे वासे मोजील. याच्या वचनावर तुह्मी विश्वास ठेविला ? आग लावा त्याच्या त्या वचनाला. याला सवड मिळंद्या. ह्मणजे हा आपल्या गुणावर गेल्याशिवाय कधीं रहाणार नाहीं. हा तुमचीं पाळेंमुळें खणून काढील. तुह्मीं तडाक्यांत सांपडला कीं, तेथच्यातेथें तुह्मांस हा कृतघ्न ठेचून टाकील.

तुमची पाठ याच्याकडे होण्याची खोटी. हाच तुह्मांवर एका क्षणांत फिरेल आणि तुमच्या मानेवर तरवार ठेवील. याच्या भाषणांत खरेपणाचा गंध नाहीं. कट्यार फेंकून देतांना तुह्मांस काय वाटलें ? आतां या बेइमानी मनुष्यानें तुह्मांस येथें ठार मारलें तर त्याचें तुह्मीं काय कराल ? कोण तुमचें रक्षण करील ? कशी तुमची बुद्धि गेली ! आपला कट्टा वैरी दैवानें तुमच्या हातीं सांपडला असून तुह्मीं त्याला जिवंत सोडलें ! या शहाणपणास काय ह्मणावें ? अनूपसिंहास हा दांडगा सोडता ? नांव कशाला घेतां ? माझ्या खिडकेखातर यानें त्यांचें आजचें मरण उद्यांवर लोटलें. नाहींतर या चांडाळानें त्याचा तेव्हांच प्राण घेतला असता. तुह्मीं याचे हात धरले तेव्हांच मी ओरडतें तर तुह्मीं दोघेही सांपडलां असतां. दोघांचाही विध्वंस झाला असता. पण नाहीं. मी जात्याभिमानावर गेलें आणि तुह्मीं त्यावर हरताळ फिरविला ? असे तुह्मीं दगलबाज असाल असें मला मुळींच वाटलें नाहीं. माझ्या सारखाच तुमचाही स्वभाव असेल असें समजून मी फसलें. लबाडांचें फावतें तें असेंच. रामानुजस्वामीनें मला ही कट्यार दिली. धन्य त्यांची दूर दृष्टी. ही कट्यार धुळींत लोळणें अयोग्य !' असें ह्मणून तिनें ती कट्यार उचलून आपल्याजवळ ठेविली.

सुंदरीच्या भाषणानें हेमूचा क्रोधाग्नि भडकला. तो मोठ्यानें 'सीपाय सीपाय !' असें ओरडला.

इला ह्मणाली, 'तूं पाहिजे तेवढे मोठे डोळे केलेस आणि वाटेल तितका रागावलास तरी मी भीत नाहीं. अशा मर्कटाला कोण भीक घालील ? ओडरतोस कशाला ? सीपाय घेऊन माझें काय करणार ? प्रत्यक्ष तुला मी भीत नाहीं ती तुझ्या शिपुड्यांस कितीशी जुमानणार ? आतां मला मृत्यूची पर्वा नाहीं. माझ्या जिवावर मी उठलें आहें. मूर्खा ! माझा सर्वप्रकारें घात केलास तरी त्याविषयीं मी निष्काळजी होतें कारण मजशीं तूं जें कपट केलेंस त्याचें फळ परमेश्वर तुला भोगायला लावील. तें कधीं चुकणार नाहींच. आमच्या जातीच्या लोकांवर तूं जो जुलूम करीत आहेस त्यांतून होईल तितक्या तजविजीनें त्यांचा बचाव करावा; रजपुतांचा एक जबरदस्त शत्रू जगांतून उठवावा इतक्या

करतांच मीं हाल व त्रास सोसून दिवस कंठलें. परंतु, माझ्या दुर्दैवानें किंवा रजपुतांच्या कमनशिबानें माझी आशा निष्फल झाली त्याला माझा नाइलाज आहे. ’

जयश्री सखेद म्हणाला, ‘ तुमचा असा महान् उद्देश होता हें माझ्या ध्यानांत आलें नाहीं. माझी चूक झाली; आतां ती सुधारण्यासारखी नाहीं. मला क्षमा करा. मी अपराधी आहें. ’

इतक्यांत दोन तीन शिपाई हेमूच्या तंबूंत आले. त्यांस हेमू सांगूं लागला, ‘ या अवदसेला कैद करा. बांधा मुसक्या ! हिनें माझा प्राण घेण्याचा प्रयत्न आरंभिला होता. ’

सुंदरी सदर्प म्हणाली, ‘ खबरदार मुलामांनो ! पाय पुढें टाकाल-माझ्या अंगाला स्पर्श कराल—तर तुमच्या नरडीचा घोट घेईन. कोणाची माय व्याली आहे ? कोणाला आपल्या जिवाचा कंटाळा आला आहे; पुढें तर या खरें. होता कीं नव्हता असें करून टाकितें. निर्लज्ज, गाढव बटकीचे ! जयश्री, तुम्हीं माझें मनोगत छपवूं पहात होता पण आतां त्यांत कांहींच तथ्यांश राहिला नाहीं. माझे जिण्याचा आतां मला शुद्ध वीट आला आहे. तुम्हांस मीं इतकें सांगितलें तरी व्यर्थ गेलें ! तुम्हीं माझी परीक्षा केली नाहीं. आतां माझ्या मायेचें या जगांत कोणीच राहिलें नाहीं. आणि त्याला कारण हा दुष्ट ! ’

जयश्री साभिमान म्हणाला, ‘ तुझ्यासारखी थोर मनाची स्त्री मीं आजपर्यंत पाहिली नाहीं आणि पुढें आढळेल अशीही मला आशा नाहीं. तूं सामान्य स्त्री नव्हेस. स्त्रीसमुदायांत तूं एक रत्न आहेस. तूं जगांतून गेलीस तर पृथ्वीवरील एक सुंदर शोभा गेली असें होईल ! प्रवंचना, प्रतारणा इत्यादि अनेक विषज्वालांनीं ज्यांचें मन जर्जर झालें असेल त्यांस तूं अमृततुल्य महौषधी आहेस. आतां इतकें मात्र खरें कीं, मी अविवाहित असल्यामुळें तुझ्यासारख्या अलौकिक स्त्रीरत्नांचे हृद्गत मला मुळींच समजणें अशक्य. तरी एकदां कां होईना तुला जो पाहील तो तुला कधीं विसरणार नाहीं. परमेश्वर तुला संकटांतून मुक्त करील. तुझ्या मनोदयाप्रमाणें सर्व गोष्टी घडवील. तूं मुळींच काळजी वाहूं नकोस. ’

सुंदरी निष्काळजीपणानें ह्मणाली ' पुन्हा भेट होईल तो सुदीन. '

हेम तिरस्कारानें ह्मणाला, ' सीपाय ! वेळ कां लावता ? या चांडाळणीस येथून न्या. अशा दुष्ट स्त्रीचें तोंड पाहूं नये. टाका तुरुंगांत. '

सुंदरी उद्दामपणानें ह्मणाली, ' ही मी निघालें. तुरुंगांत कां ? फाशीच्या मैदानांत जायला देखील मी आतां भीत नाहीं. आतां मीही तुमचें मुखावलोकन करूं इच्छित नाहीं. आतां तुमची माझी हीच शेवटची भेट. नाहीं; पण नाहीं. आणखी एकदां होईल. त्या दिवसाचा विचार करा. तेव्हां तुह्मांस केलेल्या दुष्ट कर्मांचा झाडा द्यावा लागेल. ज्या स्त्रियांवर तुह्मीं जुलूम-जबरदस्ती केली आहे, ज्यांची तुह्मीं लाज लुटली आहे, त्यांचा दुःखाक्रोशध्वनि तुमच्या कानांत घुमेल ! ज्या अर्भकांस तुह्मीं ठार मारिलें आहे; त्यांचे रक्तबंबाळ देहमूर्तिमंत तुमच्यापुढें उभे रहातील. ज्या बालकाचे मातापित्याचा तुह्मीं निष्कारण वध केला आहे; तीं रडत ओरडत. किंकाळत तुमच्या पुढें येतील. तुमचीं अनेक दुष्कृत्यें सर्पासारखीं फणकारत तुह्मांला खावूं धांवतील. तेव्हां तुमची काय दशा होईल ? कोणत्या तोंडानें तुह्मीं कृतकर्मांचा जाब द्याल ? तेव्हां मीही एकदां तेथें येईन आणि माझा सर्व नाश तुह्मींच केला काय ? असें विचारीन. कधीं सोडणार नाहीं. तेव्हां तुमची काय दशा होईल ? तुह्मांला खालीं मान घालून उभें रहावें लागेल. भयंकर नरकवास भोगावा लागेल. मी निष्कलंक आहें. लोक मला कांहीं ह्मणोत; परमेश्वर साक्ष मी सांगतें कीं, इतके दिवस जरी मी यवनांच्या सहवासांत आहें तरी मी निष्पाप आहें ! मीं तोंडानें ह्मटलें असेल कीं, तुझ्याशीं लग्न करीन. परंतु, मनानें सर्व पुरुष मला बंधूसमान आहेत. आतां माझें कांहीं होवो. ' असें बोलतां बोलतां तिचा कंठ दाटला. बोलण्याची शक्ति राहिली नाहीं. तिचा हृदयस्फोट होत असावा असें दिसूं लागलें आणि ती निचेष्टित पडली. तेव्हां पहारेवाल्यांनीं तिला तेथून उचलून तिच्या तंबूत नेलें.

सुंदरीचें भाषण ऐकून जयश्री चकित झाला. त्याच्यानेंही कांहीं बोलवेना. तेव्हां हेमू ह्मणाला, ' तुह्मीं वीर पुरुष आहां. अशा मूर्ख स्त्रीचे भाषणाकडे बिलकुल लक्ष देऊं नका. अनूपसिंहास सोडावें ह्मणून तिनें

माझें फार आर्जव केलें. परंतु, मीं तिकडे मन दिलें नाहीं. त्या रागानें ती जें तोंडास आलें तें बडबडत सुटली. त्यांत कांहींच अर्थ नाहीं.'

जयश्री ह्मणाला, ' ती मानी स्त्री आहे. तुह्मीं तिचें ऐकलें नाहीं परंतु प्रभूनें तिचा अभिमान पूर्ण केला. तिचा हेतू सिद्धीस गेला. अनूपसिंह आतां तुमचा कैदी नाहीं. मी आहें. कारण, मींच त्याला तुमच्या कैदेंतून सोडविलें.'

हेमू सविस्मय ह्मणाला, 'काय ? तो गेला ? त्याला तुह्मीं घालविलें ? तोबा ! तोबा ! !'

जयश्री शांततेनें ह्मणाला, ' तुह्मीं वीरपुरुष खरे. पण तुमच्या मनाची प्रवृत्ति अति नीच आहे. वास्तविक पाहिलें तर त्याला सोडणें किंवा त्याबद्दल दंड ठरवून सोडणें तुमचें कर्तव्य होतें. तुमचे शेंकडों कैदी आमच्या हातीं आहेत; त्यांस जर आह्मीं ठार मारलें तर तुह्मांस काय बरें वाटेल ?'

हेमू आढ्यतेनें ह्मणाला, ' त्याला ठार मारावें असा माझा मुळींच हेतू नव्हता. कांहीं तरी दंड ठरवून किंवा दंड न घेतां सन्मानानें मी त्यास पाठविणार होतों.'

जयश्री ह्मणाला, ' मग तुमच्याच मनाप्रमाणें झालें.'

हेमू ह्मणाला, ' होय तर काय ? जयश्री ! तुमचा आमचा स्नेह असावा असा माझा इरादा आहे.'

जयश्रीनें सांगितलें, ' तुह्मीं राजपूताना सोडून जा. हिंदुलोकांशीं लढाई करूं नका. नीतीनें वागा. अत्याचार सोडा. ह्मणजे स्नेहास वेळ लागणार नाहीं.'

हेमूनें सांगितलें, ' आतां तुह्मीं माझे कैदी नाहीं. तुह्मीं खुशाल आपल्या शहरांत जा. सुंदरीचें भाषण मनांत आणूं नका. तिला क्षमा करा. ती अबला आहे. स्त्रियांचे हजारो दोष असले तरी पुरुषांनीं त्यांस क्षमाच केली पाहिजे.'

जयश्री ह्मणाला, ' तिचें ह्मणणें खरें होतें. तुह्मींच तिला क्षमा करा. आणि तिच्या मनास वाटेल तिकडे तिला जाण्याची परवानगी द्या. तिनें तुम्हांला भ्राताप्रमाणें मानलें आहे. तेव्हां तिच्याशीं तुह्मीं लग्न करणें अयोग्य आहे.'

हेमू म्हणाला. ' आतां तिची मला जरूरच नाहीं. अशा दगलबाज स्त्रीला मी कधीं जिवंत ठेवणार नाहीं. तिला उद्यां दोन प्रहरीं फांशीं चढवितों. म्हणजे जगांतील एक दुष्ट मनुष्य कमी होईल. '

जयश्री म्हणाला, ' छीः छीः ! असें करूं नका. मला वाटतें रागाच्या झटक्यांत ती बेशुद्ध पडलेली सावधच होणार नाहीं. '

हेमू म्हणाला, ' मेली तर एक दगदग गेली. '

जयश्री म्हणाला, ' नका. असें म्हणूं नका. ती शुद्धींत आली तर तिला उदयपुरास परत पाठवा. '

हेमूनें सांगितलें, ' तुमची इच्छा असली तर मी तसें करीन. '

जयश्रीनें सांगितलें, ' असें खरें तर वचन द्या, असें म्हणून जयश्रीनें आपला उजवा हात पुढें केला. त्यावर हेमूनें आपला उजवा हात ठेवून सांगितलें, ' हें घ्या वचन. आतां झालें ? '

जयश्री म्हणाला, ' आतां मी परवानगी घेऊं ? '

हेमू म्हणाला, ' जशी मर्जी. '

जयश्री निघाला. हेमू त्याकडे पहात स्वस्थ राहिला.

जयश्री जातां जातां मनांत म्हणाला, ' जे लोक, दुराशेचे दास त्यांस शांतिसुखाचा अभावच. त्यांनीं दुःखांत व औदासिन्यांत दिवस घालवावेत. हेंच त्यांच्या कपाळीं ! '

प्रकरण २२ वें

भेट.

पतिविरहिणी क्रीडा प्रतापास कडेवर घेऊन रानावनांतून व लढाईच्या मैदानांतून पतीचा शोध करीत होती. पतिविरहानें ती शुद्ध वेडी झाली होती. वृक्षलतादिकांस ती पतीचा समाचार विचारीत चालली होती. तिची शक्ति क्षीण झाली. चालण्याचें, फिरण्याचें किंवा बोलण्याचेंही तिला सामर्थ्य राहिलें नाहीं. तरी अनूपसिंहावर तिची जी अचल श्रद्धा होती तीच तिजकडून सर्व कृत्यें करवीत होती. संध्याकाळ झाला. हळुंहळुं काळोख

षडूं लागला. तरी केव्हां रडत, केव्हां हंबरडे फोडीत, केव्हां विचित्र अंग-विक्षेप करीत ' माझे पति कोठें आहेत ? तुम्हांला ते भेटले काय ? मला कोठें बरें ते भेटतील ? ' असें मनसोक्त बडबडत मार्ग सांपडेल तिकडे ती जात होती. रात्रीच्या वेळीं तिनें त्या जंगलांत एक भिकार झोंपडें पाहिलें. त्यांत पल्लवशय्या करून तिनें प्रतापसिंहास निजविलें. तिला झोंप नाहीं. अन्नपाण्याची शुद्धि नाहीं. प्रहर रात्र झाली. दोन प्रहर झाली. पहाटेच्या सुमारास ती मनांत म्हणूं लागली, ' हा देह केवळ जडपिंड-वत् आहे. अशी आज माझी पुरी खात्री झाली. याला स्नेहाचें किंवा ममतेचें नांव देखील माहीत नाहीं. देहा ! तुला प्रेमाचा यत्किंचित् जरी गंध असता; तरी त्यांना शोधतांना तूं असा दमून भागून शिथील झाला नसतास आणि थोड्याशा परिश्रमानें थकून गपचुप बसला नस-तास. प्रताप ! तूं तर खुशाल झोंपला आहेस. पण तुझ्या मातेस आज किती दुःख होत आहे ? आणि किती श्रम सोसावे लागले याची दाद तरी तुला आहे ? मला जर समजतें कीं, ते मला सोडून परलोकीं गेले तर हे पापी प्राण एक क्षण देखील मीं ठेविले नसते. सखे रात्री ! तूं देखील कजाखारखीच व्याकूळ दिसतेस. सर्व जगच आज भयंकर दिसतें. सर्व रणस्थल धुंडा-ळलें; पण त्यांचा पत्ता नाहीं. पटक्यासारखा पटका— अंगरख्यासारखा अंगारखा पाहिला कीं, प्रेत तरी दृष्टीस पडेल म्हणून शोधावें; पण नाहीं. देवाला अजून दया येत नाहीं. त्यांचें नखाग्र जरी दिसतें तरी मी खात्रीनें त्यांस ओळखतें. काय झालें कांहींच समजत नाहीं. देवब्राह्मणासमक्ष वाहिलेली शपथ आतां कोठें गेली ? कसे तुह्मी मला एकटीला टाकून गेला ? सर्व माया ममता आपण एकदम तोडून टाकिली ! देवाला कशी माझी दया आली नाहीं ? मी पातकी म्हणून येथें राहिलें. अनंत जन्माचें माझें पाप आज उभें राहिलें. कोणाचा तरी मीं घात केला असेल ! नवराबायकोची ताटातूट केली म्हणून माझी अशी दशा झाली नाहीं ना ? साधुसंतांचा छळ केला असेल. काय असेल आणि काय नाहीं ? मला तरी काय समजतें ? पण मी येथें कितीवेळ बसलें ही. प्रताप झोंपला आहे. तो उठेपर्यंत आपण त्यांचा शोध करूं. ' असें म्हणून ती उठली आणि जिकडे वाट दिसेल तिकडे जाऊं लागली.

क्रीडा त्या झोंपडीपासून बरीच दूर गेल्यावर ह्मणूं लागली ' कोणाचा बरें हा शब्द ? ओळखीचा वाटतो. कोण माझें नांव घेऊन हांक मारतें ? छीः मला उगांच भास होत असेल. छीः असें नव्हे. ही पुन्हा हांक ऐकूं आली. ते तर हांक मारीत नसतील ? तो मेला जयश्री तर पुन्हा आला नसेल. नव्हे हा शब्द त्याचा नव्हे. हा शब्द अगदीं त्यांच्यासारखाच आहे. पिशाच्च तर नव्हे. तेच नाहींना पिशाच्च झाले ? पण लढाईंत पडलेले योद्धे कधीं पिशाच्च होत नाहींत ! त्यांस अक्षय्य स्वर्गवास मिळतो असें सांगतात; तें खोटेंच ? पण मनुष्याची वासना मागें राहिली तर तें पिशाच्च होतें असें ह्मणतात. त्यांची अशीच मागें वासना रहाणें स्वाभाविक आहे. बहुधा हा पिशाच्चचमत्कार असावा. असेना ! मीं कोठें त्याला जुमानतें ? इतक्या रात्रीं असा एक देखील चमत्कार माझे दृष्टीस पडला नाहीं; मग पिशाच्च तेव्हां कोठें होतें ? आतां उजाडायला देखील झालें. कोणी ह्मटलें हें ' क्रीडे ' क्रीडा तर मीच; पण हांक मारणारे तूं कोण ? ' अनूपसिंह ' तुह्मीं मला बोलावतां आहां तर ही मी आलें. तुह्मीं न्याल तिकडे मी येईन. पण येथें आहे कोण ? कोणी नाहीं. वनदेवतांची तर ही क्रीडा नव्हे ना ? त्या नसतील ना आपल्या प्रियकरणीस हाक मारीत ? नका, वनदेवतांनो, माझा असा छळ करूं नका. आतां माझ्या अंगांत अगदींच सामर्थ्य राहिलें नाहीं. अँ ! ही हांक अगदीं जवळ ऐकूं आली. काय माझी फजिती होते ही ! पारावार राहिला नाहीं या विटंबनेस. हांका तर ऐकूं येतात. शब्दही ओळखीचा आणि दिसत तर कोणीच नाहीं. देवानेंच मजकडे पाठ केली. करो खुशाल करो. माझा जीव जाईल तर बरें. पण ही आशा आहेना ? अरे ! नकोग बाई तूं अशी हात धुऊन माझे मागें लागूं. काय हा भुतांचा बाजार ? शब्द तसाच. कांहीं होवो. जिकडून ध्वनि ऐकूं येतो तिकडेच जावें. एकदां संशय तर फेडूं. ' असें ह्मणून ती जिकडून तिला हांक ऐकूं येत होती तिकडेच निघाली.

जयश्रीनें अनूपसिंहाची मुक्तता केल्यावर तो प्रथम किल्ल्यांत गेला. तेथें त्यानें क्रीडेचा शोध केला. तेव्हां येथील द्वारपालानें त्याला सांगितलें कीं, ती बाहेर गेली, ह्मणून तो शहरांत आला. शहरांत त्याला अशी

बातमी समजली कीं, ती रणभूमीवर मेली. ह्मणून तो तेथें गेला तेथेंही त्यानें तिचा तपास केला; परंतु कांहींच उपयोग झाला नाहीं. रणमैदानांत हांका मारून थकल्यावर तो जंगलाच्या मार्गास लागला आणि सारीरात्र क्रीडेच्या नांवाची जपमाळ घेत तो त्या जंगलांत फिरत होता.

शेवटीं दोघांचीही भेट झाली. तेव्हां त्यांस जें सौख्य झालें तें खरो-खरच अवर्णनीय आहे. त्याचें वर्णन करण्याची आमच्या लेखणींत श-क्तिच नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. क्रीडा अनूपसिंहास आलिंगन देऊन स्फुंदत रडूं लागली. अनूपसिंहही तिचें मस्तक आपल्या छातीजवळ घेऊन क्षणेक स्वस्थ राहिला.

क्रीडा डोळे पुशीत ह्मणाली. " तुह्मीं आणखी कांहींवेळ भेटलां नसतां तर मी शुद्ध वेडी झालें असतें. "

अनूपसिंह ह्मणाला, " आणखी वेड तें काय ? मी इतक्या हांका मारिल्या तरी कोणी ओ दिली नाहीं. प्रत्यक्ष मला भेटलीस तरी ओळ-खलेंस देखील नाहीं. "

क्रीडा ह्मणाली, ' फकिराच्या वेषानें तुह्मीं आलां मग मीं ओळखलें नाहीं तर त्यांत कांहीं नवल नाहीं. पुरुषांचें हृदय कठोर ह्मणतात तें खरें. त्यांस स्त्रियांच्या कोमल हृदयांतील सुखदुःखाचा फारसा अनुभव नसतो. बरें तें असो. पण तुह्मीं होता तरी कोठें आणि असें वेषांतर करण्याचें कारण काय ? मीं तुम्हांला इतके शोधलें तरी सांपडला कसें नाहीं ? '

अनूपसिंह म्हणाला, ' लढाईत मी असावध पडलों. मला यवनांनीं धरून नेलें. आणि कैदेंत ठेवून आजच ते मला फाशीं देणार होते. परंतु, जयश्रीस मी कैदेंत आहें असें समजतांच तो फकिराच्या वेषानें— जो वेष माझ्या अंगावर आहे त्याच वेषानें—तेथें आला. आणि त्यानें बंदीवासां-तून माझी मोकळीक केली. माझे प्राण वांचविण्याकरतां तो आपले प्राण देण्यास सिद्ध झाला. त्याला तेथें सोडून यावें असें मलाही वाटेना. पण त्यानें अत्याग्रह केला. तेव्हां निरुपायानें मी आलों. आतां माझा अर्धाजीव इकडे आणि अर्धा तिकडे गुंतला आहे. होईल तितक्या त्वरेनें जाऊन त्याला प्रथम सोडविलें पाहिजे, नाहीं तर ते दुष्ट त्याचा कसा घात करतील याचा नेम नाहीं. '

क्रीडा म्हणाली, ‘ आतां मला एकटी टाकून जाऊं नका बरें. माझें प्रेम असें कसोटीला लावून पाहूं नका बरें. ’

अनूपसिंह म्हणाला, ‘ बरें आहे. त्याचा विचार आतां नको. ’

क्रीडा म्हणाली, ‘ तुम्हांला भाऊरायानें सोडविलें आणि तो यवनांच्या कैदेंत आहे ? ’

अनूपसिंह म्हणाला, ‘ असें खरें. माझ्यासाठीं त्याचे प्राण धोक्यांत पडले आहेत. तुला शोधून मी दमलों आणि तुझी आशा सोडून मी आतांच तिकडे जाणार होतों. ’

क्रीडा म्हणाली, ‘ काय म्हटलें ? जयश्रीनें तुम्हांस सोडविलें ? ’

अनूपसिंह म्हणाला, ‘ होय ? असें अभिद्यासारखे काय करतेस ? तुला थोडें वेड लागलें नाहींना ? ’

क्रीडा म्हणाली, ‘ नाहींहो वेड कसचें ? ’

अनूपसिंह म्हणाला, ‘ वेडाला आणखी काय शिंगें असतात ! बरें, आपला प्रताप कोठें आहे ? ’

क्रीडा म्हणाली, “ त्याला खुशाल निजवून मी इकडे आलें. चला मी दाखवितें ती झोंपडी. मला वाटतें कितीतरी दिवसांनीं आपली भेट झाली. तुम्हीं माझ्या दृष्टिआड झालां कीं, माझें मन वेडें होतें. जिवाला नानातऱ्हेच्या वेदना होतात. आणि काय वाटतें तें माझ्यानें सांगवत देखील नाहीं. ’

अनूपसिंह म्हणाला, ‘ तसें होणें स्वाभाविकच आहे. आतां विलंब नको. प्रताप कोठें आहे तो दाखीव आणि चल लौकर. मला आतां फौज घेऊन यवनांच्या छावणीवर हल्ला केलाच पाहिजे. ’

क्रीडा म्हणाली, ‘ चला. ’

प्रकरण २३ वें.

प्रतापसिंह.

अरुणोदय झाला. दिशा फांकल्या. सूर्य जगताची स्थिति अवलोकन करण्याकरितां सोनेरी शेला पांघरून वर येऊं लागला. पक्षी किलबिलाट करूं लागले. कित्येक पक्षीगण मंजूळ स्वरानें सूर्याचें स्वागत करूं लागले. कित्येक उंच आकाशांत उडून सूर्यदर्शन घेऊं लागले. वृक्ष, लता टवटवीत दिसूं लागल्या. सर्व लोक आपआपल्या उद्योगास लागले.

काल्च रजपुतांची आणि यवनांची जी लढाई झाली तींत यवनांचा पराभव होऊन त्यांच्या सैन्यानें समरांगणांतून पळ काढिला ज्याला जिकडे मार्ग मिळाला तिकडे तो पळत सुटला आणि रजपुतांच्या तडाक्यांतून जे लोक बचावले ते कसेबसे छावणींत आले. कित्येकांनीं दिवसभर लपून राहून रात्रीं छावणी गांठिली. आणि कित्येक दुसरे दिवशीं आपल्या छावणींत दाखल झाले. क्रीडा ज्या जंगलांत पतिविरहानें व्याकुल होऊन हिंडत होती त्याच जंगलांत दोन यवनसैनिक लपून राहिले होते. एकाच्या मनांत रात्रीच आपल्या छावणींत जावें असें होतें. पण दुसरा त्याला तसें करूं देईना. एतदर्थ ते तेथेंच राहून सूर्योदय होतांच निघाले. दैवाची गति फार गहन आहे. ते ज्या मार्गानें जात होते त्याच मार्गांत क्रीडेनें आपल्या मुलास ठेविलेली झोंपडी होती. ते तेथें येण्यापूर्वीच प्रतापसिंह निद्रादेवीच्या अंकावरून उठला आणि रांगत रांगत झोंपडी बाहेर आला. त्यास त्या शिपायांनीं पहातांच एक शिपाई ह्मणाला, ‘ अरे ! अशा भयंकर जंगलांत मनुष्याची वस्ती आहे. आह्मांला तर कोणी धरणार नाहींना ? ’

दुसऱ्यानें सांगितलें, ‘ विपक्षांतील मनुष्य जर निःशस्त्र असेल तर रजपूत लोक त्याला कधींही त्रास देणार नाहींत. कोणी कां असेनात.. आपल्या तरवारी फेंकून देऊं आणि मकाद्यानें रस्ता पकडूं. ’

पहिला ह्मणाला, ‘ आपण जातां जातां या गोजिरवाण्या मुलास घेऊन जाऊं. ’

दुसरा ह्मणाला, ' तुला नस्ती पंचाईत फार पाहिजे. या पोरास नेऊन तूं करणार काय ? कोणाचें पोर आहे कोण जाणें ! '

पहिला ह्मणाला, ' कोणाचेंही असो. पोर तर असें फकड आहे कीं, शाबास ! '

दुसरा ह्मणाला, ' असेना. आपल्यास त्याची उठाठेव पाहिजे कशाला? '

पहिला ह्मणाला, ' उठाठेव कसली ? भितोस कशाला ? अरे रजपूत लोकांची ही फौज छपवून ठेवण्याची जागा असावी आणि येथूनच किल्ल्यांत आणि शहरांत प्रवेश करण्याचें भुयार असावें. आपण हें वर्तमान हेमूस सांगूं ह्मणजे आपल्यावरील आरोप जाईल आणि कांहीं तरी बक्षीस मिळेल. '

दुसरा म्हणाला, ' असें खरें. '

पहिल्यानें सांगितलें, ' उचल त्या मुलास आणि चालूं लाग. '

दुसरा म्हणाला, ' त्याची आई किंवा बाप कोणी तरी तेथें असल. '

पहिला म्हणाला, ' येथें कोण मरायला येतें. असें म्हणून त्यानें प्रतापसिंहास उचलून आपल्या जवळ घेतलें आणि झोंपडींत डोकावून पाहून आंत कोणीच नाहीं अशी मनाची खात्री करून घेऊन वाट धरली.

दुसरा शिपाई ह्मणाला, ' अरे ! त्या पोरास बरोबर घेऊं नकोस. आणखी दगदगीस कारण. त्याला फेंकून दे. '

पहिला ह्मणाला, ' तुझें हृदय कसाबासारखें आहे. कोणीं मागितलें तर हें मूल मी त्याला देईन. नाहीं तर छावणींत नेईन. आमचा अल्ली तरी एवढाच आहे. दोघेही मौजेनें खेळतील. बायकांसारखा भितोस कां ? हुजूरचा शिपाई ! बेट्याला धैर्य असेल तर शपत. खुदातालाची आह्मांवर मेहरबानी आहे. त्यानें आमचे प्राण वांचविले. आह्मांस किल्ल्यांत जाण्याचीं व सैन्य छपवून ठेवण्याचीं गुप्तस्थळेंही समजलीं. मला वाटतें या मुलाचा पायगुण चांगला आहे. आतां तूं मुकाट्यानें चल. '

दुसरा ह्मणाला, ' अल्ला वाली ! ' असें ह्मणून ते दोघेही छावणींत यावयास निघाले.

प्रतापसिंहास यवनांच्या शिपायांनीं झोंपडींतून नेल्यावर कांहींवेळानें क्रीडा आणि अनूपसिंह तेथें येऊन पोंचलीं. क्रीडा झोंपडींत गेली आणि

पहाते तों तेथें प्रताप नाहीं. पल्लवशय्या जशाची तशी. पण प्रताप नाहीं असें पहातांच, तिच्या हृदयांत धस्स झालें. तिला कांहींच सुचेना. ती एकदम ' प्रताप ! ' म्हणून धरणीवर पडली आणि आक्रोश करूं लागली. तेव्हां अनूपसिंह म्हणाला, ' झालें काय ? '

क्रीडा रडत रडत सांगूं लागली, ' अहो ! मी त्याला येथें निजवून गेलें आणि आतां तो येथें नाहीं. हाय हाय ! देवा ? आतां मी काय करूं ? कोणीहो माझ्या लाडक्यास नेलें ? त्याला वनदेवतांच्या स्वाधीन करून मी गेलें आणि घात झाला हो ! काय मी हतभागी. संकटा मागून संकट. दुःखावर संकटाच्या डागण्या. कोठें शोधूं ? कोणासाठीं रडूं ? '

अनूपसिंह देखील चिंताग्रस्त झाला. त्यालाही कांहीं सुचेना. तरी आपला शोक आवरून तो म्हणाला, ' तूं मुलास येथेंच ठेवून गेलीस अशी तुझी खात्री आहे काय ? '

क्रीडा म्हणाली, ' मी त्याची आई. मी काहो विसरेन ? ही पल्लव-शय्या पहा. ही माझ्या हातानें मीं केली. त्याला निजविलें आणि असें कसें झालें ? कोण दुष्ट त्याला कोठें घेऊन गेला ? कोण माझ्या लालास घेऊन गेला ? असा कोणाचा मीं घात केला होता. वत्साची आणि धेनूची-- मातेची आणि बालकाची ताडातोड केली ? असें होणार हें मला समजतें तर मी त्यास कडेवर घेऊन गेलें असतें. माझा धीर खचला. डोळ्यांपुढें अंधार--' असें म्हणून ती मूर्च्छित पडली.

अनूपसिंहानें वारा घालून तिला सावध केलें. आणि सांगितलें ' घाबरूं नकोस. धीर धर. असें वेड्यासारखें काय करतेस ? तूं येथेंच त्याला निजवून गेलीस अशी तुझी खात्री आहे ? '

क्रीडा म्हणाली, ' येथेंच हो. मी विसरेन कशी ? तो जागा झाला म्हणजे त्याला घेऊन जाईन अशा विचारानें मीं त्याला येथेंच निजविलें आणि असें कसें झालें ? काय हो करूं ? कोण माझ्या प्रतापास भेटवील ? '

अनूपसिंह म्हणाला, ' शोक करूं नकोस. कदाचित् तुझा समज चुकला असेल. तूं त्याला कोठें तरी दुसऱ्या झोंपडींत निजविलें असशील आणि येथें उगांच शोधीत असशील. आणखी या जंगलांत दुसरीकडे कोठें तरी झोंपडी असेल तिकडे आपण जाऊन पाहूं. '

क्रीडा म्हणाली, ' काय असेल तें असो. चला. ' असें म्हणून ती अनूपसिंहाच्या मागून दुःख करीत निघाली.

प्रकरण २४ वें.

गुरुदर्शन.

अनूपसिंह आणि क्रीडा प्रतापसिंहाचा शोध करीत करीत दुसऱ्या एका पर्णकुटिकेजवळ आले. त्यांत रामानुजस्वामि रहात असे. रामानुजस्वामीचा आणि वाचकांचा परिचय आहेच. हेमूस शाप दिल्यावर ' आतां मी लोकवस्तींत रहाणार नाहीं. ' असें सांगून तो तेथून निघाल्यावर आरवलीपर्वतांतील एका पर्णकुटिकेंत राहूं लागल्यास आज दोन दिवस झाले.

प्रातःकालचा समय. रामानुजस्वामि आपला प्रातर्विधी आटोपून भगवत्चिंतनांत निमग्न होते. पर्णकुटिके बाहेर त्याचा एक शिष्य छाट्या धूत होता. क्रीडेनें ती पर्णकुटिका पहातांच आंत धांव घेतली आणि रामानुजस्वामीस पहातांच, ती दीन वदनानें म्हणाली, ' माझा प्रताप कोठें आहे ? मला या. तुम्हीं माझ्या लाडक्यास इकडे आणिलें ? मीं याच झोंपडींत त्याला ठेविलें ? माझ्या ध्यानांत नाहीं. सांगा. माझा प्रताप कोठें आहे ? '

अनूपसिंहानें रामानुजस्वामीस तेव्हांच ओळखलें आणि ' गुरुदेव ' म्हणून साष्टांग नमस्कार घातला.

स्वामीनें अनूपसिंहाचे दोन्हीं हात धरून त्यास उठविलें. आणि म्हटलें, ' जगदीश तुझें कल्याण करो. अनूपसिंह ! तूं इकडे कां आलास आणि हा वेष का ? तुझी काय अवस्था आहे ? '

अनूपसिंह म्हणाला, ' गुरुराज ! मीं फार विपत्तींत सांपडलों आहें. अशा दुस्तर संकटकाळीं तुमच्याशिवाय माझा कोण उद्धार करील. जगत्पतीनें कृपा करून मला हे पाय दाखविले. '

क्रीडा म्हणाली, ' तुम्हीं माझें बालक याल तरच मी येथून जाईन.

तुमचे गुणानुवाद गाईन आणि तुमची दासी होऊन राहीन. तुम्हीं माझ्या प्रतापसिंहास कोठें ठेविलें आहे ? आपणाकडे माझें बाळ नाहीं. त्याला आपण आणलें नाहीं असा बचावाचा बाढा मात्र वाचूं नका. तुम्हीं बालक येथें नाहीं म्हणाल तर माझे प्राण येथेंच जातील. आणि तुम्हांस स्त्रीहत्येचें पातक पडेल. अहो, मी इतका कंठशोष करतें पण तुम्हांला कांहींच दया येत नाहीं कशी ? कसेहो तुम्हीं निर्दय झालां ? सांगा माझा प्रताप कोठें आहे ? मला दाखवा. एकदां मी त्याला डोळे भरून पहातें. '

रामानुजस्वामीनें विचारिलें, ' हा काय प्रकार आहे ? ही स्त्री कोण ? आणि प्रतापसिंह कोण ? त्याला ही मजकडे काय मागते ? '

अनूपसिंह म्हणाला, ' ही माझी पत्नी. काल लढाईच्या पूर्वीं हिला मी किल्ल्यांत ठेऊन युद्धास गेलों. लढाईंत आमचा जय झाला. मी कित्येक लोकांसह यवनांच्या पाठलागावर गेलों. तेव्हां यवनांनीं आम्हांस गराडा घातला. माझ्या बरोबरचे बहुतेक लोक ठार झाले. मी मूर्च्छा येऊन पडलों. तेव्हां यवनांनीं मला उचलून आपल्या छावणींत नेलें. मी त्यांचा कैदी बनलों. माझी मुक्तता करण्याकरतां इलु-नामक स्त्रीनें हेमूकडे फारच रदबदली केली. पण ती व्यर्थ गेली. आजच तो मला फांशीं देणार होता. परंतु माझा खरा मित्र जयश्री याच फकिराच्या वेषानें यवनांच्या गोटांत आला. तो मला भेटला. त्यानें आपला वेष मला दिला आणि माझ्या जागीं तो कैदेंत राहिला आहे. आतां त्याच्या मुक्ततेकरतां मला फौज घेऊन जाणें भाग आहे. माझ्या वियोगानें ही माझी स्त्री भ्रमिष्ट झाली आहे. असें जयश्रीनें मला सांगितलें. म्हणून मी हिच्या शोधासाठीं इकडे तिकडे फिरून येथें आलों. याच जंगलांत तिची माझी भेट झाली. प्रतापसिंह हा माझा पुत्र. त्याला रात्रीच्या वेळीं हिनें कोणत्याशा झोंपडींत निजविलें आणि माझा शोध करीत ही हिंडत होती. असें ही सांगते. ती झोंपडी शोधित आम्हीं इकडे आलों. '

स्वामी म्हणाले, ' अशा निर्जनवनांत बालकास एकटें ठेवणें अयोग्य. '

अनूपसिंह म्हणाला, ' आतां त्याचा विचार कसचा ? जी गोष्ट होऊन नये ती झाली. '

क्रीडा म्हणाली, ' मी मनुष्य नव्हे. राक्षसी आहे. माझ्या तान्हयास मी एकटें कोठें टाकिलें कोण जाणें ! माझें सोन्यासारखें बालक नाहींसें झालें. हाय हाय ! माझ्या लालाचा मी घात केला. आग लागो या जिण्यास--- '

अनूपसिंह म्हणाला, ' ही कालचा दिवस माझ्या वियोगानें वेडी झाली होती. मी भेटलों तेव्हां ही अत्यानंदानें वेडी झाली आणि आतां पुत्र-वियोगानें हिला वेड लागलें आहे. हिची बुद्धि ठिकाणावर नाहीं. '

स्वामि म्हणाले, ' पुत्रशोकानें हिजवर आपला पूर्ण अधिकार बसविला आहे. '

अनूपसिंह ह्मणाला, ' एखाद्या हिंसकपशूनें बहुधा त्या मुलास नेलें असेल ! '

क्रीडा ह्मणाली, ' मीं आतां त्याला शोधून आणितें. ' असें ह्मणत ती जंगलांत धावत जाऊं लागली.

अनूपसिंहानें तिला धरून पर्णकुटिकेजवळ आणिलें. तेव्हां स्वामि ह्मणाले, ' बाई ! तूं शोक करूं नकोस. तूं पतिव्रता-साध्वी स्त्री आहेस. मी दृढनिश्चयानें सांगतों कीं, तुझा पुत्र उदयपुरांत तुला सांपडेल. त्याचा कोणी घात केला नाहीं किंवा तो हिंसकपशूंच्या भक्षस्थानींही पडला नाहीं. तो सुखरूप आहे. त्याची तूं बिलकुल काळजी करूं नको. क्षणेक तो तुझ्या दृष्टिआड झाला आहे इतकेंच. '

क्रीडा ह्मणाली, ' त्याला मीं शहरांत ठेवून इकडे आलें ! या जंग-लांतील झोंपडींत नाहीं ठेविलें ? इतकी मीं वेडी झालें. कसें ह्मटलें ? त्याला मी उदयपुरांत निजवून इकडे आलें ? अहो ! या हातांनीं झाडाचे कोमल पल्लव तोडून मी त्यावर या रानांत त्याला निजविलें. आणि तुह्मी म्हणता शहरांत ! तुह्मी शुद्धींत आहां कीं, झोंपेंत बडबडतां आहां ? आहे तरी काय ? '

अनूपसिंह म्हणाला, ' स्वामि कधीं खोटें सांगणार नाहींत. आतां आपण शहरांत जाऊं. '

क्रीडा ह्मणाली, ' ह्मणजे माझा प्रताप मला मिळेल ? '

स्वामि ह्मणाले, ' होय; निःसंदेह मिळेल. '

क्रीडा ह्मणाली, ' तुह्मीं याल ? तुह्मीं माझी फसवणूक करतां. मला फसवूं पहातां ? येऊं मी तुमच्याबरोबर ? तेथें देतां प्रताप ? '

स्वामि ह्मणाले, ' हो, देतों. तूं निर्धास्त चल. '

क्रीडेनें विचारलें, ' तुह्मी येतां ? चला तर या. '

स्वामि ह्मणाला, ' चला. ' त्यानें सदानंद अशी हाक मारिली व त्याबरोबर त्याचा शिष्य तेथें आला. त्याला त्यानें सांगितलें, ' हा त्रिशूल, ही कंथा आणि ही माला घेऊन हेमूच्या छावणींत जा. तेथें इला संकटग्रस्त स्थितींत आहे. तिच्या कानांत .... हा मंत्र सांग, ' असें ह्मणून त्यानें सदानंदाच्या कानांत एक मंत्र सांगितला. ' आणि ही माला, त्रिशूल व कंथा मीं दिली आहे असें सांगून तिला दे. आतां तिला तेथें ठेवणें अप्रशस्त आहे. ज्या हेतूनें तिला तेथें ठेविली तो कार्य-भाग आटोपला. समजलें. सत्वर जा. आम्हीं उदयपुरीं तुला भेटूं. चला. अनूपसिंह, तुह्मांला होईल तितकें लौकर हेमूच्या छावणीवर छापा घालणें भाग आहे. एकदां यवनांचा संहार झाला असता कीं, आपल्यास बरोच शांतता मिळाली असती. '

असें बोलत रामानुजस्वामि; अनूपसिंह. व क्रीडा त्या निर्जनवनांतून निघाली.

प्रकरण २५ वें.

उद्धार.

पूर्वेकडील आकाशांत आरक्त सूर्याचा उदय झाला. मंद शीतळ वायु वाहूं लागला. प्रभातसमीरानें सर्वांच्या मनास प्रफुल्लता येऊं लागली. कुसुमपुंज विकसित झाले. मधुलोलुपभ्रमरांचे थवे गुंजारव करूं लागले. लहानमोठे पक्षी भक्षार्थ फिरूं लागले. प्रकृतीनें गंभीर स्वरूप धारण केलें. यवनांच्या छावणींतील सर्व लोक आपल्या उद्योगधंद्यास लागले. कोणी घोड्यांची चंदीवैरण पाहूं लागले. कोणी तरवारी व भाले साफ करूं

लागले. घायाळ पडलेले कोणी आपआपल्या पायांवर मलमपट्ट्या बसवू लागले. कित्येक जखमी लोक कण्हत कुंथत होते. जिकडे तिकडे उदासीनता दिसे. दरबारमंडपाच्या दारांत बसून आपला गफूरखां तंबाकु ओढीत होता. इतक्यांत पहारेकऱ्यानें येऊन त्याला सांगितलें, " हुजूर! एक रजपूत आमच्या छावणींतून बाहेर जात होता. तो कोण ? इकडे कां आला ? वगैरे प्रश्न त्याला विचारले. त्याचे त्यानें जे जबाब दिले ते खरे आहेत असें मला वाटेना. ह्मणून त्याला पकडून कैद केलें आहे. हुकूम होईल तर त्याला इकडे आणतों.'

गफूरखां तंबाकूचा धूर सोडित ह्मणाला, ' बहुधा तो रजपुतांचा जासूद असेल. आणा जा. पाहूं तर खरा कोण आहे तो.'

गफूरखां बोलत आहे इतक्यांत कित्येक शिपायांनीं परिवेष्टित असा एक कैदी तेथें आला. त्याला गफूरखानें विचारलें. ' कोण तूं ? इकडे कां आलास ?'

कैदी ह्मणाला, ' मी रजपुतांचा सेनापति आहें. माझें नांव जयश्री. माझ्या कांहीं खासगी कामाकरतां मी येथें आलों होतों. माझें काम झालें; तेव्हां मी जात होतों.'

जयश्रीचें भाषण ऐकतांच, गफूर घोंटाळ्यांत पडला. तो मनांत ह्मणूं लागला, ' हा काय प्रकार ? खुदा जाणें ! आपणास याचा मतलब कांहींच समजत नाहीं. हा आला कसा ? याला सेनापतीनें बोलाविलें कीं, हा आपण होऊनच आला ? आला केव्हां आणि कसा ? घस्तवाल्यांनीं याला पकडलें नाहीं कसें ? काय गाफिलगिरी आहे पहा ? यांत कांहीं तरी महत्व असलें पाहिजे. नाहीं तर हा आंत आलाच नसता. असो. काय असेल तें सेनापतीकडे गेलें कीं, समजेल —'

तितक्यांत सेनापतीच्या तंबूंत तुतारी वाजली. गफूर मनांत ह्मणाला. ' सेनापति तंबूंत आला. तो मुलाखतीस बोलावीत असेल किंवा अन्य कांहीं कारण असेल. तिकडेच जाऊं ह्मणजे झालें. (उघड) शिपाई हो ! तुह्मी आपल्या उद्योगास लागा. आह्मी या कैद्यास घेऊन सेनापतीच्या तंबूंत जातों. या नोकरीसारखा नीच धंदा कोणताच नसेल. क्षणभर स्वस्थ बसून तंबाकु ओढीन ह्मटलें तर नाहीं. काय बेटी दगदग !

करणार काय ? कपाळीं आलें तें केलेंच पाहिजे. चलरे जयश्री, पुढें हो. काय आश्चर्य आहे पहा ' कीं, जयश्रीसारखा रजपुतांचा बलाढ्य सेनापति आमच्या छावणींत पाहिजे तिकडे खुशाल हिंडत असतो ! '

यवनसेनापति हेमूच्या तंबूंतून जयश्री निघाल्यापासून हेमूच्या मनांत एकसारखी तळमळ सुरू होती. अनूपसिंह आपल्या कबजांतून सुटला. जयश्री आपल्या तंबूंत आला. त्यानें आपल्यास ठार मारण्याचा प्रयत्न केला. पण दैवानें खैर केली. इला बेताल झाली. तिनें जयश्रीच्या हातून मला मारण्याचा प्रयत्न केला. जी माझ्याशीं लग्न लावण्यास तयार तीच मजवर फिरली ? जयश्रीस पहारेवाल्यांनीं आंत कसें येऊं दिलें ? वगैरे गोष्टींचा विचार करतां करतां तो अगदीं बुचकळ्यांत पडला होता सर्वांचीच मनें आपल्या विरुद्ध आणि तींही एकाच दिवसांत कशीं झालीं ? या गोष्टीचा तावडतोब विचार करावा ह्मणून उजाडतांच त्यानें आपला दरबारीपोषाख केला आणि तो दरबारच्या हत्यांत आला

इतक्यांत जयश्रीसह गफूरखां तेथें आला. त्यास पहातांच, हेमू ह्मणाला, ' हें काय ? तुह्मांस कोणी पकडलें ? '

जयश्री ह्मणाला, ' तें दिसतेंच आहे. त्यांत इतकें आश्चर्य कसलें ? '

हेमू ह्मणाला, ' आणखी दंडास दोरी बांधिली आहे. '

जयश्री ह्मणाला, ' तुह्मीं अगदीं भिऊं नका. '

गफूरखां ह्मणाला, ' हा आमच्या छावणींतून जात असतांना आमच्या लोकांनीं यास पकडलें आहे. अपराधाची क्षमा असावी.

हेमू ह्मणाला, ' सोडा त्यांचे हात. जयश्री ! तुह्माला अशा स्थितींत पाहून मला फार दिलगिरी वाटते. आमच्या लोकांच्या या अपराधाची तुह्मीं उदारमनानें माफी करावी. त्यांनीं तुह्मांस ओळखलें नाहीं ह्मणून असें झालें. '

जयश्री ह्मणाला, ' त्यांनीं आपलें कर्तव्य केलें. आतां तुह्मीं काय करतां तितकेंच पहावयाचें राहिलें आहे. '

हेमू ह्मणाला, ' तुह्मांसारखे रुढवय्ये लोक, कैदी होऊन माझ्या समोर येणें माझ्या मतें खेदकारक आहे. या गोष्टीनें माझ्या मनास फार वाइट

वाटलें. तुमच्या हातांत हत्यार असतें तर असें कधीं झालें नसतें. मग शेंकडों लोक जरी तुमच्या अंगावर येते तरी त्यांस तुह्मीं दाद दिली नसती. असो. झाल्या गोष्टीचा विचार नको. (आपल्या हातांतील तरवार पुढें करून) ही घ्या तरवार ! ही मी मोठ्या आनंदानें तुह्मांस नजर करतों. मित्रत्वाच्या नात्यानें तुह्मीं हिचा स्वीकार कराल तर मी तुमचा फार आभारी होईन. आह्मां लोकांची तरवारबहाद्दर लोकांवर अशीच मेहेरनजर असते. मग ते प्रत्यक्ष शत्रु असोत अगर मित्र असोत. सर्वांशीं आमचें आचरण उदारमनाचें असतें. मी जरी तुमचा शत्रु असलों तरी तुमचा आभारी आहें.'

जयश्री ह्मणाला, 'आह्मां लोकांचें आचरण जगजाहीरच आहे. आमच्या शत्रूनें जरी आह्मांशीं निंद्याचरण केलें तरी प्रसंगविशेषीं आह्मी तें अगदीं विसरून जातों. मनुष्यमात्राचा असाच स्वभाव असला पाहिजे. प्रत्येकानें प्रत्येकाचा दोष टाकून गुणाचाच स्वीकार करावा.'

हेमु स्थैर्यानें ह्मणाला, 'जसे तुह्मीं मजवर उपकार केले तसेच माझेही तुह्मांवर आहेत. इतकें ध्यानांत असावें ह्मणजे झालें. आतां तुमचें आमचें मित्रत्व कायम राहो.'

जयश्री ह्मणाला, 'कसेंही ह्मणा. (स्वगत) हा आतां आपल्या जातीच्या गुणावर जाऊं लागला. (उघड) रात्रीं सांगितल्याप्रमाणें झालें कीं, तुमचा आमचा स्नेह जडलाच. बरें आतां मीं जाऊं ?'

हेमू ह्मणाला, 'खुशाल चला.'

जयश्री ह्मणाला, 'आतां मला कोणी पकडणार नाहींना ?'

हेमू ह्मणाला, 'गफूरखां ! आपल्या छावणींतील तमाम लोकांस कळवा कीं, जयश्रीस कोणी प्रतिबंध करूं नका—'

हेमूचें भाषण पुरें झालें नाहीं इतक्यांत दानेषखां, प्रतापसिंहास घेऊन तेथें आला आणि सलाम करून सांगूं लागला, 'साविंद ! हे दोघे शिपाई आरवलीपर्वताच्या झाडींत होते. तेथें चितोडगडांत प्रवेश करण्याचा गुप्त मार्ग आहे—'

हेमूनें नेत्र वटारले आणि दानेषखांस 'गप्प रहा' असा इषारा केला. तेव्हां

ज्ञानेषखानें आपल्या भाषणाचा ओघ बदलून सांगितलें '"त्या जंगलांत हें मूल सांपडलें. त्यास या शिपायांनीं इकडे आणलें आहे.'

हेमू ह्मणाला, 'बेवकूब. या कारट्याला इकडे कशाला आणिलें? त्याला उदयसागरांत फेंकून द्या.'

जयश्रीनें प्रतापसिंहास पहातांच ओळखलें. आणि तो आश्चर्यचकित होऊन ह्मणाला. 'अहो! हा अनूपसिंहाचा मुलगा. हा यांच्या हातीं कसा सांपडला? सेनापति! या पुत्रास मजकडे द्या.'

हेमू अभिमानानें ह्मणाला, 'शुक्र है खुदाका! आज परवरदिगारनें माझी मुरादहांसल केली. हा माझ्या दुस्मनचा मुलगा. त्याला मजकडे द्या. (घेतो.) आज हा छोटा दुस्मान आहे. पुढें बडा होईल. शत्रूस जिवंत ठेवूं नये. मी समजतों कीं, अनूपसिंहच पुन्हा माझ्या हातीं सांपडला!'

जयश्री शांततेनें ह्मणाला, 'त्याची आणि त्याच्या मातापित्याची ताटातूट करणें तुमच्यासारख्या समंजस मनुष्यास उचित नव्हे. त्याला येथें ठेऊन तुह्मीं काय करणार?'

हेमू साभिमान ह्मणाला, 'पुन्हा अनूप आमच्या लोकांची कत्तल करील तेव्हां त्याला मी सांगेन कीं, तुझ्या मुलाचे प्राण माझ्या हातीं आहेत. इतक्यानेंच तो जयी झाला तरी पराभव मानील!'

जयश्री रागानें ह्मणाला, 'कसें ह्मटलें?'

हेमू ह्मणाला, 'अनूप माझा शत्रू आहे, आणि हा त्याचा पुत्र आहे. अनूप गेला तर हा सांपडला याला मी ठार मारणार!'

जयश्री ह्मणाला 'अहो? हें अंगावर पिणारें बालक मातेशिवाय येथें कसें राहील? आणि ही कटकट तुह्माला येथें पाहिजे तरी कशाला?'

हेमू ह्मणाला, 'गुस्सा!'

जयश्री स्वगत म्हणाला, 'हा मनुष्य नव्हे. राक्षस आहे. (प्रकाश) या निरपराध अज्ञान बालकाशीं गुस्सा कसचा? तुमच्या एका तरी कृत्याशीं या बालकाचा अर्थाअर्थीं संबंध आहे काय? त्याला तुमचीं वैमनस्यें काय समजतात. अहो! हें पहा तुह्मांकडे पाहून हंसतें आहे. गुलाबाच्या फुलासारखें हें बाळ मारून तुह्मांस काय मिळणार?

अशी दुष्टाशा धरतांना तुमच्या मनांत कांहींच विकत येत नाहीं कशी ? विचार करा; उगांच बफाम हाऊं नका. '

हेमू तिरस्कारानें ह्मणाला, ' तुह्मांला कां त्याची पंचाईत ? या पोराचें आह्मीं काय पाहिजे तें केलें ह्मणून तुमचें त्यांत काय नुकसान ? '

जयश्री म्हणाला, ' वाः माझ्या प्रियमित्राचा हा पुत्र. ज्याकरतां मी प्राण देण्यास तयार झालों त्या अनूपसिंहाचा हा मुलगा. त्याची पंचाईत मी करूं नये तर तुह्मीं करणार काय ? '

हेमू थट्टेनें ह्मणाला, ' या मुलाचा तोंडवळा आईसारखा आहे काय ? याच्या बापाला तर मीं पाहिलें आहेच. हें मूल तर खूपसूरत दिसतें ! '

जयश्रीचा त्वेष अनावर होत चालला. तो रागानें ह्मणाला, ' तुह्मीं काय समजतां ? या मुलाच्या एका केंसास धक्का लागला तर याद राखा; त्याचें प्रतिफल तुह्मांस तत्क्षणींच भोगावें लागेल. बालहत्या करणाऱ्या पातक्यास अनाथनाथ परमेश्वर यथोचित दंड करण्यास एका क्षणाचाही विलंब लावणार नाहीं. '

हेमू ह्मणाला, ' जसें ज्याचें नशिबीं असेल तसें होईल. तुह्मांला ती उठाठेव पाहिजे कशाला ? '

जयश्री ह्मणाला, ' माझा हक्क. तो माझा धर्म. तें माझें कर्तव्य आहे. समजलें ? मीं तुला जीवदान दिलें. माझें ऐकेन अशी तूं कुराणाची शपथ वाहिलीस. आणि आतां अशा लांब लांब गोष्टी सांगतोस काय ? मीं जितकावेळ तुझी विनवणी केली; तितकी एखाद्या दगडाची केली असती तर त्याला देखील द्रव फुटला असता ! पण नाहीं. तुझें फार निर्दय कठोर मन. आतां मीं निक्षून सांगतों, याच्या रक्ताचा एक थेंब भूमीवर पडला न पडला तोंच हें व्यर्थ वटवट करणारें तोंड धडापासून वेगळें करीन; कधीं सोडणार नाहीं मग ही तरवार आहे आणि मी आहें. ' असें म्हणत त्यानें म्यानांतून तरवार बाहेर काढिली.

हेमू म्हणाला, ' रागाऊं नका. तुह्मांला जाण्याची परवानगी दिली आहे. या मुलास येथें असूं द्या. आह्मीं याचा सांभाळ करूं. तुह्मी बेफिकीर चला. तुह्मीं मला तसेंच मींहि तुम्हाला जीवदान दिलें आहे. '

जयश्री म्हणाला, ' माझा प्राण गेला तरी बेहेत्तर ! या मुलास येथें

ठेवून मी कधीं जाणार नाहीं. एखाद्याला राग येईल असें आचरण करावें, आणि मग त्याला रागाऊं नका म्हणून सांगावें हा कांहीं मनाचा मोठपणा नव्हे. तुह्मी माझे मित्र म्हणवितां आणि एखादी क्षुल्लक गोष्ट ऐकणें देखील तुम्हांस जड जातें ? मीं तुम्हांला हात जोडून सांगतों. परमेश्वराशिवाय मीं कोणाला हात जोडिले नाहींत. भिक्षा मागण्याचा माझा धर्म नव्हे. परंतु केवळ या मुलाकरतां मी तुमच्या पाया पडतों; मजवर दया करा. हें अर्भक मला भिक्षा घाला. तुमचे हे उपकार मी आमरण विसरणार नाहीं. तुह्मीं वीर पुरुष आहां—थोर मनाचे-दयाळु आहां ! माझ्या विनंतीस मान द्या. मजवर मेहरबानी करा. '

हेमू ह्मणाला, ' तुमच्या विनंतीप्रमाणें आह्मीं खात्रीनें सांगतों कीं, या मुलास आह्मीं मारणार नाहीं. पण हें तुमच्याकडे द्यावें असें आमचें मन आह्मांस सांगत नाहीं. त्याला आमचा नाइलाज आहे. '

जयश्रीचा क्रोधाग्नि पुन्हा भडकला. अग्निप्रमाणें त्याचे नेत्र आरक्त दिसूं लागले सर्वांगास स्फुरण चढलें आणि तो कर्कशस्वरानें ह्मणाला, ' हेमू ? तूं हृदयशून्य, ममताशून्य आणि विचारशून्य आहेस. सुंदरी इलेचें सांगणें अक्षरशः खरें होतें. असो, जगदीश ! मीं तुझा फार आभारी आहें. माझ्याच हातून प्रतापसिंहाचा उद्धार व्हावा एतदर्थ पहारेवाल्यांकडून तूंच मला पकडून येथें पुन्हा आणविलेंस. नाहींतर अशा शेंकडों यवनांची मीं पर्वा केली नसती. मी निःशस्त्र होतों तरी जातां जातां शेंकडो दुष्टांच्या माना मुरगळून गेलों असतों. माझ्या हातीं शस्त्र नव्हतें तें तूं या हेमूकडून मला देवविलेंस; ठीक आहे. ' असें ह्मणून त्यानें पहिल्या तडाख्यास प्रतापसिंहास आपल्या कडेवर घेतलें आणि तरवार परजीत ह्मणाला, ' ज्याला आपला जीव नकोसा झाला असेल; जो आपल्या जिवावर उदार झाला असेल; ज्याच्या अंगांत पाणी असेल; जो हिंमतबहाद्दर ह्मणवीत असेल; ज्याला तरवारबहाद्दरीची घमेंड असेल आणि ज्याला हें मूल माझेकडून घेण्याचा हिय्या असेल त्यानें छाती ठोकून पुढें यावें. भित्र्यांनो ! तुह्मीं काय समजलां ? मीं तुमच्या हातींपायीं पडलों, कुत्र्यापुढें पदर पसरला. तरी तुह्मीं आपल्या नेहमींच्या गुणावर गेलां ?

फिकीर नाहीं. पुढें तर या खरे. प्रथम हेमूस ठार मारीन मग बाकीचीं कुत्रीं मेल्यासारखीं पडतील. ' असें म्हणत तो ताबडतोब तेथून निघाला.

जयश्रीचें अत्यद्भुत कर्म पहातांच आणि वीरश्रीयुक्त भाषण ऐकतांच, हेमू जेथच्या तेथें थिजला. पुढें काय करावें ? हेंच त्याला सुचेना. दानेषखांचीही तीच स्थिती झाली. त्यानें एकदां मान खालीं घातली ती हेमू बोलूं लागेपर्यंत वर उचललीच नाहीं. शेवटीं जयश्रीचा विचार कांहीं-वेळ एकीकडे ठेवून हेमू म्हणाला, ' दानेषखां ! रजपुतांच्या किल्ल्यांत आणि शहरांत गुप्त मार्गानें प्रवेश करण्याचीं जीं भुयारें आहेत त्यांजबद्दल आपण काय सांगत होतां ? '

दानेषखां म्हणाला, ' हे शिपायी माझ्या पथकांतीलच आहेत. यांनीं ती जागा पाहिली आहे. '

हेमू म्हणाला, ' तर मग आतां तुम्हीं असें करा. आपल्या बरोबर चार तरवारबहाद्दर वीर घ्या आणि होईल तितक्या त्वरेनें जाऊन जय-श्रीस पकडून आणा. पण सांभाळा. त्याच एका केंसासही धक्का लागूं देऊं नका. '

दानेषखां म्हणाला, ' तो कोणत्या मार्गानें गेला असेल कोण जाणें ! तरी मी आज्ञेप्रमाणें जातों. ' असें सांगून तो तेथून आपल्या तंबूंत आला. त्यानें बराच वेळ आतां कोणास बरोबर न्यावें, कोण शक्तिमान, वीरपुरुष आहेत ? हा विचार करून चार तरुण बांड बरोबर घेतले आणि जयश्री ज्या मार्गानें गेला त्याच मार्गानें त्याचा पाठलाग करीत निघाला.

हेमू म्हणाला, ' गफूरखां ? तुम्हींही जा. जयश्रीचा पाठलाग करा आणि त्याला पकडून आणा. त्याला येथें कैद करून आपण अचानक जाऊन गुप्त मार्ग आपल्या ताब्यांत घेऊं. '

गफूर म्हणाला, ' जसा खावंदांचा हुकूम ! ' असें म्हणून दाने-षच्या पाठोपाठ निघाला.

हेमू तंबूच्या बाहेर आला.

जयश्री निर्विघ्नपणें छावणीबाहेर आला. त्याला कोणीच प्रतिबंध केला नाहीं. आपल्या हद्दींत आलों असें दिसतांच तो कांहींवेळ विश्रांतिसाठीं एका झाडाखालीं बसला. तितक्यांत चार वीर पुरुष एकाएकीं त्याच्या

अंगावर आले. त्याबरोबर त्यानें त्यांचा एकदम शिरच्छेद केला आणि आतां येथें थांबणें नीट नव्हे असा विचार करून तो तेथून निघाला. हेमूनें हे लोक पाठविले असतील असें त्याच्या ध्यानींमनींही नव्हतें. तो बराच दूर गेल्यावर आणखी चार जवान त्यावर धांवले. तरवारीच्या युद्धांत तो हजारांस भारी होता ! त्यानें त्या चौघांसही कावळ्या कुत्र्यांच्या भक्ष्यस्थानीं घालून आपला मार्ग सुधारला. दानेषखां व गफूर पळाले. त्यांसही जयश्री युद्धास बोलावित होताच, पण त्यांनीं मागें पाहिलेंच नाहीं. ते पळत हेमूकडे आले.

प्रकरण २६ वें.

निराशा.

जयश्री गेला. दानेषखां व गफर हतवीर्य होऊन मागें आले. असें पहातांच हेमू ह्मणाला, ' पाहिलें ? तो एकटा रजपूत आह्मां देखत आपली जवानमर्दी व हुषारी दाखवून तें पोर घेऊन गेला. त्यानें आमच्या तोंडास काळें फांसलें. धिःकार असो आमच्या पौरुषास ! आणि शाबास रजपूतांची. ते खरे शूर, दिलदार, छातीचे धडे, हिंमतवान् आणि मोठ्या नेकीचे. नाहीं तर तो एकटा, तशांत त्याच्या मागें पोराचें लफडें तरी तितकेंही सांभळून तो हां हां ह्मणत पळून गेला. त्यानें तुम्हांस थक्क केलें. तुमचे जाडे आठ योद्धे जमीनदोस्त केले आणि तुह्मी जसे गेलां तसेच हात हालवीत आलां ! त्यांची जितकी तरीफ करावी तितकी थोडी ! गफूर, स्तब्ध कां राहिलास ? खालीं मान कां घालतोस ? असाच जा. बरोबर पंन्नास बंदुकवाले घोडेस्वार घे आणि पुन्हां जोमानें जयश्रीचा पाठलाग कर. होईल तितक्या लौकर जा. वेळ लावूं नकोस. त्याला जिवंत धरून आण. नाहीं तर बेहत्तर, गोळी घालून ठार मार. त्याला अनूपच्या पोरास घेऊन जाऊं देऊं नकोस. त्या दोघांचींही प्रेतें घेऊन येशील तर चांगलें बक्षीस देऊं. वाऱ्यासारखा जा आणि तीरासारखा ये. '

गफूर तावडतोब गेला.

हेमू दानेषखांस ह्मणाला. ' खानसाहेब ! आज. तुह्मीं मोठी तरवार

गाजविली. काय तुमची हिंमत ! तुमची हुषारी व तरतरी पाहून मी फार खुष झालों. इतक्या लोकांतून तो पोरास घेऊन एकटा गेला ! कांहींतरी तुम्हांस शरम वाटते ? खरोखर, तुह्मी सर्व लोक सुस्त, गाफील व बेफाम आहां. चाकरी कशी करावी हेंही तुम्हांस समजत नाहीं. बेहोष बेफिकीर वागणें तुम्हांस योग्य नव्हे. अनूपसिंहास घेऊन कोणी जाऊं दिलें ? जयश्री कसा आमचे छावणींत आला ? तो प्रत्यक्ष आमच्या तंबूंत आला तरी तुह्मांपैकीं एकालाही दाद नाहीं. काल रात्रीं कोण पहाऱ्यावर होते ? मी इतका ओरडलों तरी कोणी दाद घेतली नाहीं. आणा त्या हरामखोरांना आणि एकेकाच्या पाठीवर शंभर शंभर कोरडे उडवा. गफूरखां हुषार आहे, त्याची चलाखी माझ्या ध्यानांत आहे. बहुतकरून तो जयश्रीस घेतल्याशिवाय किंवा ठार मारल्याशिवाय परत येणार नाहीं. जयश्रीसच ठार मारावें असा माझा इरादा होता. परंतु मी शपथ देऊन चुकलों ! काय आश्चर्य पहा ! खुदानें त्याला आमच्या हातीं देऊन पुन्हा सोडविलें ! तो आमच्या हातींपायीं पडत होता तेव्हांच त्या पोरास त्याच्या हवालीं करतों तर आमचा मान राहून तो उपकारी झाला असता. आतां त्यानें आमच्या डोळ्यांत धूळ टाकिली—आमची फजिती केली आणि आपला उद्देश सफल केला. फार शरमेची गोष्ट. जयश्री हंसेल. अनूपसिंही हंसेल ! व त्यांचें हें हंसणें आम्हांस नेहमीं रडवील !! शस्त्राची जखम लौकर बरी होते पण अपमानदुःख एकसारखें टोंचित असतें. जयश्रीस गफूरखानानें कैद केलें, ठार मारिलें, किंवा जखमी केलें तरी आतां त्यांत काय अर्थ ? आतां कांहीं झालें तरी माझ्या मनाचें समाधान होणार नाहीं अनूपसिंहाचें पोर ठार मारावें. मीं मारलें हें त्याला समजावें. त्यानें नेहमीं रडत राहिलेलें मीं पहावें निदान ऐकावें तेव्हांच माझें मन शांत होईल. पोराच्या मायेनें त्याची माता मरती. ती मेली कीं, अनूपसिंह जगांतून उठलाच. अनूप मेला कीं, रजपूत कमजोर झालेच. आपल्या मागची एक कटकट गेली. मग आपण राजपुतान्याचे राजे ! आफसोस ! एक पोर मरतें तर आज मी बादशहा झालों असतों पण आपले लोक नादान ह्मणून माझें सर्व प्रकारें

नुकसान होत आहे. एक मनुष्य निमकहलाल नाहीं. पहावा तो निमकहराम ! फुकटचा पगार खातां ? तशीच ती इला. इतके दिवस मला लग्नाची आशा लावून शेवटीं माझ्या नाशास प्रवृत्त झाली. मीं तिच्या मोहक भाषणावर विश्वास ठेविला; तिच्या स्वरुपास लुब्ध झालों ह्मणून असा फसलों. नाहीं तर माझा हेतू केव्हांच सिद्धीस गेला असता. जसजसें मी तिचें ऐकत गेलों तसतशी ती माझ्या डोक्यावर बसूं लागली. नाहीं तर हिला राजकीय भानगडी पाहिजेत कशाला ? ती ह्मणेल तें एकलें. सांगेल तें केलें, तों तों ती फाजील होत चालली. आतां तिला जिवंत ठेवणें बरें नाहीं. तिला फांशींच दिलें पाहिजे. दुष्ट —अवदसा— कावेबाज. इतके दिवस लग्न करावयास कबूल आणि आतां ह्मणते सर्व पुरुष मला बापा भावाप्रमाणें आहेत. ठीक आहे. तुमच्या हिताकडे तुमचें लक्ष्य नाहीं. आज राजपुताना प्रांत आपल्या ताब्यांत येता तर मेवाड, मारवाड वगैरे प्रांतावरील सुभेदाराची एकेकास जागा देतां आली असती. पण तिकडे पहा तो कोण ? हा विचार समजतो आहे कोणाला ? ”

हेमूची अशी बडबड चालली होती. इतक्यांत घामानें डबडबलेला गफूरखां तेथें आला आणि नम्रपणानें सलाम करून उभा राहिला. तेव्हां हेमूनें विचारिलें. कसें काय झालें ? ’

गफूर ह्मणाला, ‘ खाविंद्, आह्मीं होती तितकी शिकस्त केली पण तो सैतान मुलास घेऊन फरारी झाला ’

हेमू ह्मणाला, ‘ त्याला तुह्मीं गोळया कां घातल्या नाहींत ? मी प्रथमच तुह्मांस त्यावर बेषक गोळया घाला असा हुकूम दिला होता. मग असें कसें झालें ?’

गफूर ह्मणाला, ‘ तो गोळीच्या टप्याबाहेर होता तरी आह्मीं गोळया सोडिल्या. पण तो वस्ताद गोळी खाऊन निसटला. हुजूर काय सांगूं ? तो इनसान नव्हे केवळ सैतानाची औलाद आहे. ’

हेमू ह्मणाला, ‘ काय ! जयश्री अनूपच्या मुलास घेऊन पळाला. त्याला एकही गोळी लागली नाहीं. ! मुलगा देखील मला नाहीं. ! ’ जयश्रीनें आज माझा कलेजा कापून नेला. दुःख— शरम— माझें कपाळ फिरूं लागलें. मी काय ऐकतों हें ?

गफूर ह्मणाला, ' त्याला आमची एक गोळी लागली असावी असा तर्क आहे. आणि तितकी त्याच्या मरणास बस्स आहे.

हेमू ह्मणाला, ' उगांच माझ्या मनाचें समाधान करूं नका. लौकरच काय तें समजेल. खरें सांग, गफूर, ती गोळी त्याला लागली कीं, पोरास लागली ? '

गफूर म्हणाला, ' बहुतांशीं जयश्रीस लागली असावी. '

हेमू म्हणाला, ' छीः छीः त्या पोरास लागली पाहिजे होती. '

दानेषखा म्हणाला, ' हुजूर ! फिकीर किंवा दुःख करण्यांत काय हांसल ? जें व्हायचें तें झालें. माझ्या मतानें आतां ज्या रीतीनें आपल्या हातीं रजपुतांचा खजिना मिळेल अशी तजवीज प्रथम पाहिली पाहिजे. शत्रूच्या किल्ल्यांत जाण्याचा गुप्त मार्ग आपणांस समजला आहे. आणि किल्ल्यांतच त्यांचा खजिना आहे. अशावेळीं अचानक ह्या मार्गानें आपण जाऊं आणि त्यांवर एकदम छापा घालूं तर आपला सर्व मतलब पार पडेल. आह्मीं अकस्मात् किल्ल्यांत गेलों कीं, रजपूत लोक भयानें चळचळ कापूं लागतील. शस्त्रास्त्रें ठेवून आमच्या पायीं पडतील. आह्मांस शरण येतील. मग आपण पाहिजे तर त्याचीं कत्तल करा. किंवा जीवदान द्या. जंगी लढाईशिवाय जय मिळण्याची अशी संधी पुन्हा सांपडेल किंवा नाहीं हा वानवाच. सावंत्रांस मी अर्ज केला पाहिजे असें नाहीं. अशावेळीं रजपूत लोक बेसावध असणारच. आणखीं मीं असेंही ऐकिलें आहे कीं, शहरांतील बायकामुलें, जडजवाहीर, मालखजिना घेऊन किल्ल्यांत राहिलीं आहेत. एकदां किल्ला सर केला कीं, रजपुतांचे बालबच्चे, औरती व खजिना आमच्या सहज हातीं येईल. '

हेमूच्या हृदयाकाशांत आशारूप सूर्याचा पुन्हा उदय झाला. विषाद्-मेघमंडलानें घेरलेल्या मुखचंद्रावर हास्यकिरण चमकूं लागले. तो उमेदींत आला. दानेषखांचें सांगणें खरें असावें असा त्याचा समज झाला. मनुष्य एकदां आशेस गुंतले ह्मणजे काय काय साधकबाधक तरंग उठवील त्याचा नेम नाहीं. बराच वेळ विचार केल्यावर हेमू ह्मणाला ' तुमचें सांगणें खरें आहे. तुह्मीं ह्मणतां तसें केलें तर आपला बहुतेक

कार्यभाग सिद्धीस गेला असेंच होईल. आतां वेळ लावूं नका. घाई. करावी तितकी यावेळीं उपयोगीं पडेल. गफूर ! तूं लौकर जा. आणि तुर्की रिसाल्यांतील निवडक पांचशें स्वारांस " तैयार रहा " असा हुकूम फर्माव. दानेष, तुह्मीं बडेबडे अम्मलदार घेऊन अर्ध्या घटकेच्या आंत लढाईची तयारी करा. '

दानेषखां व गफूरखां सलाम करून जाऊं लागले. तेव्हां हेमूनें त्यांस सांगितलें ' त्या कंबख्त इलेचें मी तोंड पाहूं इच्छित नाहीं. तिला ठार मारण्याचा हुकम सांगितला आहे. ध्यानांत ठेवा. आणि शेरखांस सांगून तिची शिक्षा अमलांत आणा. '

दानेषखां ह्मणाला, ' हुजूरच्या ताबेदारांस हा हुकूम समजलाच आहे परंतु --'

हेमू ह्मणाला, ' ती कमजात आहे. आणि तिला क्षमा करतां येईल. असा तिचा अपराध नाहीं आहे. सांगितलेला हुकूम सख्त रीतीनें अमलांत आलाच पाहिजे. '

गफूर ह्मणाला, ' तर मग तिला इकडे आणलें तेव्हांचे हिंदु कपडे तिला द्यावे आणि मग फांशीं द्यावें.

हेमू ह्मणाला, ' असें खरें. ते शेरखां काढन देईल. दानेष, आह्मीं लढाईत विजयी होऊन येतांच, सुंदरीस फांशी दिलें ही वर्दी प्रथम आली पाहिजे. सैतानजादी एकदां फांशीं गेली कीं, आमची एक दगदग कमी झाली. या लढाईत फत्ते मिळाली कीं, बादशहाच्या कन्येशीं हटकून आपला विवाह होईल. खबरदार माझ्या हुकमांत गफलत कराल तर. '

दानेषखां आपल्या तंबूंत गेला. आणि हेमू युद्धवेषानें सज्ज होण्याकरतां आपल्या शस्त्रागारांत आला.

प्रकरण २७ वें.

दरबार.

प्रातःकालींच उदयपूरचा महाराणा उदयसिंह आपल्या अमात्य-प्रभृति राजकारण चतुर मंडलासह सिंहासनावर बसला. सर्व सैनिक वीरांनीं ती जागा गजबजून गेली होती. साधारणतः सर्वांचीं मुखकमलें आनंदानें टवटवीत दिसत होतीं. गतयुद्धांत आपलें काय नुकसान झालें? याचा तपास केल्यावर जयश्री व अनूपसिंह यांनीं जें अलौकिक वीरत्व प्रकट केलें; त्याची प्रशंसा चालू झाली. जो पहावा तो त्यांच्या युद्ध कौशल्याची तारीफ करूं लागला. अनूपसिंह, यवनांच्या कारागृहांतून सुटून आला ह्मणून ते जगदीश्वराच्या व करालादेवीच्या कृपेची स्तुति करूं लागले. ते तिला अनेक धन्यवाद देत होते. इतक्यांत उमरावसिंह दरबारांत आला. आणि लीनतेनें वंदन करून म्हणाला. 'महाराजांची आज्ञा शिरसा वंद्य करून मीं यवनांच्या छावणींतुन येऊन अनूपसिंह सेनापति जिवंत असल्याचें वर्तमान जयश्रीस सांगतांच ते एकटे त्यांच्या छावणींत गेले आहेत. त्यांचा प्रथम शोध करणें किंवा त्यांच्या मुक्तेची तजवीज करणें भाग आहे. अनूपसिंह आल्याचें वर्तमान मला समजलें. परंतु, ते मला भेटले नाहींत यामुळें जयश्रीचें काय वर्तमान आहे! तें काहींच समजत नाहीं.'

माहाराणा ह्मणाला, 'बहुधा ते दोघेही आले असतील. अनूपसिंह भेटला कीं, सर्व हकिकत समजेल.'

अमात्य म्हणाला, 'तोंपर्यंत आपण स्वस्थ बसणें चांगलें नव्हे. असें मला वाटतें. कारण ते दुष्टलोक केव्हां काय करतील याचा नेम नाहीं.'

महाराणा ह्मणाला 'तर मग निवडक एक हजार लोकांची टोळी घेऊन मी स्वतः जातों.

उमरावसिंह म्हणाला. 'महाराजांनीं स्वतः इतकी तसदी घेतली पाहिजे असा अर्थ नाहीं माझ्यासारखा सामान्य पुरुषही तें काम सहज करील. फक्त आज्ञा होण्याची खोटी. मी हरतऱ्हा करीन आणि सेनापतीस सोडवून आणीन.'

इतक्यांत अनूपसिंह, रामानुजस्वामी व क्रीडा तेथें आली. रामानुजस्वामीची मुद्रा गंभीर दिसत होती. अनूपसिंह सचिंत दिसे आणि क्रीडा शुद्ध वेडी झाली होती. अनूपसिंहानें महाराण्यास वंदन केलें आणि रामानुजस्वामीस एका आसनावर बसविलें. क्रीडा त्याच्या पायाजवळ बसली. अनूपसिंह हात जोडून उभा राहिला. तेव्हां महाराणा म्हणाला. ' अनूपसिंह ? तुमची अशी दशा कां झाली ? हे स्वामि कोण आणि जयश्री कोठें आहे. तुम्हांला अशा दीनावस्थेंत पाहून माझें मन उद्विग्न होत आहे. '

अनूपसिंह म्हणाला, ' महाराज काय सांगूं ? मी सर्वप्रकारें संकटग्रस्त झालों आहे. जयश्री यवनांच्या कैदेंत आहे. त्याला मुक्त करण्याकरतां मी येतों असें सांगून मी इकडे आलों. माझ्या विरहानें ही माझी स्त्री वेडी होऊन मनास वाटेल तिकड हिंडत होती. ती आतांच मला भेटली. तिनें आपल्या मुलास जंगलांतील एका झोंपडींत ठेविलें होतें असें ही सांगते. पण तें मूल तेथें कोठें मिळालें नाहीं. किंवा त्याचें काय झालें हेंही समजलें नाहीं. त्याचा आम्हीं शोध करीत असतांना हे स्वामिमहाराज मला भेटले, हे महान् सत्पुरुष आहेत. हे माझे सन्मार्ग दर्शक गुरु आहेत. केवळ यांच्या कृपेनें किंवा वरदहस्तानें मी इतक्या योग्यतेस पोंचलों. हे त्रिकालज्ञ व महाविद्वान् आहेत. यांचें नांव रामानुजस्वामि. आतां मी कोणत्याही स्थितींत असलों तरी जयश्रीच्या मुक्ततेकरतां मला प्रथमतः तिकडे जाणें भाग आहे. '

महाराणा म्हणाला, " स्वामिमहाराजांची कीर्ति मला ऐकून माहीत आहे. आज प्रत्यक्ष दर्शन झालें. मी धन्य मानितों. " असें म्हणून महाराणा सिंहासनावरून उठला आणि त्यानें स्वामीस दंडवत प्रणाम केला.

स्वामि म्हणाला, " विजयोस्तु. तुझा प्रताप जगांत गाजो. तुझ्या हातून यवनांचा संहार होवो आणि कुलकीर्तिकवच तुझें सदैव संरक्षण करो. "

क्रीडा मध्येंच म्हणाली. ' या माझा प्रताप. प्रतापास पाहिल्याशिवाय मी अन्न घेणार नाहीं आणि हे पाय सोडणार नाहीं. बोला मला इकडे

कां आणिलें ! (अनूपसिंहाकडे पाहून.) तरी मी तुह्मांला इतकें सांगितलें कीं, भाऊरायास टाकून तुह्मीं एकटेच कां आलां इतक्यानेंच काय झालें आहे ? आणखी एकेक माझें राक्षसी कृत्य तुह्मीं ऐकाल तेव्हां तुमच्या निष्कपट प्रेमांत हालाहल विष कालविलें जाईल. भाऊराय ? यांना तेथेंच हो कां माझें घोर कृत्य सांगितलें नाहीं ? या अवदसेला देवानें चांगली शिक्षा दिली.

अनूपसिंह ह्मणाला, आतां ही काय बोलेल आणि काय करील याचा नेम नाहीं. हायरे दैवा. काय मजकडून तूं हें भयंकर कृत्य करविलेंस, कसें मला मोहजालांत अडकविलेंस, आतां कांहीं होवो. महाराज मला आज्ञा द्या. माझ्यानें येथें रहावत नाहीं. मी जयश्रीकडे जातों. त्याची सुटका झाल्याशिवाय मला चैन पडणार नाहीं.

क्रीडा ह्मणाली, ' खरेंच भयंकर कृत्य ! जग आतां असेंच ह्मणत बसेल. महाराज मुलें झालीं ह्मणजे सुख होतें आणि तीं गेलीं ह्मणजे मग काय होतें ?

अनूपसिंह म्हणाला, ' महाराज ! ही पुत्रवियोगानें अगदीं भ्रमिष्ट झाली आहे. हिच्या कोणत्याही प्रकारच्या बोलण्याकडे तुह्मीं लक्ष देऊं नका. '

महाराणा दीर्घ निश्वास सोडून म्हणाला, ' धीर धरा. कालपासून हा काल पावेतों; तुह्मीं एक सारखे संकटांत आहां. तुह्मीं जयश्रीच्या मुक्ततेस जाऊं नका. मी उमरावसिंहास आतांच पाठविणार होतों. परंतु तुह्मां दोघांचेंही काय वर्तमान आहे तें आम्हांस जसें समजावें तसें समजलें नव्हतें. इतक्याच करतां आह्मीं स्वस्थ होतों. कारण प्रसंग आला तरी तो धैर्य धरून टाळला पाहिजे. विपत्कालीं धैर्य धरणें हेंच थोर पुरुषाचें खरें सुलक्षण होय. क्रीडेच्या भाषणाकडे लक्ष देण्याचा हा समयच नव्हे. ती भ्रमिष्ठासारखें तोंडास येतें तें बोलत आहे. तुम्हांला संशय असेल तर आतांच प्रतापसिंहाचा शोध करण्याकरतां जंगलांत दोनशें मनुष्यें पाठवितों. आणि उमरावसिंह जयश्रीस सोडवून आणण्यास जाईल.

क्रीडा ह्मणाली, ' जंगलांत माझा प्रताप नाहीं असेंच ना स्वामीनीं

मला सांगितलें ? महाराज देतांना माझा प्रताप ? तुमच्या आज्ञेप्रमाणें. मी शहरांत आलें. तुम्हीं त्रिकालज्ञानी–सत्यवचनी–साधु पुरुष. 'तुम्हीं मिथ्या भाषण करीत नाहीं. आतां वेळ कां लावतां ? माझा अंत पहातां ?

अनूपसिंह म्हणाला, ' स्वामिनीं, प्रतापसिंह येथें भेटेल असें हिला सांगितलें आहे. आणि त्यांवर माझा विश्वास आहे. प्रतापाच्या शोधास मनुष्य पाठविण्याचें कारण नाहीं. परंतु, ज्यानें मला जीवदान दिलें, ज्यानें माझे प्राण वांचण्याकरतां आपले प्राण धोक्यांत घातले, जो माझा खरा प्राणमित्र त्याच्या मुक्ततेकरतां–माझ्या प्रीय मित्राच्या–मुक्ततेकरतां जाणें माझें मुख्य कर्तव्य होय. माझा सर्वप्रकारें घात झाला तरी मी आतां एकक्षण देखील येथें रहाणार नाहीं. माझे पाय येथें आहेत परंतु, माझें मन तिकडे गुंतलें आहे. त्याची सुटका केल्याशिवाय लोकांत तोंड दाखविण्यास मला मार्ग नाहीं.

इतकावेळ रामानुजस्वामि विचारमग्न होता. जणो, तो अंतरज्ञानानें कांहीं पहात असावा असा दिसे. एकाएकीं त्याची वृत्ति बदलली आणि तो पुढें हात करून म्हणाला, ' हा पहा जयश्री प्रतापसिंहास घेऊन आला. '

स्वामीचें भाषण पुरें झालें नाहीं तोंच, रक्तबंबाळ झालेला जयश्री प्रतापसिंहास घेऊन आला. सर्वांचा आनंद गगनीं मावेना, ' वाहवा जयश्री ! शाबास जयश्री ! तुझा सदैव विजय असो ' अशा आनंदध्वनीनें सभागृह गजबजलें.

जयश्री महाराण्यास वंदन करण्याकरतां खालीं वांकणार तोंच महाराण्यानें त्याला कडकडून आलिंगन दिलें आणि म्हटलें, ' धन्य जयश्री ! शाबास !

अनूपसिंह जयश्रीच्या गळयास मिठी मारून म्हणाला ' प्रियमित्रा ! मी तुझ्या उपकारऋणांतून कसारे मुक्त होणार ? '

जयश्री म्हणाला, ' अनूपसिंह ! हा घे तुझा प्रताप. '

अनूपसिंहानें प्रतापास आपल्याकडे घेतलें तोंच क्रीडा तेथें आली. आणि प्रतापास आपल्या कडेवर घेऊन म्हणाली, ' अगबाई ! माझ्या लाडक्याच्या अंगांतून रक्त कसें वहातें ? '

जयश्री ह्मणाला, ' ताई ? हें त्याच्या अंगांतील रक्त नव्हे. या जय-श्रीनें त्याच्याकरतां आपलें इतकें रक्त खर्ची घातलें आहे. हा तुझा पति अनूपसिंह आणि हा तुझा पुत्र प्रतापसिंह. झालें, मी आज कृतकृत्य झालों, माझें कर्तव्य मीं केलें. आतां मी मेलों तरी बेहेत्तर ! मी निर्धास्त झालों. दुष्ट यवनांनीं मजवर गोळया घातल्या काय ? अरे कृतघ्ना हेमू ? मित्रा अनूपसिंहा, तूंच आतां रजपूतांचा आधार—तुझ्याच हिंमतीवर त्यांच्या उमेदी—तुह्मां सर्वांस देव आनंदांत ठेवो—माझ्या जन्मभूमीस मी शेव-टचा प्रणाम करतों. परमेश्वर मला सद्गति देवो—मजकडून समजूनउम-जून किंवा न समजता कोणाचा कांहीं अपराध घडला असेल तर त्यानें मला मनापासून क्षमा करावी—सर्वांची मजवर कृपादृष्टि असो. आतां या जगांत माझी कोणतीच आशा राहिली नाहीं. लोभ ठेवा. ज-ग-दी-श '

असें बोलतां बोलतां जयश्री अचेतन पडला. त्याबरोबर अनुप-सिंहानें त्याला उचलून मांडी दिली. क्रीडा, " भाऊराव ! भाऊराव ? काय केलें हें ? असा आक्रोश करूं लागली. महाराणा घाईनें ह्मणाला, " उमराव " ! राजवैद्य. पाणी. उमराव वाड्यांत गेला, त्यानें पाणी आणिलें. अनुपसिंहानें तें पाणी घेऊन जयश्रीच्या नेत्रांस लाविलें आणि मस्तकावर सिंचन केलें. उमरावसिंहानें जयश्रीचा आंगरखा फाडून काढिला. आणि जेथें गोळी लागली होती तेथें आपला कमरबंद काढून घट्ट बांधिला. तेव्हां रक्तस्राव बंद झाला. रामानुजस्वामिही जयश्री पडला होता तेथें आला. आणि ह्मणाला, " येथील गर्दी कमी करा. कोणी काळजी करूं नका. जयश्री आणखी एक घटकेनें सावध होईल, क्रीडा पदरानें वारा घालूं लागली आणि आपल्या दैवास बोल लावतांना ह्मणूं लागली ' काय मी हतभाग्य ! माझ्या दुर्दैवानें आज दोन दिवस माझा एकसारखा छल मांडिला आहे. माझें अनंतजन्माचें पाप आज उभें राहिलें. आतां माझ्या कपाळीं दुःख. दुःखामागून दुःख प्रसवतें असें ह्मणतात तें अगदीं खरें. त्यांच्या करतां रडलें. माझ्या लेंकरा करतां रडलें. आतां भाऊरायाची ही दशा ! अहो मी तुह्मांस फार छळलें. बोलूं नये तें बोललें. ह्मणून तुह्मीं मजवर रागावलां ? नका हो नका. मजवर असा राग करूं नका. मला क्षमा करा. मी पायां पडलें—पदर पसरतें. बोला हो एक शब्द

तरी बोला. मी चुकलें. पुन्हा मी असें बोलणार नाहीं. मजवर आकाश-कोसळलें तेव्हां मी विकलचित्त होतें. तेव्हां मला शुद्धि नव्हती. मीं वेडी झालें होतें. तशा स्थितींत असतांना बोलूं नये तें बोललें ह्मणून या धर्म-भगिनीवर असें रागवावें काय ? मी तुमची बहीण आणि भावानें तिज-वर असा राग करावा ? नाहीं, असें करूं नका. माझा अन्याय पोटांत घाला. मजगरिबावर दया करा. बायका या बोलून चालून मूर्ख— अज्ञान हें तुह्मांला माहीत आहे. त्यांच्या अपराधांची क्षमा करणें हें तुम्हां-सारख्या थोरमनच्या पुरुषांचें कर्तव्य. मीं तुह्मांला मित्रप्रेमाच्या अढळ पर्वतावरून पापकर्दमांत लोटलें. मला आतां पश्चाताप झाला. तुह्मीं आह्मांकरतां आपल्या प्राणाचीही बेपर्वा केली. त्यांस यवनांच्या मकरदाढेंतून सोडविलें. प्रतापास काळाच्या जबड्यांतून वांचविलें. हे तुमचे उपकार मी कसे फेडूं ? माझ्या देहाचें कातडें काढून त्याच्या पादरक्षा तुमच्या पायांत घातल्या तरी तुमचे उपकार फिटणार नाहींत. हाय ! हाय ! घात झाला ! देवीमाते ? आतां माझ्या भाऊरायास मी कोठें पाहूं ? भाऊराय ? तुमच्या गुणांस मोल नाहीं उपकारांस सीमा नाहीं. मी तुह्मांस पातकी ह्मटलें ह्मणून कांहो मजवर असा राग ? बोला हो. एक शब्द तरी बोला. या अपराधी बहिणीकडे एकदां तरी नेत्र उघ-डून पहा. आतां आमचा अंत पाहूं नका., आतां मी भाऊराय ह्मणून प्रेमानें कोणाला बरें हांक मारूं ? आजपर्यंत जसें निष्कपट निःस्वार्थ प्रेम ठेविलें तसेंच निरंतर ठेवा. मीं तुमच्या कोमल मनावर वज्रप्रहार केले. चुकलें, ही पहा पाया पडतें–पदर पसरतें–मला क्षमा करा.

एका क्षणापूर्वी त्या सभागृहांत जो आनंदींआनंद होता तो एकदम रसातळास गेला. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें सर्वत्र औदासिन्याची छाया पसरली. जो पहावा तो चिंताग्रस्त दिसूं लागला. तेव्हां रामानुज-स्वामीनें जयश्रीवर मंत्रोदक सिंचन केलें. त्यानंतर कांहीं वेळानें जयश्री सावध झाला. त्यानें नेत्र उघडले. आणि—– पा–णी असें ह्मणतांच क्रीडा पाणी घेऊन आली. तिनें त्याला पाणी दिलें. तेव्हां जयश्री चांगला शुद्धींत आला. आणि ह्मणाला, " आतां मला जगण्याची उमेद नाहीं आणि मरणाचेंही दुःख नाहीं. आज माझ्या जन्माचें सार्थक्य

झालें. परमेश्वरानें आज माझें तोंड उजळ केलें " असें बोलतां बोलतां पुन्हा तो निचेष्टित पडला.

महाराणा ह्मणाला, " अमात्य ! तुह्मीं जा आणि शस्त्रवैद्यास लौकर घेऊन या. '

अमात्य जाऊं लागला. त्यास स्वामीनें सांगितलें. ही जखम असाध्य नाहीं. याला शस्त्रवैद्याची गरज नाहीं. अशीच आणखी एकदां किंवा दोनदां घेरी येऊन जाईल आणि तो चांगला शुद्धींत आला असें मला दिसलें कीं, मी औषधीप्रयोगानें एकाक्षणांत गोळी बाहेर काढून जखम बंद करीन. तुह्मीं कोणी याची काळजी करूं नका. जगदीश लौकर यास आराम देईल.

असें संभाषण चाललें आहे इतक्यांत एक घोडेस्वार तेथें आला आणि सांगूं लागला. ' महाराज ! सुमारें पांच सहाशें लोक बरोबर घेऊन हेमू या जंगलांत येत आहे. '

महाराणा ह्मणाला, ' चिंता नाहीं. येऊं द्या. अजून त्याची खुमखुम जिरली नाहीं. आमच्या खासगी रिसाल्याची तयारी करा. आणि एकदम युद्धाचा नगारा वाजवा. वीरगण ? पहातां काय ? शत्रु तुमच्या द्वारांत चालून येत आहे. चला— उठा— त्या चांडाळांनीं तुमच्या बायकामुलांस, बंधूभगिनींस आणि मालमत्तेस घेरा घालण्याचा इरादा धरिला असेल. स्वस्थ बसण्याचा हा वेळ नव्हे. कालच्या लढाईंत तुह्मीं त्या दुष्टांची चांगली खोड मोडिली. त्यांना पळतां भुई थोडी झाली. त्यांचे शेंकडों लोक मेले व जखमी झाले. जगांत तोंड दाखविण्यास त्यांस मार्ग राहिला नाहीं. तरी ते कपटी अद्यापि शुद्धींत येत नाहींत. बलानें नाहीं तर छळानें किंवा कपटानें तरी ते आमचा घात करूं पहात आहेत. इतका त्यांचा मोड झाला तरी त्यांची रग जिरली नाहीं ! तुह्मी मर्दासारखे मर्द; मारीन किंवा मरेन अशा दृढ निश्चयानें लढणारे; तुमच्या शौर्याची जितकी तारीफ करावी तितकी थोडी. तुह्मीं मनावर घ्याल तर काळास हाणून पाडाल. एक लिंग भगवंताचें नांव घ्या आणि तरवार गाजवा. '

महाराणा कीडेसँ सांगूं लागला. ' अनूपसिंहास फार श्रम झाले आहेत

हें खरें; तरी जयश्रीची अत्यावस्था आहे. एतदर्थ नाइलाज ह्मणून अनू-पसिंहास आमच्या बरोबर नेणें भाग आहे. स्वामिमहाराजांच्या वचनावर विश्वास ठेवून आह्मीं जात आहों. विजयी होऊन येतों तों जयश्री पूर्ववत् झालेला आह्मीं पाहूं अशी आमची मनापासून उमेद असून ती पूर्ण करणें महाराजांच्या हातीं आहे. तूं होतील तितके परिश्रम करून जयश्रीची सेवा कर. त्याला सांभाळ. जयश्री राजपूतान्याच्या सौभाग्यमंदिराचा आधारस्तंभ आहे. तो माझा उजवा हात आहे. असें वीररत्न सांपडणार नाहीं. यानें क्षत्रियांचें नांव राखिलें आहे. याच्या उमेदीवर आह्मीं काय पाहिजे तें करीत आहों. असा शौर्याचा मूर्तिमंत पुतळा त्रिभुवनांत दुर्लभ. ह्यानें आपल्या प्राणाची बेपर्वा करून अनूपसिंहाचे प्राण वांचविले. प्रतापसिंहाचें काळाच्या हांतून संरक्षण केलें. यानेंच तुला सौभाग्यदान दिलें. याचे गुणानुवाद गातां सहस्र मुखांचा शेषही थकेल. याला टाकून कोठें जाऊं नको. तूं सूज्ञ आहेस. मी सांगितलें पाहिजे असें नाहीं. परंतु, जयश्रीवर माझें जें निःसीम प्रेम प्रेम आहे तें मला उगा राहूं देईना. याला अशा स्थितींत टाकून जाणें आह्मांस अनुचित. परंतु आमचाही नाइलाज आहे.

क्रीडा ह्मणाली, ' महाराज ! माझे प्राण देऊन जर यांचे प्राण वाचतात तर मी आतां सिद्ध आहें. तुह्मीं निर्धास्त चला. माझ्या भाऊरायास मी प्राणापलिकडे जपेन.

अनूपसिंह ह्मणाला, ' जयश्री माझा प्राणमित्र आहे. त्यांनें मला प्राणदान आणि तुला सौभाग्यदान दिलें आहे. आह्मीं अनंत जन्म तपश्चर्या केली होती ह्मणून अशा सन्मित्राचा आम्हांस लाभ घडला. याच्या उपकाराची उतराई होण्याकरतां हजारों जन्म घेऊन याच्या घरीं पाणी भरलें तरी ते फिटणार नाहींत. तेथें एका जन्माची कथा काय ? तशांत माझें दुर्दैव किती बलवत्तर पहा ? मला युद्धास जाणें भाग. माझा जिवलग मित्र अशा स्थितींत पडलेला काय करूं ? अशा स्थितींत माझ्या मित्राची शुश्रुषा करावयास मी जवळ नसावें असें माझ्या कपाळीं लिहितांना ब्रह्मदेवाच्या दयाळु मनास कांहींच संकोच वाटला नाहीं कसा ? अरेरे ! हें दुःख मी कधींच विस-

रणार नाहीं. चांडाळानो ? आह्मीं संकटांत आहों असें पाहून आपला डाव साधावा अशी तुमची इच्छा आहे काय ? हेमू ? तूं काय समजतोस ? आजच्या लढाईत तुला मारीन तर मीच ठार मारीन. तुझ्या नरडीचा घोट घेतल्याशिवाय माझें मन थंड होणार नाहीं. माझी तरवार तुझ्या रक्तानें रंगवीन तर मीच रंगवीन. तुझा तडाक्यासरसा करालादेवीस बळी देतों. तिला यवनरक्ताची तहान लागली आहे. फार माजलास ? तुला माझ्या हाताचा तडाका नीट मिळाला नाहीं. आतां तुला ठार मारून अह्मां लोकांची एक पीडा अजीबात नाहींशी करतों. क्षात्रियांच्या जाज्वल्य तेजानें तुला जाळून खाक करतों. सांभाळ कोठे माझ्या जयश्रीस ! मी जातों. स्वामिमहाराज मी आपल्यास प्रणिपात करितों. माझ्या मित्राचें सर्व प्रकारें संरक्षण करा. हीच या पायाकडे शेवटची विनंती आहे. पुढें या पायांचें दर्शन होईल तो सुदीन.

अनुपसिंह जावयास निघाला तितक्यांत जयश्री पुन्हा सावध झाला. यवनांची फौज आपल्यावर चाल करून येत आहे असें ऐकतांच तो आरक्त नेत्र करून चोंहीकडे पाहूं लागला. त्याचे बाहु स्फुरण पावूं लागले. तडाक्यासरसा तो उठून बसला. त्यानें आपल्या तरवारीस हात घातला. तरी त्याच्यानें बसवेना. तो पुन्हा भूमिवर पडला. आणि व्याकुलतेनें ह्मणाला, " धिःकार असो माझ्या जिण्यास ! किती मी हतभाग्य ? युद्धाच्यावेळीं बायकां सारखें मी येथें पडून रहावें असा प्रसंग आला ! जगदीश ! क्षत्रिय कुळांत माझें जन्म आणि ही दशा ? माझी दंडास लागलेली गोळी तशीच राहूं द्या. मला तुह्मीं रणांगणांत न्या. येथें दुःखभोगित बिछान्यावर पडून मरण्यापेक्षां रणक्षेत्रांत मेलेलें चांगलें. ते नराधम मजपुढें कसें काय युद्ध करतात तें मीं डोळे भरून पाहीन. न्याहो–मला कोणीतरी बरोबर न्या. माझें मागणें पुरें करा. "

महाराणा ह्मणाला. " तुमच्या हातांतील गोळी निघून जखम बाळल्याशिवाय तुह्मीं बाहेर निघणें चांगलें नव्हे. तुमच्या अंगांतून फार रक्त गेलें आहे. तुह्मांला अवसान नाहीं. तुह्मीं बरें व्हा आणि मग या. शूर पुरुषाला मरणाची मुळींच पर्वा नाहीं. अंथरुणावर पडून मरण्यापेक्षां युद्धात मरणें पुण्यकारक हें सर्व खरें. पण हा वेळ तसा नाहीं.

रामानुजस्वामिनें आपल्या बटव्यांतून एक मुळी काढिली आणि सांगि-तलें " आतां तुह्मीं लौकर हुषार व्हाल. ह्या मुळीचा लेप केला कीं, आंतील गोळी आपोआप बाहेर येईल व जखम तेव्हांच भरेल. तुह्मीं हुषार झाला कीं, मलाहीं रणांगणांत घेऊन चला. मी तुमच्या बरोबर येईन. आतां कांहीं वेळ स्वस्थ पडून रहा ह्मणजे तुह्मांस सुखानें निद्रा येईल आणि तुह्मी हुषार व्हाल. "

अनूपसिंह म्हणाला, ' हे स्वामि महत्पुरुष आहेत. यांचें सांगणें कधींही खोटें होत नाहीं. यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून आणि महा-राण्याच्या व माझ्या सांगण्यास मान देऊन तूं स्वस्थ येथें रहा. आज मी अशी प्रतिज्ञा करून जात आहें कीं, हेमूस ठार मारीन किंवा तुझ्या-सारखा जखमी तरी पाडीन. नाहींतर पुन्हा तरवार हातांत धर-णार नाहीं. किंवा जगांत तोंड दाखविणार नाहीं. आज रज-पुतांच्या तरवारींचें पाणी किती तिक्ष्ण आहे ? रजपुतांचा प्रताप किती प्रखर आहे ? हें हेमूस चांगलें दाखविल्याशिवाय रहात नाहीं. शरीरपतन किंवा कार्यसाधन याशिवाय दुसरें कांहींच कर्तव्य नाहीं. आतां या देहावर वज्रपात होवो, त्याला मी बिल-कुल जुमानीत नाहीं. आतां रणभेरींची घनघोर रणगर्जना माझ्या कानांत दणदणूं लागली. माझें क्षात्रतेज अनावर झालें. त्या नराधम हेमूच्या आरक्त रक्ताचा भूमिवर शिंतोडा घालतों आणि त्याच्या रक्तानें लालेलाल झालेली तरवार माझे प्रियमित्रास दाखवून माझी स्वामि-भक्ति, स्वदेशश्रद्धा, स्वधर्मश्रद्धा, कर्तव्यनिष्ठा आणि मित्रप्रेम गाजवितों. देवी कराले ! यावेळीं तुझी प्रचंड शक्ति मला दे. आणि तूं जसा महिषा-सुराचा वध केलास तसा माझ्या हातून यवनमहिषाचा वध कर. '

महाराणा, अनूपसिंह प्रभृति सैनिक वीरांसह तेथून निघून गेला.

प्रकरण २८ वें.

धर्माचा जय.

महाराण्याचा हुकूम होतांच, एक हजार निवडक योद्धे घेऊन अनुपसिंह यवनांवर चाल करून गेला. महाराणा किल्ल्यांत राहिला. अनुपसिंहानें आपल्या फौजेचे दोन भाग केले. त्यापैकीं एक भाग आपल्या बरोबर घेऊन तो जंगलांत गेला. आणि दुसऱ्या भागाचे आणखी दोन भाग करून त्यांनीं दोन दिशांनीं जाऊन शत्रुसेनेच्या पिछाडीवर हल्ला करावा. असा त्यानें त्यांस हुकूम केला. शत्रूस दोन्ही कडून अडवावें असा त्याचा विचार होता. तो ह्मणाला ' आह्मीं प्रथम हल्ला करूं. शत्रु आम्हांशीं लढूं लागले ह्मणजे दुसऱ्या दोन्हीं भागांनीं एकदम त्यांच्या पिछाडीवर हल्ला केला कीं, ते दुमारांत सांपडतील आणि आमच्या कटांतून त्यांस सुटतांही येणार नाहीं.

अनूपसिंहाची आज्ञा होतांच, त्याच्या फौजेचे प्रथम दोन भाग झाले आणि दुसऱ्या भागाचे आणखी दोन भाग होऊन दोन दिशांनीं यवनावर गेले. यवनांची तयारी होतीच. परंतु, त्यांचा समज चुकीचा होता. दानेषखांस त्याच्या तैनातींतील शिपायांनीं आपल्याला गुप्त मार्गाची माहिती आहे असें जें सांगितलें तें निव्वळ खोटें होतें आणि त्यांच्या भाषणावर विश्वास ठेवून हेमू फार थोड्या लोकांसह आला होता. बहुधा लढाईचा प्रसंग न येतांच, रजपुतांचा खाजेना तरी हस्तगत होईल अशी त्यास धमक होती. म्हणून तो एकदम जंगलाकडे निघाला. तेथें अनूपसिंह आपल्या तयारींत होताच. दोन्ही सेनांची गांठ पडतांच, लढाईस प्रारंभ झाला. पहिल्याच सपाट्यास रजपुतांनीं यवनांचें आक्रमण केलें. ते समोर सांपडेल त्याचा चेंदामेंदा करीत चालले. त्यांच्या खड्ग, पट्टीश, गदातोमरादिकांच्या अनिवार मारापुढें यवनांचा टिकाव निघेना. त्यांच्या सेनेची फळी फुटली. ते आपल्या सेनानायकाचें आश्वासन किंवा आज्ञा जुमानीनातसें झालें. यवन घाबरले असें पहातांच, रजपुतांस जास्त चेव येऊं लागला. ते करालदेवीचा जयजयकार करीत पुढें

निघाले. त्याबरोबर यवनांचा धीर खचला. ते वाट सांपडेल तिकडे पळूं लागले. हेमू आपल्या बरोबरच्या पन्नास लोकांसह उलट खाऊन अनूपसिंह ज्या जंगलांत होता त्यांतच शिरला. बाकीच्या कित्येक पळपुट्या लोकांची अनूपसिंहाच्या ताब्यांतील फौजेच्या दोन्हीं भागांनीं कत्तल उडविली. हेमू ज्या जंगलांत शिरला होता तेथें त्याला अनूपसिंहाच्या फौजेनें गराडा घातला आणि बंदुकांचा मारा चालविला. त्या तडाक्यांत हेमूचे सात वीर ठार झाले. इतक्यांत त्याचें दुसऱ्या भागाचें सैन्य त्यास येऊन मिळालें. आतां आपण वांचत नाहीं अशी हेमूची खातरजमा होतांच तो आपल्या लोकांस सांगूं लागला. 'आतां येथें रहाण्याची मारामार. पळून जावें तरी निरुपाय. सर्व प्रकारें आपण संकटांत सांपडलों. माझ्यामतें असें कुचमत मरण्यापेक्षां शत्रूशीं चार हात करूं आणि कुडींत प्राण आहे तों मारतां मारतां मरूं. अशा स्थितींत दुस्मानांनीं आह्मांस पकडावें, बंदीवान करावें आणि हाल हाल करून ठार मारावें, त्यापेक्षां लढाईच्या मैदानांत मेलेलें बरें. आमचे सर्व हेतू अजिबात फसले.'

हेमू आपले लोकांसह झाडींतुन बाहेर आला. त्याचा लढाई करून मरावें हा निश्चय ठरला. तो ह्मणाला 'तुह्मां लोकांचे सेनापति जयश्री व अनूप कोठें आहेत ?'

अनूपसिंह म्हणाला, 'कां ? तुझें त्यांशीं काय काम आहे ?

हेमू ह्मणाला, 'अहो ? मजकडे फारतर चाळीस लोक असतील किंवा नसतील. आणि तुमच्याकडे दहाबाराशें लोक आहेत. परस्परांच्या स्थितीकडे पाहिलें तर याप्रकारास कोणी विचारी मनुष्य युद्ध ह्मणणार नाहीं. केवळ तुह्मीं आह्मांवर हा दरोडा घालीत आहां. आमची कशीही पद्धति असो. पण जो खरा रजपूत असेल तो आमची अशी दशा पाहून युद्धाचें नांवच घेणार नाहीं. माझ्यामतें आपण द्वंद्वयुद्ध करूं ह्मणजे तुमच्या शौर्याची परिक्षा होऊन लढाईची तकार मिटेल. उभय पक्षांतील लोकांनीं फक्त आह्मां दोघांचें युद्ध पहावें. कोणी कोणाला खुणा करूं नये. किंवा एक पक्ष पडतो आहे ह्मणून त्या पक्षांतील लोकांनीं त्यास सहाय्य करूं नये कोणाचाही जय किंवा पराजय हावो. आह्मां दोघांचें युद्ध केवळ

ति-हाइताप्रमाणें पहावें. याविषयीं आपलें मत काय आहे तें सांगा ? ’

अनूपसिंह ह्मणाला, “ आह्मां लोकांच्या सालसपणामुळें लबाड लोकांचें फावतें तें असेंच. असो, त्या गोष्टीचा आतां विचारच नको. मला तुमचें ह्मणणें मान्य आहे. ”

अनूपसिंह आणि हेमू आपल्या लोकांसह प्रशस्त मैदानांत आले. त्यांनीं “ आमचें युद्ध तटस्थ राहून पहा. कोणी कोणालाही कसल्याच प्रकारची मदत करूं नये असें बजाऊन सांगितलें. द्वंद्वयुद्धास प्रारंभ झाला. ते मत्त गजाप्रमाणें एकमेकांस टक्कर देऊं लागले. केव्हां हेमू जयी आणि अनूप विजयी होतो असें दिसें. केव्हां अनूपसिंहाचा जय आणि हेमूचा पराजय होईल असें वाटें. मल्लयुद्धानंतर कांहीं वेळ त्यांनीं भल्लयुद्ध केलें. नंतर खड्गयुद्धास प्रारंभ झाला. सर्व प्रकारच्या युद्धांत हेमू चांगला प्रवीण होता. आणि अनूपसिंह देखील त्याचाच शिष्य. खड्ग युद्धांतील सलामीच्या पहिल्याच सपाट्यास हेमूनें अनूपसिंहास कठीण पेंचांत आणिलें. तरी अनूपसिंह युक्तीनें त्यांतून निसटलाच. दोघेही जाडेवीर. दोघांच्याही मनांत द्वेषभाव. हेमू निरनिराळ्या पेंचांत अनूपसिंहास अडवूं पाही. अनूपसिंह तितके त्याचे पेंच उलगडी. बराचवेळ तरवारींची चकमक झडली. विजेसारख्या तीक्ष्ण तरवारी चक्राकार फिरवून ते प्रतिपक्षाचा आघात चुकवून प्रत्याघात करूं पहात. केव्हां आवरण आणि केव्हां प्रसरण करून ते आपला बचाव करीत. त्या खडाजंगी युद्धांत ते केव्हां दपट, द्वक, लपक, बैठक व फिर्की मारून ते मोठ्या चपलतेनें आत्मरक्षण करीत. बराचवेळ खड्गयुद्ध झाल्यावर हेमूनें असा एक जबर आघात केला कीं, तो जर अनुपसिंहास लागता तर तो ठार झालाच असता. पण मोठ्या शिताफिनें त्यानें तो वार ढालेवर सांभाळिला. तरी त्यानें ढाल कापून गेली. हेमू दुसरा वार करणार तितक्यांत ‘ सांभाळ ’ ह्मणून अनूपसिंहानें अशा आवेशानें व कुशलतेनें तरवार चालविली कीं, हेमू थक्क झाला ! पुढें काय करावें हेंच त्याला सुचेना. अनूपसिंहानें अडविलेल्या कठीण पेंचांतून आपला कसा बचाव करावा हें त्याच्या ध्यानांत येईना. त्याच्या नेत्रांपुढें अंधार दिसूं लागला. तरी तो धाडसी तितक्यांत सवड साधून एक पाऊल मागें हटला. अनूपसिं-

हाचा वार हेमूच्या मानेवरच बसावयाचा पण तो मागें हटल्यामुळें खांद्या-वर बसला आणि त्यामुळें तो मूर्छित पडला. तेव्हांच प्रेक्षकांनीं तर्क केला कीं, या मूर्छेतुन हेमू सावध होत नाहीं. त्याचा प्राणवायु देहांतून निघून गेला असावा !

यवन ' तोबा ! तोबा ! ' करूं लागले. रजपूत आनंदाचा गजर करूं लागले. यवनांच्या छावणींत दुःखाचा आणि रजपूत लोकांत आनंदाचा वर्षाव होऊं लागला.

प्रकरण २९ वें.

ही कोण ?

अहो ? ह्या निर्जन वनांत, ह्या भयंकर गिरीकंदरांत, ही कोण ? ही ज्योतिर्मयी प्रतिभा कोण ? ही प्रतिभाशालिनी आणि आश्चर्य जनक योगिनी कोण ? ही कोणी देवकन्या आहे ? कीं अप्सरा आहे ? किंवारी तर नव्हे ? ही कोणी मायाविनी तर नसेल ? किंवा ही आरवली पर्वतां-तील अरण्याची अधिष्ठात्री कोणी देवतातर नसेल ? तुह्मांला वाटतें कीं, चितोडगडची ही राजलक्ष्मी असावी ? छीः तर मग ही मूर्तिमति—महा-माया कालिका देवि नव्हेना ? असेल. कारण हिच्या हातांत त्रिशूल आहे. पाहिजेच तो. यवनांचा संहार करण्याकरतां जर तिनें असा अवतार घेतला असेल — यवन निशाचरांचा संहार करावा असा तिचा हेतू असेल— तर तिला त्रिशूलासारखीं दुष्टांचा प्राणनाश करणारीं शस्त्रास्त्रं पाहिजेतच. बरें, पण ही या निर्जन अरण्यांत कां आली ? हिचा इकडे येण्याचा उद्देश काय ? आणि ही आहे तरी कोण ? काय चमत्कार पहा ? ही कोण आहे ? हेंच समजावें तसें समजत नाहीं. काय आश्चर्य हें ! विचार करा. नीट पहा. ही वनदेवता नव्हे, अप्सराही नव्हे. तर मग ही आहे तरी कोण ? तिच्या अंगकांति-कडे निहाळून पहा. तिच्या सौंदर्याकडे पहा. ही आपली पूर्व परिचित इला नव्हे काय ? होय. इलाच ही—हीच ती सुंदरी इला. पण ही इकडे कां व कशी आली ? हेमूनें तिला फांशीं देण्याची शिक्षा सांगि-

तली होती. शेरखानानें ती शिक्षा सक्त रीतीनें अमलांत आणावी असा हुकूम केला होता. हिचा पोषाक हिंदुसारखाच दिसतो. पण ही शेरखांच्या तडाक्यांतून सुटली कशी ? त्यानें तिला फांसावर चढविलें नाहीं ? त्याच्या मनांत काय शंका आली ? इतकी रागीट इला शांत कशी दिसते ? तिची मुखकांती साभिमान दिसावी ती आज गंभीर कशी दिसते ? हिच्या स्थितींत एकाएकीं इतका पालट ? मग हें खरोखर महदाश्चर्य ! हिनें आपल्या अंगावरील यावनी वस्त्रभूषणांचा परित्याग केला आहे. आपलें अलौकिक दैवी सौंदर्य छपविण्याकरतां अंगास विभूति फांसली ? काळा कुळकुळीत केशकलाप पृष्ठभागीं मोकळा रुळत आहे ? योगिनीविषानें ही फांशीं जात होती ? आपलें निष्कलंकाचरण जगास दिसावें, आपणास कोणी पातकी ह्मणूं नये ह्मणून ती अशा वेषानें फांशीं जाण्यास तयार झाली ? तिला मरणाची बिलकुल भीति वाटत नव्हती. ती मरणास तयारच होती. प्रत्यक्ष मृत्यु येऊन तिला भेट देतां तरी ती डगमगली नसती. कारण तिला आपल्या जिण्याचा अगदीं वीटच आला होता. असो.

इला बेशुद्ध पडल्यावर कांहींवेळानें आपोआप शुद्धींत आली. तेव्हां तिला फांशीं देण्याचा हुकूम झाला. तिनें आपलीं वस्त्रें कावेच्या रंगानें रंगविलीं आणि शेरखांबरोबर ती वधभूमीवर जात होती. इतक्यांत सदानंदस्वामि तिला मार्गांतच भेटला. तिला पहातांच, सदानंदानें तिला विचारिलें. ‘ माते ? तूं कोण आहेस ? मनुष्यकन्या कीं देवकन्या ? अशी रूपयौवनसंपन्न योगिनी मीं कधींच पाहिली नाहीं. तुझा नवयोगिनीवेष असावा असें मला वाटतें. तुझ्या या वेषांत दोन गोष्टींची न्यूनता आहे असें मला वाटतें. तुझ्या गळ्यांत रुद्राक्षमाला व हातांत त्रिशूळ असतां कीं, तुझी वेषाची जशी सिद्धता पाहिजे तशी झाली असती. कराळवदनाकाली देवीच्या कंठांत रुंडमाला आणि हस्तांत खड्ग असल्याशिवाय जशी तिला शोभा नाहीं तशीच तुझ्या या योगिनीवेषांत मी सांगितलेलीं दोन भूषणें नाहींत ह्मणून माझ्या मतानें किंचित् न्यूनता दिसते. जर तुझें नांव इलाच असेल आणि तुला वेण्यास कोणत्याही प्रकारची

आपत्ति नसेल तर ही रुद्राक्षमाला व त्रिशूल रामानंदस्वामींनीं तुला दिला. आहे तो घे.' असें ह्मणत सदानंदस्वामीनें आपल्या गळयांतील रुद्राक्षमाला काढिली; त्रिशूल त्याचे हातीं होताच. तीं दोन्हीं अप्रतीम भूषणें इलेस देऊन तो ह्मणाला, "माते ? ही रुद्राक्षमाला कंठांत धारण कर. हा त्रिशूल डाव्या हातीं आणि ही कंकालमाला उजव्या हातांत घे."

इला ह्मणाली, 'या अनाथ इलेची योग्य वेळीं स्वामिमहाराजांस स्मृति झाली आणि त्यांनीं मजवर कृपाच केली. आतां या जगांत माझी कोणतीच वासना बाकी राहिली नाहीं.' असें म्हणून तिनें रुद्राक्षमाळा आपल्या कंबुकंठांत धारण केली आणि त्रिशूल व कंकालमाला सदानंदानें सांगितल्याप्रमाणें वाम व सव्य हस्तांत घेतली. त्याबरोबर तिच्या अलौकिक सौंदर्याची निरुपम छटा निघून पहाणाराचे नेत्र दिपवून सोडूं लागली. तिच्या दीप्तिमान् अंगकांतीच्या तेजाकडे सदानंदाशिवाय इतरांच्यानें पहावेना. तिच्या देहकांतींतून सौंदर्याच्या जणूं ज्योति नघत आहेत काय असा भास होऊं लागला. आणि त्या कमलवदनीच्या कमलनयनांतून भयप्रद व अमानुषिक तेज निघत असावें असें दिसूं लागलें.

तितक्यांत सदानंदानें तिच्या कानांत काय मंत्रतंत्रोपदेश दिला जगदीश जाणें ! त्याबरोबर इलेची पार्थिव चिंता समूळ नाहींशी झाली. तिचें ज्ञाननेत्रपटल उघडलें. तिला या पृथ्वींतील गूढ रहस्य समजण्याची विचित्र शक्ति आली. सूक्ष्म विचार केला तर इलेच्या अंतःकरणांत केवळ सदानंदाच्या मंत्रोपदेश प्रभावानें एका अत्यद्भुत नैसर्गिक शक्तीचा संचार झाला. तिला पाहताच, पातकी जनांचे मनांत भयाचा आणि धार्मिकांच्या हृदयांत भक्तीचा उदय होऊं लागला.

इला ह्मणाली. "आतां मी जीवन मुक्त झालें. माझें सर्व दुःख व चिंता यांचा विनाश झाला. आतां मी कोणाची पर्वा करीत नाहीं."

सदानंद ह्मणाला. "साध्वी !" या त्रिशूलाचें अंगीं हजारों दुष्टांची छाती फोडून मनसोक्त रक्तपान करण्याची शक्ति आहे एतदर्थ गुरुमहाराजांनीं हा मोठ्या प्रेमानें तुह्मांस दिला आहे. हा त्रिशूल राजद्वारीं किंवा स्मशनांत, दुःखांत किंवा संकटांत तुमचें रक्षण करील.

सदानंद आणि इला बराच वेळ बोलत होती. सदानंदाच्या धर्मोपदेशानें इलेस चांगलें प्रायःश्चित मिळालें. तिजकडे पहातांच शेरखां चकित झाला. त्याला कांहींच सुचेना. आपण कोण, करतों काय ? करायचें काय ? हेंही त्याच्या ध्यानांत येईना ! इलेस फांशीं देण्याचा नाद तो अगदीं विसरला आणि तिजकडे पहात चित्रासारखा तटस्थ राहिला. बराच वेळ अशा स्थितींत गेल्यावर विचार लहरींतून मुक्त होऊन पाहूं लागला तों इलेच्या जागीं एक ज्योतिर्मयी महामाया हस्तांत त्रिशूल घेऊन उभी आहे. सदानंदस्वामि आपला कार्यभाग आटोपून निघून गेला. आतां काय करावें ? अशा विचार जालांतून शेरखां मुक्त झाल्यावर वीणाविनिंद मधुर स्वरानें इला ह्मणाली. ' शेरखां ? तूं मागें काय सांगत होतास तें तुझ्या ध्यानांत आहे ? निरापराध एखाद्या अबला स्त्रीची हत्या करणें हें मोठें पातक मानिलें आहे. स्त्रीहत्येसारखें महान् पातक जगांत दुसरें कोणतेंही नसेल. आणि तसें पातक करणारा व त्याला सहाय्य करणारा असे दोघेही त्या पातकाचे सारखेच जबाबदार आहेत. मजसारख्या निराधार स्त्रीला ठार मारून तुमचें कधींच हीत होणार नाहीं. अशाच प्रकारच्या अनेक पातकांनीं तुमचा प्रत्येक लढाईंत पराभव होत आहे. स्त्रियांवर हत्यार उचलणें हें शूर मर्दाचें काम नव्हे. जे वीरपुरुष ह्मणवितात त्यांनीं स्त्रीहत्या करणें सर्वथैव अयोग्य. त्याला कोणीच वीरपुरुष ह्मणणार नाहीं. तो पातक—मांग—चांडाळ—नराधम. जो खरा वीरपुरुष असतो, तो असें भयंकर पापकर्म करून आपले हात कधींही कलंकित करणार नाहीं. खानसाहेब ? तुह्मीं कांहीं दिवसांपूर्वी मला जें सांगत होतां त्याचा आज मला चांगला प्रत्यय आला. तेव्हांच मी तुमचें ऐकलें असतें तर आज असा प्रसंग खरोखरच आला नसता. पण काय करणार ? दैवासारखी बुद्धि. असो, गतगोष्टीचा शोक करणें निरर्थक. हेमू इतका नीच मनुष्य असेल असें मला अगदीं वाटलें नव्हतें. परंतु, त्याच्या प्रत्येक कृत्यांत अनियमितपणा आणि दगलबाजी भरलेली आहे.

इलेचें भाषण ऐकण्यापूर्वी केवळ तिच्या गंभीर चेहऱ्याकडे पाहूनच शेरखां दिग्मूढ झाला होता. तो मनांत ह्मणूं लागला ' एकाएकीं माझ्या

मनाचा बदल कसा झाला ? मी नाउमेद झालों ? माझा उत्साहभंग झाला. मी जागा आहें कीं, झोंपेंत ? मी शुद्धींत आहें कीं बेशुद्ध आहें ? पहातों हें स्वप्न नव्हेना ? आतां मीं कसें करूं ? मी करीन. पण माझें मन मला तसें करूं नको असें कां सांगते ? मी मनाच्या स्वाधीन आहें. माझ्या स्वाधीन माझें मन नाहीं ? माझें मन असें विचित्र कसें झालें ? असें कां व्हावें ? छीः छीः मी शुद्धींत आहें. हे माझे हात–पाय– हा मी शेरखां. पण उत्साह—उद्यम शून्य झालों हें खरें. मन इतकें चंचल पण तें इतकें शांत ? तें मला काय सांगतें ? " स्त्रीहत्या करूं नको. सेनापतीच्या आज्ञेप्रमाणें वागून पातकाचा अधिकारी होऊं नको. कां ? तुला असें करणें अयोग्य काय ? मी स्त्रीहत्या करतों ? भलतेंच ! कोणी स्त्रीहत्या करावी ? मी स्त्रीहत्या करणार नाहीं. मग या इलेला घेऊन मी निघालों कोठें ? इला आहे कोठें ? या साध्वीचा—या योगिनीचा—सर्वसंगपरित्याग करून जिनें अंगास राख फांसली,—तिचा मी वध करूं; बरें तोही निष्कारण ? धिःकार ! हजार वेळ धिःकार ! ! ! हेमूचा मला काय हुकूम ? इलेस फांशी दे. तिला ठार मार. इला स्त्री नव्हे ? मी वीर पुरुष नव्हे ? मी खाटिक ? मालकाची आज्ञा गैर असली तरी ती मी मान्य केली पाहिजे ? खुदानें मला अकल दिली आहे. नेक व बदकर्म. मला समजतें. मग हकनाक मी या बेकसूर स्त्रीचा प्राण घेऊं ? नाहीं मी कधीं असें निंद्य– घातक कर्म करणार नाहीं. हेमूला ठार मारून मी इलेस सोडण्यास तयार होतों. इलेशीं हेमूनें दगलबाजपणा केला हें मला माहीत आहे. छीः छीः ! मी तिला मारणार नाहीं किंवा तिच्या मरणास सहाय्य होईल असें-ही करूं देणार नाहीं. धन्याचा हुकूम चुकीचा आहे. मी वीरपुरुष आहे. आणि इला निरपराध आहे. झालें ! ठरला हाच सिद्धांत. माझ्या निश्चयांत मी फेरबदल करणार नाहीं. "

शेरखानानें बराच वेळ स्वगत विचार करून इलेस सांगितलें. " तुला वाटेल तिकडे जा. मी वीरपुरुष आहे. तूं निरपराध स्त्री आहेस. हेमूचा हुकूम चुकीचा आहे, तुला ठार मारून मी पापाचा भागिदार होऊं इच्छित नाहीं. तुला मारणें ह्मणजे फार मोठें पातक करणें होय.

सेनापतीचा हुकूम अमान्य केला तर तो मला जी शिक्षा करील ती मी भोगीन. तूं होईल तितक्या त्वरेनें जा. आमच्या छावणींतून जा. तुला कोणी प्रतिबंध करणार नाहीं, वाटेल तिकडे जा. या छावणीकडे पुन्हा बिलकुल येऊं नकोस. मला वाटेल तें मीं हेमूस सांगेन. मी काय सांगतों; तिकडे तुझें चित्त आहे ? तूं शुद्धींत आहेस ? माझें सांगणें ऐकतें आहेस ? हेमूस भेटूं नकोस. त्याचें मुखावलोकन देखील करूं नकोस. त्याचें नांव घेऊं नकोस. जा तूं. तुझ्या मनास वाटेल तिकडे जा. मी हेमूकडे जातों. माझें सांगणें ध्यानांत ठेव. नाहींतर फुकट मरशील पुन्हा इकडे येऊं नकोस. जा—तुला मार्ग सांपडेल तिकडे जा. असें सांगून तो निघाला.

इला आरवलीपर्वतांतील वनवासांत आपण रहावें असें मनांत आणून निघाली. हेमू त्याच अरण्यांत आहे हें तिला माहीतच नव्हतें. आपण निर्जन अरण्यवासांत जावें आणि शेषआयुष्य ईश्वरभजनांत घालवावें अशाच हेतूने ती निघाली.

प्रकरण ३० वें.

युद्धावसान.

गिरिकंदरांतील द्वंद्वयुद्धांत अनूपसिंहाचा जय झाला. हेमू पराभूत होऊन असावध पडला. तेव्हां त्याच्याबरोबरच्या लोकांनीं प्राण रक्षण करण्याचा घांट घातला. दानेषखां अनूपसिंहास सांगूं लागला. ‘ आमची शिकस्त झाली. आतां आह्मांवर कृपा करा आणि जीवदान द्या. आह्मीं तुह्मांस शरण आलों आहों. आह्मीं राजपुतान्यांतून निघून दिल्लीस जातों.’

इतक्यांत इलाही तेथें येऊन पोंचली. तिला पहातांच अनूपसिंह आश्चर्यचकित झाला. आणि ह्मणाला. ‘ रामानुजस्वामिनीं तुजवर कृपा केली. त्यांच्याच कृपेनें आज आमचा जय झाला. तूं माझे प्राण वांचविण्याकरितां हेमूकडे पुष्कळ रदबदली केलीस परंतु, तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं. तूं मला अन्नदान दिलेंस. प्राणदान द्यावें असा तुझा इरादा होता. तुझी इच्छा परमेश्वरानें सफल केली. हेमू आतांच गतप्राण होऊन पडला आहे. मी तुझा ऋणि आहें. तूं मला

मातेप्रमाणें पूजनीय आहेस. तुझ्या कृपेनें यवनांच्या हातून राजपुतान्याचा आज उद्धार झाला. तूं कृपा केलीस ह्मणून रजपूत लोक संकटनिर्मुक्त झाले. तूं रजपुतांस मुक्तिदायिनी आहेस. तूं रमणीकुलशिरोमणी आहेस. गुरु देवांनीं मला तुझी हकिकत सांगितली त्यावरून माझी खात्री झाली कीं, तूं आह्मांवर जे उपकार केले आहेस; ते आह्मीं आमरण विसरणार नाहीं. केवळ हेमूचा नाश व्हावा इतक्याकरतांच, गुरुमहाराजांनीं तुला तेथें ठेविली होती; नाहींतर ते वनवासांत रहाण्याचा निर्धार करून आले तेव्हांच तुलाही बरोबर आणणार होते. असें त्यांनींच मला सांगितलें. '

इला ह्मणाली, " बरें, आतां स्वामिमहाराज कोठें आहेत ? त्यांना एकदां भेटावें असें माझ्या मनांत आहे. "

अनूपसिंह ह्मणाला, " जयश्री तुमच्या छावणींतून येत असतांना कोणा दुष्टानें त्यावर गोळया धाडल्या. त्यांतील एक गोळी त्याचे दंडास लागली. त्याला उदयपुरांत ते औषधोपचार करीत आहेत. "

इला ह्मणाली, ' जयश्रीला माझ्या सांगण्याचा चांगला अनुभव आला ! आतां त्याची प्रकृति कशी आहे ? '

अनूपसिंह ह्मणाला, ' स्वामिमहाराज काय कृपा करतील ती खरी. वांचला तर पुनर्जन्म. '

इला ह्मणाली, ' त्यालाही एकदां भेटावें असें मनांत आहे.'

अनूपसिंह ह्मणाला, " आपण आतां तिकडेच जाऊं. " असें सांगून तो दानेषखांस सांगूं लागला, " खान साहेब ! शरण आलेल्यास आह्मीं कधींही दुःख देत नाहीं. शरणागताचें संरक्षण करणें हा आमचा मुख्य धर्म आहे. तुम्हीं आमचे शत्रु आहां. तुमच्या भाषणावर विश्वास ठेवून आह्मीं फार वेळ फसलों आहों. परंतु, आमच्या वचनांत आह्मीं कधींही अंतर आणणार नाहीं. तुह्मांस मारावें असा आमचा इरादा नाहीं. असो, तुह्मांस अभय दिलें आहे. तरी तुह्मांस घेऊन महाराण्याकडे जाणें मला भाग आहे. "

दानेषखानें आपल्या हातांतील तरवार अनूपसिंहाच्या पायावर ठेवून सांगितलें, " तुम्हीं मला फार दिवस पहात आहां. कित्येक लढायांवर

मी तुमच्याबरोबर होतों. माझा स्वभाव तुह्मांस माहित आहे. आज आमची पडती बाजू आहे. आमच्या दगलबाजपणाचा मोबदला खुदातालानें आह्मांस दिला. जो वाईट करील त्याचें कधीं चांगलें होणार नाहीं. तुम्हीं तरवारबहाद्दर व नेकगृहस्थ आहां. आमचे अपराध क्षमा करा. ”

दानेषखानें आपली तरवार अनूपसिंहाच्या पायावर ठेवतांच, त्याच्या बरोबरच्या लोकांनींही आपलीं शस्त्रास्त्रें खालीं ठेविलीं.

गफूरखां ह्मणाला, ‘ आतां आह्मीं तुमच्या ताबीन झालों. आमचें रक्षण करा. ’

असें संभाषण चाललें आहे, इतक्यांत महाराणाही कित्येक सैनिकवीरांसह तेथें आला. आपला जय झाला ह्मणून त्याचें मन आनंदित झालें तशांत हमूचें रक्ताक्त कलेवर पहातांच त्यास अत्यानंद झाला. तो मोठ्या प्रेमानें अनूपसिंहास भेटला आणि ह्मणाला, ‘ शाबास, अनूपसिंह; शाबास! आज तुह्मीं आपल्या सुदृढ बाहुबळ प्रतापानें, निःसीम वीरत्वानें, व अलौकिक शौर्यानें रजपुतांस, यवनांच्या अत्याचारांतून सोडविलें. तुह्मीं आपली जन्मभूमि– परमपूज्य मातृदेवता– राजपुताना– यवनांच्या त्रासांतून मुक्त केला. आज आह्मीं निर्भय व निश्चिंत झालों. आज राजपुतान्यांतील अबालवृद्ध स्त्रीपुरुषांस तुह्मीं निर्धास्त केलें. तुमच्या असामान्य अंगबल प्रभावानें, सती स्त्रियांच्या सतित्वाचें रक्षण झालें. आर्यजनांचा–आर्यधर्माचा गौरवसूर्य समुज्वल झाला. आमचें राज्य शत्रुशून्य झालें. तुमच्या पराक्रमाचें सार्थक्य झालें. स्वतंत्रताधनांतच परम गौरव आहे. स्वातंत्र्यासारखें परम मंगलदायक दुसरें कांहींच नाहीं; असा रजपूत लोकांचा जोंपर्यंत समज असेल तोंपर्यंत तें तुमचें यश मोठ्या प्रेमानें गातील. वीर समाज तुमचें अत्यद्भुत वीरत्व कधींही विसणार नाहीं. तुमचें सुवर्णाक्षरांकित नांव वीरगणांच्या हृदयपटावर अक्षय्य अंकित होवो. तुह्मीं अवर्णनीय पराक्रम केला. खरोखर हा भीमपराक्रम होय. ’

अनूपसिंह नम्रतेनें ह्मणाला, “ महाराज ! तुह्मीं सद्धर्मपरायण आहां— प्रजावत्सल आहां– केवळ धर्मबलानेंच आह्मीं आज शत्रूच्या तडाक्यांतून सुटलों. धर्मानेंच आज आपणांस विजयभूषणानें भूषित केलें.

आज सद्धर्माचाच जय झाला— खऱ्याखोट्याचा न्याय निवडला महा-माया करालादेवीनें प्रजाजनांच्या विनंतीकडे लक्ष दिलें. आज तिला त्यांची दया आली. देवीनें या भूषणांस मला निमित्तमात्रास पुढें केलें. नाहीं तर माझी शक्ति ती किती आणि मीं करणार तें काय ? "

गफूरखां ह्मणाला, " आतां आह्मांस काय हुकूम होत आहे ? "

अनूपसिंह ह्मणाला, " महाराज येथें आले आहेत ते शरणागत रक्षण-तत्पर आहेत. ते तुह्मांस अवश्य अभय देतील. मीं सांगितलें पाहिजे असा अर्थ नाहीं. "

महाराणा गंभीरतेनें ह्मणाला, ' अनूपसिंहाच्या विनंतीकडे लक्ष देऊन आह्मीं तुह्मांस अभय देतों. तुह्मीं आजपासून तीन दिवसांच्या आंत आमच्या प्रांतांतून निघून जा. तीन दिवसापुढें तुमच्या फौजेंतील कोणीही मनुष्य आमच्या दृष्टीस पडेल तर त्याला देहांताची शिक्षा होईल. दानेषखां व गफूरखां यांनीं चितोडांत बंदीस्वरूप राहिलें पाहिजे. तुमचें सर्व सैन्य गेलें मग यांस आह्मीं सोडूं. तुह्मीं आमच्या आज्ञेप्रमाणें वागला नाहीं तर न्यायानें ठरेल ती शिक्षा करूं. कारण, हे सरदार तुमचे पुढारी आहेत. यांस येथें अवश्य ओलीस ठेविलेंच पाहिजे. उमरावसिंह ! तुह्मीं पांचशें लोक बरोबर घेऊन यवनांच्या छावणींत जा. आमची आज्ञा त्यांस सांगा. त्यांचीं शस्त्रास्त्रें घ्या. आणि त्यांस जाऊं द्या. कोणी शस्त्रें देण्यास कांकूं करील किंवा आमच्या राज्यांतून निघून जावयास नाकबुल होईल तर त्यास तेथेंच बिड्या ठोकून एकदम किल्ल्यांत पाठवा. '

उमरावसिंह ह्मणाला, " आमचा पक्ष सोडून जे कुलांगार रजपूत यवनांच्या पक्षांत मिळाले आहेत; त्यांची कशी व्यवस्था करावी ? हा हुकूम होईल तर बरें. "

महाराणा ह्मणाला, " त्यांच्या मुख्य नायकास कैद करून किल्ल्यांत पाठवा. बाकीचे जे रजपूत लोक खराब मसलतींत पडून फसले आहेत; जे अज्ञानतेनें मोहवश झाले असतील; जे स्वार्थांध होऊन आमचा पक्ष सोडून यवनांस मिळाले आहेत ते पश्चाताप करून क्षमा मागतील आणि पुढें असा स्वामिद्रोह करणार नाहीं असें वचन देतील

त्यांस आमच्या आश्रयांत घ्या. जरी आज ते विश्वासघातक, निमक हराम, स्वराज्याविरुद्ध वर्तन करणारे, स्वज्ञाति विघातक आणि स्वदेश-द्रोही असे ठरले आहेत तरी ती आपलीच प्रजा आहे— स्वसंतानतुल्य आहे—एतदर्थ त्या लोकांचे जरी शेंकडों अन्याय असले; तरी त्यांस क्षमा करणें हा आपला धर्म आहे. जे लोक पश्चात्तापपूर्वक क्षमा मागणार नाहींत आणि यवनांबरोबर निघून जावें असें ज्यांच्या मनांत असेल त्यांचे पांच पाट काढा आणि त्यांस हांकून लावा. ”

उमरावसिंह ‘ आज्ञा ’ ह्मणून गफूरखां व दानेषखां यांशिवाय इतर यवनसैनिक पुरुषांस आपल्याबरोबर घेऊन गेला. इतक्यांत शेरखां तेथें आला.

शेरखांस पहातांच इला ह्मणाली, “ तुह्मीं आज मला जीवदान दिलें. त्याच पुण्यबलानें आज तुमच्या मनांत एक नवीन प्रवाह प्रवाहित होऊं लागला असावा असें दिसतें. मीं आग्रहानें तुह्मांस सांगतें कीं, त्या प्रवाहास तुम्हीं प्रतिबंध करूं नका. त्याची गति वाढेल तितकी वाढूं द्या. आजपासून कोणत्याही पापकृत्याकडे तुह्मीं आपलें मन जाऊं देऊं नका. तुह्मीं धर्ममार्गानें जाल तर सर्वशक्तिमान् प्रभु तुमचें मंगल करील. तुह्मीं आपल्या देशीं जाल तेव्हां तुमच्या राजेरजवाड्यांस सांगा कीं, तुह्मीं कीर्ति, राज्य व धन लाभाच्या जो मार्ग अवलंबन केला आहे; तो केवळ विपत्तींनीं सारखा भरलेला आहे. तो पापकंटक समाकीर्ण आहे. त्या मार्गानें जाऊन आजपर्यंत कोणाचेंही कल्याण झालें नाहीं. आणि पुढें होईल असें मला वाटतही नाहीं. प्रजा सुखी तर राजास सुख. प्रजेच्या बलानें राजा बलवान्. धर्मबलानें प्रजा सुखी आणि प्रजेच्याच बलानें राजा यशस्वी होतो. प्रजेची राजावर दृढ श्रद्धा असणें हीच राज्याची खरी बळकटी ”

महाराण्याच्या आज्ञेप्रमाणें गफूरखां व दानेषखां यांस घेऊन कित्येक रजपूत किल्यांत गेले. नंतर अनूपसिंह ह्मणाला, “ महाराज ! या योगिनीनें— साक्षात् देवीनें— माझे प्राण वांचविले. युद्ध करतां करतां मी घोड्यावरून खालीं आलों— माझी तरवार गेली, मी असावध पडलों, तेव्हां यवनांनीं उचलून मला आपल्या छावणींत नेलें. शेवटीं हेमूनें मला फांशीं

देण्याचा निश्चय केला. तेव्हां ही तेथें होती. ही मजकरतां हेमूस फार टाकून बोलली. हिनें त्याचे फार आर्जव केले. ही तेथें नसती तर माझा जीवनप्रदीप तेव्हांच मालवला असता. माझा प्राण वांचविण्याकरतां ही अपले प्राण देण्यास तयार झाली. जयश्रीवरही हिनें फार उपकार केले. त्यास हिनेंच वांचविलें. ह्मणून हेमूनें हिला ठार मारण्याची शिक्षा ठरविली होती. परंतु रामानुजस्वामींनीं आपल्या शिष्यास पाठवून हिला कोणत्या मंत्राची दीक्षा दिली प्रभु जाणें ! हिचे प्राण वांचावेत एतदर्थ त्यांनीं पुष्कळ खटपट केली आणि यवनांचा संहार करावा इतक्याचकरतां त्यांनीं हिला तेथें ठेविली. स्वामींचें योगबल अलौकिक आहे. "

शेरखां ह्मणाला, ' आतां मला काय आज्ञा आहे ? '

महाराणा ह्मणाला, ' तुह्मीं आपल्या छावणींत जा; ह्मणजे सर्व समजेल. '

शेरखां इलेस विचारूं लागला. " तुला मीं इकडे येऊं नको असें सांगितलें होतें; पण तें तूं जुमानिलें नाहींस. "

इलेनें सांगितलें, " मीं समजून उमजून इकडे आलें असा अर्थ नाहीं. आणि या गिरीकंदरांत मीं कशी आले ? हेंही मला माहीत नाहीं. मला कोणी तरी बांधून इकडे आणिलें; असा भास होतो. पण कोणी आणि कसें बांधिलें ? हेंही समजत नाहीं. "

अनूपसिंह ह्मणाला, ' योगिनी माते ! तुजवर रामानुजस्वामिमहाराजांची पूर्ण कृपा आहे. यांत शंका नाहीं. तुमच्या कृपेनें मी वांचलों इतकेंच नव्हे तर महाराण्यांनीं यवनांच्या युद्धांत जो जय संपादन केला, त्यालाही तूंच कारणीभूत आहेस. तुझी जितकी स्तुति करावी तितकी थोडीच होईल ! तुझ्याच कृपेनें रजपूतलोक आज यवनांच्या तडाक्यांतून सुटले. भारतवासी आर्यसंतानें यवनांच्या तडाक्यांतून बचावलीं. भारतभूमाता यवनांच्या भारांतून सुटली. फार काय सांगूं ? आमचे महाराज, राजपुत्रगण, आणि भारतांतर्गत सर्व आर्यसंतानगण तुझ्या उपकारऋणांत ऋणि आहे असें ह्मटलें तरी चालेल. तूं कृपा करून या राजस्थान्यांत वास्तव्य करशील तर फार चांगलें होईल. रजपूत तरवारी तुला यवनभयहारिणी देवी मानून हृदयमंदिरांत तुझी स्थापना करि-

तील. तुजवर सदैव प्रीतीनें पुष्पांजली अर्पण करतील आणि श्रद्धाभक्तीनें निरंतर तुझी पूजा करतील. '

इलेचे नेत्र अश्रूनीं भरले. तिनें कांहीं वेळ विचार केला असें दाखविलें आणि नेत्रयुगुल पुसून मंजुल व गंभीर स्वरानें ती म्हणाली, आतां या पापसंसारांत रहाण्याचा मला आग्रह करूं नका. या स्थितीचा मला फार वीट आला आहे. मीं या संसारांतील माया ममता यांचा त्याग केला आहे. हा संसार पापरूप आहे, अशी माझी खात्री झाली. आतां यापासून होईल तितकें दूर रहावें–या भानगडींत पडून कांहींच अर्थ नाहीं. असा माझा दृढनिश्चय ठरला. आणि शेषजीवन कसें कंठावें हाही पूर्ण निश्चय मी केला आहे. या पूर्वीच मी गेलें असतें, परंतु स्वामींच्या अत्याग्रहास्तव मी राहिलें. मी याच योगिनीवेषानें प्रभुगुण गात भारतवर्षांतील लहान मोठ्या शहरांत–खेड्यापाड्यांत— प्रत्येक घरीं फिरेन आणि सर्व नरनारींचे कर्ण व हृदय पवित्र करीन. जेथें जेथें मी जाईन तेथें तेथें जे लोक दुःखशोकानें परिपीडित आहेत असें माझ्या दृष्टीस पडेल; त्यांस मीं आज जो महामंत्र लाभसंपादन केला आहे, त्यानेंच उद्धारीन–त्यांच्या हृदयांत भक्तिरस सिंचन करीन– दुःखिजनांचें दुःखानलानें परितप्त झालेलें अंतःकरण शीतल करीन. ज्या प्रभुवराच्या नांवावर विश्वास ठेवून–त्याची भक्ति करून–पांच वर्षांचें ध्रुवबाल, भयंकर जंगलांतील हिंसक पशूंच्या तडाक्यांतून बचावलें; परमेश्वराच्या कृपेस पात्र झालें; आणि स्वमातेचें दुःख निरसन करण्याचेंही त्याला सामर्थ्य येऊन अचल पदीं राहिलें. ज्या जगत्पतीच्या नांवावर विश्वास ठेवून प्रल्हाद, मत्त हत्तीच्या पायांखालीं दिला तरी, जाज्वल्य अग्नींत टाकला तरी, प्रवाहवती नदींत फेंकला तरी, उच्च पर्वतशिखरावरून कडेलोट केला तरी वांचला आणि विषमिश्रित दुग्ध ज्याला अमृतमय झालें. ज्या पुराणपुरुषाच्या नांवावर विश्वास ठेवून आणि त्याची दृढश्रद्धेनें भक्ति करून द्रुपदनंदिनीनें पापिष्ट दुःशासनाचा मदपरिहार केला. आणि आपली लज्जा संरक्षण करण्याचें तिला सामर्थ्य आलें तेंच परमपवित्र भगवन्नाम गात आणि भारतवर्षांतील आर्यजनांस ऐकवीत मी भक्तिरसस्रोत वाहवीन

आणि शोकसंतप्त व दुःखित जनांचें हृदय शांत करीन. प्रभुवराच्या भक्तिप्रभावानें संसारी जनांचा उद्धार होईल. ते पापकर्दमांतून मुक्त होतील आणि परमेश्वराच्या कल्याणकारक चरणांचें त्यांस दर्शन होईल. पतिपुत्रविहीन अनाथिनींस; पितामाताविहीन अनाथ–अबल–बालकांस; अनेक प्रकारच्या रोगानें परिपीडित झालेल्या मनुष्यांस; अनेक प्रकारच्या दुःखानें त्रासलेल्या लोकांस; आणि प्रत्येक शोकपीडितास माझ्या भिक्षेच्या झोळींतील भिक्षेनें सहाय करीन– रोग पीडितांची सेवा व सुश्रुषा करीन. ते ज्या रीतीनें रोगयंत्रणेंतून मुक्त होतील असे प्रयत्न करीन. त्यांच्या पथ्यापाण्याची व औषधोपचाराची खबरदारी बाळगीन. शोकार्तांचा शोक दूर करीन. अंधपंग्वादिकांस यथाशक्ति मदत करीन. होईल तितका परोपकार करावा— निराश्रितांस आधार व धीर द्यावा. दुर्बलांचें सहाय्य करावें— संकटग्रस्तांचें सहाय करावें— त्यांच्या संकटाचा परिहार करावा हेंच आतां माझा दृढनिश्चय आहे. त्यांत मी आतां बदल करणार नाहीं. आणि करण्याचें कारण आहे असेंही मला वाटत नाहीं. तुह्मीं मला आग्रह करूं नका. समयीं तुमच्या मनांत अशी शंका येईल कीं, ही रस्त्यावरील कंगाल भिकारीण काय करणार ? हिच्या हातून काय होणार ? हिच्या अंगीं अशी अलौकिक किंवा दिव्य-शक्ति कोठें आहे ? आहे. मीं खात्रीनें सांगतें–मीं दृढनिश्चयानें सांगतें कीं, मीं जें सांगितलें त्यांतील एकही गोष्ट मिथ्या नव्हे. मी असेंच करणार ह्मणून मी दृढप्रतिज्ञ झालें आहे. ह्यांत मी अंतर करणार नाहीं. माझ्या गुरुदेवानें मला जो दिव्य मंत्रोपदेश दिला आहे त्याच्या बलानें मला अतिशय चमत्कारिक--अत्यद्भुत अवसान आलें आहे. मी ह्मणेन तें करीन असा माझा मला पूर्ण विश्वास आहे. तुह्मांला फार काय सांगूं ? मीं जें अपूर्व–अलौक मंत्रसाधन केलें आहे, त्याच्या दिव्य बलानें मला आतां कोणतेंही कृत्य असाध्य वाटत नाहीं.'

इलेचें भाषण ऐकून अनूपसिंह व महाराणा आश्चर्यचकित झाले. ते इलेकडे पहात आणि ती काय सांगते तें ऐकत स्तब्ध राहिले.

इला ह्मणाली, 'अहो ! आज भारतवर्ष यवनांच्या त्रासांतून सुटलें असा तुमचा समज आहे पण तो सर्वांशीं चुकीचा आहे. हें सौख्य

क्षणिक दिसतें. यांत कांहींच अर्थ नाहीं. गुरुदेवाच्या कृपेनें ह्मणा किंवा त्यांनीं सांगितलेल्या महामंत्राच्या प्रभावानें ह्मणा आपल्या भारतवर्षाचें भावि चिन्ह फार वाईट आहे असें दिसतें. आपल्या भारतवर्षावर पुन्हां यवनांचा अधिकार बसणार ! मोंगललोक लौकरच आर्यस्थानावर आपला अंमल बसवितील त्यांत कधीं अंतर होणार नाहीं. '

महाराजा दीर्घ निश्वास सोडून ह्मणाला, ' योगिनी ! काय भविष्य कथन करतेस हें ? सर्व भरतखंड यवनांच्या ताब्यांत पुन्हा जाणार ? भारतवर्ष पारतंत्र्यरूप शृंखलेंत बद्ध होणार ? स्वतंत्रतेचें नांव देखील रहाणार नाहीं ? '

इला गांभीर्यानें ह्मणाली, ' सर्वत्र यवनांचा अधिकार बसेल असें मी सांगत नाहीं. भारतवासीजन स्वतंत्रतादेवीची जोंपर्यंत आराधना करतील त्यांच्या हृदयांत जोंपर्यंत स्वाधीनतेचें गौरव वास्तव्य करून राहील आणि भारतललना पातिव्रत्यानें वागतील: जोपर्यंत त्यांच्या अंतःकरणांत सतीत्व धर्माचें महत्व राहील तोंपर्यंत भारताचें स्वातंत्र्य सफाई नाहींसें होणार नाहीं. कोठें कोठें स्वातंत्र्य राहील. स्वाधीनताप्रदीप अगदींच मालवणार नाहीं इतकेंच. परंतु, तो मालविण्याकरतां—आपला अधिकार सर्वत्र बसावा एतदर्थ यवनलोक अविश्रांत परिश्रम करतील त्यांत बिलकुल शंका नाहीं. तरी पण स्वातंत्र्यप्रिय कित्येक आर्यनरवर त्यांस दाद देणार नाहींत ! स्वातंत्र्य रक्षणार्थ ते स्वप्राणांचीही बेपर्वा करून लढतील आणि आपलें स्वातंत्र्य संरक्षण करतील. स्वतंत्रतादेवीनें भारतांतून आपलें ठाणें सफाई उठविलें असें जरी होणार नाहीं तरी यवनांचें प्राबल्य जिकडे तिकडे फार माजेल ह्यांत मुळींच संदेह नाहीं. ते आर्यलोकांस फार त्रास देतील. आर्य लोकांवर असह्य जुलूम होतील. त्यांचीं देव मंदिरें भ्रष्ट होतील. एका हातांत कुराण आणि एका हातांत तरवार घेऊन यवन लोक आपल्या धर्माचा प्रसार करतील. तेव्हां महाराष्ट्रांत एक गोब्राह्मण प्रतिपालक, स्वधर्म निष्ठ आणि प्रौढ प्रताप राजा अवतरेल आणि तो धर्म स्थापना करून यवनांच्या जुलमांतून आर्यजनांचा बचाव करील. त्यानंतर त्याचे वंशज अवघ्या हिंदुस्थानांत आपला अमल गाजवितील. महाराष्ट्राधिपतीचा भगवाझेंडा सर्वत्र फडकेल आणि त्यानंतर

लोकांत वृथाभिमान वाढून एकमेकांत भयंकर कलह उत्पन्न होतील. पुढें आंग्लराजे राज्य करतील. त्यांचे कारकीर्दींत लोकांस उत्तम सुख मिळेल. ज्ञानाचा सर्वत्र फैलाव होईल. जमीनींचा महसूल कायम ठरविला जाईल. बाष्पयंत्रें व आकाशयानें सुरू होऊन लांबवर देशांशीं हिंदुस्थानचा व्यापारसंबंध व स्नेहसंबंध घडेल. मध्यंतरीच्या बखेड्यांत ठार झालेल्या कलाकौशल्याबद्दल लोकांस हळहळ वाटून पुन्हा त्यांचें त्या कलेकडे लक्ष लागेल. व त्यापासून आर्यसंतानांचा चांगला फायदा होईल. न्यायान्यायासंबंधानें राजाबद्दल शहाणे लोकांत विश्वास बसेल. परंतु मध्यंतरीं कांहीं माथेफिरु अन्याय्य मार्गाचें अवलंबन करून योग्य माणसांना विनाकारण पेचांत आणतील व त्या योगानें खरें देशहित साधण्याचे कांहीं काळ मागें पडेल. परंतु, ही गौणस्थिती फार वेळ टिकणार नाहीं. माथेफिरूंना योग्य शिक्षा होऊन फिरून उन्नतीच्या काळास सुरवात होईल. देशांतील कलाकौशल्य वाढून त्याबद्दल सर्व राष्ट्रांचे तोंडीं हिंदुस्थानची ख्याती ऐकावयास सांपडेल. हा काळ मोठा सुखाचा जाईल. धांदल, व्यर्थ मारामाऱ्या यांचा त्या काळांत नायनाट होईल. शिक्षणाचे योगानें लोकांचीं मनें सुसंस्कृत बनतील; व एकंदर सर्वत्र फायदा होईल. परंतु त्या काळांत धर्मबंधनें लोकांकडून शिथिल पडतील. लोक अविचारानें धर्माधर्माबद्दल बिलकुल पर्वा बाळगणार नाहींत. उच्च वर्णाचे लोक कमी दर्ज्याच्या वर्णाचे लोकांच्या चालीरितींना—अधार्मिक वागणुकींना—थारा देऊन धर्मसंबंधीं स्वकर्तव्यें विसरतील व त्या योगानें ते नीच दशेला पोहोंचतील. हा धर्मसंबंधीं होणारा ऱ्हास भयंकर दुष्काळ पाडून ' त्राहिभगवान् ' करून सोडील. ' ह्यापुढें तिच्या तोंडांतून शब्द निघेना. जणूं काय भावी भयंकर अवनतीचें चित्र तिजपुढें प्रत्यक्ष उभें असावें. व ती विपद्स्थिती पाहून तिचें कोंवळें मन भयभीत झालें असावें ! तिनें डोळे मिटले ! त्यानंतर सुंदरी आकाशाकडे पाहूं लागली. तिचा कंठ भरून आला आणि तिच्यानें एकही शब्द बोलवेना. तेव्हां अनूपसिंह सविस्मय ह्मणाला, " देवी ! काय भयंकर भविष्य हें ! आह्मां आर्यलोकांच्या परमप्रिय आर्य-

जनांचें भावि भाग्य ऐकून अंतःकरण फारच विदीर्ण होतें. ! आर्य संतानांची काय दुर्दशा ही ! "

सुंदरी हळुहळू सांगूं लागली, " काय करणार ? जें होणार तें कधीं चुकणार नाहीं. अहो ! गृहविच्छेद, अनैक्य, स्वार्थदृष्टी, कलह, अविश्वासघात, जातिमत्सर, स्वदेशाभिमानशून्यता, स्वधर्माविषयीं अनास्था, स्वाभिमानाच्या नावानें अभाव अशा, आणखी अशा सारख्याच निंद्य कर्मांनीं हिंदुस्थानचा नाश होणार. निःसंशय नाश ! तुह्मीं आपल्या स्वभावावरून लोकांच्या मनाची परीक्षा करूं पहात आहां, पण सर्वांशीं चुकत आहां. तुह्मीं भारतांत नीच पुरुष नाहीं ह्मणतां पण त्यांचें पाहिजे त्यापेक्षांही वैपूल्य आहे. त्यांच्यासाठीं मुळींच अडणार नाहीं. ते अधमाधम राजेरजवाड्यांस व्यसनांत पाडतील. पैशासाठीं प्राण घेतील. नीच कृत्यें करावयास त्यांच्या मनास मुळींच संकोच वाटणार नाहीं. स्वधर्माभिमानशून्यतेमुळेंच आमच्या देशाचें फार नुकसान होईल. बंधुबंधूंत वैमनस्य माजेल, पुत्र पित्याची आज्ञा जुमानणार नाहीं. अनाचार वाढेल. स्त्रिया पतीची बेपर्वा करतील. स्त्रियांचें स्वातंत्र्य फार वाढेल. दुर्व्यसनांची कमाल होईल. कित्येक लोक असे निपजतील कीं, आपला एक पैईचाही फायदा नसतांना दुसऱ्याचें लाखो रुपयांचें नुकसान करतील. एक आणि दोन मला जें दिसतें तें मी सांगतें— "

अनूपसिंह ह्मणाला, ' देवी, असें सांगूं नकोस. अशा गोष्टी ऐकून दुःखानें अंतःकरण दुभंग होतें. हाय हाय ! भारतवासीजनांची काय ही नीचावस्था ? '

सुंदरी ह्मणाली, " तुह्मांला वाईट वाटतें तर मी सांगत नाहीं. आतां मी जातें. मी जेथें असेन तेथें परमेश्वरापाशीं तुमचें कल्याण चिंतीन. ईश्वर करो आणि दिवसेंदिवस तुमची उन्नति होवो. तुमच्या देशांत धनधान्य समृद्धि होवो. यथाकालीं चांगली पर्जन्यवृष्टि होवो. तुमचें कल्याण होवो. महाराण्यास जगदीश्वरानें दीर्घायु करावें. तुमच्या राज्याची बढती होवो. तुह्मीं आनंदानें राज्य करा. परमेश्वर तुह्मांसारख्या प्रजावत्सल व धार्मिक राजाचें मंगल करो. जयश्री जखमी पडला आहे असें ऐकून मला फार वाईट वाटत होतें. परंतु, मंत्रबलानें मला आतां स्पष्ट

दिसतें कीं, सदाशिव त्याच्या अंगावरून आपला दयामय हस्त फिरवीत आहे. त्याच्या परममंगलकर हस्तकमल स्पर्शानें तो चांगला झाला. परमेश्वरानें त्यावर कृपा केली. तुह्मी कोणी त्याची काळजी करूं नका. तो वीर पुरुष आहे. जगदीश त्याचें कल्याण करील. ”

महाराणा आग्रहानें विचारूं लागला, ‘ भारतसंतानांत पुढें धर्मजागृति कितपत असेल ? ’

सुंदरीनें नेत्र मिटले आणि पुन्हा ध्यान केल्यासारखें दाखवून कांहीं वेळानें ती ह्मणाली, “ महाराज ! हल्लीं जसे हिंदु, यवन, बौद्ध, जैन इत्याद्यनेक संप्रदाय किंवा समाज या भारतांत आहेत. तसे भविष्यकाळीं शेंकडों संप्रदाय होतील आणि त्यांत अतिशय वैमनस्य माजेल. प्रत्येक समाज आपली थोरवी घेऊन उठेल प्रत्येक अहंभाव धारण करील. मी मोठा ! मी थोर ! मी ज्ञानी, मी तत्ववेत्ता, मी सर्वज्ञ, माझें ह्मणणें खरें. मी सांगेन तें सर्वांनीं एकावें. मी करीन तें करावें. असा साराच मीपणा फैलावेल. जो पहावा तो तोंडाची बडबड फार आणि कृतीचे नांवानें शून्य. जो पहावा तो संप्रदाय माझें खरें—माझें सत्य—याच संप्रदायानें धर्मजागृति होईल असंच प्रतिपादन करूं लागेल. परंतु हेंच त्यांचे संप्रदाय धर्मग्लानीस कारणीभूत होतील. त्यांची संप्रदायांनींच अत्यंत फाटाफूट होईल. जसजशी संप्रदायाची अभिवृद्धि होत जाईल; तसतसा द्वेष, वृथाभिमान, वैमनस्य व मत्सर वाढत जाईल. एका संप्रदायांतील लोक दुसरे संप्रदायांतील लोकांस आपले कट्टे शत्रू समजतील. समाज मनसोक्त बोकाळूं लागेल—खऱ्या ज्ञानाचा लोप आणि खोट्याचा फैलाव झाला—मग आपल्या देशास एकदेश किंवा लोकांस एकजाति असें कसें ह्मणतां येईल ? मग ऐक्यता तरी कशी ? अहो आह्मां आर्यलोकांचा एकदेश आणि आर्य ही एकजाति आहे, तीत हजारो पोटभेद झाले कीं, भिन्नता झालीच. मग एक परिवार कोठें राहिला ? एक समाज दुसऱ्यास; दुसरा तिसऱ्यास; तिसरा चौथ्यास बिलकुल सहाय करणार नाहीं. होईल त्या मार्गानें त्याचें अनिष्ट करूं पहाणार; मग एक्यता ती राहिली कोठें ? छीः ! तिचें नांव घेऊं नका. जितके समाज जास्त तितके

अनैक्य जास्त. भारतसंतानें आपल्या पूर्वजांस मूर्ख व अज्ञान समजूं लागतील. आपला पिता, पितामह, त्याचा पिता क्रमानें मूर्ख–शतमूर्ख होता असें स्पष्ट ह्मणूं लागतील. कलाकुशलतेचा लोप होईल. आळसाचें प्राबल्य वाढेल. दारिद्र्यास सीमा नाहींशी होईल, दुष्काळ प्रजापीडन करील. खऱ्या मित्रत्वाचें नांव देखील रहाणार नाहीं; तें तर दुर्लभच. केवळ स्वार्थापुरती मित्रता राहील. स्वार्थ साधला कीं स्नेह आटोपलाच. दिवसेंदिवस दंभ, वृथाभिमान, स्वार्थ, कपट, मत्सर, छल व द्वेष फार वाढेल. जसजसा लोभ वाढत जाईल तसतसा लक्ष्मीचा लोप होईल. ज्याला आपल्या नांवाचा डंका वाजविण्याची उमेद असेल, तोच आपणास देशहितैषि बनवील. परंतु खरी स्वदेशहितैषा एकाच्याही मनांत वसणार नाहीं. जो पहावा तो स्वार्थांध, पहावा तो मतिमंद; सत्यासत्याची कोणालाच परीक्षा नाहीं; असें होईल. बहुतेक लोक छलक व कपटी वाचाळांस आपले प्राणमित्र समजतील. आणि खऱ्या हितचिंतकास शत्रूसारखा लेखतील. धनी काय आणि सेवक काय ? दोन्हीं समानच. स्वार्थसाधन हेंच चातुर्य. दुसऱ्यास फसविणें हेंच शहाणपण. विद्वत्ता थोडी पण अभिमान फार. नाहीं तर चारित्र्यशोधन हें मनुष्याचें मुख्य कर्तव्य होय. परंतु तिकडे कोणाचेंच लक्ष जाणार नाहीं. जो पहावा तो विद्वान, जो पहावा तो थोर आणि जो पहावा तो शिरजोर. शक्तीचा ऱ्हास होईल. दुर्व्यसनांचा सुकाळ होईल. अनाचार फार वाढेल. ज्ञानाचा लोप आणि अज्ञानाची वृद्धि होईल. सारांश, अनंतकाल अशाप्रकारच्या अनेक दुःखांत, दैन्यांत, व विपत्तिग्रस्त दशेंत गेला —अवघें भरतखंड दुर्दशेनें पूर्णपणें ग्रासिलें—अवनतीची कमाल झाली. ह्मणजे परमेश्वराच्या कृपेनें पुन्हा खऱ्या ज्ञानाचा उदय होऊं लागेल. आर्यलोकांची आपल्या प्राचीनतम ऋषिमुनींच्या असंडनीय युक्तीवर श्रद्धा बसेल. लोकांची स्वार्थांधता थोडथोडी कमी होऊं लागेल. त्यांचे सत्यज्ञानाचा विकास होऊं लागेल. त्यांच्या मनांत जसजसा प्रेमाचा उदय होत जाईल तसतशी ज्ञानवृद्धि होईल. भक्ति व ज्ञानबलानें अनैक्याचा नाश व ऐक्याची संस्थापना होऊन मनुष्याचा धर्मावर पूर्ण विश्वास बसेल. लोकांस जेव्हां आपण मनुष्य आहों, आपला काय अधिकार आहे हें यथातथ्य समजेल

तेव्हांच त्यांची धर्मजागृती होईल. व नंतर आर्यधर्माबद्दल प्रेम उत्पन्न होईल. त्याचें खरें रहस्य समजून सार्वत्रिक अंतःकरणाची प्रेमळ समता उत्पन्न होईल. प्रेम हेंच जगाची आद्य शक्ति आहे. अवघें जग प्रेमानें परिबद्ध आहे; पण तेंच नाहींसें झालें तर मग काय राहिलें ? "

प्रकरण ३१ वें.

सन्मीलन–दुःखाचा शेवट आणि स्वातंत्र्यवृद्धि.

महाराणा व अनूपसिंह सुंदरीशीं संभाषण करीत आहेत इतक्यांत जयजयकारध्वनि ऐकूं येऊं लागला. प्रथमतः तो बऱ्याच अंतरावर होत असावा असें भासलें. नंतर तो अगदींच जवळ ऐकूं आला. त्याचा प्रतिध्वनि होतो न होतो तोंच जयश्री आपल्याबरोबर कित्येक वीर पुरुष, रामानुजस्वामि व क्रीडा यांसह तेथें येऊन पोंचला.

जयश्रीस पहातांच,महाराण्यास फार आश्चर्य वाटलें.तो प्रथम त्याला भेटला आणि विचारूं लागला, " हें काय ? जयश्री ! तुह्मीं इतक्या लौकर बरें कसें झालां ? आणि इकडे येण्याची त्वरा कां केली ? "

जयश्री नम्रतेनें ह्मणाला, ! ' महाराज, माझ्या बाहूंत जी बंदुकीची गोळी बसली होती त्या जखमेंतून अतिशय रक्तस्राव झाल्यामुळें मी मूर्छित पडलों होतों. कितीवेळ मी तशा अवस्थेंत होतों, हें मला माहीत नाहीं. मी सावध झालों आणि पाहिलें तों माझ्या हातांतील गोळी बाहेर पडली होती; आणि जखम देखील साफ बरी झाली होती; तेव्हां माझ्या मनास चांगली हुशारी वाटली. मीं तुमचा शोध केला तेव्हां तुह्मीं यवनांशीं युद्ध करण्यास गेला असें मला समजलें. युद्धाचें नांव ऐकतांच, माझ्यानें स्वस्थ रहावेना. यवन सेनापतीनें दिलेली तरवार तेथेंच पडली होती, ती मीं घेतली आणि तसाच निघालों. क्रीडाताई व स्वामिमहाराज मला न जाण्याचा आग्रह करीत होते. परंतु, माझ्यानें रहावेना. मी निघताच, त्यांच्या मनास समाधान वाटेना–न जाणो मी वाटेंतच कोठेंतरी असावध पडलों तर ?

असा विचार करून तींही मजबरोबर आली. मार्गांतच मला समजलें कीं, आमचा जय झाला. तेव्हां तर मला दुप्पट अवसान आलें आणि केव्हां एकदां तुमचें चरणदर्शन घेईन व अनूपसिंहास भेटेन असें झालें. अनूपसिंह! आज तूं यवनसेनापति हेमूस ठार मारिलेंस आणि यवनांचा पाडाव करून जी सत्कीर्ति मिळविलीस त्यामुळें मला फार आनंद झाला. आतां त्याच आनंदांत तुझ्या विजयी बाहूची आलिंगनानें पूजा करतों. तुझ्या पराक्रमाची कीर्ति जगांत अक्षय्य राहील. वीरगण तुझें यश सदैव गातील. जन्मास येऊन तूं आपल्या धैर्याची, शौर्याची व वीर्याची अजरामर कीर्ति केलीस. जगांत जोंपर्यंत इतिहास उपलब्ध असेल तोंपर्यंत त्यांत तुझें नांव सुवर्णाक्षरांकित राहील. तुझ्या कृत्याचा मला फार अभिमान वाटतो. तुझा गौरव तोच माझा सन्मान असें मी समजतों. तूं स्वदेशहितैषी, स्वदेशभक्त आणि वीर पुरुषश्रेष्ठ आहेस.'

अनूपसिंहानें असें ह्मणून त्यास दृढालिंगन दिलें व गंभीरतेनें ह्मणाला, 'सूक्ष्म विचार केला तर मी तुझा ऋणि आहे. अनेक जन्म घेऊन तुझें ऋण फेडण्याचा मीं प्रयत्न केला तरी तें फिटणार नाहीं. माझ्याकरतां तुला जे श्रम पडले तसें मजकडून तुजकरता कांहींच घडलें नाहीं. हें मी मोकळ्या मनानें कबूल करतों. माझें कर्तव्य मीं केलें आणि तूं जीं अलौकिक कृत्यें केलींस, तीं मनांत आणिलीं ह्मणजे तुला केवळ दैव समजून तुझी मीं निरंतर पूजा करणें न्याय्य आहे. तुझ्यासारखा खरा मित्र त्रिभुवनांत मिळणार नाहीं. माझें अनंत जन्माचें पुण्य होतें, ह्मणून तुझ्यासारखा मित्र मला मिळाला. माझेसंबंधानें तुला फार त्रास सोसावा लागला. त्याविषयीं तूं मला उदारमनानें क्षमा कर. मी हेमूचा शिष्य होतों, तरी माझ्या कर्तव्यानें मला त्याचा काळ बनविलें. त्या दुष्टांस ठार मारून मी कृतकृत्य झालों. माझ्या मित्राच्या रक्तपाताचा मोबदला मीं त्यास ठार मारून मिळविला. इतक्यानेंच मी धन्यता मानितों. असो, तुझ्या निःस्वार्थ प्रेमास मी साष्टांग नमस्कार करितों." असें ह्मणून त्यानें जयश्रीच्या पायांवर मस्तक ठेविलें.

जयश्रीनें अनूपसिंहास उचलून पुन्हा आलिंगन दिलें. दोघेही आनंदांत क्षणेक तल्लिन राहिले. नंतर जयश्री ह्मणाला, 'हें काय?'

रामानुज ह्मणाले, " अनूपसिंहानें असे लक्षावधी नमस्कार घातले तरी जयश्रीचे उपकार फिटणार नाहींत. अनूपसिंहानें रास्त केलें. "

अनूपसिंह स्वामीस नमस्कार करून ह्मणाला, " तुह्मीं माझे पूज्य गुरु आहां. केवळ तुमच्या कृपेनें माझे ज्ञानचक्षु उघडले. स्वामिमहाराजांच्या चरणधूलीचा मी दासानुदास आहे. "

जयश्री ह्मणाला, " यांच्याच कृपेनें माझा पुनर्जन्म झाला. मी असें ऐकतों कीं, मला जेव्हां मूर्छा आली; ते लोक ह्मणत होते कीं, मीं गतप्राण झालों; क्रीडा मजकरितां आकांत करीत होती; तेव्हां या स्वामींनीं मजकडे दयार्द्रदृष्टीनें पाहिलें. माझ्या जखमेवरून यांनीं आपला पवित्र हस्त फिरविला. यांनींच आपल्या हातांनीं गोळी बाहेर काढिली. जखम साफ बरी झाली. मी झटकन् उठून बसलों. या सत्पुरुषाच्या दर्शनानें आणि कृपाप्रसादानें मी इतका तरतरीत झालों कीं, लढाईचें नांव ऐकतांच येथपर्यंत धांवत आलों. "

जयश्रीचें भाषण एकतांच, महाराण्यानें रामानुजस्वामीस प्रणाम केला. आणि प्रौढतेनें ह्मणाला, ' स्वामिमहाराज ! आपल्या आशिर्वादानें अनूपसिंह विजयी झाला. जयश्रीचा पुनर्जन्म झाला. जयश्रीस पहातांच मला जो अत्यानंद झाला त्याचें वर्णन करण्यास मी असमर्थ आहें ! तुमच्याच कृपेनें आमचा जय झाला. तुह्मीं आमचें कल्याण करणारे आहां. आतां आपल्या दासावर कृपा करा आणि आनंदानें येथें रहा. हें तुमचें राज्य आहे. आह्मीं तुमचे दासानुदास आहों. तुह्मी जी आज्ञा कराल ती आह्मी शिरसा वंद्य मानूं. नेहमीं तुमची चरणसेवा करूं व स्वधर्मपालनांत दक्ष राहून तुमचें आशिर्वादानें देहाचें सार्थक्य करूं. '

धीरगंभीरतेनें रामानुजस्वामि ह्मणाले, ' राजन् ! फार दिवस झाले; मी पार्थिवभोगाशेचा परित्याग करून संन्यासाश्रमधर्म ग्रहण केला आहे. केवळ यवनभाराक्रांत भारतमातेचा, यत्नप्रयत्नानें यवनांच्या तडाक्यांतून उद्धार करावा; इतक्याच अभिलाषेनें एतावत्काल प्रयोजनानुसार कधीं यवनांच्या शिबिरांत गेलों; कधीं भयंकर युद्धांत गेलों; केव्हां भयानक अरण्यांत राहिलों; केव्हां गिरिकंदरांत वास्तव्य केलें; केव्हां नगरांत फिरलों आणि केव्हां खड्यापाड्यांत वास्तव्य करून कालक्रमणा केली.

आज परमेश्वराच्या कृपेनें तुमच्या राज्यांत चढाई करून आलेल्या यवनांचा नाश झाला. तुम्हीं त्यांचा पराभव केला; हें पाहून माझें अभीष्ट सिद्ध झालें असें मी समजतों. आतां लोकवस्तींत रहावें असा माझा बिलकुल उद्देश नाहीं. इले, पूर्वी एकदां तूं मजबरोबर वनवासांत येण्याची इच्छा प्रदर्शित केली होतीस. तेव्हां मीं तुला आजच बरोबर नेत नाहीं असें सांगितलें होतें. मीं तेव्हां तुझी अभिलाषा कां पूर्ण केली नाहीं ? हें आतां तुझ्या ध्यानांत चांगलें आलें असेल. तेव्हां यवनशिबिरांत तुझ्या वास्तव्याची अत्यावश्यकता होती. इतक्याकरतांच मला तसें करणें भाग पडलें. तुझ्या हातून जो कार्यभाग साध्य करून घ्यावयाचा होता तो जगदीश्वराच्या कृपेनें आज सिद्धीस गेला. आतां तुझी इच्छा असेल तर मजबरोबर चल. तुझें यवनांच्या हातून संरक्षण व्हावें एतदर्थ माझ्या शिष्याकडे हा त्रिशूल देऊन मींच त्याला तिकडे पाठविलें होतें. याच पवित्र त्रिशूलानें तुझें रक्षण केलें. सदानंदानें तुला ज्या मंत्राचा उपदेश दिला— ज्या सर्वोत्कृष्ट मंत्राची दीक्षा दिली—त्याच्या प्रतापानें अखिलपातकांचा विध्वंस होऊन तूं शुद्ध झाली आहेस. तुझा महान् उद्देश मला माहीत आहे. आतां तो ज्या रीतीनें सिद्धीस जाईल असा सदुपाय मीं करीन. त्याविषयीं तूं अगदीं चिंता वाहूं नकोस. अनूपसिंह, आतां तूं आपल्या स्त्रीपुत्रासह सुखानें गृहस्थाश्रमधर्माचें पालन कर. सद्धर्मवासना ठेव. यवन शत्रूंच्या तडाक्यांतून जन्मभूमीचें व सनातन आर्यधर्माचें रक्षण कर. म्हणजे जगदीश तुझें कल्याण करील. मी कोठेंही असलों तरी तुमचें कल्याण चिंतीत राहीन. आतां मी जातों—हो; एक गोष्ट राहिली. जयश्रीस तूं आपल्या बंधूसमान मान. त्याशीं तुझें निष्कपट प्रेम आहेच, पण तें दिवसेंदिवस ज्या सदुपायांनीं वृद्धिंगत होईल असा प्रयत्न कर. या पापमय जगांत जयश्रीसारखा खरा मित्र दुसरा मिळणार नाहीं. जयश्रीसारखा सन्मित्र ज्याला मिळेल, त्यास कोणत्याही गोष्टीची कधींच न्यूनता पडणार नाहीं. तोच खरा सुखी. त्याच्या सौख्यास सीमा नाहीं. फार काय सांगूं ? त्याला कधीं दुःख होणार नाहीं. खरोखरच हा जयश्री सत्पुरुष आहे. जयश्री ! तूं शूर, धैर्यवान आणि परोपकाररत महत्पुरुष आहेस. तुझ्या हृदयांत स्वार्थाचा

गंध येणार नाहीं. म्हणूनच तूं आत्मसौख्यावर जलांजली देऊन आपल्या बंधूस सौख्य दिलेंस. तुझें निःस्वार्थ प्रेम आहे. एतदर्थ तूं आपल्या मित्रास सौख्य देण्यास समर्थ झालास. जयश्री, या स्वार्थांध जगांत बंधु या नांवाचें तूंच सार्थक्य केलेंस. क्रीडेवर तुझें भगिनीसारखें प्रेम आहे यांत मुळींच संदेह नाहीं. क्रीडा तुला बोलू नये तें बोलली- तिनें तुझा महान अपराध केला- हें जरी खरें तरी तिला तूं उदारमनानें क्षमा कर. कारण ती क्षम्य स्त्री आहे. ती साध्वी-सती-स्त्री आहे. ती पतिविरहानें व्याकुळ झालेली असतांना तुला अनुचित व कठोर भाषण बोलली. परंतु, ती देहभानावर नसतांना तसें बोलली आहे. हा विचार करून तूं तिचें भाषण विसरून जा. तुला मी सांगावें असा अर्थ नाहीं. कारण, तूं प्रोक्त विचारी व उदारमनाचा गृहस्थ आहेस. खरोखर या जयश्रीसारखें सद्रत्न मिळावयाचें नाहीं. हा सकल सद्गुणांचें वसतिस्थान आहे. महाराज ! हा जयश्री तुमच्या राज्याचा आधारस्तंभ आहे.'

क्रीडा रामानुजस्वामीस हात जोडून ह्मणाली, "तुह्मी देव आहां. तुह्मीं त्रिकालज्ञ — सर्वज्ञ आहां. संसार तुह्मांस हस्तामलकवत् आहे. तुह्मांसारख्या साधुश्रेष्ठांस मी अल्पमतीनें काय सांगावें ? मी अज्ञान आहे. त्यांत विरहदुःखानें मी गांजलेली असतांना मजकडून जे अपराध घडले असतील त्यांची सर्वांनी थोरमनानें मला क्षमा करावी हेंच पदर पसरून माझें मागणें आहे मी सर्वांनाच फार टाकून बोललें; पण मला आतां त्या गोष्टीचा फारच पश्चात्ताप होत आहे."

रामानुजस्वामी ह्मणाले, "पश्चात्ताप हीच शुद्धि आहे. तुझ्यासारख्या सती स्त्रियेस याहून जास्त प्रायश्चित्ताची गरज नाहीं. मी स्वतः अलौकिक शक्तिसंपन्न मनुष्य नाहीं. मला कांहीं समजत नाहीं. परंतु, कित्येक लोक माझ्या अंगी कांहीं तरी अद्भुत तेज आहे असें जें समजतात तें तुझ्यासारख्या पतिव्रता स्त्रियांच्या आशिर्वादाचेंच फल होय. साध्वी स्त्रियांच्या कृपेचाच तो प्रसाद. आज पूर्वस्थिती हळूहळू जागृत होऊं लागली. गतकथा मूर्तिमंत अंतःकरणांत उभ्या राहूं लागल्या. क्रीडे ! तुझ्यासारखीच सुस्वरूप आणि सद्गुणसंपन्न पतिप्राणार-

मणी माझ्या घरांत लक्ष्मीसारखी नांदत होती. परंतु, फारच थोड्या दिवसांत तिनें परलोकीं गमन केलें. आणि माझ्याही वैराग्याचें कारण तेंच. स्त्री मरण पावतांच, जमीनजुमला, धनदौलत, घरदार, गुरेंवासरें इत्यादि गोर-गरिबांस दान दिलें आणि शिरमुंडन करून कांहीं काळ योगसाधनांत घालविला. कित्येक दिवस निराहार व निरूदक राहिलों. महान् महान् साधुपुरुषांचें दर्शन घेतलें. कित्येक पुण्यक्षेत्रें व तीर्थें पाहिलीं आणि आपल्या हातून होईल तितका धर्मप्रसार करावा व देह ठेवावा असा निश्चय केला. हेमूस प्रारंभीं भेटलों. त्याला आपलासा करून घेतला. त्याकडून हुमायुनास बंगाल प्रांतांतून हाकून काढविलें. तेव्हां मोंगल आणि पठाण यांत भयंकर लढाई होऊन शेंकडों यवन लोक मृत्युमुखीं पडले. हेमू त्या जयानें उन्मत्त झाला आणि असेच जय मिळवून आपण सार्वभौमराजा होऊं असें मनांत आणून तो इकडे युद्धास आला परंतु, त्याचा जय होणार नाहीं हें मला पक्कें माहीत होतें. तरी त्याची फजिती व्हावी इतक्याकरतांच मी अलिप्त राहिलों. आतां मी फार वृद्ध झालों आहें. आतां युद्धासारख्या भानगडींत आपण पडूं नये असा माझा निश्चय ठरला आहे. दैवीं असेल तें कोण चुकवील ? तरी मी एक उपाय सांगतों. हेमू असावध पडला आहे. त्याला मी सावध करतों. तुह्मीं भिऊं नका. मी खात्रीनें सांगतों, हेमू जिवंत झाला तरी यापुढें तुह्मांशीं शत्रुत्व करणार नाहीं. त्याला चांगला पश्चाताप झाला आहे. तो तुमच्या पक्षांत मिळून मिसळून राहील. तुमचे हिताकरितां फार परिश्रम करील. तो दुराग्रही आहे हें जरी खरें तरी मोठा साहसी, शूर व बलवान् आहे. लौकरच पानीपतच्या जंगी रणमैदानांत घनघोर युद्ध होईल. त्यांत हा मोठें साहसकर्म करील. परंतु, हा त्याच लढाईंत गतप्राण होईल. अनूपसिंह ! हेमुनें तुला शस्त्रास्त्रविद्या शिक-विली. तो तुझा शिक्षादाता गुरु होय. त्यानेंच तुझा प्रतिपाल केला. आतां तुझा त्याचा जरी कांहीं संबंध नसला तरी तूं त्याचा ऋणी आहेस. तूं त्याचा सत्कार करणें न्याय्य होय. हेमूचा समरंगणांत तूं पाडाव केलास किंवा ठार मारिलेंस तरी त्याविषयीं तुला कोणीच दोष देणार नाहीं. कारण, युद्धभूमीवर तुह्मीं परस्परांचे शत्रु ह्मणून उभे

राहिला होता. परस्परांचा यत्नप्रयत्नानें विनाश करणें हेंच तुमचें कर्तव्य होतें. आता त्याच्या पक्षाचा सर्वथैव मोड झाला आहे. आतां तो तुह्मांस शरण आला आहे असें समजून त्याचा यापुढें गौरव करणें तुला भाग आहे. याच्या हातून राजपुतान्याचें पुष्कळ हित होण्याचा संभव आहे. तो नामांकित योद्धा आहे. यापढें हा सन्मतीनें वागेल अशी मी तजवीज करतों तुह्मीं अगदी भिऊ नका. ”

महाराणा ह्मणाला, ‘ ज्या मार्गानें आमचें कल्याण होईल तें करणें तुमच्या स्वाधीन आहे. आह्मां अल्पमतीस काय समजतें ? ’

रामानुजस्वामि ह्मणाले, ‘ परमेश्वराशिवाय कोणी सर्वज्ञ नाहीं. तुह्मीं स्वस्थ रहा. ’ असें सांगून तो हेम प्रेतवत पडला होता तेथें आला. त्याच्या जखमेवर त्यानें औषधी लाविली आणि आपल्या कमंडलूंतील पाणी तोंडानें काही मंत्र ह्मणून त्यावर शिंपडलें. हेमूची जखम तत्काल बरी झाली आणि तो झोंपेतून उठतांना जसे आळापळे देऊन उठतो तसा उठून बसला. त्यानें नेत्र उघडून चोहांकडे न्याहाळून पाहिलें. आणि आपली पूर्वस्थिति आठवून तो ह्मणाला, ‘ कोठें आहे अनूप ? ’

रामानुजस्वामि ह्मणाले ‘ हम ! चांगला सावध झालास ? तुझी मूर्छा गेली ? तूं येथें मृत्युमुखांत पडला होतास हें तुझ्या ध्यानांत आहे ? तूं मरून पडला होतास तुला कशाचें स्मरण ? परंतु यापूर्वी तुझी काय स्थिति होती तिचा विचार कर ’

हेमू लीनतेनें ह्मणाला, ‘ मी देहभानावर नव्हतों ’

रामानुजस्वामीनें सांगितलें, ‘ असें खरें. अनूपसिंहाशी तूं युद्ध करीत होतास. त्यानें तुला ठार मारिलें होतें मीं तुला काळाच्या तोंडांतून ओढून काढिलें आहे मीच तुझे प्राण वाचविले आहेत. मी तुला जीवदान दिलें आहे. आतां मी सांगतो ते मन देऊन ऐक. या युद्धात तुमचा जय होणार नाही असें मीं निक्षून सांगितलें होतें तें तुझ्या स्मरणांत आहे ? ’

हेमू नम्रतेनें ह्मणाला, ‘ आहे ’

रामानुजस्वामि ह्मणाले, ‘ हुमायूनास बंगाल्यांतून हांकून लावण्याच्या कामीं माझी तुला किती मदत होती हें तुला आठवतें ? ’

हेमू म्हणाला, ' होय. '

रामानुजस्वामि ह्मणाले. ' आजपर्यंत मी तुझ्या किती उपयोगीं पडलों त्याचा विचार कर आणि मी सांगतों तें ऐकेन अशी प्रतिज्ञा कर. '

हेमू ह्मणाला. ' मीं तुमचें ऐकलें नाहीं यामुळें माझें फार नुकसान झालें. आतां मी कुराणाची शपथ वाहून सांगतों कीं, जें तुह्मी सांगाल त्याप्रमाणें मी वागेन. त्यांत कधींही अंतर करणार नाहीं. '

रामानुजस्वामि ह्मणाले. ' न्यायानें वागणाऱ्यास पशुपक्षी देखील सहाय्य करितात आणि अन्यायाचरण करणाराचे आप्तइष्ट देखील त्याग करितात. तूं अन्यायाचरण केलेंस ह्मणून तुझा पराजय झाला. ' रजपुतांशीं तह करूं ' असें तुला मीं सांगत होतों. परंतु, माझें तूं ऐकिलें नाहींस. असो; आतां गतगोष्टींचा कोणीच विचार करूं नये हेंच उत्तम. आजपासून तूं रजपुतांचा द्वेष करूं नकोस. त्यांशीं सख्यत्वानें वाग. दिल्लीपति तुला जें वेतन देत होता त्यापेक्षा हे महाराज कांहीं जास्त देतील. आतां हेच तुझे धनी आणि तूं त्यांचा निमकहलाल नोकर अशा नात्यानें वाग. कारण, रजपूत लोकांनीं तुजवर फार उपकार केले आहेत. त्यांच्या कृपेनें तूं मेलेला वांचलास— त्यांनींच तुला प्राणदान दिलें— संकटमुक्त केलें. तूं शूर पुरुष आहेस. महाराजांची आज्ञा शिरसावंद्य करून इमानें इतबारें वागलास तर ते तुला कधीं परकी समजणार नाहींत. निमकहराम होऊं नकोस. सत्याचा जय आणि असत्याचा पराजय होतो हें नीट ध्यानांत ठेव. सारांश, पापकर्दमानें लिप्त होऊं नकोस. परोपकार करण्याची संवय ठेव. न्यायान्यायाचा विचार करून वाग. दुराचरण करूं नकोस. स्वामिनिष्ठेनें वाग ह्मणजे जगदीश तुझें कल्याण करील. '

हेमू ह्मणाला, " मी आपल्या आज्ञेप्रमाणें वागेन असें शपथ वाहून सांगतों. आतां मला पूर्ण पश्चात्ताप झाला. यापुढें मी कधीं अन्यायाचरण करणार नाहीं. मीं केलेल्या अपराधाची सर्वांनीं मनापासून मला क्षमा करावी. "

क्रीडा इन्दुलेजवळ गेली आणि तिला सांगूं लागली. ' तूं मानवी स्त्री नव्हेस. प्रत्यक्ष देवी आहेस. तुझ्या कृपेनें माझा पति, पुत्र आणि

भाऊगय वांचला. तूं विज्ञानरूपिणी आदिशक्ति आहेस. तुझे गुणानुवाद गावयास सहस्रमुखाचा शेषही थकेल; मग माझी कथा काय ? ' '

इला स्मितहास्य करून म्हणाली, ' तूं पतिव्रता स्त्री आहेस. तुझ्या पतिभक्तीच्या बलानेंच तुझा पति, पुत्र व बंधु तुला भेटले केवळ तुझ्या पुण्यबलानेंच असें झालें. मीं कांहीं केलें नाही. क्रीडे ! या जगांत भक्तिच सर्वांत श्रेष्ठ आहे. भक्तिच मुक्तीचें साधन आहे. भक्तिपुढें, दया ज्ञान-यश-धर्म-कर्म-ध्यान यांचीही प्रतिष्ठा नाहीं बाई ! तूं साक्षात् भक्तिरूपिणी लक्ष्मी आहेस. ये ! ये ! तुझें कंठालिंगन करून माझें हृदय शांत करूं दे. '

इलेनें हस्तयुगुल प्रसृत करून क्रीडेस कंठालिंगन दिलें. क्रीडाही तशीच प्रेमानें तिला भेटली तो अपूर्व प्रेक्षणीय देखावा पाहून रामानुज-स्वामि हर्षभरित झाले आणि त्यानीं त्यांस नमस्कार घालून सांगितलें. ' आज माझा मंत्र सिद्ध झाला. माझ्या अभीष्ट देवीचेंच मला दर्शन झालें असें वाटतें. आहा ! काय अत्याश्चर्यकारक भेट ही ? शक्तीशी भक्तीची भेट झाली. परंतु या भेटीस, मानवमंडलाच्या मनांत स्थळ मिळेल असें मला वाटत नाहीं. दुर्भाग्य ! महत दुर्भाग्य ! त्याला कोण काय करील ? '

स्वामीनीं आपल्यास नमस्कार केला असें समजून इला चकित झाली. ती व्यग्रतेनें चहूंकडे पाहूं लागली. हळुहळू तें पहाणें फारच उग्र दिसूं लागलें. तिनें आपल्या हातांतील माळा गळ्यांत घातली. आणि एकसारखा अट्टहास चालविला. ती भयंकर दिसूं लागली. तिच्या कंठांतील माळा, मुंडमाला तर नव्हेना ? असा भास होऊं लागला. हातांत त्रिशूळ होताच. तिची परमभयानक मूर्ति पहातांच भीतिनें क्रीडा तिच्या मागें जाऊन उभी राहिली. भयानें तिनें आपले दोन्ही हात वर केले तेव्हां तर इला प्रत्यक्ष चतुर्भुजा देवीच आहे असें सर्वांस दिसलें. ती उग्रस्वरूपानें जिकडे तिकडे पाहूं लागली. आतां ही काय करते कोण जाणें ! या विचारांत महाराणा वगैरे मंडळी आहेत; तोंच रामानुजस्वामीनें पुन्हा इला व क्रीडा यांकडे पाहिलें. परंतु त्याला ती युगलमूर्ति दिसली नाहीं. तेव्हां तो इलेस सांगूं लागला, " माते ! अशी परमभीषण— अशी उग्र

मूर्ति–असें भयानक स्वरूप दाखवून भिववूं नकोस. हें तुझें अज्ञानसंतान विज्ञान व भक्ति यांची संयुक्त मूर्ति पाहूं इच्छितें. आतां मी येथें रहात नाहीं. मला आज्ञा द्या. मी वनवासांत जातों. आणि ह्याच अभीष्ट मूर्तीचें ध्यान करीत स्वस्थ रहातों. ”

असें सांगून रामानुजस्वामि तेथून जाऊं लागले. इलाही त्यांच्या मागून निघाली. आणि जातां जातां हेमूस सांगूं लागली, “ तुझी पुन्हां भेट झाली. असो; मागील सर्व गोष्टी आतां विसरून जा. नीतीनें वाग. सत्कर्म करून जगांत कीर्ति गाजव. असत्कर्म करूं नकोस. दया, क्षमा आणि शांति धर. जगदीश तुझें मंगल करो. ”

इला रामानुजस्वामीस विचारूं लागली, “ आतां माझी काय दशा होणार ”

रामानुजस्वामि म्हणाले, ‘ तें मी तुला पुढें सांगेन. परंतु, तुझें चित्त एकाएकीं साशंक कां झालें ? तूं इतक्या संदेहांत कां पडलीस ? परमेश्वर पतितांचा उद्धारकर्ता आहे. तो पातकीजनांस पातकसमुद्रांतून तारितो; ह्मणून त्याला पतीतपावन असें ह्मणतात. तो परमदयाळु, परमपवित्र आहे. तो दयामय आहे. तूं अगदीं काळजी करूं नकोस. ’ कांहीं वेळ विचार करून ते पुन्हां म्हणाले ‘ हें बरोबर, मी समजलों. तुझ्या मनांत एकाएकीं कां संदेह आला ? तें माझ्या ध्यानांत आलें. तुझ्या कंठांत शक्तिचिन्ह रुद्राक्षमाला आहे. भक्तिचिन्हाचा अभाव आहे. एतदर्थ, संशयबुद्धीचा उदय झाला. ठीक आहे. माझें गळ्यांतील तुळशीची माला तुझे गळ्यांत घालितों आणि नारायणाच्या बीजमंत्राचा तुला उपदेश देतों. इतका संस्कार केला कीं, तुझी ज्ञानदृष्टि उघडेल आणि भक्तिरसाचा सागर उचंबळूं लागेल. ’ स्वामीनें तसें करतांच इला जगदीशाचिंतन करीत स्वामीच्या मागून जाऊं लागली.

अशा अलौकिक लीला अवलोकन करून महाराणाप्रभृति सर्व मंडळी आश्चर्यानें थक्क झाली ! ती विस्मित होऊन कांहीं बोलणार इतक्यांत हेमू ह्मणाला, ‘ स्वामीच्या कृपेनें माझा पुनर्जन्म झाला. तरी या सर्व कृत्यास तुह्मींच कारण आहां. मी तुह्मां सर्वांचे फार फार आभार मानितों. स्वामीनीं मला जी आज्ञा केली आहे त्याप्रमाणें इमानेंइतबारें वागण्याचा मी दृढ-

निश्चय केला आहे. तुमच्या सेवेंत मी एकनिष्ठेनें वागेन. अन्यायांचरण करणार नाहीं. आतां मी जें सांगितलें त्यांत बिलकुल अंतर होणार नाहीं. '

महाराणा ह्मणाला, " तुझें सांगणें सत्य असेल. आणि तूं शपथ वाहिली आहेस. त्यावरून तसा वागशील यांतही शंका नाहीं. परंतु, आमच्या मनाची खात्री होईपर्यंत चितोडच्या किल्ल्यांत तुला नजरकैदेंत रहावें लागेल. तुझें चरित्र शुद्ध आहे. तुझ्या पातकास चांगलें प्रायश्चित्त मिळालें. तूं पापकर्दमानें पुन्हां लिप्त होणार नाहींस अशी आमची खात्री झाली ह्मणजे आह्मीं तुजवर विश्वास ठेऊन वागूं. मग तूं आमचा बंदि नव्हेस. तर आमचा हितकर्ता—व आधारस्तंभ आहेस असें समजून स्वामिमहाराजांनीं सांगितल्याप्रमाणें व्यवस्था ठेऊं. त्यांत आमच्याकडून कधींही अंतर होणार नाहीं हेंही आह्मी शपथपुरःसर सांगतों. तूं किल्ल्यांत राहिलास—आह्मी तुला कैदी असें ह्मटलें तरी तुझ्या दर्जांत किंवा [illegible] रातवांत आमच्याकडून [illegible] नाहीं. आतां तूं जा. आमचें सांगणें वाजवी नाहीं असें तुला वाटत असेल तर स्पष्ट सांग ? "

हेमू ह्मणाला, " विश्वास पटेपर्यंत कोणीही असाच वागेल. त्याविषयीं माझें कांहीं ह्मणणें नाहीं, मी महाराजांचा बंदा आहें. तुमची आज्ञा मला मान्य आहे. "

महाराणा ह्मणाला, ' ठीक आहे. बळवंतसिंह, याला घेऊन तुह्मीं जा आणि सांगितल्याप्रमाणें व्यवस्था ठेवा. '

' आज्ञा ' ह्मणून बळवंतसिंह, हेमूस घेऊन चितोडगडाकडे निघाला.

महाराण्यानें अमात्यास सांगितलें ' आज महामायेच्या कृपेनें आम्हांस विजय प्राप्त झाला आहे. नगरांत अवश्य विजयोत्सव झालाच पाहिजे. तुह्मीं पुढें जा. हत्तीवरून साखरा वांटा. डांगोरा पिटवून आमच्या विजयाचें वर्तमान नगरवासी जनांस कळवा आणि विजयी वीरांच्या स्वागतार्थ सौभाग्यवती स्त्रियांस सन्मानानें पाठवा. तुह्मीं सुज्ञच आहां. तुह्मांस प्रल्हादानें सांगितलें पाहिजे असा अर्थ नाहीं. आपल्या प्राचीन पद्धतिप्रमाणें सर्व व्यवस्था यथास्थित ठेवा म्हणजे झालें. आमच्या मनांतून विजयी वीरांचा आदर व सन्मान स्वतः करावा असें आहे. याकरतां मी किल्ल्यांत जातों. '

महाराण्याच्या आज्ञेप्रमाणें नागरिक जनांनीं गुढ्या, तोरणें, आम्रपल्लव, ध्वज, पताका आणि पुष्पमालादिकांनीं उदयपूर शृंगारिलें. जयडंका वाजूं लागला. रांगोळ्या व सुगंधसड्याची तर एकच गर्दी उसळली. जिकडे तिकडे अत्यानंद झाला. बंदी व भाट, महाराण्याचे स्तुतिपाठ गाऊं लागले. जलपूर्ण घट व मांगलिक द्रव्यें घेऊन गजगतीनें सुंदर व कोकिलकंठ स्त्रिया मंगलगीत गात सामोऱ्या चालल्या. महाराणा, जयश्री व अनूपसिंह यांच्या जयजयकारानें दाही दिशा गजबजल्या आणि मोठ्या थाटमाटानें वीरश्रेष्ठांनीं सैनिकगणांसह नगरप्रवेश केला. तेव्हां अष्टदिशाकडून ' स्वधर्माचा जयजयकार असो. सत्याचा जयजयकार असो. ! ! ' असे आनंदध्वनि निघूं लागले.

समाप्त.